राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ३९९/०९, ४००/०९ व ४०१/०९

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३९९,४०० व ४०१
निर्णय दिनांक ०१/०१/२०१०

१ श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल : अपिलार्थी
रा. जाफ्राबाद, जि. जालना

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तालुका कृषि अधिकारी,
तालुका कृषि कार्यालय, जाफ्राबाद, जि. जालना

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी,
जाफ्राबाद, जि. जालना

निर्णय

श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १८.०५.२००९ रोजी केलेली दि. १९.०५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेली तीन स्वतंत्र व्दितीय अपिले आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. १८.०८.२००८ रोजीच्या तीन स्वतंत्र माहितीच्या अर्जांसंबंधी दि. ०७.११.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे तीन स्वतंत्र प्रथम अपिले केली होती. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलांवर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेली व्दितीय अपिले आयोगाकडे दाखल केली आहेत.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपिलांची प्राथमिक तपासणी केली असता, ही अपिले अपिलार्थीने प्रथम अपिलांच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ७१ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल

केली आहेत. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीची प्रस्तुतची अपिले फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१) अपील क्र. ३९९/०९, ४००/०९ व ४०१/०९ फेटाळण्यात येत आहेत.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक : ०१/०१/२०१० **राज्य माहिती आयुक्त,**
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१) श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल, बाजार गल्ली, मेनरोड, जाफ्राबाद, जि. जालना.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३०१

निर्णय दिनांक ०१-०१-२०१०

१ श्री. भारत छोटुलाल चव्हाण, : अपिलार्थी

व्दारा- कापड विक्री केंद्र, पोलीस लाईन, उस्मानाबाद

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी

तथा उप अभियंता,

जिल्हा परिषद (बांधकाम) उपविभाग, उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा कार्यकारी अभियंता,

जिल्हा परिषद (बांधकाम) विभाग, उस्मानाबाद

त्रयस्थ पक्ष : १. श्रीमती मेघमाला रावसाहेब जाधव,

२. श्री. सुहास श्रीराम देशमुख

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर ७२ दिवसांनी सुनावणी घेतल्यामुळे आणि जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक ०१-१०-२००८ रोजीच्या पत्राव्दारे दिलेली माहिती चुकीची असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती त्यांना चुकीची वाटत असल्यासंदर्भात त्यांनी, या माहितीव्दारे त्यांना प्राप्त झालेले संमतीपत्र हे कायदेशीर नाही, अधिकृत नाही व संमतीपत्रावर कराराचे मुद्रांक शुल्क दिलेले नाही आणि हे संमतीपत्र नोंदणीकृत नाही अशी कारणे देऊन त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०१-१०-२००८ रोजी चुकीची माहिती पुरविली असल्याचे त्यांनी विचाराधीन अपील अर्जामध्ये नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक २२-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे " उस्मानाबाद गट नंबर ६१४ येथील शेततळ्याचे लाभार्थी मेघमाला रावसाहेब जाधव यांनी श्री. सुभाष देशमुख यांना त्यांच्या वतीने त्यांचे प्रतिनिधी म्हणून काम पाहण्यासाठी दिलेल्या संमतीपत्राची सत्यप्रत " ही माहिती रजिस्टर्ड पोस्टाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २३-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २७ इतके त्यांना रोखीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने दिनांक २७-०९-२००८ रोजी या शुल्काचा भरणा केल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०१-१०-२००८ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०-१२-२००८ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही उचित असल्याचा निष्कर्ष काढून अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष श्री. सुहास श्रीराम देशमुख हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क दिनांक २७-०९-२००८ रोजी भरल्यानंतर त्यांनी दिनांक ०१-१०-२००८ रोजी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती सशुल्क पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे त्यांना जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती खोटी असल्याच्या कारणावरुन व्दितीय अपील केले असून या प्रकरणी आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांना परत मिळावे अशी त्यांनी या अपिलाव्दारे आयोगाकडे विनंती केली आहे.

अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती चुकीची का वाटते याबाबत आयोगाकडील केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये विविध कारणे नमूद केली आहेत. अपिलार्थीच्या मते सदरचे संमतीपत्र अधिकृत व कायदेशीर नाही. या संमतीपत्रावर कराराचे मुद्रांक शुल्क दिलेले नाही आणि ते नोंदणीकृत केलेले नाही. अपिलार्थीने निर्देशित केलेली ही कारणे या प्रकरणी लागू होत नाहीत. कारण माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात त्यांनी ती अर्जदारास अधिनियमातील तरतुदीनुसार उपलब्ध करुन देण्यासंदर्भात निर्णय घेणे एवढीच प्रक्रिया अभिप्रेत आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेले श्रीमती जाधव यांचे कथित संमतीपत्र केवळ त्या पत्रावर मुद्रांक शुल्क नाही म्हणून ते कायदेशीर नाही अथवा नोंदणीकृत नाही म्हणून ही माहिती चुकीची आहे असे म्हणता येणार नाही. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये सदर संमतीपत्र कायदेशीर नाही असे म्हटले आहे. परंतु ते निश्चितपणे, कसे कायदेशीर नाही, ते कसे अधिकृत नाही यासंदर्भात कोणताही खुलासा केलेला नाही आणि याही उपर महत्त्वाचे असे आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी त्यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्याच स्वरुपात ती अधिनियमातील विहीत तरतुदींचे पालन

करुन अपिलार्थीस उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे अपिलार्थीचा, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी चुकीची माहिती दिल्याचा मुद्दा, आयोग फेटाळून लावत आहे.

अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या माहितीसंदर्भात त्यांना कळविण्यात आलेल्या शुल्का-बाबत असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीचा दिनांक २२-०८-२००८ रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाव्दारे दिनांक २६-०८-२००८ रोजी प्राप्त झाला. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस शुल्क भरावयास लिहिलेल्या पत्राचा दिनांक आणि प्रत्यक्षात अपिलार्थीने भरणा केलेल्या शुल्काचा दिनांक यातील फरक लक्षात घेता जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस ही माहिती दिनांक २९-०९-२००८ रोजी अगर तत्पूर्वी सशुल्क देय होती. परंतु या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०१-१०-२००८ रोजी म्हणजे अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी व्यपगत झाल्यानंतर दिली आहे. त्यामुळे अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील कलम ७ (६) प्रमाणे विनामूल्य माहिती मिळण्यास पात्र होत आहेत. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रुपये २७ इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून या प्रकरणी माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रुपये २७ इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक ०१-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. भारत छोटुलाल चव्हाण, व्दारा- कापड विक्री केंद्र, पोलीस लाईन, उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम) उपविभाग, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम) विभाग, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३०२

निर्णय दिनांक ०१-०१-२०१०

१ श्री. मुनव्वर अहेमद नईम अहेमद, : अपिलार्थी

व्दारा- प्लॉट नं. ४०, अब्दुल माजीद, न्यू एस. टी. कॉलनी,

औरंगाबाद

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी

तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद,

औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : ३. सौ. शेख सालेहा परवीन,

४. शेख आमेना कौसर

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे माहिती अधिकारी यांनी त्यांना तीन आठवड्यात माहिती दिली नाही. त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असून

संबंधितांवर माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई व्हावी अशी त्यांनी या अर्जामध्ये आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, श्री. अदनान खान यांनी दिनांक १३-०८-२००८ रोजी केलेल्या तक्रार अर्जावर चौकशी केली असल्यास चौकशी अहवालाची झेरॉक्स प्रत व यासंदर्भात संबंधितांवर करण्यात आलेल्या करवाईची माहिती, व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १९-१२-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेली चौकशी तीन आठवड्याच्या आत पूर्ण करुन अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस कोणतीही माहिती न दिल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी आणि त्रयस्थ पक्ष हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने चौकशी प्रकरणा-संदर्भात माहिती मागितली असल्यामुळे आणि त्यांनी माहितीसाठीचा अर्ज ज्यावेळी दाखल केला होता त्यावेळी ही चौकशी पूर्ण झाली नसल्यामुळे ते अपिलार्थीस त्यावेळी कोणतीही माहिती देऊ शकले नाहीत. तथापि त्यांनी प्रथमतः दिनांक १९-०३-२००९ रोजी या चौकशी प्रकरणात त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या खुलाशाच्या प्रती अपिलार्थीस पुरविल्या व अंतीमतः अपिलार्थीस दिनांक ०२-०६-२००९ रोजी या चौकशी अहवालाच्या प्रती विनामूल्य पुरविल्या आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अंतीमतः त्यांच्याकडील दिनांक ०२-०६-२००९ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस अपेक्षित असलेली संपूर्ण माहिती विनामूल्य पुरविली आहे. अपिलार्थीस या प्रकरणी त्यांच्या दिनांक ०६-१०-२००८ रोजीच्या प्रथम अर्जावर, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने केलेल्या तक्रार अर्जावर अद्यापपावेतो चौकशी पूर्ण न झाल्याने कोणतीही कारवाई झाली नाही असे उत्तर विहित मुदतीत देणे समर्पक ठरले असते. केवळ अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने ते अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात संदर्भित केलेले चौकशी प्रकरण पूर्ण होण्याची वाट पाहत राहीले व तदनंतर अपिलार्थीस विनामूल्य माहिती पुरविली. यावरुन जन माहिती अधिकारी यांचा अपिलार्थीपासून कोणतीही माहिती लपविण्याचा असद्हेतू असावा असे निःसंशयपणे सिध्द होत नाही. त्यामुळे अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये विनंती केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्यावर कोणतीही कारवाई आयोग आदेशित करत नाही. अपिलार्थीस अपेक्षित माहिती त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील केल्यानंतर पूर्ण स्वरुपात मिळाली असल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

<u>आदेश</u>

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक ०१-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुनवर अहेमद नईम अहेमद, व्दारा, प्लॉट नं. ४०, अब्दुल माजीद, न्यू एस. टी. कॉलनी, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१०८

निर्णय दिनांक ०१.०१.२०१०

१ श्री. अर्जुन नागोराव सावंत, : अपिलार्थी

मु.पो. कुप्पा, ता. वडवणी, जि. बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा

उपअभियंता, जिल्हा परिषद बांधकाम

उपविभाग, माजलगांव, जि. बीड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग क्र.-२,

जिल्हा परिषद, बीड

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५.०९.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून, या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांचेवर दंडात्मक व शिस्तभंगाची कार्यवाही करुन अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे आयोगाने आदेशित करावे. या अर्जामध्ये त्यांनी असेही नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक ३०.०५.२००८ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी, या अर्जासोबत जोडलेला टाईप केलेला मजकूर असलेल्या कागदपत्रावर, माहिती मिळाल्याचे लिहून देण्याचे कथन त्यांनी स्पष्टपणे नाकारल्यामुळे विचाराधीन प्रकरण गंभीर स्वरुपाचे आहे असे वाटल्यावरुन, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, मौजे कुप्पा, तालुका वडवणी, जिल्हा बीड येथील इंदिरानगर ते महादेव मंदीर रस्ता दुरुस्ती कामाचे अंदाजपत्रक, टेंडर वर्क ऑर्डर, एम.बी. च्या बिलाच्या झेरॉक्स प्रती यांची माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २५.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ३४ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले आणि त्यांनी मागणी केलेल्या माहितीपैकी सदर कामाचे बील आणि निविदा विभागीय कार्यालयाकडून उपलब्ध करुन घेण्याचे अपिलार्थीस निर्देश दिले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात न करता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांचे दिनांक २५.०४.२००८ रोजीचे पत्र त्यांना दिनांक ०७.०५.२००८ रोजी प्राप्त झाले असल्यामुळे, सदर माहिती विनामूल्य प्राप्त होण्याकरता जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २७.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २६.०६.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस ३ दिवसाच्या आत अधिनियमातील कलम ७ (६) च्या तरतुदीच्या अधिनियमामध्ये माहिती पुरविण्याचे सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०४.०७.२००८ राजीच्या पत्राद्वारे त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती पुरविली. या पत्रामध्ये माहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी टेंडर व बिलाच्या प्रतीबाबत अपिलार्थीस विभागीय कार्यालयाशी संपर्क साधण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अशाप्रकारच्या प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी, त्यांच्या कार्यालयाकडील उपलब्ध माहिती दिनांक ०४.०७.२००८ रोजी, कार्यकारी अभियंता यांच्या निर्णयानुसार विनामूल्य पाठविल्याचे आयोगास अवगत केले आहे व तसेच त्यांनी आयोगास असेही अवगत केले आहे की, अपिलार्थीच्या दिनांक २८.०३.२००८ रोजीच्या अर्जास त्यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत दिनांक २५.०४.२००८ रोजी प्रथम प्रतिसाद दिला असल्यामुळे, त्यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियमातील कोणत्याही तरतुदीचा भंग झालेला नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदींशी सुसंगत आहे. तथापि अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीपैकी सदर रस्त्याचे टेंडर आणि बिलाच्या प्रती ही माहिती कार्यकारी अभियंत्याकडे व उर्वरित माहिती उपअभियंत्याकडे उपलब्ध होती. अपिलार्थीने माहिती उपअभियंत्याकडे मागितली होती. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेल्या माहितीतील काही भाग जर जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसेल तर, त्यांनी अर्जदाराच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची प्रत, त्यांनी मागितलेल्या माहितीचा भाग ज्या प्राधिकरणाकडे उपलब्ध आहे त्या प्राधिकरणाकडे, सदर अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून ५ दिवसाच्या आत पाठवणे व या पत्राची प्रत अर्जदारास देणे जन माहिती अधिकाऱ्यास अनिवार्य आहे. त्यामुळे या प्रकरणी उपअभियंता यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत कार्यकारी अभियंत्याकडे दिनांक ०२.०४.२००८ रोजी अगर तत्पूर्वी पाठवून, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील टेंडर व बिलाच्या प्रती कार्यकारी अभियंत्याकडून प्राप्त करुन घेण्याचे सूचित करणे, या प्रकरणी योग्य झाले असते. अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे अशी कार्यवाही

त्यांच्याकडून अपेक्षित होती. तथापि त्यांनी अशाप्रकारे कार्यवाही न करता अपिलार्थीस परस्पर कार्यकारी अभियंत्याकडून माहिती घेण्याचे सूचित केले, ही त्यांची कृती सर्वथा गैर व चुकीची आहे. त्याच्या अशाप्रकारच्या कृतीमुळे अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदी - प्रमाणे मिळविता येण्याजोगी माहिती कोणत्याही कारणाशिवाय अप्राप्त राहिली. त्यामुळे आता अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस अद्यापपावेतो द्यावयाची राहिलेली संपूर्ण माहिती त्यांनी कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयाकडून हस्तगत करुन घेऊन ती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः मागितली असल्यामुळे, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून या कालावधीमध्ये पूर्वनियोजित वेळी त्यांच्या कार्यालयात स्वतः उपस्थित राहून ही माहिती संबंधितांकडून विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी लागेल. ही माहिती त्यांच्या कोणत्याही प्रतिनिधीस जन माहिती अधिकाऱ्यांकडून विनामूल्य देय असणार नाही.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २५.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी जरी अधिनियमातील कलम ७ (१) मध्ये विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला असला तरी, या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा तपशील, जो त्यांनी अधिनियमातील कलम ७ (३) (क) प्रमाणे अपिलार्थीस कळविणे आवश्यक होता तो, त्यांनी अपिलार्थीस या प्रकरणी कळविला नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे अपिलार्थीस शुल्क भरण्याची सूचना करणारे त्यांचे दिनांक २५.०४.२००८ रोजीचे पत्र अवैध ठरत आहे. या पत्राच्या संदर्भात अपिलार्थीने असा मुद्दा मांडला आहे की, सदरचे पत्र त्यांना दिनांक ०७.०५.२००८ रोजी प्राप्त झाले आहे ते विलंबाने प्राप्त झाले असल्याने, त्यांना अधिनियमातील कलम ७ (६) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती, देय होत आहे. अपिलार्थीचे हे गृहीतक सर्वथा चुकीचे असून जन माहिती अधिकारी यांच्या, अपिलार्थीच्या मूळ माहिती अर्जाच्या संदर्भात लिहिलेल्या पत्रावरील दिनांक, व जावक रजिस्टरमधील सदर पत्र पाठविलेला दिनांक यापैकी जो उशिरा आहे तोच दिनांक अपिलार्थीस माहिती देण्याचा दिनांक

गृहीत धरण्यात येत आहे. **केवळ अर्जदारास पोस्टामार्फत उशिरा पत्र प्राप्त झाले म्हणून अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती मिळण्याचा हक्क प्राप्त होऊ शकत नाही,** हे त्यांनी येथे लक्षात घ्यावे. या प्रकरणी अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे आयोगाने आदेशित केले आहे, ते केवळ जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक २५.०४.२००८ रोजीच्या पत्रामध्ये त्यांनी माहितीपोटीच्या शुल्काचा आवश्यक तो तपशील अपिलार्थीस न दिल्यामुळे व परिणामी सदरचे पत्र अवैध होत असल्यामुळे, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी असद्हेतुने टाळले असल्याचे अथवा अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती दुष्ट हेतूने त्यांच्यापासून दडवून ठेवल्याचे नि:संशयपणे सिध्द होत नसल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर, अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये विनंती केल्याप्रमाणे, अधिनियमातील कलम २० प्रमाणे कोणतीही कारवाई आयोग आदेशित करीत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत त्यांना व्यक्तिशः व विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक ०१.०१.२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अर्जुन नागोराव सावंत, मु.पो. कुप्पा, ता. वडवणी, जि. बीड

२ जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, माजलगांव, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग क्र.-२, जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३००

निर्णय दिनांक ०१.०१.२०१०

१ श्री. ज्ञानोबा नामदेवराव गायकवाड, : अपिलार्थी
रा. भिमनगर, भावसिंगपुरा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे
पुतळ्याजवळ, औरंगाबाद

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
प्राचार्य, मिलींद कला महाविद्यालय,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग,
औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपप्राचार्य, मिलींद कला महाविद्यालय,
औरंगाबाद

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८.०१.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या निवृत्तीवेतन मंजूरीचे प्रकरण प्राचार्य, मिलींद कला महाविद्यालय, औरंगाबाद यांनी प्रलंबित ठेवले असल्यामुळे प्राचार्यांच्या निष्क्रियतेमुळे अपिलार्थीच्या सेवेतील खंड क्षमापीत करण्यासाठी अक्षम्य विलंब केला असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०.१०.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, अपिलार्थीच्या सेवेतील, दिनांक १६.०६.१९७४ ते ३०.०६. २००२ या कालावधीमधील सेवाखंडाच्या क्षमापनासाठी राज्य शासन पत्र दिनांक १३.०५.२००८ व शिक्षण उपसंचालक औरंगाबाद यांचे पत्र दिनांक २१.०८.२००८, अपिलार्थीच्या अर्जावर व उपाध्यक्ष पी. ई. एस. यांनी दिनांक २२.०९.२००८ रोजी पाठविलेल्या पत्रावर प्राचार्यांनी केलेली कार्यवाही, अशाप्रकारची माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १४.११.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीच्या सेवा खंडातील क्षमापनासाठी उपाध्यक्ष, पी. ई. एस. यांनी दिनांक १७.१०.२००८ रोजी पाठविलेल्या पत्राची त्यावरील अभिप्रायासह प्रत अपिलार्थीस माहिती म्हणून पाठविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २४.१२.२००८ रोजी शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या सेवेतील खंड क्षमापनाबाबत अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित करुन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतर देखिल जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही कार्यवाही न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून यासंदर्भातील कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही व तसेच त्यांच्या सेवेतील खंडाचा कालावधी क्षमापित करण्यासाठी प्राचार्य, मिलींद कला महाविद्यालय यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही. प्राचार्यांनी ही कार्यवाही त्वरीत करावी, अशी त्यांना अपेक्षा आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिल्याचे आयोगास अवगत केले. परंतु त्यांनी निश्चितपणे अपिलार्थीस कोणती माहिती दिली, हे त्यांना आयोगास दाखवता आले नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीस आजपावेतो प्राचार्य, मिलींद कला महाविद्यालय, औरंगाबाद यांच्याकडून त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेले वेगवेगळे अर्ज व त्यावर प्राचार्य, मिलींद कला महाविद्यालय, औरंगाबाद यांनी केलेली कार्यवाही म्हणजे, अपिलार्थीने संदर्भित केलेल्या अर्जांवर प्राचार्य यांनी दिनांक १०.१०.२००८ पर्यंत विविध संबंधित प्राधिकरणाशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती व या विषयावर त्यांच्याकडे अभिलेख्यावर नोंदविण्यात आलेल्या टिपणीच्या प्रती, ही होय. अशाप्रकारची कार्यवाही जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी केली नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. सबब संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांच्या संस्थेने अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेले महाराष्ट्र शासनाच्या दिनांक १३.०५.२००८ रोजीच्या पत्रावर, शिक्षण उपसंचालक यांच्या दिनांक २१.०८.२००८ रोजीच्या पत्रावर व उपाध्यक्ष, पी. ई. एस. यांच्या दिनांक २२.०९.२००८ रोजीच्या पत्राच्या संदर्भात प्राचार्य, मिलींद कला महाविद्यालय, औरंगाबाद यांनी दिनांक १०.१०.२००८ पर्यंत सर्व संबंधित प्राधिकरणाशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती व या अर्जांशी संबंधित अभिलेख्यावरील सर्व नोंदी व टिपणीच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवाव्यात. जर या संबंधित पत्रांवर जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केली नसेल तर त्यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या कोणत्याही पत्रावर कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे अपिलार्थीस, याच मुदतीत लेखी कळवावे, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १४.११.२००८ रोजी दिलेल्या प्रतिसादाद्वारे चुकीची माहिती पुरविली असल्यामुळे, संबंधित जन माहिती अधिकारी हे अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस निश्चितपणे पात्र

ठरत आहेत. तथापि आता ते नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले असल्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्याचे कोणतेही आदेश आयोग देत नाही .

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक ०१.०१.२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. ज्ञानोबा नामदेवराव गायकवाड, रा. भिमनगर, भावसिंगपुरा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळ्याजवळ, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा उपप्राचार्य, मिलींद कला महाविद्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१०९

निर्णय दिनांक ०१.०१.२०१०

१ श्री. संतोष मारोतराव गोरे, : अपिलार्थी

रा."शाकुंतल", १५- स्वस्तिकनगर, शिव रोड

तरोडा बु., ता. जि. नांदेड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा

तहसीलदार,

तहसील कार्यालय, कळमनुरी, जि.

हिंगोली.

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

उपविभागीय अधिकारी, हिंगोली.

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९.११.२००८ रोजी फेर सादर केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे व उपविभागीय अधिकारी यांनी, त्यांचे अपील नामंजूर करण्याचा निर्णय हा चुकीच्या माहितीच्या आधारे घेतला असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३१.०७.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे " गट क्रमांक १३५/१३६ मधील विहिरीची नोंद ७ / १२ वर

घेणेबाबत " या विषयावर सन २००५ ते दिनांक ३१.०७.२००७ या कालावधीमध्ये त्यांच्या दिनांक ०२.०९.२००५ रोजीच्या अर्जासंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागविली होती.

"माझा अर्ज दिनांक ०२.०९.२००५ प्रमाणे गट क्रमांक १३५/१३६ मधील विहिरीची नोंद माझे नाव ५० % घेण्याबाबत - सद्यःस्थिती - लागणारा कालावधी - गेल्या दोन वर्षात नोंद न होण्याची कारणे".

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकरी यांच्याकडून साधारण टपालाने मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०८.१०.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०३.११.२००७ रोजी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दिनांक १२.११.२००७ रोजी पारित केले, या निर्णयाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे अपील नामंजूर केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी, जन माहिती अधिकारी हजर आणि जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, कळमनुरी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ३१.०७.२००७ रोजीच्या मूळ अर्जामध्ये अपिलार्थीस नेमकी कोणत्या गावातील गट नंबर १३५/१३६ मधील माहिती हवी आहे याचा उल्लेख केला नसल्यामुळे त्यांना अपिलार्थीस माहिती पुरविता आली नाही. कळमनुरी तालुक्यात एकूण १४० गावे असून यातील जवळजवळ प्रत्येक गावामध्ये गट क्रमांक १३५/१३६ असे नंबर असण्याची शक्यता नाकारता येत नाही. कारण या गावांमध्ये प्रत्येकी शंभर पेक्षा जास्त गट आहेत. मूळात अपिलार्थीने मागणी

केलेली माहितीच चुकीची असल्यामुळे, त्यांना अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती पुरविता आली नाही. अपिलार्थीच्या पत्त्यावरुन अपिलार्थी नांदेडचे असावेत आणि त्यांनी माहिती तहसीलदार, कळमनुरी यांच्याकडे मागितली असल्यामुळे, तहसीलदार कळमनुरी यांच्याकडून आजही अपिलार्थीस निश्चितपणे कोणती माहिती हवी आहे, याचा कोणताही बोध होत नाही. जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीमध्ये अपिलार्थीस कळमनुरी तालुक्यातील कोणत्या गावातील सर्वे नंबर १३५/१३६ मधील विहिरीच्या नोंदी संदर्भात माहिती हवी आहे, हे स्पष्ट होत नाही. तसेच अपिलार्थीने तहसीलदार, कळमनुरी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भीत केलेल्या दिनांक ०२.०९.२००५ रोजीच्या अर्जामध्ये देखिल अपिलार्थीने कोणत्याही गावाचा उल्लेख केलेला नाही. त्यामुळे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही मोघम स्वरुपाची असल्याचे सिध्द होत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे स्पष्ट स्वरुपातच व संदर्भ देऊन माहिती मागणे आवश्यक आहे. तथापि अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही संदर्भारहीत व स्पष्ट स्वरुपात नसल्यामुळे मूळात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती देय होत नाही. या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन पुढील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

प्रसंगावशात या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ३१.०७.२००७ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीचा भंग केला असल्यामुळे तत्कालीन संबंधित तहसिलदार श्री. डी. व्ही. पवार (सध्या जिल्हाधिकारी लातूर यांच्या नियंत्रणाखाली कार्यरत) यांना

आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून, यापुढे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जावर त्यांनी अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

२. तहसीलदार श्री. डी. व्ही. पवार (सध्या जिल्हाधिकारी लातूर यांच्या नियंत्रणाखाली) यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक ०१.०१.२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. संतोष मारोतराव गोरे, रा."शाकुंतल", १५- स्वस्तिकनगर, शिव रोड तरोडा बु., ता. जि. नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, कळमनुरी, जि. हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, हिंगोली, यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ श्री. डी. व्ही. पवार, तहसिलदार (जिल्हाधिकारी लातूर यांचे कार्यालय) यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

५ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२११०

निर्णय दिनांक ०१.०१.२०१०

१ श्री. मोहंमद अन्वरउल्ला खान, : अपिलार्थी
रा. नांदेड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी,
आयुक्त यांचे कार्यालय, नांदेड वाघाळा शहर
महानगरपालिका, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,
नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

जन अपिलीय अधिकारी : उपायुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११.१२.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण व चुकीची माहिती दिली असल्यामुळे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द दिनांक २२.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १३.०८.२००८ रोजी

सुनावणी घेतली असता, त्यांना अपिलीय अधिकारी श्री. रत्नाकर वाघमारे हे जन माहिती अधिकारी असल्याचे आढळून आले आहे. या प्रकरणी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे एकच अधिकारी असल्यामुळे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने माहिती अधिकार अधिनियम तरतुदींची केलेली ही थट्टा आहे व त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २३.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने नेमलेल्या आय.एल. ॲन्ड एफ. एस. या कंपनी विषयी एकूण १० मुद्यांद्वारे काही माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ११.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध माहिती पाठविली. तथापि प्राप्त माहिती अपूर्ण व खोटी असल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २२.०७.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ११.०९.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस माहिती अधिकाऱ्यांनी माहिती पुरविल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले. या प्रकरणी जन माहिती व अपिलीय अधिकारी ही एकच व्यक्ती असल्यामुळे व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढण्याच्या निर्णयाने व्यथित झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हजर आणि जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी जन माहिती व अपिलीय अधिकारी ही दोन्ही कामे एकाच व्यक्तीने पाहिल्याचे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कबूल केले व अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध माहिती पूर्णतः पुरविल्याचे त्यांनी आयोगास पुढे स्पष्ट केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे आय. एल. ॲन्ड एफ.एस. या कंपनी विषयी एकूण १० मुद्यांद्वारे काही माहिती मागविली होती. या अर्जातील मुद्दा क्रमांक १० द्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती मागितली असल्याचे दिसून येते. अशाप्रकारची माहिती ही माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची असल्यामुळे, ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. उर्वरित सर्व ९ मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ११.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे पुरविलेल्या कथित माहितीचे अवलोकन केले असता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी जन माहिती अधिकाऱ्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ द्वारे दिलेली माहिती बरोबर आहे. मुद्दा क्रमांक २, ३ व ४ द्वारे त्यांनी अपिलार्थीस त्रयस्थ पक्ष तथा आय. एल. ॲन्ड एफ. एस. कंपनीच्या संकेत स्थळावरुन त्यांना आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन घेण्याचे सूचित केले आहे. जन माहिती अधिकारी यांची ही कृती अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने पूर्णत: पोषक असल्याचे आयोगास वाटत नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २, ३ व ४ शी संबंधित माहिती त्यांनी कंपनीच्या संकेत स्थळावरुन डाऊनलोड करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ द्वारे अपिलार्थीने, विनानिविदा आय. एल. ॲन्ड एफ. एस. कंपनीला काम देण्यासंदर्भात शासनाच्या आदेशाची प्रत अशी माहिती, जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागितली आहे. यावर जन माहिती अधिकाऱ्यांनी बी.पी. एम. सी. अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अशाप्रकारची कार्यवाही महानगरपालिका करु शकते अशाप्रकारची माहिती अपिलार्थीस दिली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली या मुद्यावरील माहिती चुकीची आहे. यासंदर्भात मुंबई महानगरपालिका अधिनियमातील ज्या कलमाद्वारे त्यांनी आय. एल. ॲन्ड एफ. एस. कंपनीला संदर्भीय काम दिले

आहे त्या कलमाच्या अधिनियमातील झेरॉक्स प्रती अपिलार्थीस त्यांना आता पुरवाव्या लागतील. उर्वरित मुद्यांवर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती बरोबर आहे.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती यांचे वरीलप्रमाणे केलेले विश्लेषण पाहता, वरील परिच्छेदामध्ये दिलेल्या सूचनेप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी आता अपिलार्थीस त्यांच्या मूळ आर्जातील उर्वरित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ०७ दिवसाच्या अता विनामूल्य पुरवावी, असे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे जन माहिती व अपिलीय अधिकारी या दोन्ही स्तरावरील भूमिका एकाच व्यक्तीने पार पाडल्याचे आयोगास आढळून आले आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलीय अधिकारी यांची सुनावणी घेण्याची नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची कृती ही आक्षेपार्ह असून आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी या पदावर काम करणाऱ्या अधिकाऱ्यांपेक्षा जेष्ठ अधिकाऱ्यांची जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक करावी. या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे 'व्यक्तीशः' माहितीची मागणी केली असल्यामुळे, अपिलार्थीस या आदेशाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असलेली माहिती त्यांच्याकडून घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात अपिलार्थीस वरील परिच्छेदात नमूद केलेल्या कालावधीमध्ये पुर्वनियोजित वेळी स्वतः उपस्थित राहावे लागेल, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक ०१.०१.२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मोहंमद अन्वरउल्ला खान, रा. ९-४-४५५, कय्यूम प्लॉट्स, नांदेड, ता. जि. नांदेड - ४३१६०४

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेली अपिले

क्र.३४२/०९,३४३/०९,३४४/०९ व ३४५/०९

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३४२ ते ३४५
निर्णय दिनांक: ०२-०१-२०१०

१. श्री. कामाजी तुकाराम बनसोडे, : अपिलार्थी
रा. नांदेड

विरुध्द

१. **अपील क्र.३४२/०९:**

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पु), मुदखेड, जि.नांदेड	जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, मुदखेड, जि.नांदेड	:प्रतिवादी

त्रयस्थ पक्ष: श्री. शिवलाल शंकरलाल सोनी

२. **अपील क्र.३४३/०९:**

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पु), धर्माबाद, जि.नांदेड	जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, धर्माबाद, जि.नांदेड

त्रयस्थ पक्ष:१) मे.विश्वनाथ बन्सीलाल इनानी,(२) लालन्ना रामजी येम्मेवार

३. **अपील क्र.३४४/०९:**

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पु), नायगाव, जि.नांदेड	जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,नायगाव, जि.नांदेड

त्रयस्थ पक्ष: (१) श्री. मेडेवार विश्वनाथ सिताराम (२)श्री.प्रकाश गणेश पोलावार,(३) श्री. बसवराज माधव आप्पा पांचारी (४) श्री. अशोक रामचंद्र मेकाळे

४. **अपील क्र.३४५/०९:**

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पु), उमरी, जि.नांदेड	जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, उमरी, जि.नांदेड

त्रयस्थ पक्ष:(१) श्रीम.जमुनाबाई देवजी येम्मेवार,(२) श्री.मोहन दिगंबर उत्तरवार,(३) श्री. अनिल रामचंद्र गुंडावार

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि. ०३.०२.२००९ रोजी नोंदविलेली चार स्वतंत्र द्वितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

सदर चारही द्वितीय अपील अर्ज अपिलार्थीने आयोगाकडे या एकाच दिवशी सादर केली असल्यामुळे, या चारही अपिलांची एकत्रितपणे सुनावणी घेण्यात येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने आयोगास उद्देशून लिहिलेली त्यांची दि. ०२.०१.२०१० रोजीची चार स्वतंत्र पत्रे आयोगास सादर केली असून, या सर्व पत्रांचे अवलोकन केले असता, त्यामध्ये त्यांची उपरोक्त चारही अपिले क्र. ३४२/०९,३४४/०९,३४५/०९ व ३४६/०९ ते स्वखुषीने मागे घेत असल्याचे नमूद करुन त्यांनी विचाराधीन चारही अपिले रद्द करण्याची आयोगास विनंती केली असल्याचे दिसून येत आहे.

खुद्द अपिलार्थीने आयोगाकडे केलेली ही चार द्वितीय अपिले आता मागे घेतली असल्याने, त्यांची उपरोक्त विनंती मान्य करण्यात येऊन अपिलार्थीची चारही अपिले खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१. अपील क्र. ३४२/०९,३४४/०९,३४५/०९ व ३४६/०९, दि.०३.०२.२००९ ही चारही अपिले खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक: ०२-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त,**
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कामाजी तुकाराम बनसोडे,द्वारा आनंदा हैबती भुरे, रा. प्रकाशनगर, तरोडा (बु.) नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय, मुदखेड, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय, धर्माबाद, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय, नायगाव, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय, उमरी, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, मुदखेड, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, धर्माबाद, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, नायगाव, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

९. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, उमरी, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१०. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३४६
निर्णय दिनांक: ०२-०१-२०१०

१. श्री.मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, रा. नांदेड. : अपिलार्थी

विरुध्द

१. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय,मुखेड, जि. नांदेड. : प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, मुखेड, जि.नांदेड

त्रयस्थ पक्ष : श्री. प्रल्हाद हरिदास राठोड

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०१.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन असून, या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की त्यांनी, त्यांचा माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीअंतर्गत केलेला दि. १०.०६.२००८ रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठवून दिला असता, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्याने त्यांनी तहसीलदार, मुखेड यांच्याकडे दि. १०.११.२००८ रोजी प्रथम अपील केले. परंतु या अपिलाची सुनावणी न घेता तहसीलदार मुखेड यांनी प्रकरण प्रलंबित ठेवल्या कारणाने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी या अर्जाद्वारे कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १०.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्री. प्रल्हाद हरीदास राठोड यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने दि. १६.०६.१९९५ रोजी 'लमाणी' जातीचे प्रमाणपत्र देण्याकरिता त्यांच्याकडे त्रयस्थ पक्षाने सादर केलेल्या कागदपत्रांच्या मूळ संचिकेच्या सत्यप्रती, जन माहिती अधिकारी यांच्या दि.

१६.०६.१९९५ च्या कार्यालयीन जावक रजिस्टरची सत्यप्रत आणि सदरचे दि. १६.०६.१९९५ चे प्रमाणपत्र तहसीलदार कार्यालयाकडून निर्गमित झाले किंवा नाही, अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १०.११.२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत आणि जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील काही माहिती त्यांनी दि. २५.११.२००८ रोजी पुरविली आहे. तथापि उर्वरित माहिती ज्या अभिलेख्यामध्ये उपलब्ध असण्याची शक्यता आहे, ते अभिलेखे त्यांच्या कार्यालयात शोध घेऊनही त्यांना अद्यापपर्यंत आढळून आले नाहीत. परंतु यापुढे या अभिलेख्यांचा कसोशीने शोध घेऊन, एक महिन्याच्या आत अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती ते अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न करतील. सदर अभिलेखे जतन करुन ठेवण्याचा कालावधी दहा वर्षांचा जरी असला तरी हे अभिलेखे त्यांच्या कार्यालयाने अद्यापपावेतो नष्ट केलेली नाहीत, असेही त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केले.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीस यापुढे एक महिन्याच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने त्यांच्या युक्तिवादामध्ये कबूल केले आहे. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित अभिलेख्यांचा त्यांच्या कार्यालयामध्ये कसोशीने शोध घेऊन, अपिलार्थीने

मागणी केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. या कालावधीमध्ये त्यांना जर अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे आढळून आले नाहीत तर, सदरचे अभिलेखे जतन करुन ठेवण्याची जबाबदारी त्यांच्या कार्यालयातील ज्या अधिकाऱ्यांची/कर्मचाऱ्यांची होती व आहे अशा सर्व कर्मचारी/अधिकाऱ्यांवर त्यांनी याच कालावधीमध्ये फौजदारी स्वरुपाचा गुन्हा नोंदवावा व आपला अनुपालन अहवाल आयोगास सदर गुन्हयाची नोंद केल्यानंतर सात दिवसांच्या आत पाठवावा.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने दि. १०.०६.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमांतर्गत माहिती मागविली असताना, या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७(१)मध्ये विहित केलेली मुदत व्यपगत झाल्यानंतर, अंदाजे साडेचार महिन्यांनी प्रतिसाद देऊन अपिलार्थीस अपूर्ण माहिती पुरविली आहे. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विलंबाने व अपूर्ण माहिती देण्याच्या त्यांच्या कृतीद्वारे स्वतःला अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५(५) च्या तरतुदीनुसार अर्जदारास माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणाऱ्या त्यांच्या सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतुद आहे. हे पाहता, या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी आणि अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असणारे या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी हे सर्व एकत्रितपणे अशाप्रकारच्या कारवाईस पात्र असल्याचे सिध्द होत आहे. सबब सचिव (महसूल) यांना या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, मुखेड व या प्रकरणाशी संबंधित त्यांच्या सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

प्रसंगावशात, या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. १०.११.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार श्री. कदम (सध्या ता.जळकोट जि.लातूर येथे कार्यरत) यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी न घेता अथवा या अपील अर्जास कोणत्याही प्रकारे

प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या बेजबाबदार कार्यशैलीची नोंद जिल्हाधिकारी, नांदेड /लातूर यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील वरील निर्णयात स्पष्ट केलेली, त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (महसूल) यांना संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

४. जन माहिती अधिकारी यांनी,अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे गहाळ झाले असल्यास ते जतन करुन ठेवण्याची जबाबदारी त्यांच्या कार्यालयातील ज्या अधिकाऱ्यांची/कर्मचाऱ्यांची होती व आहे अशा सर्व कर्मचारी/अधिकाऱ्यांवर त्यांनी याच कालावधीमध्ये फौजदारी स्वरुपाचा गुन्हा नोंदवावा व आपला अनुपालन अहवाल आयोगास सदर गुन्हयाची नोंद केल्यानंतर सात दिवसांच्या आत पाठवावा.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांकः ०२-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त,**
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक,सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड,नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल),तहसील कार्यालय,मुखेड, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, मुखेड, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, लातूर/नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. सचिव (महसूल), मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३४७
निर्णय दिनांक: ०२-०१-२०१०

१. श्री.मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, : अपिलार्थी
रा. नांदेड.

विरुध्द

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
नायब तहसीलदार (म),
तहसील कार्यालय,कळमनुरी, जि. हिंगोली.
२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार,कळमनुरी, जि.हिंगोली

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : तहसीलदार, कळमनुरी, जि.हिंगोली.
जन अपिलीय अधिकारी : उपविभागीय अधिकारी, हिंगोली, जि.हिंगोली.
त्रयस्थ पक्ष : श्री. साहेबराव गंगाराम अन्नापुरे

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०१.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय यांनी दि. २९.१२.२००८ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस १५ दिवसांच्या आत माहिती देण्याचे सूचित करुनही संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आजपर्यंत माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०६.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाकडून जा.क्र. १८३९, दि. २४.०५.१९९३ रोजी साहेबराव गंगाराम अन्नापुरे यांना देण्यात आलेल्या 'चांभार' जातीच्या प्रमाणपत्र घेण्याकरिता त्रयस्थ पक्षाने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये दाखल केलेल्या आवश्यक त्या कागदपत्रांच्या मूळ संचिकेच्या सत्यप्रती, जन माहिती अधिकारी यांच्या दि. २४.०५.१९९३ च्या कार्यालयीन जावक रजिस्टरची सत्यप्रत आणि सदर प्रमाणपत्र जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून निर्गमित केले आहे किंवा कसे, - अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २०.०७.२००८ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती पंधरा वर्षांपूर्वीची असल्यामुळे ही माहिती शोधण्याचे काम चालू असल्याचे अपिलार्थीस कळविले आहे व माहिती प्राप्त होताच माहिती पुरविण्याचे आश्वासित केले. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०६.११.२००८ रोजी तहसीलदार, कळमनुरी यांना उद्देशून त्यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीने सदरचे अपील तहसीलदार, कळमनुरी यांना उद्देशून केले होते. तथापि या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी हे उपविभागीय अधिकारी असल्यामुळे त्यांनी अपिलार्थीचे सदर प्रथम अपील अर्ज दि. २६.११.२००८ रोजी उपविभागीय अधिकारी यांना पाठविला. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २९.१२.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मान्य केले आणि तहसीलदार तथा जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती पंधरा दिवसांच्या आत त्यांना पुरविण्याचे सूचित केले. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केलेले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली संचिका त्यांच्या कार्यालयात, त्यांनी बराच शोध घेतल्यानंतरही आढळून आली नाही. त्यामुळे संबंधितांनी मागणी केलेली माहिती त्यांना आता देता येणे शक्य नाही. त्यांनी अपिलार्थीस अद्यापपावेतो तसे कळविलेले नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही, अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. अपिलार्थीस प्रथमतः जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. २०.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात शोधण्याचे काम चालू असल्याचे आणि माहिती प्राप्त होताच ही माहिती अपिलार्थीस देण्याचे आश्वासित केले. तथापि या प्रकरणी आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीच्या द्वितीय अपील सुनावणीच्या दिवसापर्यंत म्हणजेच अपिलार्थीने माहितीसाठीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दाखल केल्यानंतर अंदाजे दीड वर्षांचा कालावधी व्यपगत झाल्यानंतरही, अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नाही, असे कळविण्याचे कष्ट देखील संबंधित जन माहिती अधिकारी यांनी घेतलेले नाहीत. अपिलार्थीने ज्या विषयाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागविली आहे, तो विषय महत्त्वाचा असून, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे जनसामान्यांना दिल्या जाणाऱ्या जात प्रमाणपत्राच्या आधारे, सदर प्रमाणपत्रधारक हे शासकीय/निमशासकीय प्राधिकरणांमध्ये, या प्रमाणपत्रांच्या आधारे प्राधान्याने नोकरी मिळवित असतात. परंतु एकंदरीत आयोगाकडे या विषयावर प्राप्त झालेल्या द्वितीय अपील अर्जांमध्ये, वेगवेगळया अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, केवळ त्यासंबंधीची नस्ती उपलब्ध होत

नाही, या एकाच कारणास्तव महसूल विभागाकडून नाकारली जाते. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता, महसूल विभागाकडून जातीचे खोटे प्रमाणपत्र देखील निर्गमित केली गेली असल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अशाप्रकारच्या प्रकरणाकडे विशेष गांभीर्याने आयोगास पहावे लागेल.

आज रोजी आयोगास सुनावणीच्या वेळी तहसीलदार,कळमनुरी यांनी एक लेखी निवेदन सादर केले असून या निवेदनामध्ये त्यांनी असेही नमूद केले आहे की, प्रकरणाची गांभीर्य लक्षात घेता, त्यांनी कार्यालयातील लिपीक श्री. बी.एस.गरड व अभिलेखापाल श्री. बी. जी. रेड्डी यांना वेळोवेळी कळवून त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील माहिती उपलब्ध करुन दिली नाही. या कालावधीमध्ये अपिलार्थीस माहिती न पुरविण्यासाठी श्री. बी.एस.गरड हे लिपीक व्यक्तिशः जबाबदार असल्याचे त्यांनी आयोगास स्पष्ट केले असून या कालावधीमध्ये त्यांनी आपल्या, श्री. व्ही.एस.गरड लिपीक हे बेजबाबदारपणे वागत असल्याचे अभिप्राय व आयोगास माहिती देण्यासाठी त्यांनी कोणताही प्रयत्न न केल्याचे स्पष्ट अभिप्राय या कालावधीमध्ये केलेले आहेत. माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये कलम ५(५) च्या तरतुदीनुसार अर्जदारास माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना या प्रकरणाशी संबंधित जबाबदार असलेले त्यांचे सर्व सहाय्यक यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतुद आहे. हे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती उपलब्ध न करुन देण्यासाठी तहसीलदार, कळमनुरी यांच्या कार्यालयातील श्री. बी.एस.गरड व अभिलेखापाल श्री. बी.जी. रेड्डी हे दोन कर्मचारी जबाबदार असल्याचे आयोगास आढळून आले आहे. त्यांना बचावाची संधी देण्याच्या दृष्टीने आयोगातर्फे असे सूचित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना देण्यासंदर्भात श्री. बी.एस.गरड व श्री. बी.जी.रेड्डी यांनी कोणतीही कार्यवाही न करुन अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल या प्रकरणी त्यांच्यावर एकत्रितपणे रु.२५,०००/- शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ

आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्यास जन माहिती अधिकारी जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचे निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात संबंधित माहितीची नस्तीच तहसीलदार, कळमनुरी,जि.हिंगोली यांच्या कार्यालयातून गहाळ झाली असल्यामुळे अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणतीही माहिती प्राप्त होऊ शकणार नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जतन करुन ठेवण्याची जबाबदारी ज्या कर्मचारी/अधिकाऱ्यांवर होती, त्या सर्व कर्मचारी/अधिकाऱ्यावर हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत फौजदारी स्वरुपाची गुन्हा नोंदवावा व आपला अनुपालन अहवाल आयोगास सदर गुन्हयाची नोंद केल्यानंतर सात दिवसांच्या आत पाठवावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. संबंधित जन माहिती अधिकारी यांचे सहायक श्री. बी.एस.गरड, लिपीक व श्री. बी.जी.रेड्डी अभिलेखापाल, तहसील कार्यालय,कळमनुरी यांना एकत्रित एकूण रु. २५,०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत आयोगास सदर सादर करावा.

३. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे जतन करुन ठेवण्याची जबाबदारी त्यांच्या कार्यालयातील ज्या अधिकाऱ्यांची/कर्मचाऱ्यांची होती व आहे

अशा सर्व कर्मचारी/अधिकाऱ्यांवर त्यांनी याच कालावधीमध्ये फौजदारी स्वरुपाचा गुन्हा नोंदवावा व आपला अनुपालन अहवाल आयोगास सदर गुन्हयाची नोंद केल्यानंतर सात दिवसांच्या आत पाठवावा.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक: ०२-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त,**
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक,सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅण्डरोड,नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, कळमनुरी, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, हिंगोली,जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ४०२/०९,४०३/०९,४०४/०९ व ४०५/०९

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४०२,४०३,४०४ व ४०५
निर्णय दिनांक ०२/०१/२०१०

१ श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल : अपिलार्थी
रा. जाफ्राबाद, जि. जालना

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तालुका कृषि अधिकारी,
तालुका कृषि कार्यालय, जाफ्राबाद, जि. जालना

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी,
जाफ्राबाद, जि. जालना

निर्णय

श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १८.०५.२००९ रोजी केलेली दि. १९.०५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेली चार स्वतंत्र व्दितीय अपिले आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. १८.०८.२००८ रोजीच्या चार स्वतंत्र माहितीच्या अर्जांसंबंधी दि. ०७.११.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे चार स्वतंत्र प्रथम अपिले केली होती. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलांवर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेली व्दितीय अपिले आयोगाकडे दाखल केली आहेत.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक

असते. तथापि, प्रस्तुत अपिलांची प्राथमिक तपासणी केली असता, ही अपिले अपिलार्थीने प्रथम अपिलांच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ७१ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केली आहेत. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीची प्रस्तुतची अपिले फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१) अपील क्र. ४०२/०९,४०३/०९,४०४/०९ व ४०५/०९ फेटाळण्यात येत आहेत.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक : ०२/०१/२०१० **राज्य माहिती आयुक्त,**
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१) श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल, बाजार गल्ली, मेनरोड, जाफ्राबाद, जि. जालना.

राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१३३
निर्णय दिनांक: ०२.०१.२०१०

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसुफ, : अपिलार्थी
नांदेड.

विरुध्द

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सचिव,
फैजुल उलुम एज्युकेशन सोसायटी, विसावानगर,
नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
सहाय्यक धर्मादाय आयुक्त,
नांदेड विभाग, नांदेड.

त्रयस्थ पक्ष : श्रीमती सबिहा सुलताना

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १६.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार सचिव, फैजुल उलुम एज्युकेशन सोसायटी यांच्याकडे दि. १७.०३.२००८ रोजी माहितीसाठीचा अर्ज रजिस्ट्रीव्दारे पाठवून दिला असता, माहिती अधिकारी यांनी जाणूनबुजून रजिस्ट्री परत केल्यामुळे अपिलार्थीने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त यांच्याकडे दि. ०८.०४.२००८ रोजी प्रथम अपील केले असता, त्यांनी सुनावणी न घेता त्यांचे अपील प्रलंबित ठेवल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दि.१०.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये सचिव, फैजुल उलुम एज्युकेशन सोसायटी यांच्याकडे त्यांच्या संस्थेविषयी काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास त्यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार सहायक धर्मादाय आयुक्त यांच्याकडे दि. ०८.०४.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर सहायक धर्मादाय आयुक्त यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी सहायक धर्मादाय आयुक्त यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित आहेत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी आयोगास असे आढळून येते की, मुळात या प्रकरणी अपिलार्थीने ज्या संस्थेकडे माहिती मागितली आहे, ही संस्था माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) च्या तरतुदीनुसार सार्वजनिक प्राधिकरण आहे किंवा कसे हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्राच्या अनुपलब्धतेमुळे आणि संबंधितांच्या अनुपस्थितीमुळे कळण्यास मार्ग नाही तसेच सहायक धर्मादाय आयुक्त हे फक्त त्यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयासंदर्भात माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी म्हणून काम करु शकतात. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज व प्रथम अपील अर्ज दोन वेगवेगळया, ज्यांचा एकमेकांशी काहीही संबंध नाही, अशा प्राधिकरणाकडे करुन अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीचा भंग केला आहे. अपिलार्थीस या प्रकरणी संस्थेसंदर्भात जी माहिती आवश्यक आहे ती प्राप्त करुन घेण्याकरीता जन माहिती अधिकारी, सहायक धर्मादाय आयुक्त यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्रथमत: अर्ज करणे गरजेचे होते. तथापि अपिलार्थीने अशी कृती या प्रकरणी केलेली नाही. या

प्रकरणातील अशा विविध प्रकारच्या त्रूटी पाहता अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षापत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक: ०२.०१.२०१० **राज्य माहिती आयुक्त,**
खंडपीठ औरंगाबाद.

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसुफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टँड रोड,नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा सचिव, फैजुल उलुम एज्युकेशन सोसायटी, विसावानगर, नांदेड.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, नांदेड विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१६६
निर्णय दिनांक: ०२.०१.२०१०

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसुफ, : अपिलार्थी
नांदेड.

विरुध्द

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सचिव,
प्रज्ञा निकेतन शिक्षण संस्था, देगलूर, ता.देगलूर,
जि.नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
सहाय्यक धर्मादाय आयुक्त,
नांदेड विभाग, नांदेड.

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०९.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार सचिव, प्रज्ञा निकेतन शिक्षण संस्था यांच्याकडे दि. २९.१०.२००७ रोजी रजिस्ट्रीव्दारे माहितीसाठीचा अर्ज पाठवून दिला असता, त्यांनी मुदतीत माहिती न दिल्याने अपिलार्थीने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त यांच्याकडे दि. २६.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले असता, त्यांनी सुनावणी न घेता त्यांचे अपील प्रलंबित ठेवल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२९.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये सचिव, फैजुल उलुम एज्युकेशन सोसायटी यांच्याकडे त्यांच्या संस्थेविषयी काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास त्यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार सहायक धर्मादाय आयुक्त यांच्याकडे दि. २६.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर सहायक धर्मादाय आयुक्त यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी सहायक धर्मादाय आयुक्त यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित आहेत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी आयोगास असे आढळून येते की, मुळात या प्रकरणी अपिलार्थीने ज्या संस्थेकडे माहिती मागितली आहे, ही संस्था माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) च्या तरतुदीनुसार सार्वजनिक प्राधिकरण आहे किंवा कसे हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्राच्या अनुपलब्धतेमुळे आणि संबंधितांच्या अनुपस्थितीमुळे कळण्यास मार्ग नाही तसेच सहायक धर्मादाय आयुक्त हे फक्त त्यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयासंदर्भात माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी म्हणून काम करु शकतात. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज व प्रथम अपील अर्ज दोन वेगवेगळया, ज्यांचा एकमेकांशी काहीही संबंध नाही, अशा प्राधिकरणाकडे करुन अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीचा भंग केला आहे. अपिलार्थीस या प्रकरणी संस्थेसंदर्भात जी माहिती आवश्यक आहे ती प्राप्त करुन घेण्याकरीता जन माहिती अधिकारी, सहायक धर्मादाय आयुक्त यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्रथमतः अर्ज करणे गरजेचे होते. तथापि अपिलार्थीने अशी कृती या प्रकरणी केलेली नाही. या

प्रकरणातील अशा विविध प्रकारच्या त्रूटी पाहता अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षापत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक: ०२.०१.२०१० **राज्य माहिती आयुक्त,**
खंडपीठ औरंगाबाद.

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसुफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टँड रोड,नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा सचिव, प्रज्ञा निकेतन शिक्षण संस्था, देगलूर, ता.देगलूर, जि. नांदेड.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, नांदेड विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले

क्रमांक ३३९/२००९ व ३४१/२००९

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३३९ व ३४१

निर्णय दिनांक ०२.०१.२०१०

१ सौ. एस.पी.नैण, : अपिलार्थी

द्वारा, मुख्य कार्यालय, अखिल भारतीय महिला सुरक्षा व

विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे, सहयोगनगर,

नांदेड

विरुध्द

१ **<u>अपील क्रमांक ३३९/२००९</u>**

जन माहिती अधिकारी तथा

मुख्याध्यापक,

संताबाई माध्यमिक विद्यालय, पाळा, ता. मुखेड,

जि. नांदेड

२ **<u>अपील क्रमांक ३४१/२००९</u>**

जन माहिती अधिकारी तथा

मुख्याध्यापक,

मौलाना अबुल कलाम आझाद उर्दू हायस्कूल,

मुदखेड, जि. नांदेड

३ **अपील क्रमांक ३३९ व ३४१/२००९**

जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद,

नांदेड

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३.०१.२००९ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र द्वितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या दोनही अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, संताबाई माध्यमिक विद्यालय, पाळा, ता. मुखेड व मुख्याध्यापक, मौलाना आझाद उर्दू हायस्कूल, मुदखेड यांच्याकडे पोस्टाद्वारे अनुक्रमे दिनांक ३०.०६.२००८ व ०४.०७.२००८ रोजी अर्ज पाठवून दिले असता, त्यांना वेळेत माहिती न मिळाल्याने त्यांनी अधिनियमातील तरतुदीनुसार शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे अनुक्रमे दिनांक १९.०९.२००८ व ०९.०९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १९.११.२००८ रोजी संताबाई माध्यमिक विद्यालयाशी संबंधित प्रथम अपिलावर व मौलाना आझाद उर्दू हायस्कूल या प्रकरणी दिनांक २०.११.२००८ व २३.१२.२००८ रोजी प्रथम सुनावणी ठेवली असता, दोनही प्रकरणी जन माहिती अधिकारी हे गैरहजर राहिले, त्यामुळे प्रकरण प्रलंबित राहिल्यामुळे अपिलार्थीने विचाराधीन अपिले आयोगाकडे सादर केली आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ३०.०६.२००८ रोजीच्या व दिनांक ०४.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मुख्याध्यापक, संताबाई माध्यमिक विद्यालय व मौलाना आझाद उर्दू हायस्कूल यांच्या शाळेशी संबंधित व त्यांच्या शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या आस्थापनाविषयी आणि सेवेविषयी मोठी व्याप्ती असलेली माहिती मागितली होती. अपिलार्थीने या दोनही प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागितलेली माहिती त्यांच्या शाळा स्थापन झाल्यापासून ते अपिलार्थीने मूळ अर्ज करेपर्यंतच्या दिनांकापर्यंत या कालावधीशी संबंधित होती.

अपिलार्थीच्या या दोनही अर्जास दोनही शाळेच्या मुख्याध्यापकांनी दिनांक २९.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना देण्यासाठी अनुक्रमे रु. ६००/- व रु. २८३/- इतक्या शुल्काचा भरणा संस्थेकडे करण्याचे सूचित केले. तथापि जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे कार्यवाही न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दोनही प्रकरणी दिनांक १२.०८.२००८ रोजी दोन स्वतंत्र प्रथम अपिले दाखल केली. यापैकी संताबाई माध्यमिक विद्यालयाच्या संबंधित प्रथम अपील अर्जावर शिक्षणाधिकाऱ्यांनी कोणताही निर्णय दिला नाही. मौलाना अबुल कलाम आझाद उर्दू हायस्कूलच्या मुख्याध्यापकास त्यांनी दिनांक १६.०१.२००९ रोजी पत्र लिहून अपिलार्थीस ८ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस संबंधितांकडून माहिती प्राप्त न झाल्याने आणि त्यांच्या प्रथम अपिलांवर निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन त्यांनी वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन दोन स्वतंत्र अपिले आयोगाकडे सादर केली आहेत.

वरील प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक ०२.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी या दोनही प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी उपस्थित आणि जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

या प्रकरणाशी संबंधित दोनही जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला आहे की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमातील विहित वेळेमध्ये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांच्या शाळेत भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा त्यांच्याकडे न केल्यामुळे ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत. आजही ते अपिलार्थीस ही माहिती सशुल्क देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, दोनही शाळांच्या मुख्याध्यापकांनी अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (१) मधील विहित मुदतीमध्ये योग्य तो

प्रथम प्रतिसाद देऊन त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविले आहे. परंतु या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे करण्याची तयारी या संपूर्ण घटनाक्रमामध्ये अपिलार्थीने कधीही दर्शविली नाही. आयोगास या अपिलार्थीच्या संदर्भात आतापर्यंत आलेल्या अनुभवावरुन अपिलार्थी हे सार्वजनिक प्राधिकरणाकडे वेगवेगळ्या प्रकारची व्यापक व्याप्ती असलेली माहिती कायम मागवीत असतात. परंतु आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्याची तयारी ते कधीही दाखवत नाहीत. या प्रकरणी नेमके असेच घडले आहे. अपिलार्थीचे आयोगाकडे सादर केलेले द्वितीय अपील अर्जासोबतच्या प्रथम अपील अर्जाची पाहणी करता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने दोनही प्रकरणी दिनांक १२.०८.२००८ रोजी त्यांचे प्रथम अपील अर्ज टंकलिखीत करुन ठेवले होते. परंतु प्रत्यक्ष अपिले मात्र त्यांनी संताबाई माध्यमिक विद्यालयाच्या संदर्भात दिनांक १९.०९.२००८ रोजी व मौलाना अबुल कलाम आझाद उर्दू हायस्कूलच्या संदर्भात दिनांक ०९.०९.२००८ रोजी दाखल केली आहेत, याची त्यांनी स्वतः कबूली आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये दिलेली आहे. त्यामुळे या बाबींच्या पार्श्वभूमीवर, माहिती प्राप्त करुन घेण्यामध्ये त्यांना फारसे स्वारस्य नसावे, असा निष्कर्ष काढण्यास हरकत नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी या गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याची तयारी दर्शवीत आहेत. परंतु हे शुल्क भरण्याची प्रत्यक्षात अपिलार्थीची तयारी आहे किंवा कसे, हे अपिलार्थीच्या अनुपस्थितीमुळे आयोगास कळण्यास मार्ग नाही. अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांना खरोखरच जर संबंधित मुख्याध्यापकांकडून अद्यापही माहिती आवश्यक असेल तर त्यांनी संबंधित मुख्याध्यापकांकडे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे प्रथमतः शुल्क भरुन ही माहिती त्यांच्याकडून प्राप्त करुन घ्यावी. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती देण्यासंदर्भात कार्यवाही करणे हे जसे माहिती अधिकाऱ्यांचे कर्तव्य आहे तसेच, अधिनियमातील कलम ७ (५) च्या तरतुदीचे पालन करुन आवश्यक असलेल्या माहितीपोटी प्रथमतः शुल्क भरणे हे देखिल

अर्जदाराचे तितकेच महत्त्वाचे कर्तव्य आहे, हे अपिलार्थीने या प्रकरणी ध्यानात घेणे गरजेचे आहे. त्यांच्यावरील, माहितीपोटीचे शुल्क भरण्याचे उत्तरदायित्व अपिलार्थीने या दोनही प्रकरणी पार पाडले नसल्याने, त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त न होण्यास ते स्वतः जबाबदार असल्याचे आयोगास आढळून येत आहे. त्यामुळे अपिलार्थीची दोनही विचाराधीन अपिले फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१. अपील क्रमांक ३३९/२००९ व ३४१/२००९ फेटाळण्यात येत आहेत.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक ०२.०१.२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ सौ. एस.पी.नैण, द्वारा मुख्य कार्यालय अखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे, सहयोगनगर, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, संताबाई माध्यमिक विद्यालय, पाळा, ता. मुखेड, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मौलाना अबुल कलाम आझाद उर्दू हायस्कूल, मुदखेड, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३४०

निर्णय दिनांक ०२.०१.२०१०

१ सौ. एस. पी. नैण, : अपिलार्थी

द्वारा - मुख्य कार्यालय, अखिल भारतीय महिला सुरक्षा व

विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे, सहयोगनगर,

नांदेड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी,

तालुका कृषि कार्यालय, कंधार, जि. नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

तालुका कृषी अधिकारी, कंधार,ता. कंधार,

जि. नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : मंडळ कृषी अधिकारी, कंधार, जि. नांदेड

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३.०१.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, दिनांक २६.०७.२००८ रोजी पोस्टाद्वारे त्यांचा अर्ज पाठवून दिला असता, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २२.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे मनमानी शुल्क आकारुन अपिलार्थीची दिशाभूल केल्यामुळे

त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२.०९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले परंतु , जन अपिलीय अधिकारी यांनी या अपील अर्जावर दिनांक ०८.१२.२००८ रोजी सुनावणी घेऊन नियमबाह्य निर्णय दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक २६.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये तालुका कृषी कार्यालय, कंधार यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित दिनांक ०१.०४.२००२ ते ३१.०३. २००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २२.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे टपाल खर्चासह एकूण शुल्क रु. ८५,७८४/- इतके त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि ही रक्कम अवाजवी वाटल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. त्यांनी यासंदर्भात आपले आदेश दिनांक १७.१२.२००८ रोजी पारित करुन अपिलार्थीचे अपील अमान्य केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती सहा वर्षाशी संबंधित असल्यामुळे, हे शुल्क अपिलार्थीस जास्त वाटत असावे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे आजही तयार आहे, परंतु अनुदानाच्या अनुपलब्धतेमुळे ते ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य पुरवू शकणार नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीच्या दिनांक २६.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी यांनी जरी अधिनियमातील कलम ७ (१) मध्ये विहित केलेल्या कालावधीमध्ये प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविले असले तरीही, या शुल्काचा तपशील, जो जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनयिमातील कलम ७ (३) (क) प्रमाणे देणे आवश्यक आहे, तो दिलेला नाही. याच मुद्यावर अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०२.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देताना त्यामध्ये अधिनियमातील कलम ७ (३) (क) च्या तरतुदीची दखल घेतलेली नाही व अपिलार्थीचे अपील अमान्य केले आहे.

अशाप्रकारे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा तपशील अपिलार्थीस न कळवून अधिनियमातील कलम ७ (३) (क) चा भंग केला आहे, त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता विनामूल्य देय होत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे आवश्यक ते अनुदान उपलब्ध नसल्याचे आयोगास अवगत केले आहे. तथापि अपिलार्थीस आता ही माहिती देण्यासाठी लागणाऱ्या शुल्काची व्यवस्था त्यांनी स्वतःच्या जबाबदारीवर करुन अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

आयुक्त, कृषी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लागणारे शुल्क उपलब्ध करुन देण्यासाठी योग्य ती व्यवस्था करावी अथवा अन्यप्रकारे ही माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक ०२.०१.२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ सौ. एस. पी. नैण, द्वारा - मुख्य कार्यालय, अखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे, सहयोगनगर, नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषी अधिकारी, कंधार, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, कंधार,ता. कंधार, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे -०५, यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

५ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ४०६/०९,४०७/०९,४०८/०९,४०९/०९,४१०/०९,४११/०९ व ४१२/०९

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४०६ ते ४१२
निर्णय दिनांक ०४/०१/२०१०

१ श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल : अपिलार्थी
रा. जाफ्राबाद, जि. जालना

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तालुका कृषि अधिकारी,
तालुका कृषि कार्यालय, जाफ्राबाद, जि. जालना

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी,
जाफ्राबाद, जि. जालना

निर्णय

श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १८.०५.२००९ रोजी केलेली दि. १९.०५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेली सात स्वतंत्र व्दितीय अपिले आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. १८.०८.२००८ रोजीच्या सात स्वतंत्र माहितीच्या अर्जांसंबंधी दि. ०७.११.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सात स्वतंत्र प्रथम अपिले केली होती. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलांवर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेली व्दितीय अपिले आयोगाकडे दाखल केली आहेत.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक

असते. तथापि, प्रस्तुत अपिलांची प्राथमिक तपासणी केली असता, ही अपिले अपिलार्थीने प्रथम अपिलांच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ७१ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केली आहेत. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीची प्रस्तुतची अपिले फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१. अपील क्र. ४०६/०९, ४०७/०९, ४०८/०९, ४०९/०९, ४१०/०९, ४११/०९ व ४१२/०९ फेटाळण्यात येत आहेत.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक : ०४/०१/२०१० **राज्य माहिती आयुक्त,**
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल, बाजार गल्ली, मेन रोड, जाफ्राबाद, जि. जालना.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ३५७/२००९, ३५८/२००९, ३५९/२००९, ३६०/२००९, ३६१/२००९ ३६२/२००९, ३६३/२००९, ३६४/२००९

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/ ३५७,३५८,३५९,३६०,३६१,३६२,३६३ व ३६४

निर्णय दिनांक ०४.०१.२०१०

१ सौ. एस.पी.नैण, रा. नांदेड : अपिलार्थी

विरुध्द

१ **अपील क्रमांक ३५७/२००९**

जन माहिती अधिकारी तथा

मुख्याध्यापक,

कुसूमताई प्राथमिक शाळा, नांदेड

२ **अपील क्रमांक ३५८/२००९**

जन माहिती अधिकारी तथा

मुख्याध्यापक,

दिगंबर स्वामी प्राथमिक शाळा, तामसा, ता.

हदगांव, जि. नांदेड

३ **अपील क्रमांक ३५९/२००९**

जन माहिती अधिकारी तथा

मुख्याध्यापक, इंदिरा गांधी प्राथमिक शाळा,

शहापूर, ता. देगलूर, जि. नांदेड

४ **अपील क्रमांक ३६०/२००९**

जन माहिती अधिकारी तथा

मुख्याध्यापक,

गितांजली प्राथमिक शाळा, भोकर, जि. नांदेड

५ **अपील क्रमांक ३६१/२००९**

जन माहिती अधिकारी तथा

मुख्याध्यापक,

गोविंदेश्वर प्राथमिक शाळा, नांदेड

६ **अपील क्रमांक ३६२/२००९**

जन माहिती अधिकारी तथा

मुख्याध्यापक, वसंतराव नाईक प्राथमिक शाळा,

सावळी, ता. मुखेड, जि. नांदेड

७ **अपील क्रमांक ३६३/२००९**

जन माहिती अधिकारी तथा

मुख्याध्यापक, जवाहर उलुम उर्दू प्राथमिक

शाळा, किनवट, जि. नांदेड

८ **अपील क्रमांक ३६४/२००९**

जन माहिती अधिकारी तथा

मुख्याध्यापक, यशवंतराव चव्हाण प्राथमिक

शाळा, मुखेड, जि. नांदेड

अपील क्रमांक ३५७ ते ३६४/२००९

जन अपिलीय अधिकारी तथा

शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,

नांदेड

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८.०४.२००९ रोजी नोंदविलेली एकूण ८ स्वतंत्र द्वितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून, या आठही अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीअंतर्गत त्यांना आवश्यक असलेली माहिती मिळण्याकरता संबंधित शाळांच्या मुख्याध्यापकांकडे त्यांनी दिनांक ०५.११.२००८ व ०७.११.२००८ रोजी माहितीसाठीचे अर्ज पाठवून दिले असता, माहिती अधिकारी यांनी मुदतीच्या आत व मुदत संपल्यानंतर अपिलार्थीस माहिती न दिल्यामुळे त्यांनी प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दिनांक ०२.०२.२००९ व १०.०२.२००९ रोजी प्रथम अपील अर्ज दाखल केले असता, या अपील अर्जांवर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता प्रकरण प्रलंबित ठेवल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपिले आयोगाकडे सादर केली आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या आठही प्रकरणी अपिलार्थीने संबंधित शाळांच्या मुख्याध्यापकांच्याकडे त्यांच्या शाळेत कायम स्वरुपात कार्यरत असलेले एकूण शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या आस्थापना आणि सेवाविषयक बाबींच्या संदर्भात, सदर शाळा स्थापन झाल्यापासून ते अपिलार्थीने प्रथम अर्ज केलेल्या दिनांकापर्यंतच्या कालावधीशी संबंधित विस्तृत प्रमाणात माहिती मागितली होती. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अपील क्रमांक ३५७/२००९, ३५८/२००९ व ३६४/२००९ शी संबंधित प्रथम अर्जांसंदर्भात दिनांक ०२.०२.२००९ रोजी व उर्वरित अर्जांच्या संदर्भात दिनांक १०.०२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. तथापि शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी यापैकी एकाही प्रकरणाची सुनावणी न घेतल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेली आठ स्वतंत्र विचाराधीन द्वितीय अपिले आयोगाकडे सादर केली आहेत.

वरील प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक ०४.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, अपील क्रमांक ३५७, ३५८, ३६१ व ३६२/२००९ शी संबंधित जन माहिती अधिकारी उपस्थित व इतर चार प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी आणि संबंधित जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता, या प्रकरणी अपिलार्थीच्या आठही प्रथम अपील अर्जांवर जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी प्रथमतः सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०२.०२.२००९ व १०.०२.२००९ रोजी त्यांच्याकडे दाखल झालेल्या सर्व प्रथम अपील अर्जांवर, त्यांनी हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले निर्णय पारित करावेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयांनी समाधान न झाल्यास अपिलार्थी, माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीअंतर्गत, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती अयोगाकडे द्वितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची विचाराधीन आठही अपिले निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील क्रमांक ३५७/२००९, ३५८/२००९, ३५९/२००९, ३६०/२००९, ३६१/२००९, ३६२/२००९, ३६३/२००९ व ३६४/२००९ निकाली काढण्यात येत आहेत.

२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०२.०२.२००९ व १०.०२.२००९ रोजीच्या एकूण आठ प्रथम अपील अर्जांवर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य

विलंब क्षमापित करुन, तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले निर्णय पारित करावेत.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक ०४.०१.२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ सौ. एस.पी.नैण, द्वारा मुख्य कार्यालय अखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ, शिवमंदिरच्या पाठीमागे, सहयोगनगर, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, कुसूमताई प्राथमिक शाळा, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, दिगंबर स्वामी प्राथमिक शाळा, तामसा, ता. हदगांव, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, इंदिरा गांधी प्राथमिक शाळा, शहापूर, ता. देगलूर, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, गितांजली प्राथमिक शाळा, भोकर, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, गोविंदेश्वर प्राथमिक शाळा, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, वसंतराव नाईक प्राथमिक शाळा, सावळी, ता. मुखेड, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जवाहर उलुम उर्दू प्राथमिक शाळा, किनवट, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

९ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, यशवंतराव चव्हाण प्राथमिक शाळा,मुखेड, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१० जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३१३
निर्णय दिनांक: ०५-०१-२०१०

१. श्री. नामदेव पुंडलिक कोल्हे, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद.

विरुध्द

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
पाणीपुरवठा अधिकारी,
महानगरपालिका झोन क्र.'ब',
औरंगाबाद.
२. जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
पाणीपुरवठा विभाग, महानगरपालिका,
औरंगाबाद.

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १३.०१.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने अशी विनंती केली आहे की, आयोगाने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस परिपूर्ण माहिती देण्याचे आदेशित करुन जन माहिती अधिकारी यांच्यावर योग्य ती कार्यवाही आदेशित करावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ११.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे अधिकृत व अनधिकृत नळजोडणी व पाणीपट्टी वसूली आणि पाणीपुरवठयासंदर्भात एकूण आठ मुद्यांद्वारे विस्तृत प्रमाणात माहिती मागविली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १०.११.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २५.११.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस दि. २७.११.२००८ पर्यंत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयानुसार प्राप्त झालेल्या माहितीने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणी अथवा त्यांचा प्रतिनिधी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाही.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस नेमकी कोणती माहिती दिली व ती कधी दिली, यासंदर्भातील कागदपत्रे अपिलार्थीने आयोगास त्यांच्या द्वितीय अपील अर्जासोबत सादर केली नसल्याचे दिसून येत आहे. तसेच त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने त्यांची कशाप्रकारे दिशाभूल होत आहे व ही माहिती चुकीची कशी आहे, याचा कोणताही खुलासा त्यांनी आयोगाकडे सादर केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये केलेला नाही. एवढेच नव्हेतर हा खुलासा तोंडी स्वरुपात सादर करण्यासाठी ते आयोगासमोर आज रोजी सुनावणीसाठी उपस्थित देखील नाहीत. अशाप्रकारे आवश्यक त्या

पुराव्याअभावी आणि सर्व संबंधितांच्या अनुपस्थितीमुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक: ०५-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त,**
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नामदेव पुंडलिक कोल्हे,रा.राजे संभाजी कॉलनी, प्लॉट नं.२५,२६,जळगाव रोड,हर्सूल,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा वॉर्ड अभियंता, महानगरपालिका झोन क्र.'ब', औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,पाणीपुरवठा विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२११९
निर्णय दिनांक: ०५-०१-२०१०

१. श्री. रणजीत नामदेव चव्हाण, : अपिलार्थी
मु.पिंपरखेड, पो.हिवरा,ता.आष्टी,जि.बीड

विरुध्द

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तहसीलदार, आष्टी,
जि.बीड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, तहसील कार्यालय,आष्टी,
जि.बीड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (म),
तहसील कार्यालय,आष्टी,जि.बीड

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०१.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाची कारवाई आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०२.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे आष्टी तालुक्यातील वीट भट्टयांसंदर्भात सन २००५ ते दि. ०२.०६.२००८

पर्यंतच्या कालावधीमधील काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये -तालुक्यातील वीटभट्टयांची संख्या, सदर वीटभट्टयांना महाराष्ट्र राज्य प्रदुषण मंडळाचे प्रमाणपत्र आहे काय?, वीटभट्टयांच्या मालकांची व गावाची नावे व सर्व्हेनंबर आणि संबंधित मालकांनी रॉयल्टी भरली असल्यास त्यांच्या झेरॉक्स प्रती व गावांची नाहरकत प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत- या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. १६.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयातील जमाबंदी विभागास संकलीत करण्याचे सूचित केले असल्याचे त्यांना कळविले व सदर माहिती संकलीत होताच ती अपिलार्थीस पुरविण्याचे आश्वासित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने दि. ०७.०८.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, आष्टी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीप्रमाणे प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर निर्णय न झाल्याने व अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत आणि विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा दि. ०२.०६.२००८ रोजीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे दि. ०२.०६.२००८ रोजी प्राप्त झाला. तथापि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही जुन्या कालावधीशी संबंधित असल्यामुळे संबंधित संचिका शोधून काढण्यासाठी त्यांना वेळ लागला व ही माहिती त्यांच्या कार्यालयातील लिपीक, जमाबंदी-१ यांच्याशी संबंधित असल्यामुळे, त्यांच्याकडून ही माहिती प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस त्यांना द्यावी लागत होती. या सर्व कारणामुळे ते अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती पुरवू शकले नाहीत. त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आता अपिलार्थीने

आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज केल्यानंतर दि. १६.०१.२००९ रोजी दिली आहे. त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ त्यांनी अपिलार्थीस सदर माहिती प्राप्त झाल्याबद्दलची अपिलार्थीची पोचसही आयोगास सादर केली.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या माहितीच्या अर्जास त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कलम ७(१) च्या तरतुदीमध्ये विहित केलेल्या कालावधीमध्ये प्रथम प्रतिसाद देणे आवश्यक होते. तथापि त्यांनी अपिलार्थीस या प्रकरणी दि. १६.०१.२००९ रोजी म्हणजे त्यांनी माहिती मागितलेल्या दिनांकापासून अंदाजे साडेपाच महिने इतक्या विलंबाने अपिलार्थीस माहिती पुरविली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही, त्यांनी अर्ज केल्यापासूनच्या मागील तीन वर्षांच्या कालावधीपूर्वीची अशी होती. त्यामुळे ही माहिती फार जुनी होती व तसेच ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयाची साधनसामग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागणार होती, अशातील कोणतीही बाब या प्रकरणी संभवत नव्हती. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही, संबंधित लिपीक-जमाबंदी-१ यांच्याकडे उपलब्ध होती, म्हणून त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी उशिर लागला, असा युक्तिवाद आयोगासमोर केला आहे. तथापि अशाप्रकारचा युक्तिवाद आयोगास मान्य करता येणार नाही. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५(५) च्या तरतुदीनुसार अर्जदारास माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणाऱ्या त्यांच्या सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतुद आहे. हे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या बरोबरच त्यांच्या कार्यालयातील संबंधित लिपीक-जमाबंदी-१ हे देखील जबाबदार असल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. १६.०१.२००९ रोजी पुरविलेल्या कथित माहितीचे अवलोकन केले असता, त्यामध्ये अपिलार्थीच्या मूळ अर्जातील संबंधित वीटभट्टी

मालकांनी रॉयल्टी भरली असल्यास त्यांच्या झेरॉक्स प्रती व गावांचे नाहरकत प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत या माहितीचा समावेश नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. यासंदर्भात उपस्थित जन माहिती अधिकारी यांना आयोगाने विचारणा केली असता, या मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस ते पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत, असे त्यांनी आयोगास आश्वासित केले. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील परिच्छेदामधील वस्तुस्थितीचे अवलोकन केले असता, या प्रकरणी संबंधित जन माहिती आणि त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सहायक-जमाबंदी-१ लिपीक यांनी अपिलार्थीस विलंबाने व अपूर्ण माहिती दिल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी आपल्या, अपिलार्थीस विलंबाने व अपूर्ण माहिती देण्याच्या कृतीद्वारे, स्वतःला अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस निःसंशयपणे पात्र ठरविले आहे. सबब सचिव (महसूल) यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, आष्टी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सहायक -जमाबंदी-१ लिपीक यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (महसूल) यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, आष्टी,जि.बीड व त्यांचे सहायक - जमाबंदी-१ लिपीक यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक: ०५-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त,**
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रणजीत नामदेव चव्हाण,मु.पिंपरखेड,पो.हिवरा, ता.आष्टी,जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म.),तहसील कार्यालय,आष्टी,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय,आष्टी,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८५०
निर्णय दिनांक: ०५-०१-२०१०

१. श्री.बेंद्रे अरुण तातेराव व श्री. कदम ज्ञानोबा संभाजीराव : अपिलार्थी
मु.पो.सावरगाव(नसरत),
ता.लोहा, जि.नांदेड.

विरुध्द

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
जिल्हा परिषद, शिक्षण कार्यालय (माध्यमिक),
नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.११.२००९ रोजी फेर सादर केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी जाणूनबुजून विलंबाने,चुकीची, अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिली. त्यांच्या प्रथम अपिलाची जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही, त्यामुळे त्यांचे विचाराधीन द्वितीय अपील आयोगाने दाखल करुन घ्यावे आणि अपिलार्थीवर होत असलेला अन्याय दूर करावा व संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) च्या तरतुदीनुसार शास्ती व कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाची कारवाई आदेशित करावी. याच अपील अर्जाबरोबर अपिलार्थीने असेही नमूद केले आहे की, शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी त्यांच्या दि. २६.०७.२००६ रोजीच्या अर्जाद्वारे त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना ३० दिवसांच्या आत पुरविली नाही. त्यांनी अर्जासोबत पाठविलेली रु.१६२/- इतकी रक्कम जन माहिती

अधिकारी यांनी स्वीकारली नाही आणि दि. २४.०२.२००७ रोजी पोस्टाने चुकीची,अपूर्ण व दिशाभूल करणारी आणि माहितीच्या मागणीचा विषय असलेली माहिती नष्ट करुन काही माहिती पुरविली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्याच नियंत्रणाधीन असताना, त्यांनी अपिलार्थीचा अर्ज मुख्याध्यापिका, शिवनिकेतन,माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, सावरगाव (नसरत), ता.लोहा यांच्याकडे हस्तांतरित करुन प्रकरणाला वेगळी दिशा देऊन त्यांची दिशाभूल केली आहे व तसेच संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे उपलब्ध नसलेल्या माहितीचे सकारण स्पष्टीकरण दिलेले नाही. या सर्व बाबी जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर श्री. ठाकरे यांच्या निदर्शनास आणूनही त्यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावली नाही व त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई केली नाही. त्यांनी या अपील अर्जामध्ये पुढे असेही नमूद केले आहे की, अपिलार्थीने दि. १०.०२.२००७ रोजी कलम २०(१) अन्वये केलेल्या प्रथम अपिलाचे संदर्भात अपिलीय प्राधिकरणाने आजतागायत सुनावणी घेतली नसल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २२.०७.२००६ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या सेवाविषयक प्रलंबित बाबींसंदर्भात, जन माहिती अधिकारी यांच्या नियंत्रणात असलेली काही माहिती एकूण तीन मुद्यांद्वारे आणि १४ उपमुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न दिल्याचे कारण दर्शवून त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक,लातूर यांच्याकडे दि. १३.०९.२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथमतः दि. ०४.१२.२००६ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि अपिलार्थी सदर सुनावणीस अनुपस्थित राहिल्यामुळे त्यांनी दि. ११.१२.२००६ रोजी पुनश्च् सुनावणी ठेवली. तथापि याही वेळेस अपिलार्थी

गैरहजर राहिल्याने, शेवटची संधी म्हणून जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ११.०१.२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि ही सुनावणी झाली किंवा कसे, हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही. परंतु यानंतर शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. १८.०१.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील काही माहिती दिली आणि काही मुद्यांवरील माहिती ही मुख्याध्यापक, शिवनिकेतन हायस्कुल सावरगाव यांच्याकडे अपील करुन ती प्राप्त करुन घेण्याचे अपिलार्थीस सूचित केले व या पत्राची प्रत मुख्याध्यापक, शिवनिकेतन हायस्कूल, सावरगाव यांनी अग्रेषित केली. अशाप्रकारे बराच कालापव्यय होऊन देखील अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या |ह्मEन्णाची सुनावणी +ह्मVह्म ह्मnङ्कxह्मह्महEं ०५.०१.२०१० ऱ्ह्मुVह्म्र औरंगाबाद द्यह्मुlह्मु Pह्मुhद्यह्मह्मांह्म +ह्मफ्ह्म्र. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणी अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दि. २२.०७.२००६ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीचे एकूण ३ मुद्दे - 'क', 'ख' व 'ग' पैकी अपिलार्थीस मुद्दा क्र. 'ख' मधील उपमुद्दा क्र. ५ वगळता, कोणत्याही मुद्यावरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. या मुद्याद्वारे त्यांनी स्वत:विषयीच प्रश्नार्थक स्वरुपात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली आहे. यापैकी काही उपमुद्यांद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांचे स्पष्टीकरण व त्यांच्या कृतीबद्दलची कारणे अपेक्षित करणारी व काही उपमुद्यांद्वारे भविष्यकाळातील माहिती मागितली आहे. ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची असल्यामुळे, ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील, 'ख'

या मुद्यामधील उपमुद्दा क्र. ५ च्या संदर्भात त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. १८.०१.२००७ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे. अशाप्रकारे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मुद्दा क्र. 'ख' शी संबंधित उर्वरित मुद्यांद्वारे कोणतीही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. 'ग' द्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी विहित केलेल्या प्रपत्रामध्ये काही माहिती मागविली आहे. यासंदर्भात स्पष्ट करण्यात येत आहे की, अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्याच स्वरुपात ती अर्जदारास देणे अशाप्रकारची तरतुद माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये आहे. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. 'ग' द्वारे विहित केलेल्या प्रपत्रामधील माहिती त्यांच्याकडील ज्या कागदपत्रांमध्ये उपलब्ध आहे, त्या कागदपत्राच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच विनामूल्य पुरवाव्यात.

अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. 'क' चे अवलोकन केले असता, यातील सर्व उपमुद्यांवरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. १८.०१.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस या मुद्यावरील माहिती संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांकडून घेण्याचे सूचित केले आहे. तथापि या माहितीचे स्वरुप पाहता, ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात जतन करुन ठेवली जाणे अपेक्षित आहे, हे पाहता, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. 'क' शी संबंधित सातही उपमुद्यांवरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडूनच देय होत आहे, असे दिसून येते. एवढे असूनही अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी विलंबाने प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात त्यांची काहीशी दिशाभूल केली आहे, असे आयोगास वाटते. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहिती ही, जन माहिती अधिकारी यांनीच त्यांना देणे अनिवार्य असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. 'क' आणि 'ग' च्या संदर्भातील वरील परिच्छेदात

स्पष्ट केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी संपूर्ण घटनाक्रमाचे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अवलोकन केल्यानंतर अपिलार्थीच्या दि. २२.०७.२००६ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन व अपिलार्थीस विलंबाने दिशाभूल करणारी माहिती देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५(५) मध्ये अर्जदारास माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणाऱ्या त्यांच्या सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतुद आहे. हे पाहता, या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी आणि अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असणारे या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी हे सर्व एकत्रितपणे त्यांच्या वरील परिच्छेदात वर्णिलेल्या कृतीमुळे अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र असल्याचे सिध्द होत आहे. सबब शिक्षण संचालक, पुणे व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना अनुक्रमे संबंधित जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, नांदेड व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.'क' व 'ग 'च्या संदर्भातील माहिती, वरील निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे देय

असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. शिक्षण संचालक, पुणे यांना संबंधित जन माहिती अधिकारी (दि. २२.०७.२००६ रोजी व तदनंतर कार्यरत असलेले) यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांचे सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी (दि. २२.०७.२००६ रोजी व तदनंतर कार्यरत असलेले) यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक: ०५-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त,**
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.बेंद्रे अरुण तातेराव व श्री. कदम ज्ञानोबा संभाजीराव, दोघेही रहाणार मु.पो.सावरगाव - (नसरत),ता.लोहा, जि.नांदेड-४३१ ७०८.

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, १७,डॉ.आंबेडकर मार्ग,पुणे-१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८५१
निर्णय दिनांक: ०५-०१-२०१०

१. श्री. शामराव तावजी डोईफोडे, : अपिलार्थी
रा.पैठण, जि.औरंगाबाद.

विरुध्द

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा पुनर्वसन अधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हाधिकारी, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १०.१०.२००८ रोजी फेर सादर केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित कालावधी व्यपगत झाल्यानंतरही मोफत माहिती दिली नाही. त्यांनी माहिती मिळविण्यासाठी रु.४३०/- मनीऑर्डरने पाठविली असता, सदर मनीऑर्डरचा स्वीकार जन माहिती अधिकारी यांनी केला नाही. त्यामुळे व्यथित होऊन त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व धरणग्रस्ताचे प्रमाणपत्र रद्द केलेल्या प्रमाणपत्रधारकाच्या सन १९९९ ते २००० पर्यंतच्या नावांच्या यादीची मागणी कायम ठेवली आहे

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १४.०३.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे सन १९९९ ते २००७ या कालावधीतील त्यांच्या कार्यालयाने धरणग्रस्त रद्द केलेल्या प्रमाणपत्रधारकांच्या नावांची यादी टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ०२.०४.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ४३०/- इतके त्यांच्या कार्यालयामध्ये भरणा करण्याचे सूचित केले.सदर शुल्क आकारताना जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी प्रतिपृष्ठ रु. १०/- या दराने एकूण ४३ पृष्ठांसाठी रु.४३०/- इतके शुल्क आकारण्यात येत असल्याचे अपिलार्थीस कळविले आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मनीऑर्डरने सदरचे शुल्क पाठविले असता, जन माहिती अधिकाऱ्याने हे शुल्क न स्वीकारता मनीऑर्डची रक्कम अपिलार्थीस परत पाठविली. या सर्व प्रकाराने व्यथित होऊन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०७.०५.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनीही निर्णय देण्याची तसदी न घेतल्यामुळे व परिणामी अपिलार्थी अपेक्षित माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे, प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्याकडील माहितीची मागणी केली असता व त्यांच्या सूचनेप्रमाणे आवश्यक ते शुल्क मनीऑर्डरने पाठविले असता, जन माहिती अधिकारी यांनी सदरचे शुल्क स्वीकारले नाही आणि आजतागायत त्यांना कोणतीही माहिती दिलेली नाही.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असून, ही माहिती ते अपिलार्थीस तीन दिवसांच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही, अधिनियमातील तरतुदींशी पूर्णतः सुसंगत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७(१) प्रमाणे प्रथमतः विहित मुदतीत कार्यवाही केली, परंतु ही कार्यवाही चुकीची आहे. कारण त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क प्रतिपृष्ठ रु. १०/- या प्रमाणे आकारुन अपिलार्थीस एकूण ४३ पृष्ठांकरिता रु. ४३०/- इतक्या रकमेचा चलनाद्वारे भरणा करण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने सदरचे शुल्क चलनाद्वारे न भरता, मनीऑर्डरने जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविले. यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने दि. ११.१०.२००५ रोजी पारित केलेल्या अधिसूचना क्र. आर.टी.आय. २००५/ सी.आर. ३१५/०५/५ मधील परिच्छेद क्र. ४(१) प्रमाणे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मनीऑर्डरद्वारे अर्जदाराने पाठविलेल्या शुल्काचा जन माहिती अधिकारी यांनी स्वीकार करणे, त्यांना अनिवार्य आहे. तथापि अशा स्पष्ट सूचना प्रचलीत असूनही या प्रकरणी, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटीचे त्यांनी मनीऑर्डरद्वारे पाठविलेले शुल्क स्वीकारले नाही. याही पेक्षा जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी न घेऊन वर कडी केली आणि त्यांच्या कार्यशैलीतील बेजबाबदारपणा स्पष्ट केला. यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांच्या उपस्थित प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला, परंतु नंतर तो कोणत्या शाखेकडे पाठविला गेला, याची नोंद त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही. अपिलार्थीच्या प्रथम

अपील अर्जावर निर्णय न देण्याचे जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने दिलेले कारण हे केवळ हास्यास्पदच नाही तर जनसामान्यांच्या मनात चीड उत्पन्न होईल, असे आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप इतके सोपे व सरळ होते की सदर माहिती अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना फारसे कष्ट घ्यावे लागले असते, किंवा त्यांच्या कार्यालयाची साधनसामग्री मोठया प्रमाणात वळवावी लागली असण्याची कोणतीही शक्यता या प्रकरणी संभवत नव्हती. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाची परिणीती अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली साधी माहिती देखील प्राप्त न होण्यामध्ये झाली आहे. महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांच्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींची अंमलबजावणी महसूल विभागातर्फे औरंगाबाद जिल्हयात कशाप्रकारे चालू आहे, याचे सम्यक दर्शन या प्रकरणी आयोगास होत आहे. राज्य शासनाच्या दि. ११.१०.२००५ रोजीच्या अधिसूचनेमध्ये अपिलार्थीस रु.२/- प्रतिपृष्ठ या दराने माहिती पुरविण्याचे आदेशित केले असताना देखील या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रतिपृष्ठ रु.१०/- इतक्या दराने शुल्काची आकारणी केली असल्याचे दिसून येत आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब सचिव (महसूल) यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, औरंगाबाद (दि. १४.०३.२००७ रोजी व यानंतर तीस दिवसांच्या कालावधीपर्यंत कार्यरत असलेले) यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाने विनामूल्य पुरवावी व याचा अनुपालन अहवाल आयोगास याच कालावधीमध्ये सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत रजिस्टर्ड टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (महसूल) यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, औरंगाबाद (दि. १४.०३.२००७ रोजी व यानंतर तीस दिवसांच्या कालावधीपर्यंत कार्यरत असलेले) यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक: ०५-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त,**
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शामराव तावजी डोईफोडे,४६९,नाथगल्ली,पैठण, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ४१३/०९, ४१४/०९ व ४१५/०९

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४१३, ४१४ व ४१५
निर्णय दिनांक ०५/०१/२०१०

१ श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल : अपिलार्थी
रा. जाफ्राबाद, जि. जालना

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तालुका कृषि अधिकारी,
तालुका कृषि कार्यालय, जाफ्राबाद, जि. जालना

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी,
जाफ्राबाद, जि. जालना

निर्णय

श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १८.०५.२००९ रोजी केलेली दि. १९.०५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेली तीन स्वतंत्र व्दितीय अपिले आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. १८.०८.२००८ रोजीच्या तीन स्वतंत्र माहितीच्या अर्जांसंबंधी दि. ०७.११.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे तीन स्वतंत्र प्रथम अपिले केली होती. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलांवर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेली व्दितीय अपिले आयोगाकडे दाखल केली आहेत.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपिलांची प्राथमिक तपासणी केली असता, ही अपिले अपिलार्थीने प्रथम

अपिलांच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ७१ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केली आहेत. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीची प्रस्तुतची अपिले फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१) अपील क्र. ४१३/०९, ४१४/०९ व ४१५/०९ फेटाळण्यात येत आहेत.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक : ०५/०१/२०१० **राज्य माहिती आयुक्त,**
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल, बाजार गल्ली, मेनरोड, जाफ्राबाद, जि. जालना.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३०९

निर्णय दिनांक ०५-०१-२०१०

१ श्री. अशोक धोंडीबा साबळे, अपिलार्थी

गट नं. १०५, प्लॉट नंबर ७३, ज्ञानेश्वर नगर, रेणुका

मातामंदिरासमोर, सातारा परिसर, औरंगाबाद

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी

तथा उप अभियंता (सिंचन), जिल्हा परिषद उपविभाग,

सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा कार्यकारी अभियंता (सिंचन), जिल्हा परिषद,

औरंगाबाद

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जाव्दारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली असून त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे नमूद केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे त्यांचे दिनांक ०५-०१-२०१० रोजीचे पत्र सादर केले असून या पत्रामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, त्यांना या अपिलाशी संबंधित मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असून यासंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार राहिलेली नाही. त्यामुळे आयोगाकडे त्यांनी दाखल केलेले विचाराधीन अपील क्रमांक ३०९/२००९ हे ते स्वखुषीने मागे घेत आहेत. या अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांचे विचाराधीन अपील रद्द करण्यात यावे अशी आयोगास अंतिमतः विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीने त्यांचे आयोगाकडे केलेले विचाराधीन अपील आता मागे घेतले असल्यामुळे व ते रद्द करण्याची विनंती आयोगास केली असल्यामुळे, अपिलार्थीने आयोगाकडे केलेले विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

<u>आदेश</u>

१. अपील क्रमांक ३०९/२००९, दिनांक ०७-०१-२००९ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक ०५-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अशोक धोंडीबा साबळे, गट नं. १०५, प्लॉट नंबर ७३, ज्ञानेश्वर नगर, रेणुका मातामंदिरसमोर, सातारा परिसर, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता (सिंचन), जिल्हा परिषद उपविभाग,

सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (सिंचन), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३१०

निर्णय दिनांक ०५-०१-२०१०

१ श्री. गौस महंमद गुलाम मुंशी, : अपिलार्थी

घर नं. ६५०, पेन्शनपुरा, छावणी, औरंगाबाद

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी

तथा मंडळ कृषि अधिकारी,

कार्यालय तालुका कृषि अधिकारी, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा तालुका कृषि अधिकारी, औरंगाबाद

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आयोगास कोणतीही विनंती न करता त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपील अर्जाच्या संदर्भात त्यांच्याशी झालेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती सोबत जोडल्या आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २०-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित दिनांक ०१-०४-२००७ ते १५-०९-२००७ या

कालावधीतील मराठवाडा पाणलोट विकास कार्यक्रमाअंतर्गत झालेल्या ४१.६१ लक्ष रुपये इतक्या रकमेच्या अपहाराच्या विषयासंदर्भात एकूण दोन मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १८-११-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १६८० इतके चलनाव्दारे बँकेत भरुन ते चलन त्यांच्या कार्यालयात सादर करण्याचे सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा न करता अपिलार्थीने या शुल्काचा तपशील जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक २४-११-२००८ रोजीच्या पत्राव्दारे मागितला. यानंतर अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १६८० इतक्या रकमेचा भरणा करुन तालुका कृषि अधिकारी यांच्याकडून दिनांक २२-१२-२००८ रोजी करुन आवश्यक ती माहिती प्राप्त करुन घेतली. तथापि या नंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-१२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २३-१२-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस १६८० रुपयाच्या मर्यादेत राहून माहिती पुरविण्याचे व उर्वरित माहिती विनामूल्य पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले व अपिलार्थीचे अपील निकाली काढले. तथापि या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १८-११-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १६८० इतके चलनाव्दारे बँकेत भरण्याचे त्यांना सूचित केले. माहिती अधिकार

अधिनियमातील कलम ७ (३) (क) मधील तरतुदीप्रमाणे दारिद्र्यरेषेखालील अर्जदार वगळता इतर अर्जदाराने माहितीची मागणी केल्यास या माहितीच्या शुल्काचा तपशील जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास पुरविणे त्यांना अनिवार्य आहे. या प्रकरणी असा तपशील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १९-११-२००८ रोजी अगर तत्पूर्वी कळविणे आवश्यक होते. परंतु माहिती अधिका-याने सदरचा तपशील अपिलार्थीस दिनांक २२-१२-२००८ रोजी पुरविला त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे दिनांक १८-११-२००८ रोजीचे अपिलार्थीस उद्देशून लिहिलेले सदर पत्र अधिनियमातील कलम ७ (३) (क) चा भंग करणारे असल्याचे व पर्यायाने अवैध असल्याचे सिध्द होत आहे. परिणामी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून या प्रकरणी माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रुपये १६८० इतके त्यांना अपिलार्थीस परत करावे लागेल. सदरचे शुल्क अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयात दिनांक १९-१२-२००८ रोजी भरल्याचे आयोगास आढळून येत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे दिनांक १९-१२-२००८ रोजी स्वीकारलेले शुल्क रुपये १६८० इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस प्राप्त झालेल्या माहितीवर आयोगा-कडे केलेल्या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने कोणतेही अभिप्राय दिले नसल्याने, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवर आयोगाचे कोणतेही भाष्य नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रुपये १६८० इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक ०५-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त**
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गौस महंमद गुलाम मुंशी, घर नं. ६५०, पेन्शनपुरा, छावणी, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, कार्यालय तालुका कृषि अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३११

निर्णय दिनांक ०५-०१-२०१०

१ श्री. बिपीनचंद्र केशवराव पाटील आणि इतर, : अपिलार्थी
रा. एन-११, एच-सेक्टर, प्लॉट नं. ०५, नवजीवन कॉलनी,
हडको, औरंगाबाद

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी
तथा उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण
कंपनी मर्यादित, शहर विभाग १, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण
कंपनी मर्यादित, शहर विभाग १, विद्युत भवन, मील कॉर्नर,
औरंगाबाद

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने या प्रकरणी आपल्या माहितीची मागणी कायम ठेवून त्यांचे अपील मान्य करावे व संबंधित जन माहिती अधिकारी यांना अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे शास्ती लावावी अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक १६-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित काही माहिती एकूण ११ मुद्दयाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १७-१०-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ३० इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने शुल्क भरुन जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती घेतली असता प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने आणि अपिलार्थीस अपेक्षित माहितीपासून वंचित राहावे लागल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ११-११-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथमत: सुनावणी घेऊन आपला निर्णय देणे आयोगास या टप्प्यावर गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, शहर विभाग १, औरंगाबाद यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ११-११-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, शहर विभाग १,औरंगाबाद यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ११-११-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक ०५-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बिपीनचंद्र केशवराव पाटील आणि इतर, रा. एन-११, एच-सेक्टर, प्लॉट नं. ०५, नवजीवन कॉलनी, हडको, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, शहर विभाग १, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण

कंपनी मर्यादित, शहर विभाग १, विद्युत भवन, मील कॉर्नर, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३१२

निर्णय दिनांक ०५-०१-२०१०

१ श्री. पांडुरंग निवृत्तीराव मोने, : अपिलार्थी

रा. अंबाली निवास, समतानगर, औरंगाबाद

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी

तथा विभागीय आयुक्त,

विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा विभागीय आयुक्त,

विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : तहसीलदार (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : अपर विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक २४-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे, सन १९९० ते १९९६-९७ या कालावधीतील औरंगाबाद प्रादेशिक दुय्यम सेवा निवड मंडळामार्फत निवड झालेल्या निवड यादीतील एकूण २२ उमेदवारांच्या, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केलेल्या त्यांच्या शैक्षणिक पात्रतेच्यासंदर्भातील संपूर्ण माहिती, टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २७-११-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागितलेली माहिती, ही तत्कालीन प्रादेशिक निवड मंडळाचे कामकाज बंद करण्यात आले असल्याने व ही माहिती जतन करुन ठेवण्याचा कालावधी संपल्याने ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे कळविले. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-१२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा दिनांक १२-१२-२००८ रोजीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे मूळात प्राप्त झाला नसल्यामुळे त्यांना अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय देणे शक्य झाले नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने नमूद केलेली वरील वस्तुस्थिती पाहता, अपिलार्थी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी त्यांच्या दिनांक १२-१२-२००८ रोजीच्या या प्रकरणाशी संबंधित प्रथम अपील अर्जाची प्रत जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत सादर करावी. अपिलार्थीकडून त्यांच्या

दिनांक १२-१२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जाची प्रत प्राप्त झाल्यानंतर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १२-१२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १२-१२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, सदर अपील अर्जाची प्रत अपिलार्थीकडून प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक ०५-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. पांडुरंग निवृत्तीराव मोने, रा. अंबाली निवास, समतानगर, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३०५

निर्णय दिनांक ०५.०१.२०१०

१ श्री. आबासाहेब दगडू पठाडे, : अपिलार्थी
मु.पो. वरझडी, ता. जि. औरंगाबाद

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम
उपविभाग (दक्षिण), औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम
विभाग, औरंगाबाद

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२.०२.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाविरुध्द अपील केल्याचे नमूद करुन, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून रोजगार हमी योजनेची कामे, फळबाग योजना, गांडुळ खत प्रकल्प व त्यावरील अनुदान व संदर्भीय पत्रानुसार कुशल व अकुशल खर्च ही माहिती आवश्यक असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांचा दिनांक १६.०९.२००८ रोजीचा मूळ अर्ज, जो जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २०.०९.२००८ रोजी प्राप्त झाला, त्याद्वारे जन माहिती अधिकारी

यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील देवळाई ते सिंदोन, भिंदोन कचनेर रस्त्यावर दिनांक ३१.०३.२००७ ते १६.०९.२००८ पर्यंत काय काम करण्यात आले व त्यावर कामनिहाय किती खर्च करण्यात आला, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २३.१०.२००८ रोजी प्रथम अपील करुन, आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७.१२.२००८ रोजी आपले आदेश पारित करुन, अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला आहे की, अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. तथापि ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी किंवा त्यांना देय असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्यासाठी अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित राहिले नाहीत. अंतिमतः त्यांनी दिनांक ०२.०२.२००९ रोजी अपिलार्थीस त्यांच्याकडे माहिती तयार असल्याचे व ती घेऊन जाण्याचे कळविल्यानंतर अपिलार्थीने दिनांक १७.०४.२००९ रोजी ही माहिती त्यांच्या कार्यालयाकडून व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घेतली. त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ त्यांनी अपिलार्थीची दिनांक १७.४.२००९ रोजीची माहिती मिळाल्याची पोच पावती आयोगास सादर केली आहे. यावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील माहिती दिनांक १७.०४.२००९ रोजी व्यक्तिशः दिल्याचे सिध्द होत

आहे. जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीच्या केलेल्या मूळ अर्जान्वये त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहिती हवी असल्याचे नमूद केले आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने 'व्यक्तिशः' माहितीची मागणी केल्यानंतर या अर्जाच्या संदर्भातील पुढील घडामोडी ज्ञात होण्याकरिता अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः उपस्थित रहाणे हे त्यांना अनिवार्य आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्या म्हणण्याप्रमाणे अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात त्यांना आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी कधीही उपस्थित झाले नाहीत. जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नसल्यामुळे, अथवा ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात व्यक्तिशः उपस्थित राहिल्याबद्दलचा कोणताही पुरावा त्यांनी आयोगाकडे सादर केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडला नसल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांचा अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित राहिले नसल्याचा मुद्दा येथे सिध्द होत आहे. याच बरोबर आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थी या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या प्रथम अपिलावरील सुनावणीच्या वेळी गैरहजर होते. तसेच आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना आवश्यक असलेली माहिती या सदरासमोर त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून कृषी विभागाची माहिती अपेक्षिली असल्याचे दिसून येते. या सर्व विसंगती एकत्रितपणे पाहता व विशेषतः अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य प्राप्त झाली नसल्यामुळे, अपिलार्थीचे

विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१. अपील क्रमांक ३०५/२००९ फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक ०५.०१.२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. आबासाहेब दगडू पठाडे, मु.पो. वरझडी, ता. जि. औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग (दक्षिण), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/ ३०६
निर्णय दिनांक ०५-०१-२०१०

१ श्री. राजेंद्र काशीनाथ पितृभक्त, : अपिलार्थी
एन - १२, जी - १५, स्वामी विवेकानंद नगर,
हडको, औरंगाबाद

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (सिंचन विभाग),
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपअभियंता, जिल्हा परिषद सिंचन उपविभाग कन्नड, जि. औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता (सिंचन), जिल्हा परिषद, औरंगाबाद

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१.०१.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून, जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून दिनांक ०५.०१.२०१० रोजी लिहिलेले पत्र सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त झाली असून, त्यांची याबाबतीत कोणतीही तक्रार शिल्लक राहिलेली नाही. त्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील क्रमांक ३०६/२००९ हे, ते स्वखुषीने मागे घेत आहेत. या पत्रामध्ये अपिलार्थीने आयोगास अशीही विनंती केली आहे की, विचाराधीन अपील रद्द करण्यात यावे.

खुद्द अपिलार्थीने आयोगाकडे दाखल केलेले विचाराधीन अपील आता त्यांच्या दिनांक ०५.०१.२०१० रोजीच्या पत्राद्वारे मागे घेतले असल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१. अपील क्रमांक ३०६/२००९, दिनांक २१.०१.२००९ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक ०५.०१.२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. राजेंद्र काशीनाथ पितृभक्त, एन - १२, जी-१५, स्वामी विवेकांनद नगर, हडको, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, जिल्हा परिषद सिंचन उपविभाग कन्नड, जि.

औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (सिंचन), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३०७

निर्णय दिनांक ०५.०१.२०१०

१ श्री. तावरे काशीनाथ झांबर, : अपिलार्थी
मु.पो. कडा, ता. आष्टी, जि. बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.,
उपविभाग आष्टी, जि. बीड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत
वितरण कंपनी मर्या., बीड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., उपविभाग आष्टी, जि. बीड

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०.११.२००९ रोजी फेर सादर केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांना कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे स्मरणपत्र देऊनही त्यांना अद्यापपावेतो जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झालेली नाही. त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती ही विज वितरण कंपनीच्या

कार्यालयाच्या रेकॉर्डशी मिळतीजुळती नाही व ती खोटी आणि दिशाभूल करणारी आहे. या अभिप्रायसह त्यांनी आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी या अपील अर्जामध्ये कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २६.११.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांचे मीटर क्रमांक R. १६०५ चे बीलाबाबत, दिनांक १३.०२.२००१ ते १३.०५.२००१ व १३.०५.२००१ ते १३.०८.२००१ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या कालावधीचे त्यांचे मीटर बील, सदरचे मीटर P.D. आहे काय ? असेल तर कधी पासून, वीज कनेक्शन घेतल्यापासून ते आजपर्यंत वापरलेले युनिट किती, त्याप्रमाणे बील आहे काय - या मुद्यांचा समावेश होतो. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १३.१२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २२.०९.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांच्याकडे प्रथम अपील केले. त्यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती अद्यापपावेतो प्राप्त झाली नाही. जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १३.१२.२००७ रोजी पुरविलेली माहिती ही विज वितरण कंपनीच्या

कार्यालयातील अभिलेख्यांशी मिळतीजुळती नाही, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना सत्य माहिती अपेक्षित आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला आहे की, अपिलार्थीचे वीज बील ज्या कालावधीमध्ये आकारले गेले होते, त्यावेळी तीन महिन्यामध्ये ग्राहकाने वापर केलेल्या युनिटची एकूण संख्या त्यांच्या कार्यालयाकडे संगणकामार्फत जतन करुन ठेवण्याची पध्दत प्रचलीत होती. सदर संगणकाचे मुख्य केंद्र त्यावेळी नांदेड येथे होते, यानंतर हे केंद्र बीड येथे स्थलांतरित करण्यात आले. या केंद्राच्या स्थलांतरणामध्ये संगणकातील डेटा करप्ट झाला असल्यामुळे त्यांच्याकडे अपिलार्थीने ज्या कालावधीशी संबंधित माहिती मागितली आहे ती माहिती, आता उपलब्ध होऊ शकत नाही. तथापि अपिलार्थीने यानंतरच्या कालावधीमध्ये वापरलेल्या एकूण युनिटच्या संख्येवरुन त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस पुरवून, अपिलार्थीस बीलाची रक्कम कळविली आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या विहित प्रपत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस बील दिले आहे काय, अशी आयोगाने विचारणा केली असता, त्यांनी असे बील अपिलार्थीस दिले नसल्याचे आयोगास अवगत केले. तथापि हे बील त्यांना आता अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत विनामूल्य देता येईल, असेही त्यांनी आयोगास पुढे स्पष्ट केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील, "सदरचे बील P.D. आहे काय? वापरलेल्या युनिटप्रमाणे बील आहे काय? " या मुद्यांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून या मुद्यांद्वारे ज्या स्वरुपात माहिती मागितली आहे ते स्वरुप, माहिती अधिकार अधिनियमातील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी पूर्णतः विसंगत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांची मते, त्यांचा खुलासा अथवा स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती मागणे आणि जन माहिती

अधिकारी यांनी अशाप्रकारचे स्पष्टीकरण व खुलासे अर्जदारास देणे, अशा स्वरुपाची प्रक्रिया मूळात अभिप्रेत नाही. हे पाहता, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील त्यांचे घरगुती विज मीटर क्रमांक आर. १६०५ चे दिनांक १३.०२.२००१ ते १३.०५.२००१ आणि १३.०५.२००१ ते १३.०८.२००१ या कालावधीतील बील, सदरचे विज मीटर कधीपासून पी.डी. (Permanent Disconnect) आहे व विज कनेक्शन घेतल्यापासून ते अपिलार्थीने अर्ज करण्याच्या दिनांकापर्यंत त्यांनी वापरलेल्या युनिटची संख्या एवढीच माहिती देय होत आहे. यापैकी विज बील वगळता उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १३.१२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे दिलेली आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकरी यांनी त्यांना पुरविलेली माहिती ही महाराष्ट्र राज्य, विज वितरण कंपनीच्या अभिलेख्यांशी मिळतीजुळती नाही, असे नमूद केले आहे. या संदर्भात अपिलार्थीस, आयोगाने, त्यांनी हे निष्कर्ष महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीच्या कोणत्या अभिलेख्याशी तुलना करुन काढले याची त्यांना विचारणा केली असता, त्यांनी आयोगास असे उत्तर दिले की, या कालावधीची माहिती मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्धच नाही, त्यामुळे या प्रकरणी तुलनेचा प्रश्न उद्‌भवत नाही. अपिलार्थीचा हा युक्तिवाद आयोग अमान्य करीत असून, केवळ काही तांत्रिक दोषामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देता आली नाही व त्यांनी अपिलार्थी यांच्या बिलासंदर्भात जी माहिती दिली आहे, ती त्यांच्याकडील प्रचलीत कार्यपध्दतीनुसार दिली नसल्याचे या प्रकरणी सिध्द होत आहे. ही माहिती खोटी असल्याचे अपिलार्थीचे, युक्तिवादामध्ये व्यक्त केलेले अभिप्राय, कोणत्याही पुरव्याशिवाय आयोगास मान्य करता येणार नाहीत. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेली त्यांच्या विजेच्या बिलाची माहिती त्यांनी विहित प्रपत्रामध्ये अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य आणि व्यक्तिशः पुरवावी. अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडून मूळात व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे, अपिलार्थीस ही माहिती स्वतः जन माहिती अधिकारी यांच्या

कार्यालयात उपस्थित राहून पुर्वनियोजित वेळी त्यांच्या कार्यालयाकडून या कालावधीमध्ये हस्तगत करुन घ्यावी लागेल.

जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी त्यांच्या संगणकीय केंद्राच्या नांदेड येथून बीड येथे झालेल्या स्थलांतरणाच्या वेळी त्यांच्या संगणकातील डेटा करप्ट झाल्याचे आयोगास अवगत केले आहे. या संदर्भात व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.,मुंबई यांना या प्रकरणी त्यांच्या स्तरावर चौकशी करुन आवश्यक वाटल्यास संबंधितांवर योग्य ती कारवाई करावी, अशी शिफारस करण्यात येत आहे व तसेच या प्रकरणी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २२.०९.२००८ रोजीच्या अपिलावर निर्णय न घेऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या बेजबाबदार कार्यशैलीतील त्यांनी यथायोग्यरित्या नोंद घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या कालावधीच्या विज बिलाची प्रत त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक ०५.०१.२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. तावरे काशीनाथ झांबर, मु.पो. कडा, ता. आष्टी, जि. बीड

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., उपविभाग आष्टी, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., प्रकाशगड, ५वा मजला, बांद्रा (पुर्व), मुंबई - ४०० ०५१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३०८

निर्णय दिनांक ०५.०१.२०१०

१ श्री. महेश रमेश पाटील, : अपिलार्थी
रा. औरंगाबाद

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
प्रभारी मुख्याध्यापिका, रविसूत मराठी प्राथमिक
शाळा, मिलींदनगर, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,
औरंगाबाद

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१.०१.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून, या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार रजिस्टर्ड पोस्टाद्वारे केलेला अर्ज जन माहिती अधिकारी यांनी जाणीवपुर्वक नाकारल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले होते. तथापि अपील करुनही त्यांना कोणतीही माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ११.११.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या शाळेविषयी सन २००५ - २००६ ते २००८ - २००९ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या कालावधीतील कार्यरत शिक्षकांच्या हजेरीची माहिती, या कालावधीतील चौथीच्या विद्यार्थ्यांचे चौथी बोर्ड, औरंगाबाद बोर्डाच्या अंतिम निकालाची माहिती, एप्रिल २००५ ते ऑक्टोबर २००८ या कालावधीमधील शाळेच्या प्रवेश निर्गम रजिस्टरची प्रत, जुन २००६ ते मे २००७ यावर्षी रविसूत मराठी प्राथमिक शाळा त्रिमुर्ती कॉलनी, पवननगर, रांजणगाव येथील शाळांना जिल्हा परिषद औरंगाबादकडून मिळालेली अंतिम मान्यता प्रतीची झेरॉक्स व जुन २००७ ते ऑक्टोबर २००८ यावर्षी या शाळा (अंकूर बालकमंदिर, सावतानगर, रांजणगांव तालुका गंगापूर, जि. औरंगाबाद येथील रविसूत मराठी प्राथमिक शाळा या शाळेची शासनमान्यता प्रत - या मुद्यांचा समावेश होतो. ही माहिती अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून रजिस्टर्ड पोस्टाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीने सदरचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठविला होता. तथापि या अर्जाची तामीली न झाल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २७.११.२००८ रोजी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन द्वितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना संदर्भित शिक्षण संस्थेकडून, माहितीसाठीचा अर्ज व आयोगाकडे केलेले अपील मागे घेण्यासाठी दबाव आणण्यात आला. परंतु त्यांना मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस माहिती देऊ केली असता, अपिलार्थी हे माहितीचा स्वीकार करीत नाहीत. या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे एखादा पुरावा उपलब्ध आहे काय? असे आयोगाने विचारले असता, असा कोणताही पुरावा आयोगास सादर करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे, त्यांनी आयोगास सांगितले.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की , या प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१.०१.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविल्यानंतर जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक ०७.०३.२००९ रोजी सुनावणी घेऊन त्याच दिवशी निर्णय दिला आहे. या निर्णयाद्वारे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील मान्य करुन, अपिलार्थीस दिनांक १७.०३.२००९ रोजी माहिती देण्याचे मुख्याध्यापिका तथा जन माहिती अधिकारी यांना सूचित केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सुचित करुनही अपिलार्थीस माहिती न देण्याचे कारण आयोगाने संबंधित जन माहिती अधिकारी यांना विचारले असता, त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संस्थेकडे उपलब्ध असल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०७.०३.२००९ रोजी आदेशित करुनही अपिलार्थीस दिनांक १७.०३.२००९ पर्यंत कोणतीही माहिती पुरविली नाही. दिनांक १७.०३.२००९ ते आज रोजी पर्यंत अपिलार्थीस माहिती देण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी कोणताही सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे देखिल आयोगास या प्रकरणी आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाप्रमाणे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जरी संबंधित संस्थेकडे उपलब्ध असली तरीही त्यांनी ही माहिती, अधिनियमातील कलम २ (च) च्या तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे, ती संस्थेकडून प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांच्या स्तरावर प्रयत्न करणे गरजेचे होते. तथापि त्यांनी

अशाप्रकारची कोणतीही कृती केल्याचे आयोगास आढळून येत नाही. याउपर आज रोजी सुनावणीच्या वेळी उपस्थित शिक्षणाधिकारी यांच्याकडून, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही मुख्याध्यापकांच्या ताब्यात असणे अभिप्रेत आहे की ती संस्थेकडे असणे अभिप्रेत आहे याची आयोगाने विचारणा केली असता, त्यांनी देखिल अपिलार्थीने मागणी केलेली माहिती मुख्याध्यापकाकडे उपलब्ध असावयास कोणतीही हरकत नसल्याचे आयोगास अवगत केले आहे. यावरुन असे आढळून येत आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०७.०३.२००९ रोजी आदेशित करुनही आज दिनांक ०५.०१.२०१० पर्यंत संबंधित शाळेच्या मुख्याध्यापिकेकडून अपिलार्थीस कोणतीही माहिती पुरविली गेली नाही. अपिलार्थीस माहिती न पुरविण्यासाठी त्यांनी अपिलार्थी ही माहिती स्वीकारत नाहीत, असे कारण दर्शविले आहे. तथापि त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ त्या आयोगासमोर कोणताही पुरावा सादर करु शकल्या नाहीत. अपिलार्थी हे याच शाळेतील शिक्षक आहेत. कदाचित काही पूर्वग्रहामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी कोणतीही कार्यवाही केली नसावी, असे अनुमान या प्रकरणी काढण्यास हरकत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस देण्यासंदर्भात अथवा नाकारण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी एका विशिष्ट कालावधीमध्ये अपिलार्थीस माहिती देणे त्यांना गरजेचे होते. अपिलार्थीस माहिती न देण्याची त्यांची इच्छा असली तरीही या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक ०७.०३.२००९ रोजीच्या आदेशाचे जन माहिती अधिकारी यांनी अनुपालन करणे त्यांना गरजेचे होते. परंतु त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाचे देखिल पालन केल्याचे आयोगास आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली व त्यांना देय असलेली कोणतीही माहिती अधिनियमातील कलम ७ (१) मध्ये विहित केलेल्या मुदतीत दिली नसल्यामुळे, त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) च्या तरतुदीप्रमाणे विलंबाच्या प्रतिदिनी रु. २५० याप्रमाणे एकूण रु. २५,०००/- (अक्षरी रुपये पंचवीस

हजार) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. या शास्तीचा भरणा त्यांनी जास्तीत जास्त २५ हप्त्यामध्ये शासकीय कोषागारात पुढील लेखाशिर्षाखाली करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

लेखाशीर्ष- "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) "

जन माहिती अधिकारी या सदर शास्तीचा भरणा फेब्रुवारी २०१० पासून नियमितपणे करतील, असे शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी पहावे, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना पुढे असेही सूचित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जर संबंधित शिक्षण संस्था जन माहिती अधिकारी यांना प्रतिबंध करत असेल तर संस्थेवर आवश्यक वाटल्यास त्यांनी महाराष्ट्र खाजगी प्राथमिक शाळा अधिनियम १९८१ प्रमाणे कारवाई करुन, कोणत्याही परिस्थितीत अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती उपरोक्त कालावधीमध्ये विनामूल्य उपलब्ध करुन दिली जाईल, असे पहावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व रजिस्टर्ड पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी यांना विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० याप्रमाणे एकूण रु. २५,०००/- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती लावण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक ०५.०१.२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. महेश रमेश पाटील, द्वारा, श्री. दिनेश वकील, रामेश्वर अपार्टमेंटच्या बाजूला, ज्युबलीपार्क, जिन्दानी लॅबरोटरीजवळ, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा प्रभारी मुख्याध्यापिका, रविसूत मराठी प्राथमिक शाळा, मिलींदनगर, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३१४
निर्णय दिनांक: ०६-०१-२०१०

१. श्री.राजू सुरतराम ताजी, : अपिलार्थी
रा.बेंदवाडी, ता. वैजापूर, जि.औरंगाबाद.

विरुध्द

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपवनसंरक्षक, औरंगाबाद
२. जन अपिलीय अधिकारी तथा
वनसंरक्षक अधिकारी,
वनविभाग,औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : मुख्य लेखापाल,
वनसंरक्षक कार्यालय, औरंगाबाद.
जन अपिलीय अधिकारी : सहायक वनसंरक्षक,
औरंगाबाद वन विभाग, औरंगाबाद

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.०१.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी आठ दिवसांच्या आत माहिती देण्याचे आदेशित करुनही अद्यापपावेतो यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व या अपील अर्जाद्वारे आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २९.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या औरंगाबाद व जालना या दोन जिल्हयामधील सन २००४ ते मार्च, २००८ या कालावधीमध्ये परवानाधारका लिंब व आंब्याच्या लाकडाने भरलेल्या गाडयांच्यासंदर्भात

काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - सन २००४ ते मार्च,२००८ या कालावधीमध्ये परवानाधारक लिंब व आंब्याच्या लाकडाने भरलेल्या गाडया किती येतात, त्या मालापासून शासनाला किती महसूल जमा होतो. त्या मालाचे पासेस नंबर व गार्ड,दिनांकासह इ. सविस्तर व अवैध भरलेल्या लाकडाने पासेसशिवाय किती माल येतो व त्या मालाच्या किती गाडया पकडतात, त्या मालापासून शासनाला किती महसूल वसूल करुन दिला जातो व त्या मालाचे चलन नंबर व गाडीनंबर दिनांकासह सविस्तर माहिती - अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीने सदरचा अर्ज उपवनसंरक्षक, औरंगाबाद यांना उद्देशून केला होता. तथापि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती वनपरिक्षेत्रपाल अधिकाऱ्यांच्या पातळीवरची असल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम ६(३)(एक) नुसार संबंधित वन परिक्षेत्र अधिकाऱ्याकडे दि. ०७.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीच्या अर्जाची प्रत सर्व वनपरिक्षेत्र अधिकाऱ्याकडे पाठवून त्यांना अपिलार्थीस परस्पर माहिती देण्याचे सूचित केले व या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. या पत्रानंतर त्यांनी संबंधित वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांना त्यांच्या कार्यालयातर्फे दि. १५.१०, ३१.१० व १९.११.२००८ रोजी स्मरणपत्र पाठविले. तथापि यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त होऊ शकली नाही. मध्यंतरीच्या काळात दि. १२.११.२००८ रोजी अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार त्यांना संबंधितांकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले होते. या अपिलाचा निर्णय जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०१.०१.२००९ रोजी देऊन या निर्णयाद्वारे त्यांनी खुलताबाद परिक्षेत्राशी संबंधित माहिती आठ दिवसांच्या आत व उर्वरित वनपरिक्षेत्र अधिकाऱ्याशी संबंधित औरंगाबाद जिल्हयातील माहिती अपिलार्थीस लवकरात लवकर देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर अपिलार्थीस सोयगाव वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी दि. २०.०१.२००९ रोजी काही माहिती पुरविली. तथापि औरंगाबाद वनपरिक्षेत्र वगळता उर्वरित कोणत्याही वनपरिक्षेत्रातील अधिकाऱ्यांकडून अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, औरंगाबाद वनपरिक्षेत्र अधिकाऱ्याने अपिलार्थीस दि. २३.१०.२००८ रोजी सोयगाव वनपरिक्षेत्र अधिकाऱ्याने दि. २०.०१.२००९ रोजी, खुलताबाद वनपरिक्षेत्र अधिकाऱ्याने दि. १६.०२.२००९ रोजी आणि जालना (द) वनपरिक्षेत्र अधिकाऱ्याने दि.१२.०२.२००९ रोजी अपिलार्थीस विनामूल्य माहिती पुरविली. औरंगाबाद व जालना जिल्हयातील उर्वरित वनपरिक्षेत्र अधिकारी जालना (उत्तर), अजिंठा व कन्नड यांनी अपिलार्थीस अद्यापपावेतो कोणतीही माहिती पुरविली नाही. अपिलार्थीने उपवनसंरक्षक कार्यालयाकडे माहिती मागितली होती. उपवनसंरक्षक कार्यालयातील मुख्य लिपीक यांची जन माहिती अधिकारी या पदाचा कार्यभार सोपविण्यात आला आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे सहज उपलब्ध असू शकत नाही. त्यामुळे त्यांनी या प्रकरणी अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या तरतुदीप्रमाणे अपिलार्थीच्या अर्जाची प्रत सर्व संबंधित उपवनक्षेत्रपाल यांच्याकडे पाठवून त्यांना अपिलार्थीस परस्पर माहिती देण्याचे सूचित केले. अपिलार्थीने जी काही माहिती मागितलेली आहे ती सर्व संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्याकडून परस्पर प्राप्त झालेली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून आले आहे की, औरंगाबाद व जालना जिल्हयातील एकूण सात वनपरिक्षेत्रपालापैकी वनपरिक्षेत्रपाल,औरंगाबाद, सोयगाव, खुलताबाद व जालना (द) यांनी अपिलार्थीस विलंबाने व काही प्रकरणी अपूर्ण माहिती दिली आहे तर वनपरिक्षेत्रपाल, जालना (उ), अजिंठा व कन्नड यांनी अपिलार्थीस आजपावेतो कोणतीही माहिती पुरविली नाही. अपिलार्थीस पुरविलेल्या कथित माहितीचे अवलोकन केले असता,औरंगाबाद वनपरिक्षेत्रपालाने दिलेल्या माहितीमध्ये अपिलार्थीने मागणी केलेल्या

माहितीतील महसूलाच्या माहितीचा समावेश नाही. सोयगाव वनक्षेत्रपाल अधिकाऱ्याने दि. २०.०१.२००९ रोजी पुरविलेल्या माहितीमध्ये देखील अपिलार्थीच्या मूळ अर्जातील महसूलाच्या मुद्यावरील माहितीचा समावेश नाही. खुलताबाद व जालना (दक्षिण) यांनी अनुक्रमे दि. १६.०२.२००८ व १२.०९.२००८ रोजी माहिती पुरवून अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंब लावला आहे. अपिलार्थीने दि. २९.०९.२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्ज करुनही त्यांना आजतागायत म्हणजे दि. ०६.०१.२०१० पर्यंत देखील अपेक्षित माहिती पूर्णरितीने प्राप्त झाली नसल्याचे या प्रकरणी आढळून येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी या प्रकरणी प्रत्यक्षात नेमलेले गेलेले जन माहिती अधिकारी हे जरी सरळ जबाबदार नसले तरी या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक, ज्यांना माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५(५) च्या तरतुदीनुसार माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतुद आहेत, असे सर्वजण अपिलार्थीस विलंबाने, अपूर्ण आणि काही प्रमाणात न मिळण्यास जबाबदार असल्याचे आयोगास आढळून येत आहे. या सर्व वनपरिक्षेत्र अधिकाऱ्याने आपल्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे स्वतःला अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्यास पात्र ठरवले आहे. सबब सचिव (वने) यांना या प्रकरणाशी संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी, औरंगाबाद, सोयगाव, खुलताबाद, जालना(द) यांच्यावर त्यांनी अपिलार्थीस विलंबाने व अपूर्ण माहिती देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या संबंधित सहायकांपैकी जालना (उ), अजिंठा, कन्नड येथील वनपरिक्षेत्र अधिकाऱ्याने अपिलार्थीस अद्यापपावेतो कोणतीही माहिती दिलेली नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व तिचे स्वरुप पाहता, त्यांच्या मूळ अर्जाच्या नजिकच्या कालावशी संबंधित आहे, त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस विहित मुदतीत देणे हे काम फारसे जिकीरीचे होते, असे आयोगास वाटत नाही. त्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रमामध्ये जालना (उ),अंबड व कन्नड येथील वन परिक्षेत्र अधिकाऱ्याने कोणताही

सकारात्मक प्रतिसाद न देऊन त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे कलम २०(१) प्रमाणे कारवाईस पात्र ठरले आहेत. या विलंबाची कारणे स्पष्ट करण्यासाठी संबंधित वन परिक्षेत्र अधिकारी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. त्यांना त्यांच्या बचावाची संधी देण्याच्यादृष्टीने या वनपरिक्षेत्र अधिकारी, जालना (उ), वनपरिक्षेत्र अधिकारी, अजिंठा व वनपरिक्षेत्र अधिकारी,कन्नड या तीनही जन माहिती अधिकारी यांना त्यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांना प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्यामुळे त्यांच्यावर या प्रकरणी प्रत्येकी रु.२५,०००/- इतक्या रकमेची शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्यास जन माहिती अधिकारी जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचे निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

अपिलार्थीस माहिती देण्याच्यादृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत (वनपरिक्षेत्र अधिकारी (जालना (उ),अजिंठा व कन्नड यांच्याकडील संपूर्ण माहिती व वनपरिक्षेत्र अधिकारी, औरंगाबाद,सोयगाव,खुलताबाद व जालना (दक्षिण) यांच्याकडील उर्वरित माहिती) सर्व वन परिक्षेत्र अधिकाऱ्यांकडून संपूर्ण माहिती स्वीकारुन त्यांना,विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस दि. १२.११.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०१.०१.२००९ रोजी दिलेल्या निर्णयाचे अवलोकन करता हा निर्णय संदिग्ध असल्याचे आयोगाच्या निदर्शनास येत आहे. या निर्णयामध्ये त्यांनी खुलताबाद वनपरिक्षेत्र अधिकाऱ्याला अपिलार्थीस आठ दिवसांच्या आत माहिती देण्याचे व औरंगाबाद जिल्हयातील उर्वरित वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांना अपिलार्थीस लवकरात लवकर माहिती देण्याचे सूचित केल्याचे दिसून येत आहे. या आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्याकरिता कोणतीही कालमर्यादा निश्चित केली नाही, त्यामुळे त्यांचा हा आदेश मोघम स्वरुपाचा

असल्याचे सिध्द होत आहे. इत:पर त्यांनी अशाप्रकारचे मोघम आदेश देण्याचे टाळावे, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, वरील निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (वने) यांना यांना या प्रकरणाशी संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी, औरंगाबाद, सोयगाव, खुलताबाद, जालना(द) यांच्यावर त्यांनी अपिलार्थीस विलंबाने व अपूर्ण माहिती देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

४. जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक: ०६-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त,**
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.राजू सुरतराम ताजी,रा.बेंदवाडी, ता. वैजापूर, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्य लेखापाल,वनसंरक्षक कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, औरंगाबाद वन विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (वने), मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३१५
निर्णय दिनांक: ०६-०१-२०१०

१. श्री. प्रकाश ग्यानोबा वाघमारे, : अपिलार्थी
रा.गोकुंदा, ता.किनवट,जि.नांदेड.

विरुध्द

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
गट विकास अधिकारी, पंचायत समिती,
हिमायतनगर,जि.नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),
जिल्हा परिषद,नांदेड

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.०१.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, विस्तार अधिकारी व ग्रामसेवक यांच्या टी.ए. बीलाची आणि मुख्यालयासंबंधीची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून हवी असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०८.१०.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील विस्तार अधिकाऱ्यांच्या संदर्भातील सन २००६-२००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण ९ मुद्यांद्वारे शीघ्र टपालाद्वारे मागितली होती. या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. १४.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने सादर केलेल्या दारिद्रयरेषेखालील प्रमाणपत्राबद्दलचे त्यांचे आक्षेप नोंदविले व

या प्रमाणपत्रातील नावामध्ये विसंगती आढळल्याने अपिलार्थीस विनामूल्य माहिती देता येणे शक्य नसल्याचे कळविले आणि आवश्यक त्या माहितीपोटीचे शुल्क रु. १५,००/- इतके जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि प्राप्त प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १०.११.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणताही निर्णय दिला नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत आहे. अशाप्रकारे अपेक्षित माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन द्वितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणी अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

वरील घटनाक्रम, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून आले आहे की, अपिलार्थीच्या दि. ०८.१०.२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. १४.१०.२००८ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीने त्यांच्याकडे सादर केलेल्या अपिलार्थीच्या दारिद्रयरेषेखालील व्यक्तीच्या प्रमाणपत्रावरील नावाबाबत आक्षेप घेऊन अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे नाकारले आहे. जन माहिती अधिकारी यांच्या मते अपिलार्थीने त्यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज सादर करताना त्यांचे संपूर्ण नाव,'वाघमारे प्रकाश ग्यानोबा' असे दर्शविले आहे. तथापि दारिद्रयरेषेखालील प्रमाणपत्र हे 'श्री. प्रकाश ज्ञानोबा वाघमारे' यांच्या नावाचे आहे, या दोनही नावातील फरकामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती नाकारली आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. १४.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीच्या शुल्काचा तपशील, जो त्यांनी अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७(३)(क) प्रमाणे देणे अनिवार्य होते, तो

न देऊन अधिनियमातील कलम ७(३)(क) च्या तरतुदीचा भंग केल्याने जन माहिती अधिकारी यांचे दि. १४.१०.२००८ रोजीचे पत्र अवैध ठरत आहे. अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीचा उल्लेख त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये केलेला नाही. त्यामध्ये विस्तार अधिकारी व ग्रामसेवक यांच्या टी.ए.बील आणि अहवालासंबंधीची माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित असल्याचे नमूद केले आहे. तथापि ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागवित असताना अपिलार्थीने त्यांच्या दि. ०८.१०.२००८ रोजीच्या मूळ अर्जामध्ये मुद्दा क्र.४ द्वारे फक्त 'टी.ए.बीलाची प्रत' अशा मोघम स्वरुपाची माहिती मागितली आहे. माहितीच्या अशा मोघम स्वरुपामुळे अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता देय होणार नाही. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये विस्तार अधिकारी व ग्रामसेवक यांच्या मुख्यालयासंबंधीची माहिती मागविली आहे. तथापि ही माहिती त्यांनी त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागितल्याचे आढळून येत नाही. परंतु असेच साधर्म्य असलेली माहिती त्यांनी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.८ द्वारे मागितली आहे. यामध्ये मुख्यालयाचा उल्लेख नसला तरीही त्यांनी, 'सजावर राहत असलेल्या ग्रामसेवकांची यादी, त्यांच्या निवासस्थानाचे पत्ते, घरमालकाचे नाव आणि घरभाडे' ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागितली आहे. या मुद्यावर अपिलार्थीस माहिती पुरविताना जन माहिती अधिकारी यांना ही माहिती त्यांना अपिलार्थीस देण्यासाठी वेळ लागणार आहे, असे कळविले आहे. वास्तविक पाहता, ही माहिती प्रत्येक पंचायत समितीच्या मुख्यालयाकडे कोणत्याही वेळी उपलब्ध असणे गरजेचे आहे. परंतु या प्रकरणी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हिमायतनगर यांनी अपिलार्थीस या मुद्यावर कोणतीही माहिती न देता त्यांना ही माहिती देण्याचे टाळले आहे असेच या प्रकरणी सिध्द होत आहे. अशाप्रकारे जन माहिती अधिकारी यांचे दि. १४.१०.२००८ रोजीचे पत्र वर स्पष्ट केल्याप्रमाणे अवैध असल्याचे सिध्द होत असल्याने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ८ च्या संदर्भातील संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत **सशुल्क** पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ८ च्या संदर्भातील संपूर्ण माहिती, वरील निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत **सशुल्क** पुरवावी.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांकः ०६-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त,**
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. प्रकाश ग्यानोबा वाघमारे,द्वारा शेळके यांचे घर, दत्तनगर, गोकुंदा, ता. किनवट, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हिमायतनगर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),जिल्हा परिषद,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३१६
निर्णय दिनांक: ०६-०१-२०१०

१. श्री. जोंधळे अर्जुन भुजंगराव, : अपिलार्थी
रा.कंधार, जि.नांदेड.

विरुध्द

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याधिकारी,
नगर परिषद,कंधार,जि.नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद,कंधार, जि.नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक कार्यालय निरीक्षक,
नगर परिषद,कंधार, जि.नांदेड

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.०१.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी त्यांच्या दि. १९.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे फुलेनगर येथील शहरी दारिद्रयरेषेखालील कुटुंबांच्या यादीतून शहरी सर्वेक्षणामध्ये वगळलेल्या कुटुंबांच्या यादीची व वगळण्याच्या कारणांची काही माहिती मागितली असता, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. ०८.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे दिलेले उत्तर मान्य नसल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १४.१०.२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपिलासंदर्भात संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना दि. १५.११.२००८ रोजी सुनावणीसाठी समक्ष हजर राहण्याचे सूचित केले. परंतु त्यांनी या प्रकरणी सुनावणी न घेता त्यांच्या दि. १९.११.२००८ रोजीच्या पत्राद्वारे

अपिलार्थीस त्यांच्या अपील प्रकरणाची दि. १०.११.२००८ सुनावणी झाली असे कळवून त्यांची दिशाभूल केली. या सर्व प्रकाराने व्यथित होऊन त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले असून या अपील अर्जाद्वारे आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १९.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, कंधार नगर परिषदेच्या कार्यक्षेत्रामधील फुलेनगर येथील शहरी दारिद्रयरेषेखालील कुटुंबांची सन १९९७-९८ मध्ये झालेल्या जनगणनेप्रमाणे यादी व शहरी सर्वेक्षण २००५-०६ मध्ये दारिद्रयरेषेखालील यादीतून वगळलेल्या कुटुंबांची नावानिशी यादी व त्याची कारणे, ही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०८.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संचालक, नगर पालिका प्रशासन संचालनालय,मुंबई यांच्याकडे उपलब्ध असल्याचे अपिलार्थीस कळविले व या माहितीकरिता त्यांच्या कार्यालयाशी संपर्क साधण्याचे अपिलार्थीस सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १४.१०.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले होते. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.१९.११.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिसाद देऊन जन माहिती अधिकारी यांचा निर्णय कायम ठेवला. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन द्वितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमधील सन १९९७-९८ च्या जनगणनेवर आधारित शहरी दारिद्रयरेषेखालील व्यक्तींची यादी त्यांच्याकडे उपलब्ध आहे. तथापि सन २००५-०६ मध्ये झालेल्या सर्वेक्षणावरुन नगर परिषद प्रशासनाने तयार केलेल्या दारिद्रयरेषेखालील व्यक्तींची यादी अद्यापपावेतो अंतिम होणे बाकी आहे. यासंदर्भात त्यांना संचालक, नगरपालिका प्रशासन,मुंबई यांच्याकडून दोन सी.डी.प्राप्त झाल्या असून दीड वर्षापूर्वी संचालक, नगरपालिका प्रशासन यांनी ही माहिती, माहितीच्या अधिकारात जरी मागितली तरी कोणासही देऊ नये, अशाप्रकारची तोंडी सूचना दिल्यामुळे त्यांनी ही माहिती अपिलार्थीस दिली नाही. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, सन २००५-०६ मध्ये झालेल्या सर्वेक्षणाप्रमाणे अद्यापपावेतो दारिद्रयरेषेची यादी अंतिम करणे बाकी आहे. त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या दोन सी.डी.मधील यादीतून कोणतीही नावे वगळली जाण्याची शक्यता नाही. परंतु त्यांना या यादीमध्ये यापुढे वाढच अपेक्षित आहे.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये सन १९९७-९८ सालच्या जनगणनेवर आधारित कंधार शहरातील दारिद्रयरेषेखालील व्यक्तींची यादी आणि सन २००५-०६ मध्ये दारिद्रयरेषेखालील यादीतून वगळल्या गेलेल्या कुटुंबांची यादी व त्याचे कारण, अशी माहिती मागितली आहे. यापैकी जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन १९९७-१९९८ मध्ये झालेल्या जनगणनेनुसार नगर पालिका प्रशासनाने केलेल्या दारिद्रयरेषेखालील व्यक्तींची यादी उपलब्ध आहे. ती त्यांना आता अपिलार्थीस द्यावी लागेल. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील दुसऱ्या मुद्याबाबत जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी संचालक,नगरपालिका प्रशासनाने त्यांना दिलेल्या तोंडी सूचनेनुसार त्यांनी सन २००५-०६ मध्ये झालेल्या सर्वेक्षणाच्या आधारे ज्या व्यक्तींची नावे दारिद्रयरेषेखालील व्यक्तींच्या यादीमधून वगळली आहेत, अशी यादी अपिलार्थीस दिली नसल्याचे कळविले. जन माहिती अधिकारी यांना सदर सूचना नगरपरिषद प्रशासनाच्या कोणत्या संचालकांनी व कधी

दिल्या, याबाबत कोणताही खुलासा आयोगासमोर करता आला नाही. ही यादी आता जन माहिती अधिकारी यांच्याकडे बुकलेटच्या स्वरुपात उपलब्ध आहे. ही माहिती उघड केल्याने दारिद्रयरेषेखालील यादी अंतिम करण्यामध्ये कोणतेही अडथळे निर्माण होतील, तसेच ही माहिती उघड केल्याने अधिनियमातील कलम ८ व ९ च्या तरतुदींचा कोणताही भंग होणे संभवत असल्याचे आयोगास वाटत नाही. त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी या यादीमध्ये कोणत्याही व्यक्तीची नावे वगळली जाण्याची शक्यता नाही परंतु या यादीमध्ये वाढच संभव आहे, असे आयोगास अवगत केले आहे, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस या मुद्यावरील माहिती देखील विनामूल्य पुरवावी लागेल. अपिलार्थीच्या मूळ अर्जामध्ये अपिलार्थीने ज्या कुटुंबाना दारिद्रयरेषेखालील यादीमधून वगळले गेले आहे त्या कुटुंबांना वगळल्याची कारणे जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागितली आहेत. तथापि अपिलार्थीची ही मागणी माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) च्या तरतुदींशी सुसंगत नसल्यामुळे, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दारिद्रयरेषेखालील कुटुंबांच्या यादीतून वगळल्याची "कारणे", ही माहिती देय असणार नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेली माहिती देण्यासंदर्भात वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली अपिलार्थीस देय असलेली माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन

खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील वरील निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीस देय होणारी माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक: ०६-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त,**
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जोंधळे अर्जुन भुजंगराव,रा.फुलेनगर, कंधार,ता.कंधार, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक कार्यालय निरीक्षक,नगर परिषद,कंधार, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,नगर परिषद,कंधार, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३१७
निर्णय दिनांक: ०६-०१-२०१०

१. श्री. अशोक रा.दरेवार, : अपिलार्थी
रा.बरबडा,ता.नायगाव,जि.नांदेड

विरुध्द

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी,
जिल्हा परिषद, नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी,
जिल्हा परिषद, नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : पशुधन विकास अधिकारी,
जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
कार्यालय,जिल्हा परिषद, नांदेड

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.०१.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नसल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०८.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००५ ते २००८ या कालावधीतील कर्मचाऱ्यांच्या देयकाच्या मंजूरीसंबंधी काही माहिती एकूण सहा मुद्यांद्वारे मागितली होती. तथापि ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.

०४.११.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचा कथित निर्णय दि. २७.११.२००८ रोजी दिला. या निर्णयाचे अवलोकन केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय दिला नसल्याचे आयोगास आढळून आले आहे. सदरचा कथित निर्णय म्हणजे त्यांनी अपिलार्थी बरोबर त्यांच्या प्रथम अपिलाबाबत केलेल्या चर्चेचे इतिवृत्त आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या कथित निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन द्वितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. विद्यमान व तत्कालीन जन माहिती व अपिलीय अधिकारी अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेला कथित निर्णय म्हणजे त्यांनी अपिलार्थी बरोबर त्यांच्या प्रथम अपिलाबाबत केलेल्या चर्चेचे इतिवृत्त अशा स्वरुपाचा आहे.जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अपील अर्जावर त्यांना निश्चित स्वरुपाचा निर्णय देणे अपेक्षित आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, तथा जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ०४.११.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन,आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.०४.११.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला नि-र्णय पारित करावा.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांकः ०६-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त,**
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अशोक रा.दरेवार,पशुधन विकास अधिकारी, गट-अ, पशुवैद्यकीय दवाखाना, श्रेणी-१,बरबडा,ता.नायगाव,जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा पशुधन विकास अधिकारी,जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४१८
निर्णय दिनांक ०६/०१/२०१०

१ श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल, : अपिलार्थी
रा. जाफ्राबाद, जि. जालना

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तालुका कृषी अधिकारी,
तालुका कृषी कार्यालय, जाफ्राबाद, जि. जालना

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तालुका कृषी अधिकारी,
जाफ्राबाद, जि.जालना

निर्णय

श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १८.०५.२००९ रोजी केलेले दि. १९.०५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १८.०८.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.०७.११.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ७१ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल

केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक : ०६/०१/२०१० **राज्य माहिती आयुक्त,**
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल, बाजार गल्ली, मेनरोड, जाफ्राबाद, ता. जाफ्राबाद, जि. जालना.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५६६
निर्णय दिनांक ०६/०१/२०१०

१ श्री. अब्दूल रहेमान ईस्माईल मलंग, रा.दबीरपुरा, उदगीर, जि. लातूर	:	अपिलार्थी
विरुध्द		
१ जन माहिती अधिकारी, नगरपरिषद कार्यालय, उदगीर, जि. लातूर २. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद कार्यालय, उदगीर, जि. लातूर	:	प्रतिवादी

निर्णय

श्री. अब्दूल रहेमान ईस्माईल मलंग यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०१.०४.२००९ रोजी केलेले दि.०४.०४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०४.०८.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.०७.१०.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर सुनावणी घेऊन दि.२१.१०.२००८ रोजी आपले आदेश पारित केले. तथापि यानंतरही माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत अथवा प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपील आदेशाच्या

दिनांकापासून ९० दिवसापेक्षा ७४ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक : ०६/०१/२०१० **राज्य माहिती आयुक्त,**
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अब्दूल रहेमान ईस्माईल मलंग, रा. दबीरपुरा, उदगीर, ता.उदगीर, जि. लातूर.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५६७
निर्णय दिनांक ०६/०१/२०१०

१ श्री. विजयकुमार दगडू सूर्यवंशी, रा.देवणी (खु.), ता.देवणी, जि. लातूर	:	अपिलार्थी
विरुध्द		
१ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, जि.प.ल.पा.उपविभाग, उदगीर, जि. लातूर	:	प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जि.प.ल.पा.विभाग, लातूर		

निर्णय

श्री. विजयकुमार दगडू सूर्यवंशी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १५.०४.२००९ रोजी केलेले दि. २०.०४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०१.०३.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.२३.०५.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा २०७ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक : ०६/०१/२०१० **राज्य माहिती आयुक्त,**
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विजयकुमार दगडू सूर्यवंशी, रा. देवणी (खु.), पो. गुरनाळ, ता.देवणी, जि. लातूर.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३१८

निर्णय दिनांक ०६-०१-२०१०

१ श्री. गंगाधर कामाजी चव्हाण, : अपिलार्थी

मु. पो. बोधडी बु. तालुका किनवट, जिल्हा नांदेड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी

तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय,

बोधडी बु. तालुका किनवट, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, किनवट,

तालुका किनवट, जिल्हा नांदेड

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, मौजे बोधवड बु., तालुका किनवट येथील सर्वे नंबर ८९/१, ८९/२, ८९/३ व ८९/४ नवीन सर्वे नंबर २१८ व २१९ यापैकी कोणताही भाग अथवा जागा ग्रामपंचायतीने संपादित

केली आहे काय किंवा खरेदी केली आहे काय व खरेदी केली असल्यास कोणत्या दस्तऐवजाच्या आधारे त्या दस्ताऐवजाच्या प्रमाणित प्रती, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २३-१०-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची संचिका न्यायालयामध्ये सादर केली असल्यामुळे ती संचिका न्यायालयातून प्राप्त होताच अपिलार्थीस माहिती देण्यात येईल, असे त्यांना आश्वासीत केले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २२-१२-२००८ रोजी निर्णय दिला. या निर्णयाव्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस, त्यांनी मागणी केलेली माहितीची संचिका न्यायालयाकडून उपलब्ध झाल्यानंतर, अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचे सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, ते या पदावर नुकतेच बदलून आले असून अपिलार्थीने त्यांच्याकडे जी माहिती मागविली आहे ती माहिती ज्या संचिकेमध्ये उपलब्ध आहे ती संचिका न्यायालयात सादर केली असल्यामुळे त्यांना अपिलार्थीस माहिती पुरविता आली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून बोधडी बु. ग्रामपंचायतीने मौजे

बोधवड बु., तालुका किनवट येथील सर्वे नंबर ८९/१, ८९/२, ८९/३ व ८९/४ नवीन सर्वे नंबर २१८ व २१९ यापैकी कोणताही भाग अथवा जागा ग्रामपंचायतीने संपादित केली आहे काय किंवा खरेदी केली आहे काय व खरेदी केली असल्यास कोणत्या दस्तऐवजाच्या आधारे त्या दस्ताऐवजाच्या प्रमाणित प्रती एवढीच माहिती देय होत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित माहितीबाबत, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती, जी अधिनियमातील तरतुदीशी विसंगत आहे, मागितली आहे ती मागितली असल्याने, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून, तीच्या विसंगतीपूर्ण स्वरुपामुळे ती देय असणार नाही. वास्तविक पाहता ही माहिती देण्यासाठी ग्रामविकास अधिकारी यांना कोणतीही अडचण असल्याचे सकृतदर्शनी वाटत नाही. अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या माहितीवरुन त्यांना या सर्वे नंबरचा मालकी हक्क कोणाचा आहे व तो कोणत्या दस्तऐवजाच्या आधारे घेतला आहे याची माहिती हवी असल्याचे दिसून येत आहे. त्यांनी या प्रकरणात संबंधित तलाठ्याकडे जाऊन या सर्वे नंबरचा ७/१२ चा उतारा व त्यांच्याकडील नमुना नं. ८ अ रजिस्टरची पाहणी केली असती तर अपिलार्थीस ही माहिती व्यवस्थित देता आली असती. परंतु जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारे कोणतीही कार्यवाही केली नाही. केवळ या माहितीची संचिका न्यायालयात सादर केली एवढेच कारण पुढे करुन त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे टाळले आहे. उपस्थित जन माहिती अधिकारी यांना, विचाराधीन प्रकरणाची नस्ती न्यायालयात सादर केल्याबाबतचा कोणता पुरावा उपलब्ध आहे काय अशी आयोगाने विचारणा केली असता, त्यांच्याकडे असा कोणताही पुरावा उपलब्ध नसल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी वरील परिच्छेदामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीने ज्या माहितीची मागणी केली आहे त्या मालकी हक्काच्या संदर्भात संबंधीत सर्वे नं. चे प्रचलीत ७/१२ चे उतारे व अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील वर स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना देय असलेली माहिती हे आदेश निर्गमीत होताच त्यांना सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

<u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक ०६-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गंगाधर कामाजी चव्हाण, मु. पो. बोधडी बु., तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, बोधडी बु., तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३१९

निर्णय दिनांक ०६-०१-२०१०

१ श्री. गंगाधर सदाशिव लांडगे, : अपिलार्थी

मौजे रहाटी (खुर्द), पो. मनूर, तालुका उमरी, जिल्हा नांदेड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी

तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उमरी,

तालुका उमरी, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),

जिल्हा परिषद, नांदेड

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर व जन माहिती अधिकारी हजर आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उमरी यांनी अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक १९-१२-२००९ रोजीचे पत्र आयोगास सादर केले आहे. हे पत्र अपिलार्थीने आयोगाकडील दिनांक ०९-१२-२००९ रोजीच्या

सुनावणीच्या सूचनेच्या पत्रासंदर्भात आयोगास सादर केले आहे. या पत्रामध्ये अपिलार्थीने असे कबूल केले आहे की, त्यांना विचाराधीन अर्जाची संपूर्ण माहिती पंचायत समिती, उमरी यांच्याकडून दिनांक २४-१०-२००८ रोजी प्राप्त झाली असून या माहितीने त्यांचे समाधान झाले असल्याचे म्हटले आहे. यावरुन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त झाल्याचा निष्कर्ष आयोग काढत आहे. तथापि ही माहिती केव्हा अपिलार्थीस प्राप्त झाली यासंदर्भात आयोगाने गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उमरी यांना विचारले असता त्यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांच्या कार्यालयातील माहिती अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयामध्ये दिनांक १२-०९-२००८ रोजी व ग्रामपंचायत स्तरावरील माहिती दिनांक २४-१०-२००८ रोजी दिली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही ग्रामपंचायत स्तरावरील असल्यामुळे त्यांच्याकडून ही माहिती प्राप्त करुन नंतर ती अपिलार्थीस द्यावी लागणार असल्याने ही माहिती त्यांना देण्यासाठी विलंब लागला व या विलंबासाठी पंचायत समिती, उमरी मधील ग्रामसेवक, ग्रामसेवक, ग्रामपंचायत, हंगरगा, रहाती व मनुर हे जबाबदार असल्याचे त्यांनी आयोगास सांगितले. उपरोक्त प्रकरणी या तीनही ग्रामसेवकांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती अधिनियमातील तरतुदीपेक्षा त्यांना विलंबाने देण्याच्या त्यांच्या कृतीव्दारे त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट करुन स्वत:ला अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या प्रकरणाशी संबंधित ग्रामसेवक, ग्रामपंचायत, हंगरगा रहाटी व मनूर यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती प्राप्त झाल्याचे त्यांनी कबूल केले असल्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या प्रकरणाशी संबंधित ग्रामसेवक, ग्रामपंचायत, हंगरगा रहाटी व मनूर यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक ०६-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गंगाधर सदाशिव लांडगे, मौजे रहाटी (खुर्द), पो. मनूर, तालुका उमरी, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उमरी, तालुका उमरी, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३२०

निर्णय दिनांक ०६-०१-२०१०

१ श्री. अब्दुल जाहेर अमजद पि. म. याकुब, : अपिलार्थी
रा. घर नं. ९-१-३९, गणीमपुरा,
नांदेड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी
तथा आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप आयुक्त (महसूल),
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, क्षेत्रीय कार्यालय क्रमांक ३, नांदेड

त्रयस्थ पक्ष : श्री. महंमद पिता याकुब पि. म. इस्माईल

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी हे माहिती देण्यास हेतूपुरस्सर टाळाटाळ करत आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक १९-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे, सध्याचे घर क्रमांक ९-१-३८ ची त्यांच्या १९८२-८३, १९८५-८६, १९८८-८९, १९९०-९१, १९९१-९२, १९९२-९३, १९९५-९६, १९९६-९७, १९९८-९९, २०००-०१ ते २००८-०९ या वर्षाच्या कर मागणी बील, पाणी कर मागणी बील आणि त्या बिलांच्या भरलेल्या रकमेच्या पावत्यांच्या झेरॉक्स प्रमाणित प्रती, घर क्रमांक ९-१-३८, ९-१-३९, ९-१-४० च्या रिव्हीजन रजिस्टरच्या सन १९९६-९७ आणि २००५-०६ च्या झेरॉक्स प्रतीची माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०७-१०-२००८ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध असलेल्या माहितीपैकी काही माहिती दिली. तथापि प्राप्त माहिती अपूर्ण, बनावट व दिशाभूल करणारी असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-१२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १३-०१-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सात दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित करुन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित केलेला कालावधी व्यपगत होऊनही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती त्यांना प्राप्त झाली आहे. तथापि मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी खोटी माहिती पुरविली आहे. त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित त्यांना पुरविलेली माहिती व त्यांच्याकडे उपलब्ध

असलेली माहिती व त्यांनी नगरपालिकेला कर भरलेल्या पावत्या आयोगास दाखविल्या. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०७-१०-२००८ रोजीच्या पत्राव्दारे विसंगत माहिती दिल्याचे आयोगास आढळून येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस प्रथमतः दिनांक ०७-१०-२००८ व तदनंतर दिनांक १४-०१-२००९ रोजी आवश्यक ती माहिती त्यांच्याकडून नकलेपोटी आवश्यक ते शुल्क आकारुन दिली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याचे अपिलार्थीने आयोगासमोर कबूल केले आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगास त्यांच्या युक्विादामध्ये असे अवगत केले आहे की, अपिलार्थीने मागणी केलेल्या पावत्याबाबत ब-याच पावत्या त्यांना, अपिलार्थीने त्या त्या वर्षी आवश्यक त्या कराचा भरणा न केल्यामुळे, त्या अपिलार्थीस देता आल्या नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १४-०१-२००९ रोजी दिलेल्या माहितीचे अवलोकन केले असता त्यामध्ये असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या सन १९९६-९७ आणि २०००-०१ या व्यतिरिक्त उर्वरित पावत्यांच्या प्रतीच्या संदर्भात लेखा विभागाकडे विचारणा केल्याचे कळविले आहे. लेखा विभागाकडून या पावत्या उपलब्ध होताच त्या अपिलार्थीस देण्याचे त्यांनी आश्वासीत केले गेले आहे. तथापि या पावत्याच्या संदर्भात पुढे नेमके काय झाले हे त्यांनी अपिलार्थीस कळविले नाही आणि तसेच अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहिती ही विसंगत पुरविली आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांनी स्पष्ट स्वरुपात हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०७-१०-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथमतः काही माहिती विसंगतीपूर्ण दिल्याचे आयोगास आढळून आले आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असा खुलासा केला की, त्यांना ही माहिती वसूली लिपीकाकडून ज्या स्वरुपात प्राप्त झाली होती त्या स्वरुपात त्यांनी ती अपिलार्थीस पुरविली आहे. यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांना संबंधित वसूली लिपीक यांनी अपिलार्थीस विसंगत माहिती दिल्याबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेल्या माहिती-तील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत स्पष्ट स्वरुपात व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (महसूल), नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना संबंधित वसूली लिपीक यांनी अपिलार्थीस विसंगत माहिती दिल्याबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक ०६-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अब्दुल जाहेर अमजद पि. म. याकुब, रा. घर नं. ९-१-३९, गणीमपुरा, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, क्षेत्रीय कार्यालय क्रमांक ३, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (महसूल), नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३२१

निर्णय दिनांक ०६-०१-२०१०

१ श्री. संदीप हरिभाऊ पडलवार, अपिलार्थी

मु. अमीनगुडा, पो. तुळशी, तालुका माहूर, जिल्हा नांदेड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी,

पंचायत समिती, माहूर, तालुका माहूर, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),

जिल्हा परिषद, नांदेड

निर्णय

उपरोक्त प्रकरणी श्री. संदीप हरिभाऊ पडलवार या अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी माहितीसाठीचा प्रथम अर्ज श्री. पांडुरंग चंपत वाडगुरे यांनी केला होता व या अर्जासंदर्भात माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले होते. मात्र आयोगाकडे व्दितीय अपील श्री. संदीप हरिभाऊ पडलवार यांनी केल्याचे आढळून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील

तरतुदीनुसार ज्या अर्जदाराने माहिती अधिका-याकडे माहितीसाठीचा प्रथम अर्ज सादर केला आहे त्यांनीच त्यांच्या मूळ अर्जाशी संबंधित प्रथम अपील व व्दितीय अपील अनुक्रमे जन अपिलीय अधिकारी व राज्य माहिती आयोगाकडे करणे त्यांना अनुज्ञेय आहे. मूळ अर्ज व त्यावरील अपील एका व्यक्तीने करणे आणि त्यावरील व्दितीय अपील दुस-या व्यक्तीने करणे अशा प्रकारची प्रक्रिया माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये समाविष्ट नसल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक ०६-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. संदीप हरिभाऊ पडलवार, मु. अमीनगुडा, पो. तुळशी, तालुका माहूर, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी, पंचायत समिती, माहूर, तालुका माहूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३२२

निर्णय दिनांक ०६.०१.२०१०

१ श्री. रामराव संभाजी शिंदे, : अपिलार्थी
मु.पो. भाटेगांव, ता. हदगांव, जि. नांदेड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
तहसील कार्यालय, हदगांव, जि. नांदेड.

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय,
हदगांव, जि. नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, हदगांव, जि. नांदेड

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५.०१.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती दिली नसल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २२.१०.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी यांच्याकडे , मौजे भाटेगांव, तालुका हदगांव येथील अन्नधान्य पुरवठा व रॉकेल पुरवठा डिलरला किती पुरविण्यात येतो या संदर्भात काही माहिती व्यक्तिशः मागितली होती. या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले होते.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ११.११.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जासोबत ते दारिद्र्यरेषे-खालील व्यक्ती असल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडले नसल्यामुळे अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज संचित करण्यात येत आहे, असे अपिलार्थीस कळविले. तथापि या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २४.११.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, हदगांव यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जास जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८.११.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीने त्यांच्याकडे सादर केलेले दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्र सांक्षांकित केले नसल्यामुळे अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज संचित केला जात असल्याबाबत अपिलार्थीस या पत्राद्वारे कळविले. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने दिनांक ०५.०१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हजर आणि जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जासोबत त्यांचे दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्र जोडले नव्हते व तसेच त्यांनी त्यांच्या दिनांक २४.११.२००८ रोजी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जासोबत देखिल त्यांनी त्यांचे साक्षांकित केलेले दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे

अपिलार्थीस ते कोणतीही माहिती पुरवू शकले नाहीत. जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून, त्यांना त्यांचे दारिद्र्यरेषेखालील वैध प्रमाणपत्र प्राप्त न झाल्याने, प्राप्त झालेली नाही. या संदर्भात अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांना अद्यापही या माहितीची आवश्यकता असेल तर त्यांनी याच माहितीकरिता जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज परत सादर करावा. या अर्जासोबत ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचा सबळ पुरावा त्यांनी जोडावा जेणेकरुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस देय असलेली माहिती विनामूल्य देणे सुलभ होईल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न होण्यासाठी ते स्वत:च जबाबदार असल्याचे अयोगास आढळून येत असल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक ०६.०१.२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रामराव संभाजी शिंदे, मु.पो. भाटेगांव, ता. हदगांव, जि. नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, हदगांव, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हदगांव, जि. नांदेड

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३२३

निर्णय दिनांक ०६.०१.२०१०

१ श्री. सूर्यवंशी अशोक विठ्ठलराव, : अपिलार्थी

मु. होंडाळा, पो.दापका (राजा), ता. मुखेड, जि. नांदेड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी,

कृषी अधिकारी कार्यालय, मुखेड, जि. नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

जिल्हा कृषी अधिकारी, जिल्हा कृषी कार्यालय, नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : मंडळ कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय मुखेड, जि. नांदेड

जन अपिलीय अधिकारी : तालुका कृषी अधिकारी, मुखेड, जि. नांदेड

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५.०१.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांचा प्रथम अर्ज घेण्यास नाकारले आहे, प्रथम अपील केल्यानंतर त्यांना अपूर्ण व दिशाभूल माहिती दिली गेल्याने व त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना सत्य स्वरुपात मिळण्यासाठी आणि माहिती मिळाल्यानंतर संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर नियमानुसार शिस्तभंग व दंडात्मक कार्यवाही आयोगाने आदेशित करण्यासाठी त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०५.११.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे , त्यांच्या कार्यालयातर्फे केल्या गेलेल्या विकास कामांच्या संदर्भातील सन २००१ ते २००८ या कालावधीतील व्यापक व्याप्ती असलेली माहिती मागविली होती. या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे. अपिलार्थीचा हा अर्ज अपिलार्थीस दिनांक ०८.११.२००८ रोजी पोस्टाद्वारे परत मिळाल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक १०.११.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन द्वितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हजर आणि जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांचा दिनांक ०५.११.२००८ रोजीचा केलेला अर्ज त्यांच्याकडे दिनांक ०५.११.२००८ रोजी प्राप्त झाला नाही. त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज व कलम १९ (१) अन्वयेचा प्रथम अपील अर्ज तालुका कृषी अधिकारी, मुखेड यांच्या कार्यालयात एकाच दिवशी (दिनांक २७.११.२००८ रोजी) सादर केला आहे. सदर अर्ज प्राप्त झाल्यानंतर जन माहिती अधिकारी श्री. पी.एस. जाधव, प्रभारी मंडळ कृषी अधिकारी, मुखेड यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती एकत्रित करुन ती अपिलार्थीस दिनांक १२.१२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे पोष्टाने दिनांक १६.१२.२००८ रोजी पाठविली आहे. जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज आणि प्रथम अपील अर्ज तालुका कृषी अधिकारी यांना दिनांक २७.११.२००८ रोजी प्राप्त झाला आहे व यानंतर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १६.१२.२००८ रोजी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस पोष्टाद्वारे पुरविली आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज प्राप्त झाला नाही. तथापि हा अर्ज प्रथम अपील अर्जासोबत प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत त्यांचे कर्तव्य पार पाडल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी असल्याचे आयोगास केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये नमूद केले आहे. तथापि अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणती माहिती प्राप्त होणे बाकी आहे आणि प्राप्त झालेल्या माहितीने त्यांची कशा प्रकारे दिशाभूल होत आहे, हे त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जात स्पष्ट केलेले नाही आणि या संदर्भात त्यांचा तोंडी युक्तिवाद करण्यासाठी देखिल ते आयोगासमोर आज रोजी उपस्थित नाहीत. यापेक्षा दुसरे असे महत्त्वाचे आहे की, अपिलार्थीने दिनांक ०५.११.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे कथित प्रथम अर्ज केला असता, माहिती मिळण्यासाठीचा अधिनियमाद्वारे विहित केलेला कालावधी व्यपगत होण्यापूर्वीच अपिलार्थीने त्यांचा प्रथम अर्ज केल्यानंतर लागलीच ५ दिवसाच्या आत जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले आहे. अपिलार्थीची ही कृती अधिनियमातील कलम १९ (१) चा भंग करणारी आहे. या सर्व बाबी एकत्रितपणे व विशेषत: अपिलार्थीस, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा अर्ज व अपील अर्ज त्यांच्याकडे दिनांक २७.११.२००८ रोजी प्राप्त झाला असता, अपिलार्थीस दिनांक १६.१२.२००८ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे. या माहितीच्या दर्जाबद्दल अपिलार्थीने त्यांचे जे अभिप्राय आयोगाकडे सादर केले आहेत, त्या अभिप्रायांचे संपूर्ण समर्थन त्यांनी

आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये केले नसल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक ०६.०१.२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सूर्यवंशी अशोक विठ्ठलराव, मु. होंडाळा, पो.दापका (राजा), ता. मुखेड, जि. नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय मुखेड, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, मुखेड, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१२०

निर्णय दिनांक ०६.०१.२०१०

१ श्री. रणजीत नामदेव चव्हाण, : अपिलार्थी

मु. पिंपरखेड, पो. हिवरा, ता. आष्टी, जि. बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी ,

तालुका कृषी अधिकारी कार्यालय,

आष्टी, जि. बीड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

तालुका कृषी अधिकारी,

तालुका कृषी कार्यालय, आष्टी, जि. बीड

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१.१२.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अद्याप कोणतीही माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व या अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून, जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) प्रमाणे कारवाई आदेशित करण्याची आणि अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः तालुका कृषी अधिकारी, आष्टी यांच्याकडे त्यांच्या दिनांक ०२.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये त्यांच्या कार्यक्षेत्रातील मोराळा, भातवळी व देसूर येथील पॉकेट क्रमांक ७, ३१ व १९ मधील मातीनाला बांधकामाच्या कामावर काम केलेल्या कामगारांची यादी, अंदाजपत्रक यांच्या प्रती रजिस्टर्ड पोस्टाने मागविल्या होत्या.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०२.०८.२००८ रोजी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०७.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस माहिती देण्याचे तालुका कृषी अधिकारी, आष्टी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, आणि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक ०२.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली संपूर्ण माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना ती अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ च्या तरतुदीप्रमाणे पुरविणे आवश्यक आहे. आता अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी व्यपगत झाला असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या

दिनांक ०२.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, बीड यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती विहित मुदतीत दिली आहे किंवा कसे, यांची प्रथमतः तपासणी करावी आणि जर अपिलार्थीच्या आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामधील अपिलार्थीच्या म्हणण्यात त्यांना तथ्यांश आढळून आला तर त्यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांचेवर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, बीड यांना अपिलार्थीच्या द्वितीय अपील अर्जामधील म्हणण्यात तथ्यांश आढळून आला तर त्यांना, संबंधित जन माहिती अधिकारी यांचेवर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक ०६.०१.२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रणजीत नामदेव चव्हाण, मु. पिंपरखेड, पो. हिवरा, ता. आष्टी, जि. बीड

२ जन माहिती अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, आष्टी, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, तालुका कृषी कार्यालय, आष्टी, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१२१

निर्णय दिनांक ०६.०१.२०१०

१ श्री. मस्के महादेव संभाजी, : अपिलार्थी
मु. पो. ता. आष्टी, जि. बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (प्रशासन),
नाशिक विभाग, नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक
विभाग, नाशिक

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८.०८.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही माहिती अधिकाऱ्यांनी अपुरी व चुकीची माहिती दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ११.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी यांच्याकडे, सहकार विभागामार्फत वर्ग ३ च्या एकूण १४७ कर्मचाऱ्यांच्या भरतीसंदर्भात काही माहिती ६ मुद्यांद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०४.०६.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०१.०७.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील अंशतः मंजूर केले व अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २५.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी हजर आणि अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे मूळात दिनांक ११.०३.२००८ रोजी प्राप्त झाला नव्हता व त्यांना तो अपिलार्थीच्या दिनांक ०४.०६.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जाबरोबर प्राप्त झाला. यानंतर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाच्या संदर्भात दिलेल्या आदेशाप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस दिनांक २५.०७.२००८ रोजी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती पाठविली व ती माहिती अपिलार्थीस प्राप्त झालेली आहे. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्याकडे उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती प्राप्त झालेली आहे. अपिलार्थीचा आक्षेप मूळात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित दिलेल्या माहितीसंदर्भात असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मुद्दा क्रमांक १ द्वारे "सलेक्शन झालेल्या १४७ जणांपैकी प्रत्येकी लेखी परिक्षेत किती पोस्ट क्वॉलिफाय होत्या त्यांची यादी, प्रत्येकाच्या किती पोस्ट लेखी मधील " अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या या मुद्यांवरुन त्यांना नेमके काय म्हणावयाचे आहे, याचा बोध कोणासही होणे शक्य नाही. परंतु अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६.०८.२००८ रोजी सादर केलेल्या त्यांच्या पत्रान्वये त्यांची मार्क लिस्ट जन माहिती अधिकारी यांना त्यांनी उपलब्ध करुन दिल्याचे कबूल केले आहे. त्या १४७ जणांचे मार्कमेमो त्यांनी या कार्यालयाकडे उपलब्ध नाहीत, असे अपिलार्थीस कळविले आहे. यावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून १४७ जणांची लेखी परिक्षेतील मार्कांची यादी आवश्यक असावी, असे अनुमान काढण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने ज्या परीक्षेच्या संदर्भात त्यांच्याकडे माहिती मागितली आहे, ती परीक्षा महाराष्ट्र ज्ञान महामंडळ या शासनाच्या महामंडळातर्फे घेण्यात आलेली आहे. ही परीक्षा केंद्रीय पध्दतीची असून ही माहिती महाराष्ट्र ज्ञान महामंडळाकडे उपलब्ध असण्याची शंका आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मूळात मुद्दा क्रमांक १ चे आकलन होणे शक्य नाही. तथापि अपिलार्थीने याच मुद्यावर वेगवेगळ्या ठिकाणी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांचे जे अभिप्राय व्यक्त केले आहेत, त्यावरुन अपिलार्थीस १४७ उमेदवारांच्या मार्कांची यादी अपेक्षित असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती महाराष्ट्र ज्ञान महामंडळाकडे उपलब्ध आहे व तसेच ही यादी सहकार आयुक्त पुणे यांच्या कार्यालयात देखिल उपलब्ध असण्याची शक्यता नाकारता येत नाही. या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित

करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ द्वारे मागणी केलेली १४७ उमेदवारांच्या मार्कमेमोची यादी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना चुकीची माहिती मिळाल्यासंदर्भात त्यांचे काही अभिप्राय व्यक्त करुन, त्यांच्यापेक्षा काही उमेदवारास लेखी परीक्षेत कमी गुण मिळाले व तोंडी परीक्षेत जास्त गुण कसे दिले गेले, त्यांच्या निवडीचे निकष कोणते व अपिलार्थीची निवड न होण्याचे निकष कोणते, अशाप्रकारची माहिती मागितली आहे. अपिलार्थीने आयोगाकडे उपस्थित केलेल्या या मुद्यांचा त्यांनी मूळ अर्जामध्ये मागणी केलेल्या माहितीमध्ये समावेश नाही. त्यामुळे या मुद्यांवर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती हवी असल्यास त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडे वेगळ्याने अर्ज करावा लागेल, हे त्यांना सूचित करण्यात येत आहे. याच बरोबर अपिलार्थीस असे स्पष्ट करण्यात येत आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध असेल त्याच स्वरुपात त्यांनी ती अर्जदारास देण्याविषयी त्यांनी अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करणे एवढीच सीमित प्रक्रिया या अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे. केवळ अपिलार्थीची निवड झाली नाही किंवा अपिलार्थीस निवड पध्दत सदोष असल्याचे वाटल्यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस चुकीची माहिती पाठविली, असे त्यांना म्हणता येणार नाही. यासंदर्भात अपिलार्थीस जर त्यांच्या मनात काही शंका असेल तर त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील संबंधित नस्तीच्या तपासणीसाठी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रथमतः वेगळा अर्ज करावा, जेणेकरुन सदरचे अभिलेख तपासल्यानंतर अपिलार्थीच्या मनातील शंका दूर होण्यास मदत होईल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस १४७ उमेदवारांच्या विषयनिहाय मार्काची यादी, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक ०६.०१.२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मस्के महादेव संभाजी, आष्टी (भिमनगर), मु. पो. ता. आष्टी, जि. बीड

२ जन माहिती अधिकारी तथा विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेली अपिले

क्रमांक ३६५/०९ व ३६६/०९

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३६५ व ३६६
निर्णय दिनांक: ०७-०१-२०१०

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, : अपिलार्थी
रा.नांदेड.

विरुध्द

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, नांदेड.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, नांदेड

अपील क्र. ३६६/०९ : त्रयस्थ पक्ष : मुख्याध्यापक,सना ऊर्दू प्राथमिक शाळा,नांदेड.

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.०४.२००९ रोजी नोंदविलेली द्वितीय अपिले क्र. ३६५/०९ व ३६६/०९ आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या दोनही अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागविली असता, त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दि. ०६.०१.२००९ रोजी प्रथम अपील केले होते. परंतु अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी न घेतल्याने आणि प्रकरण प्रलंबित ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक ०७.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणी अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांचा दि. ०२.०८.२००८ रोजीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे केल्याचा पुरावा आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये जोडला आहे. तसेच शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जि.प,नांदेड यांच्याकडे दि. ०६.०१.२००९ रोजी त्यांनी दोन स्वतंत्र प्रथम अपिले दाखल केल्याचा पुरावा देखील अपिलार्थीच्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांमध्ये उपलब्ध आहे. परंतु एवढे असूनही अपिलार्थीच्या मूळ अर्जाची व प्रथम अपील अर्जाची शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्या कार्यालयाने कोणतीही दखल घेतलेली नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, या प्रकरणी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी अपिलार्थीच्या दि. ०६.०१.२००९ रोजीच्या दोनही प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करणे आयोगास गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी यांनी उपरोक्त दोनही प्रकरणासंदर्भात अपिलार्थीच्या दि. ०६.०१.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जांवर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले निर्णय पारित करावेत, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयांनी अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची विचाराधीन दोनही अपिले निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील क्र. ३६५/०९ व ३६६/०९ निकाली काढण्यात येत आहेत.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी उपरोक्त दोनही प्रकरणी अपिलार्थीच्या दि.०६.०१.२००९ रोजींच्या प्रथम अपील अर्जांवर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले निर्णय पारित करावेत.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक: ०७-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त,**
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ,मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅण्डरोड,नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेली अपिले

क्रमांक ३६७/०९ व ३६८/०९

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३६७ व ३६८
निर्णय दिनांक: ०७-०१-२०१०

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, नांदेड. : अपिलार्थी

विरुध्द

१. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, हिंगोली. : प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, हिंगोली.

त्रयस्थ पक्ष :अपील क्र. ३६७/०९ : श्री. जाधव केशव रामराव
अपील क्र. ३६८/०९: श्री. जाधव केशव रामराव व श्री. मुंढे

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.०३.२००९ रोजी नोंदविलेली द्वितीय अपिले क्र. ३६७/०९ व ३६८/०९ आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

अपील क्रमांक ३६७/०९:

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार संबंधित जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी यांच्याकडे दि. २९.०९.२००८ रोजी माहितीसाठीचा अर्ज पाठवून दिला होता. तथापि मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी दि. १८.११.२००८ रोजी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, हिंगोली यांच्याकडे प्रथम अपील केले. परंतु प्रथम अपिलाची सुनावणी न घेता प्रकरण प्रलंबित ठेवल्यामुळे

त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्याकडील दि. २९.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे प्राथमिक पदवीधर सहशिक्षक श्री. केशव रामराव जाधव यांच्या जातीच्या प्रमाणपत्राबाबत मुख्याध्यापक, जिल्हा परिषद,माध्यमिक शाळा,डोंगरखेडा, ता.कळमनुरी,जि.हिंगोली यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ०१.०८.२००८ रोजी त्यांनी दिलेल्या तक्रार अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी आजपर्यंत काय कार्यवाही केली, अशी माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १८.११.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती, अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष आयोगासमोर उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्याकडे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेली दि. ०१.०८.२००८ रोजीची तक्रार प्राप्त झाली आहे, तथापि या तक्रारीवर त्यांनी अद्यापपावेतो कोणतीही कार्यवाही केली नाही. परंतु अपिलार्थीस ही माहिती न देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना आयोगाकडे कोणतेही समर्थन करता आले नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने

जन माहिती अधिकारी यांच्याकडे संदर्भित केलेल्या मुख्याध्यापक, जिल्हा परिषद,माध्यमिक शाळा,डोंगरकडा,ता.कळमनुरी,जि.नांदेड यांच्या श्री. केशव रामराव जाधव यांच्याविरुध्दच्या दि. ०१.०८.२००८ रोजीच्या तक्रार अर्जावर, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा प्रथम अर्ज त्यांच्याकडे ज्या वेळी प्राप्त झाला, त्यावेळेपर्यंत कोणतीही कार्यवाही केली नव्हती, त्यामुळे अपिलार्थीच्या दि. २९.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जावर त्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती देण्यासाठी कोणतीही अडचण नव्हती. परंतु या प्रकरणी अशाप्रकारची कार्यवाही संबंधित जन माहिती अधिकारी यांनी केली नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून मूळ अर्जावर कोणतीही कार्यवाही न केली गेल्यामुळे अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १८.११.२००८ रोजी प्रथम अपील केले असता, त्या अपील अर्जावर देखील जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे कार्यवाही केली नाही. अशाप्रकारे अपिलार्थीचा मूळ अर्ज व त्यावरील दि. १८.११.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जाची हिंगोली जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने अक्षम्य उपेक्षा केली असल्याचे आयोगास आढळून येत आहे. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद न देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, तर शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, हिंगोली यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न देऊन आपल्या बेजबाबदार कार्यशैली या प्रकरणी स्पष्ट केली असल्याचे दिसून येत आहे. सबब सचिव (शालेय शिक्षण) यांना या प्रकरणाशी संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, हिंगोली यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. तसेच जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, हिंगोली यांच्या अशाप्रकारच्या बेजबाबदार कार्यशैलीची यथायोग्यरित्या नोंद घेण्याचे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (शालेय शिक्षण) यांना तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपील क्रमांक ३६८/०९:

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार संबंधित जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी यांच्याकडे दि. २९.०९.२००८ रोजी माहितीसाठीचा अर्ज पाठवून दिला होता. तथापि मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी दि. १८.११.२००८ रोजी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, हिंगोली यांच्याकडे प्रथम अपील केले होते. परंतु प्रथम अपिलाची सुनावणी न घेता प्रकरण प्रलंबित ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने प्रथमत: जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २९.०९.२००८ रोजीच्या त्यांच्या मूळ

अर्जाद्वारे त्रयस्थ पक्ष श्री. केशव रामराव जाधव यांच्या मूळ सेवापुस्तिकेची सत्यप्रत, त्यांच्या शैक्षणिक वर्ष सन २००५-२००६, २००६-२००७, २००७-२००८ मधील वेतनपडताळणी अहवालाच्या सत्यप्रती, या तीनही शैक्षणिक वर्षाची वेतनवाढ मुख्याध्यापकाच्या शिफारशी न घेता,सहशिक्षक श्री. मुंढे यांच्या हस्ताक्षराने कोणत्या नियमानुसार देण्यात आली, वेतनवाढीची शिफारस करण्याचे अधिकार मुख्याध्यापकाऐवजी श्री. मुंढे यांच्याकडे दिले आहेत काय?, याच्या जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या आदेशाच्या सत्यप्रती आणि तसे आदेश नसल्यास सहशिक्षक श्री. मुंढे यांच्यावर कायदेशीर पोलीस कारवाई करुन गुन्हा नोंदविण्यात का आला नाही, - अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या अर्जातील ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रत्यक्षतः उपलब्ध नसल्याने त्यांनी अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या तरतुदीनुसार गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, वसमत यांच्याकडे अपिलार्थीच्या अर्जाची प्रत दि. १४.१०.२००८ रोजी पाठवून देऊन अपिलार्थीस माहिती देण्याचे त्यांना सूचित केले व या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. तथापि या नंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १८.११.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १२.०३.२००९ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थी त्यांच्याकडे सुनावणीसाठी उपस्थित न राहिल्याने अपिलार्थीचे अपील निकाली काढले. यानंतर अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्याचे कारण दर्शवून राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी त्रयस्थपक्षासह आयोगासमोर उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याशी संबंधित नसल्याने त्यांनी दि. १४.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे, अधिनियमातील कलम ६(३)(एक) प्रमाणे अपिलार्थीच्या अर्जाची प्रत संबंधित गट शिक्षणाधिकाऱ्याकडे पाठवून दिली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही गट शिक्षणाधिकारी यांच्याकडे असणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी आता गट शिक्षणाधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेतली असून ती अपिलार्थीस देण्यासाठी त्यांनी आज रोजी सोबत आणली आहे.

त्रयस्थ पक्षाने अपिलार्थीने त्यांच्यासंदर्भात मागणी केलेली माहिती त्यांना उघड करण्यासाठी त्रयस्थ पक्षाची कोणतीही हरकत नसल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्षाने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही गट शिक्षणाधिकारी यांच्याकडे उपलब्ध असणे मूळात अभिप्रेत आहे. त्यामुळे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज दाखल केल्यानंतर सदर अर्ज प्राप्त झाल्यापासून पाच दिवसांच्या आत त्यांनी अपिलार्थीच्या अर्जाची प्रत गट शिक्षणाधिकारी यांच्याकडे पाठवून देणे त्यांना क्रमप्राप्त होते. तथापि या प्रकरणाची कार्यवाही वेळेत न करता दि. १४.१०.२००८ रोजी म्हणजेच अंदाजे आठ दिवस इतक्या विलंबाने अपिलार्थीच्या अर्जाची प्रत त्यांनी संबंधितांकडे पाठविली. संबंधित गट शिक्षणाधिकारी यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती पुरविली नाही. परिणामी अपिलार्थीस अद्यापपावेतो अपेक्षित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली नाही. अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती प्राप्त न होण्याचे कोणतेही समर्थनीय कारण संबंधितांनी आयोगापुढे केलेल्या युक्तिवादावरुन आढळून येत नाही. त्यामुळे व विशेषतः अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, अपिलार्थीस आता माहिती प्राप्त होण्यासाठी झालेला विलंब हा कोणत्याही परिस्थितीत समर्थनीय होऊ शकत नाही. या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी व गट शिक्षणाधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती

देण्यासाठी केलेल्या अशा अक्षम्य दुर्लक्षामुळे ते अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यास पात्र होत आहेत. सबब शिक्षण संचालक,पुणे यांना या प्रकरणाशी संबंधित गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, वसमत व शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, हिंगोली यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील, "वेतनवाढीची शिफारस करण्याचे अधिकार मुख्याध्यापकाऐवजी श्री. मुंढे यांच्याकडे दिले काय?" व "मुंढे यांच्यावर खोटया वेतनवाढ देण्याच्या पत्रावरुन सहायक शिक्षक श्री. मुंढे यांच्यावर बेकायदेशीर पोलीस कारवाई करुन गुन्हा का नोंदविण्यात आला नाही?" या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस, ती माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होत नाही.मात्र या अर्जातील उर्वरित संपूर्ण माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार असलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे आयोगास आढळून आले आहे. ही माहिती आज रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार आहे. सशुल्क माहिती देण्याचा अधिनियमाद्वारे विहित केलेला कालावधी आता व्यपगत झाला असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत त्यांना नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली, अपिलार्थीस देय असलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

३. शिक्षण संचालक,म.रा.पुणे यांना तत्कालीन जन माहिती अधिकारी व गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, वसमत यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक: ०७-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त,**
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ,मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅण्डरोड, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, १७,डॉ.आंबेडकर मार्ग,पुणे -१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. सचिव (शालेय शिक्षण) मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेली अपिले

क्रमांक ३६९/०९ व ३७०/०९

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३६९ व ३७०
निर्णय दिनांक: ०७-०१-२०१०

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, : अपिलार्थी
नांदेड.

विरुध्द

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक,
जय जवान जय किसान माध्यमिक व उच्च माध्यमिक
विद्यालय,कावलगाव,ता.पूर्णा, जि.परभणी.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, परभणी.

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.०३.२००९ रोजी नोंदविलेली द्वितीय अपिले क्र. ३६९/०९ व ३७०/०९ आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या दोनही अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १७.०९.२००८ रोजी माहिती मागविली असता, त्यांना अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी दि. २६.११.२००८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, परभणी यांच्याकडे प्रथम अपील केले. परंतु सदर प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेता, प्रलंबित ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन दोन स्वतंत्र द्वितीय अपिले आयोगाकडे सादर केली आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने एकाच माहितीकरिता राज्य माहिती आयोगाकडे दोन स्वतंत्र द्वितीय अपिले सादर केली आहेत. दोनही अपील अर्जाशी संबंधित मूळ माहितीच्या अर्जातील मजकूर एकसारखाच असल्यामुळे अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलांपैकी अपील क्र. ३७०/०९ हे खारीज करण्यात येत आहे.

अपील क्र. ३६९/०९ च्या संदर्भात असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जय जवान जय किसान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,कावलगाव, ता.पूर्णा जि.परभणी यांच्याकडे काही माहिती मागविला असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. १८.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संस्था चालकाकडे उपलब्ध असल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले. जन माहिती अधिकारी यांच्या या पत्राने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २६.११.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांच्याकडे प्रथम अपील केले. परंतु अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी न घेता सदरचे प्रकरण प्रलंबित ठेवल्याकारणाने, अपिलार्थीने परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधित संस्थाचालकांकडे उपलब्ध असल्याने ते अपिलार्थीस ही माहिती पुरवू शकले नाहीत. अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या त्यांच्या प्रथम अपिलाच्या झेरॉक्स प्रतीचे अवलोकन केले असता, मूळात अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज शिक्षणाधिकारी

(माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी यांच्याकडे प्राप्त झाला किंवा कसे हे कळण्यास मार्ग नाही. तसेच यासंदर्भात अपिलार्थीने आयोगाकडे दुसरा कोणताही पुरावा सादर केलेला नाही. त्यामुळे अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी प्रथम शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, परभणी यांच्याकडे त्यांच्या दि. २६.११.२००८ रोजीच्या कथित प्रथम अपील अर्जाची प्रत सादर करावी. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीकडून त्यांच्या दि. २६.११.२००८ रोजीच्या कथित प्रथम अपील अर्जाची प्रत प्राप्त झाल्यानंतर तीस दिवसांच्या आत व अपवादात्मक परिस्थितीत ४५ दिवसांच्या आत विलंबाची कारणे त्यांच्या अभिलेख्यावर नोंदवून, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन सुनावणी घ्यावी व तदनंतर यासंदर्भातील आपला निर्णय पारित करावा.

शिक्षणाधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास अपिलार्थी सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत अधिनियमातील कलम १९(३) नुसार राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीच्या विचाराधीन दोनही अपिलासंदर्भात खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील क्र.३७०/०९ खारीज करण्यात येत आहे.

२. अपील क्र. ३६९/०९ निकाली काढण्यात येत आहे.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दि.२६.११.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, जास्तीत जास्त पंचेचाळीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक: ०७-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त,**
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ,मुख्य संपादक, साप्ताहिक सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जय जवान जय किसान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,कावलगाव,ता.पूर्णा, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५६८
निर्णय दिनांक ०७/०१/२०१०

१ श्री. शाह शेख रहीम कादरी पिता शाह शेख इमाम कादरी, रा.नांदेड	:	अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा वक्फ अधिकारी, नांदेड	:	प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र वक्फ मंडळ, औरंगाबाद		

निर्णय

श्री. शाह शेख रहीम कादरी पिता शाह शेख इमाम कादरी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०१.०२.२००९ रोजी केलेले दि. ०४.०२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २४.१२.२००७ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.२५.०४.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा १५६ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक : ०७/०१/२०१० **राज्य माहिती आयुक्त,**
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१) श्री. शाह शेख रहीम कादरी पिता शाह शेख इमाम कादरी, गल्ली नं.१, पिरबुऱ्हाणनगर, नांदेड ४३१ ६०५.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५६९
निर्णय दिनांक ०७/०१/२०१०

१ श्री. विनोदसिंह मानसिंह राजपूत, : अपिलार्थी
रा.नगरदेवळा, ता.पाचोरा, जि. जळगांव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मॅनेजर,
म.बाळासाहेब कृष्णराव शिवराव पवार ग्रामिण
बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्यादित, नगरदेवळा,
ता.पाचोरा, जि. जळगांव

२. जन अपिलीय अधिकारी तथा
सहायक निबंधक,
सहकारी संस्था, पाचोरा, जि. जळगांव

निर्णय

श्री. विनोदसिंह मानसिंह राजपूत यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०५.०३.२००९ रोजी केलेले दि. ०७.०३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १४.०७.२००७ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.२४.०८.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ४३६ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक : ०७/०१/२०१० **राज्य माहिती आयुक्त,**
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विनोदसिंह मानसिंह राजपूत, मु.पो.नगरदेवळा, ता.पाचोरा, जि. जळगांव.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५९६
निर्णय दिनांक ०७/०१/२०१०

१ श्री. दिपक व्यंकटराव कदम, : अपिलार्थी
रा.हातणी, ता.लोहा, जि.नांदेड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, हातणी, ता.लोहा, जि.नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, लोहा, जि. नांदेड

निर्णय

श्री. दिपक व्यंकटराव कदम यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १८.०९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १६.०६.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.१८.०९.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा २४० दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक : ०७/०१/२०१० **राज्य माहिती आयुक्त,**
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दिपक व्यंकटराव कदम, रा. हातणी, पो. कौडगांव, ता.लोहा, जि.नांदेड.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले

क्रमांक ३७१/०९ व ३७३/०९

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३७१ व ३७३

निर्णय दिनांक ०७-०१-२०१०

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

विरुध्द

अपील क्रमांक ३७१/२००९

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, महात्मा ज्योतिबा फुले माध्यमिक
विद्यालय, गोकुंदा, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : मुख्याध्यापक, महात्मा ज्योतिबा फुले माध्यमिक व उच्च विद्यालय, गोकुंदा, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

अपील क्रमांक ३७३/२००९

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, महात्मा ज्योतिबा फुले माध्यमिक
विद्यालय, गोकुंदा, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : मुख्याध्यापक, महात्मा ज्योतिबा फुले माध्यमिक व उच्च विद्यालय, गोकुंदा, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी : शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नांदेड

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०४-२००९ रोजी नोंदविलेली दोन व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

अपील क्रमांक ३७१/२००९ व अपील क्रमांक ३७३/२००९ हे एकाच संस्थेच्या एकाच माध्यमिक विद्यालयाशी संबधित असून दुसरे अपील हे याच संस्थेच्या उच्च माध्यमिक विद्यालयाशी संबंधित आहे. अपिलार्थीने या दोनही विद्यालयाशी संबंधित एकाच स्वरुपाची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकाच दिवशी मागितली असल्यामुळे व तसेच यासंदर्भातील प्रथम व व्दितीय अपिले त्यांनी सक्षम प्राधिकरणाकडे एकाच दिवशी केली असल्यामुळे या दोनही अपिलांची सुनावणी एकत्रितपणे घेण्यात येत आहे.

आयोगाकडे दाखल केलेल्या या दोनही अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना विहित मुदतीत प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे प्रथम अपिले केली असता त्यांनी प्रथम अपिलांची सुनावणी न घेता प्रकरणे प्रलंबीत ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपिले आयोगाकडे सादर केली आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या दोनही प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ०५-०१-२००९ रोजीच्या दोन स्वतंत्र अर्जाव्दारे

मुख्याध्यापक, महात्मा ज्योतिबा फुले माध्यमिक व उच्च विद्यालय, गोकुंदा, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांच्याकडे त्यांच्या महाविद्यालयाच्या संदर्भात त्यांचे विद्यालय सुरु झाल्यापासून ते अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज करेपर्यंतच्या कालावधीतील विविध मुद्दयावरील माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - संस्थेमधील कायमस्वरुपी कार्यरत असलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या त्यांच्या आस्थापना व सेवाविषयक बाबी, तसेच शालेय पोषण आहार यासंदर्भातील माहितीचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीचे दिनांक ०५-०१-२००९ रोजीचे दोन अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपील क्रमांक ३७१/२००९ च्या संदर्भात दिनांक ०६-०१-२००९ रोजी व अपील क्रमांक ३७३/२००९ च्या संदर्भात दिनांक २१-०१-२००९ रोजी प्राप्त झाले. अपिलार्थीच्या या अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०३-०२-२००९ व दिनांक १८-०२-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस अपील क्रमांक ३७१/२००९ शी संबंधित प्रथम अर्जातील माहितीपोटीचे शुल्क रुपये ६०० व अपील क्रमांक ३७३/२००९ शी संबंधित प्रथम अर्जास माहितीपोटीचे शुल्क रुपये ७०० इतके त्यांच्या विद्यालयामध्ये डी. डी. व्दारे जमा करण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे न करता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दिनांक १०-०२-२००९ रोजी दोन स्वतंत्र प्रथम अपील अर्ज सादर केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जांवर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे दोन स्वतंत्र व्दितीय अपिले आयोगाकडे सादर केली आहेत.

वरील दोनही प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक ०७-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी या दोनही अपील प्रकरणांशी संबंधित जन माहिती अधिकारी हजर व अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

दोनही जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यापासून तीन दिवसाच्या आत त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविले होते. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने त्यांच्याकडे न केल्यामुळे ते अपिलार्थीस ही माहिती देऊ शकले नाहीत. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती आजही त्यांच्याकडे तयार असून ते ही माहिती अपिलार्थीस सशुल्क देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी म्हणतात त्याप्रमाणे जरी त्यांनी त्यांच्या दिनांक ०३-०२-२००९ व दिनांक १८-०२-२००९ रोजीच्या पत्राव्दारे अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद दिला असला तरी हा प्रतिसाद पुरेसा नाही. कारण अधिनियमातील कलम ७ (३) (क) प्रमाणे अपिलार्थीस माहितीपोटीचे शुल्क कळविताना या शुल्काचा तपशील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविणे त्यांना भाग होते. तथापि या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस माहितीपोटीचे शुल्क कळवितांना या शुल्काचा तपशील अपिलार्थीस न कळवून अधिनियमातील कलम ७ (३) (क) चा भंग केला आहे. त्यामुळे अपिलार्थीस आता ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त दोनही प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाने व विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासाठी कोणत्याही टप्प्यावर नाकारले नसल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याचे आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे केलेली व्दितीय अपिले क्रमांक ३७१/२००९ व ३७३/२००९ मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील क्रमांक ३७१/२००९ व ३७३/२००९ मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, या दोनही अपील प्रकरणी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत स्वतंत्रपणे नोंदणीकृत टपालाव्दारे व विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक ०७-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, महात्मा ज्योतिबा फुले माध्यमिक व उच्च विद्यालय, गोकुंदा, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३७२

निर्णय दिनांक ०७-०१-२०१०

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, माध्यमिक आश्रमशाळा शिराढोण,
तालुका कंधार, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, नांदेड

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, माध्यमिक आश्रमशाळा, शिराढोण, तालुका कंधार, जिल्हा नांदेड यांनी अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक ०७-०१-२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता संपूर्ण

माहिती प्राप्त झाली असून प्राप्त माहितीसंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार नाही. त्यामुळे ते त्यांचे विचाराधीन अपील क्रमांक ३७२/२००९ स्वखुषीने मागे घेत आहेत व ते रद्द करण्यात यावे अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीनेच त्यांचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील आता मागे घेतले असल्याने व ते रद्द करण्याची त्यांनी विनंती केली असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१. अपील क्रमांक ३७२/२००९, दिनांक २८-०४-२००९ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक ०७-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, माध्यमिक आश्रमशाळा, शिराढोण, तालुका कंधार, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३७४

निर्णय दिनांक ०७-०१-२०१०

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : सहायक अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-११-२००८ रोजी

माहितीसाठीचा अर्ज पाठवून दिला असता त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी दिनांक १४-०१-२००९ रोजी अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर त्यांनी कोणतीही सुनावणी न घेता प्रकरण प्रलंबीत ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ०३-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००६-०७ ते २००७-०८ या कालावधी-मधील विस्तृत प्रमाणावर काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०७-११-२००८ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी ज्या प्रपत्रामध्ये केली आहे त्या प्रपत्रामध्ये काही रकाने रिकामे असल्याचे कळवून अपिलार्थीस माहितीसाठी अर्ज करतांना एकाच विषयाशी संबंधित अर्ज करुन विषयांकीत माहितीच्या छायांकीत प्रतीची मागणी करावी असे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक १४-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७-०३-२००९ रोजी, सुनावणीसाठी अपिलार्थी गैरहजर राहिल्यामुळे, अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर निर्णय न दिल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती २० दिवसात पुरविण्यात येईल, असा युक्तिवाद केला.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही मोठी व्याप्ती असलेली आणि विस्तृत प्रमाणात आहे. तथापि अपिलार्थीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०७-११-२००८ रोजीच्या पत्राव्दारे जो प्रतिसाद दिला आहे तो प्रतिसाद पूर्णपणे चुकीचा व गैर असल्याचे आयोगास आढळून आले आहे. कारण अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थीने सदरचा अर्ज विहित नमुन्यामध्ये आणि सर्व रकाने भरुन केला आहे. तसेच एकाच अर्जाव्दारे एकच विषयावर माहिती मागविणे अर्जदारास अनुज्ञेय आहे अशा अर्थाची कोणतीही अधिसूचना राज्य शासनाने अद्यापपावेतो निर्गमित केलेली नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०७-११-२००८ रोजीच्या पत्राव्दारे दिलेला प्रतिसाद हा केवळ अपिलार्थीस माहिती देण्याचे टाळण्याच्या दृष्टीने दिला आहे असा आयोगाचा निष्कर्ष आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ती अधिनियमातील कलम ७ च्या तरतुदी-प्रमाणे उपलब्ध करुन द्यावी लागेल. अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी आता व्यपगत झाला असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना आता असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच २० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्यावेळी माहिती मागितली त्यावेळी जन माहिती अधिकारी या पदावर श्री. एस. बी. झगडे नावाचे कार्यकारी अभियंता कार्यरत होते, असे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले आहे. तथापि श्री. एस. बी. झगडे हे आता कोणत्या पदावर कार्यरत आहेत याची त्यांना कोणतीही माहिती नसल्याचे अविश्वसनीय विधान त्यांनी केले आहे. या प्रकरणी संबधित जन माहिती अधिकारी श्री. एस. बी. झगडे, तत्कालीन कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, नांदेड यांनी दिनांक ०७-११-२००८ रोजीच्या पत्राव्दारे चुकीचा प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती देण्यास टाळाटाळ केली असल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या कार्यपध्दतीव्दारे त्यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस सचिव (जलसंपदा) यांना करण्यात येत आहे. अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांनी श्री. एस. बी. झगडे यांचा पत्ता शोधून काढून या आदेशाच्या प्रती श्री. एस. बी. झगडे यांना तामिल करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, हे आदेश निर्गमित होताच २० दिवसाच्या आत अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (जलसंपदा) यांना संबंधित जन माहिती अधिकारी श्री. एस. बी. झगडे, तत्कालीन कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, नांदेड यांच्यावर

प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक ०७-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त**
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (दोन प्रतीमध्ये एक प्रत श्री. झगडे यांना देण्यासाठी)

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३७५

निर्णय दिनांक ०७-०१-२०१०

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी
तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती मागवूनही संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांना मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांनी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे प्रथम अपील केले. परंतु त्यांनी या अपील अर्जावर कोणतीही सुनावणी न घेता प्रकरण प्रलंबीत ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद नांदेड, यांच्याकडे खाजगी प्राथमिक उर्दू व मराठी

माध्यमांच्या शाळांसंदर्भात सन २००७-०८ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती. तथापि ही माहिती विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. परंतु अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-०७-२००८ रोजीच्या प्रथम अर्जाव्दारे खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" खाजगी प्राथमिक उर्दू व मराठी माध्यमाची शैक्षणिक वर्ष २००७-०८ साठी वर्ग ५ वी ते ७ वी तसेच अतिरिक्त तुकडीस अनुदानास पात्र ठरवण्याकरिता जिल्हा मुल्यांकन समितीने पात्र व अपात्र ठरविलेल्या खाजगी प्राथमिक उर्दू व मराठी माध्यमाचे शाळाचे नाव व पत्ता सहित आपल्या स्तरावर मुल्यांकन समितीने शासनाकडे पाठविलेले प्रपत्राची, मुल्यांकन समितीची स्वाक्षरीसहीत छायांकीत प्रत मिळणेबाबत."

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता ही माहिती अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्याचे व तसेच हा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास प्राप्त झाला असल्याचे त्या अर्जाच्या झेरॉक्स प्रतीवरील जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाच्या शिक्क्या-वरुन आयोगास आढळून येत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना आता अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य पुरवावी लागेल. हे पाहता संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित

करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक ०७-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३७६

निर्णय दिनांक ०७-०१-२०१०

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी,
वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास
महामंडळ मर्यादित, कार्यालय, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा जिल्हा व्यवस्थापक, वसंतराव नाईक विमुक्त जाती व
भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित,
कार्यालय, नांदेड

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-११-२००८ रोजी रजिस्टर्ड पोस्टाने अर्ज पाठविला असता त्यांना जन माहिती अधिकारी यांनी गैरकायदेशीररित्या ७१९०० रुपये इतक्या रकमेची मागणी केली. या रकमेबाबत स्पष्टीकरण मागितले असता जन माहिती अधिकारी यांनी त्यांना स्पष्टीकरण न देऊन त्यांची दिशाभूल केली त्यामुळे त्यांनी दिनांक

११-०२-२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. परंतु त्यांनी या प्रकरणाची सुनावणी न घेता प्रकरण प्रलंबीत ठेवले आहे, त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या महामंडळाशी संबंधित सन २००६ ते २००९ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ७१९०० इतके त्यांच्या कार्यालयास भरण्याचे सूचित केले. तथापि जन माहिती अधिकारी यांचा हा निर्णय मान्य नसल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. परंतु अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ७१९०० हे कोणत्या पत्राव्दारे कळविले त्या पत्राचा दिनांक व त्या पत्राची प्रत आयोगास सादर केलेली नाही. तसेच त्यांनी दिनांक ११-०२-२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील कोणत्या माध्यमाव्दारे सादर केले त्यासंदर्भात कोणताही पुरावा अपिलार्थीने अपिलासोबत जोडलेला नाही.

अशा प्रकारे आयोगास निर्णय घेण्यासाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे व सर्व संबंधितांच्या अनुपस्थितीमुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक ०७-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित, कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा व्यवस्थापक, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित, कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३८९
निर्णय दिनांक ११/०१/२०१०

१ श्री. शेख महंमद अय्युब महंमद याकूब, : अपिलार्थी
रा.अहमदनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
नगररचनाकार,
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त,
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

निर्णय

श्री. शेख महंमद अय्युब महंमद याकूब यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दि. १९.०७.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०१.०२.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. २२.०२.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर सुनावणी घेऊन दि.१३.०३.२००८ रोजी आपले आदेश पारित केले. तथापि यानंतरही माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत अथवा प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश

प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपील आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसापेक्षा ३६ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

अहमदनगर **(वि. बा. बोरगे)**
दिनांक : ११/०१/२०१० **राज्य माहिती आयुक्त,**
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख महंमद अय्युब महंमद याकूब, घर नं. १७९०, करशेटजी रोड, रामचंद्र खुंट, अहमदनगर.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३९०
निर्णय दिनांक ११/०१/२०१०

१ श्री. गोविंद केशवराव जाधव : अपिलार्थी
रा.कोळगांव, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, कोळगांव,
ता.श्रीगोंदा, जि. अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, श्रीगोंदा, जि.अहमदनगर

निर्णय

श्री. गोविंद केशवराव जाधव यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १५.०७.२००९ रोजी केलेले दि.१८.०७.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २४.०९.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. २३.०१.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ५२ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

अहमदनगर
दिनांक : ११/०१/२०१०

(वि. बा. बोरगे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गोविंद केशवराव जाधव, मु.पो.कोळगांव, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर ४१३ ७२८.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५९१
निर्णय दिनांक ११/०१/२०१०

१ श्री. शेख नुरुद्दीन अझीमुद्दीन, : अपिलार्थी
रा.राहुरी, जि. अहमदनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
व्यवस्थापक,
रावसाहेब पटवर्धन नागरी सहकारी पतसंस्था मर्या.,
पाईपलाईन रोड, सावेडी, अहमदनगर

१ जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, अहमदनगर

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०.०२.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दिनांक २३.११.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे व्यवस्थापक, रावसाहेब पटवर्धन नागरी सहकारी पतसंस्था मर्या., अहमदनगर यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर पतसंस्थेच्या व्यवस्थापकांनी त्यांच्या दि. २५.११.२००८ रोजीच्या पत्रान्वये, माहितीपोटीचे शुल्क रु. २८१/- इतके त्यांच्या कार्यालयात जमा करण्याचे अपिलार्थीस सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा न करता अपिलार्थीने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०१.१२.२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि.२३.१२.२००८ रोजी पारित केले. याव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील मान्य केले व माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा केल्यानंतर

माहिती उपलब्ध करुन देण्याचे व्यवस्थापक, रावसाहेब पटवर्धन नागरी सहकारी पतसंस्था मर्या. यांना आदेशित केले. यानंतर अपिलार्थीने माहितीपोटी जादा रक्कम घेतल्याचे कारण दर्शवून वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, संबंधित पतसंस्थेचे व्यवस्थापक व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

या प्रकरणी सर्व संबंधितांच्या असे निदर्शनास आणण्यात येत आहे की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने "नियंत्रण" व "वित्तिय सहाय्य" या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. हेच विवेचन सहकारी पतसंस्थांना देखील लावल्यास असे दिसून येते की, सहकारी पतसंस्थांना देखील शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्राप्त होत नाही व या पतसंस्थेच्या दैनंदिन कारभारावर शासनाचे कोणतेही प्रत्यक्ष नियंत्रण नसल्याने माहिती अधिकार अधिनियम-२००५ आता मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर पतसंस्थेस लागू होणार नाही. तथापि अपिलार्थीस ते या पतसंस्थेचे सदस्य असल्यास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ३२ नुसार संबंधित पतसंस्थेकडे आवश्यक त्या दस्तऐवजाच्या प्रतींची मागणी करता येईल.

या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे

आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१. अपील क्र. ५९१ /०९ खारीज करण्यात येत आहे.

अहमदनगर **(वि. बा. बोरगे)**
दिनांक : ११-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त,**
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख नुरुद्दीन अझीमुद्दीन, सपना १०२०, जंगम गल्ली, राहुरी, ता. राहुरी, जि. अहमदनगर.

२. व्यवस्थापक, रावसाहेब पटवर्धन नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, पाईपलाईन रोड, सावेडी, अहमदनगर.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३७७

निर्णय दिनांक ११-०१-२०१०

१ श्री. संजय बबन पोटे, : अपिलार्थी

मु. पो. मिरजगांव, तालुका कर्जत, जिल्हा अहमदनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी

तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, कर्जत,

तालुका कर्जत, जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, अहमदनगर

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०८-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांना माहिती मोफत मिळावी आणि माहिती अधिकार अधिनियमाचा अवमान केल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमाप्रमाणे आवश्यक ती कारवाई करण्यात यावी.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०१-२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी सुनावणीच्या सुरुवातीसच जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक ०८-१२-२००९ रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी आयोगाकडे दिनांक २६-०८-२००९ रोजी केलेले अपील ते आता त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असल्यामुळे, मागे घेत आहेत. या पत्रान्वये त्यांनी विचाराधीन अपील रद्द करण्याची आयोगास विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीनेच त्यांचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील आता मागे घेतले असल्यामुळे आणि विचाराधीन अपील रद्द करण्याची आयोगास त्यांनी विनंती केली असल्यामुळे अपिलार्थीचे अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१. अपील क्रमांक ३७७/२००९, दिनांक २९-०८-२००९ खारीज करण्यात येत आहे.

अहमदनगर **(वि. बा. बोरगे)**

दिनांक ११-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. संजय बबन पोटे, मु. पो. मिरजगांव, तालुका कर्जत, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, कर्जत, तालुका कर्जत, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३७८

निर्णय दिनांक ११-०१-२०१०

१ श्री. विजय यशवंत गोडसे, : अपिलार्थी

रा. कासार गल्ली, राहुरी, तालुका राहुरी,

जिल्हा अहमदनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी

तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,

अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा विभागीय महसूल आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : गट विकास अधिकारी, पंचायत समिती, राहुरी, तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर

जन अपिलीय अधिकारी : उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, अहमदनगर

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०९-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती दिली नाही आणि जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील

तरतुदीकडे दुर्लक्ष करुन आवश्यक ते स्पष्ट आदेश पारीत न केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक २९-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या मालकीच्या राहुरी येथील सर्वे नं. ३६०/०२ येथे ७/१२ च्या उता-यावर असणा-या " महाराष्ट्र सरकार जिल्हा परिषद " या बोजाची नोंद कमी करण्याकरिता जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-११-२००७, दिनांक २४-१२-२००७ व दिनांक १४-०१-२००८ रोजी दिलेल्या पत्रावर त्यांनी कोणती कार्यवाही केली त्याच्या छायांकीत प्रती, दिवंगत यशवंत गोडसे यांच्या नावाने जमा असलेल्या रकमेचा खाते उतारा, ही माहिती टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार विभागीय महसूल आयुक्त, नाशिक यांच्याकडे दिनांक ०५-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. त्यांनी सदरचा अर्ज उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्याकडे पाठवून दिला. त्यांनी या प्रकरणी दिनांक २३-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस दहा दिवसाच्या आत योग्य ते उत्तर देण्याचे गट विकास अधिकारी, पंचायत समिती, राहुरी यांच्या प्रतिनिधीस आदेशित करुन अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले. तथापि यानंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०१-२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांना आयोगास कोणतीही माहिती व्यवस्थितपणे पुरविता आली नाही. विचाराधीन प्रकरणाबाबत ते पूर्णतः अनभिज्ञ असल्याचे आयोगाच्या निदर्शनास आले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जास प्रथम प्रतिसाद न दिल्याचे व तसेच जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशावरही त्यांनी कोणतीही कार्यवाही न केल्याचे आयोगास आढळून येत आहे.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत तर पुरविली नाहीच नाही परंतु जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील कोणतीही माहिती अद्यापपर्यंत पुरविलेली नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांना आवश्यक असलेली माहिती म्हणजे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-११-२००७, दिनांक २४-१२-२००७ व दिनांक १४-०१-२००८ च्या दिलेल्या अर्जांवर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही, ही होय. या अर्जांवर जन माहिती अधिकारी यांनी विविध प्राधिकरणाशी या प्रकरणासंदर्भात केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती, अभिलेख्यावरील टिपणीच्या प्रती म्हणजे अपिलार्थीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही. अपिलार्थीने मागणी केलेली ही माहिती अधिनियमातील तरतुदी-नुसार सुसंगत असल्याने ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील कलम ७ प्रमाणे देय होत आहे. अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी आता व्यपगत झाला असल्याने संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २९-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेली ही माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत स्पीड पोस्टाने विनामूल्य उपलबध करुन द्यावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप इतके मर्यादित होते की, अपिलार्थीस ही माहिती देण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी यांना यांच्या कार्यालयातील मनुष्यबळ मोठ्या प्रमाणात या कामासाठी वळवावे लागत होते अशातली कोणतीही बाब या प्रकरणी संभवत नाही. केवळ अपिलार्थीस माहितीच द्यावयाची नाही म्हणूनच संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी या प्रकरणी टाळल्याचे आयोगास आढळून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या अशा प्रकारच्या वर्तनाव्दारे अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस स्वतःला निःसंशयपणे पात्र ठरविले आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी संबंधित जन माहिती अधिकारी हजर नाहीत. सबब संबंधित जन माहिती अधिकारी (दिनांक २९-०१-२००८ व तदनंतर १०० दिवसापर्यंत कार्यरत असलेले) यांना असे आदेशित करण्यात येते आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय माहिती न पुरविल्याबद्दल व त्यांना अपेक्षित माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगास प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस त्यांनी माहिती देण्यासाठी टाळाटाळ केले असल्याचे व त्यांच्यापासून माहिती दडवून ठेवल्याचे त्यांना मान्य आहे असा निष्कर्ष काढून हेच आदेश अंतिम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

आज रोजी जिल्हा परिषदेच्या उपस्थित असलेल्या कर्मचा-यांना तत्कालीन जन माहिती अधिकारी यांची नावे आयोगास सांगता आली नाहीत म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस माहिती न देण्यासाठी जबाबदार असलेल्या अधिका-यांची नावे त्यांनी त्यांच्या पातळीवर निश्चित करुन हे आदेश सर्व संबंधितांना पाठवावेत आणि सर्व संबंधितांचा खुलासा ते आयोगास एका महिन्याच्या आत सादर करतील असे पहावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, राहुरी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना वरील निर्णया-मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत स्पीड पोस्टाने विनामूल्य पुरवावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी (दिनांक २९-०१-२००८ व तदनंतर १०० दिवसापर्यंत कार्यरत असलेले) यांना उपरोक्त प्रकरणी एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा.

अहमदनगर **(वि. बा. बोरगे)**

दिनांक ११-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. विजय यशवंत गोडसे, रा. कासार गल्ली, राहुरी, तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, राहुरी, तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालाव्दारे)

५ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३७९

निर्णय दिनांक ११-०१-२०१०

१ श्री. देशमुख मोईन अब्दुल लतीफ, : अपिलार्थी

घर नं. १०/८, गजानन हौसिंग सोसायटी (जुना मुकूंदनगर),

औरंगाबाद रोड, अहमदनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी

तथा कामगार तलाठी, मौजे भानसहिवरे, तालुका नेवासा,

जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नेवासा,

तालुका नेवासा, जिल्हा अहमदनगर

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-०९-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतेही आदेश दिलेले नाहीत. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १९-०६-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे मौजे भानसहिवरे, तालुका नेवासा येथील कामगार तलाठ्याबाबत काही वैयक्तीक स्वरुपाची माहिती एकूण १३ मुद्दयाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-०७-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध माहिती पुरविली. तथापि ही माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार तहसीलदार, नेवासा यांच्याकडे दिनांक १८-०७-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही व यासंदर्भात आपले कोणतेही आदेश पारीत न केल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०१-२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी हजर व जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १८-०७-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, नेवासा यांनी सुनावणी घेऊन आपला निर्णय देणे या टप्प्यावर आयोगास गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, नेवासा यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक १८-०७-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, नेवासा यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १८-०७-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

अहमदनगर **(वि. बा. बोरगे)**

दिनांक ११-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. देशमुख मोईन अब्दुल लतीफ, घर नं. १०/८, गजानन हौसिंग सोसायटी (जुना मुकूंदनगर), औरंगाबाद रोड, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा कामगार तलाठी, मौजे भानहिवरे, तालुका नेवासा, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नेवासा, तालुका नेवासा, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३८०

निर्णय दिनांक ११-०१-२०१०

१ श्री. मुनाफ इब्राहिम बागवान, : अपिलार्थी
१४६२, वंजार गल्ली,
अहमदनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी
तथा तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, अहमदनगर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, अहमदनगर

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०९-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी तहसीलदार, अहमदनगर यांच्याकडे दिनांक २३-०६-२००९ रोजी प्रथम अपील केले असता त्यांना समाधानकारक माहिती मिळत नसल्याचे आढळून आले आहे. या प्रकरणातील अपील अर्जावर तहसीलदाराने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत सशुल्क माहिती देण्याचे आदेश दिले होते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०१-२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीस अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांना आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती पूर्णतः प्राप्त झाली असल्यामुळे त्यांना विचाराधीन अपील चालवावयाचे नाही व ते हे अपील स्वखुषीने मागे घेत आहेत.

अपिलार्थीने या प्रकरणात त्यांचे लेखी निवेदन आयोगास सादर केले आहे.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे विचाराधीन अपील आता मागे घेतले असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१. अपील क्रमांक ३८०/२००९, दिनांक १६-०९-२००९ खारीज करण्यात येत आहे.

अहमदनगर **(वि. बा. बोरगे)**

दिनांक ११-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुनाफ इब्राहिम बागवान, १४६२, वंजार गल्ली, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३८१

निर्णय दिनांक ११-०१-२०१०

१ श्री. शेख शाकीरभाई अब्दुल सत्तार, : अपिलार्थी

तवकल वस्ताद मळा, टिळक रोड, अहमदनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी

तथा अपर पोलीस अधीक्षक,

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा उपायुक्त / पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक

विभाग, नाशिक

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक

विभाग, नाशिक

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०९-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी नाकारल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-०६-२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले असता जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे म्हणणे विचारात न घेता अपिलार्थीने मागणी केलेला चौकशी अहवाल देण्याचे नाकारले. सदर अहवाल

अपिलार्थीस देण्याचे आणि तसेच या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना देण्यात आलेल्या माहितीपोटीचे बेकायदेशीरपणे स्वीकारलेले अतिरिक्त शुल्क रुपये ५० इतके अपिलार्थीस परत करण्याचे माहिती अधिकारी यांना आदेशित करावे, अशी त्यांनी या अर्जाच्या अखेरीस आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक १८-०६-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००७ ते २००९ या कालावधीतील त्रयस्थ पक्ष श्री. सुरेश इथापे, श्री. एन. बी. मगर व श्री. रोहीदास सातपुते यांच्या अवैध संपतीची चौकशी होण्याकरिता अपिलार्थीने केलेल्या अर्जासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - अपिलार्थीने केलेल्या तक्रार अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी घेतलेला निर्णय, त्यावर केलेली कार्यवाही, चौकशी अहवालाच्या छायांकित प्रती, त्रयस्थ पक्ष श्री. रोहीदास सातपुते यांची चौकशी करण्याकरिता पोलीस उप अधीक्षक यांनी महासंचालकाकडे कधी मागणी केली, त्यास कधी मान्यता मिळाली त्याचा दिनांक व तपशील आणि या चौकशीची प्रत व तपास अधिका-याने सर्व चौकशी पूर्ण केल्यानंतर त्यासंबंधीचा सविस्तर अहवाल - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०९-०७-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ५० इतके त्यांना स्टेट बँकेमध्ये जमा करण्याचे सूचित केले व अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तयार करुन ठेवली व यानंतर अपिलार्थीने दिनांक २३-०७-२००९ रोजी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा केल्यानंतर अपिलार्थीस दिनांक २३-०७-२००९ रोजी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली. तथापि यापूर्वीच अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-०६-२००९ रोजी प्रथम अपील केले होते. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २९-०८-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०१-२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीपैकी जेवढी माहिती उघड करणे शक्य होते ती सर्व माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक २३-०७-२००९ रोजी उपलब्ध करुन दिली असून उर्वरित माहिती, ती अपिलार्थीस उघड केल्याने, त्रयस्थ पक्षाच्या जीवितास व त्यांच्या कुटूंबाना धोका संभवत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आणल्यावरुन आणि याची त्यांना खात्री पटल्यावरुन त्यांनी अपिलार्थीस उर्वरित माहिती उपलब्ध करुन दिली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देय माहिती देण्याचे या घटनाक्रमाच्या कोणत्याही टप्प्यावर नाकारलेले नाही. अपिलार्थीस जेवढी माहिती देता येणे शक्य होते तेवढी त्यांनी अधिनियमातील कलम ७ (३) नुसार अपिलार्थीस सशुल्क पुरविली आहे. अपिलार्थीस माहिती उघड करुन न देण्याची कारणे जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २९-०८-२००९ रोजी दिलेल्या निर्णयामध्ये पुरेशा प्रमाणात स्पष्ट केली आहेत. आयोग जन अपिलीय अधिकारी यांच्या अपिलार्थीस माहिती उघड न करण्याच्या निष्कर्षाशी सहमत आहे. अपिलार्थीने आयोगाकडे नमूद केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांना माहितीपोटीचे आकारलेले अतिरिक्त शुल्क रुपये ५० याबाबत आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २३-०७-२००९ रोजी एका पृष्ठाची माहिती दिली असून ती माहिती अपिलार्थीस पाठविण्याचा त्यांना २५ रुपये इतका खर्च आला आहे. तथापि या पत्रास त्यांनी अपिलार्थीकडून ५० रुपये इतके शुल्क आकारलेले

आहे. या शुल्काचा तपशील जन माहिती अधिकारी यांना विचारला असता, त्यांनी अपिलार्थीस शुल्काची ही रक्कम प्रथमतः कळविण्यासाठी त्यांनी अपिलार्थीशी केलेल्या पत्रव्यवहारापृष्ठ्यर्थ त्यांना आलेल्या खर्चाचा या शुल्कामध्ये समावेश आहे असे आयोगास सांगितले. यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेले माहितीपोटीचे शुल्क कळवितांना जन माहिती अधिकारी यांना येणारा खर्च त्यांनी त्यांच्या कार्यालयीन खर्चामधून करावयाचा असतो. अपिलार्थीस माहितीपोटीचे शुल्क आकारतांना प्रत्यक्षात अपिलार्थीस जितक्या पृष्ठांची माहिती पुरविली तितक्याच पृष्ठाचे शुल्क जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आकारणे गरजेचे आहे. त्यामुळे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांची अपिलार्थीस एका पृष्ठाची माहिती देऊन याकरिता ५० रुपये इतके शुल्क आकारण्याची कृती अवैध व गैर आहे. त्यामुळे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांना आता अपिलार्थीने त्यांच्याकडे भरणा केलेल्या एकूण ५० रुपये इतक्या रकमेपैकी २३ रुपये इतकी रक्कम अपिलार्थीस परत करावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले जादाचे शुल्क रुपये २३ इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत परत करावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

<u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीकडून स्वीकारलेले माहितीपोटीचे जादाचे शुल्क रुपये २३ इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत परत करावे.

अहमदनगर **(वि. बा. बोरगे)**
दिनांक ११-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त**
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शेख शाकीरभाई अब्दुल सत्तार, तवकल वस्ताद मळा, टिळक रोड, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३८२

निर्णय दिनांक ११-०१-२०१०

१ श्री. बाळासाहेब पोपटराव कोळपे, : अपिलार्थी
मु. पो. कोळपेवाडी, तालुका कोपरगांव,
जिल्हा अहमदनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी
तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय,
कोळपेवाडी, तालुका कोपरगांव,
जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कोपरगांव,
तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : विस्तार अधिकारी (कृषि), पंचायत समिती,
कोपरगांव, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०९-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी घेतलेल्या सुनावणीनंतरही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०८-०६-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित सन २००७ ते २०१० या आर्थिक वर्षातील आठवडी बाजारतळ कर वसुलीबाबत काही माहिती व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या सर्व वर्षाच्या आठवडी बाजारतळ कर वसुली लिलावाचा संपूर्ण अहवाल, लिलाव उपस्थितीसाठी दवंडी देय पावती, वर्तमानपत्र जाहिरात पुरावा, लिलाव रक्कम बोलीचा तक्ता आणि आठवडी बाजार कर वसुली लिलावाचा संपूर्ण तपशील, आठवडी बाजार कर वसुली लिलावासंदर्भात शासनाची मार्गदर्शक तत्वे अथवा नियमाची दप्तरीदाखल माहिती - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २४-०६-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ११० इतके त्यांना भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा ग्रामपंचायतीकडे न करता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-०७-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २६-०८-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस ग्रामविकास अधिका-याकडून माहिती घेण्याचे सूचित केले. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०१-२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर व जन माहिती अधिकारी हजर आहेत.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ११० इतके ग्रामपंचायतीमध्ये भरण्याचे सूचित केले होते. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा न करता जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. नंतर अपिलार्थीने दिनांक २४-०९-२००९ रोजी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ११० इतके ग्रामपंचायत कार्यालयामध्ये भरल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस दिनांक २४-०९-२००९ रोजी माहिती दिली. ही माहिती त्यांनी अपिलार्थीस व्यक्तिशः हस्तांतरीत केलेली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी अथवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने आयोगाकडे दिनांक १८-०९-२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल्यानंतर त्यांना आवश्यक ती माहिती व्यक्तिशः पुरविली आहे. प्राप्त माहितीवर अभिप्राय व्यक्त करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. त्यांनी यासंदर्भातील त्यांचा लेखी युक्तिवादही आयोगास सादर केलेला नाही. हे पाहता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती समाधानकारक असल्याचा निष्कर्ष काढण्यात येत आहे. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिलेला आहे व अपिलार्थीस आवश्यक ती माहिती अधिनियमातील तरतुदीप्रमाणे माहितीपोटीचे शुल्क भरल्यानंतर लागलीच दिली आहे. त्यामुळे अपिलार्थीच्या

विचाराधीन अपिलावर वेगळ्याने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालील-प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

अहमदनगर **(वि. बा. बोरगे)**

दिनांक ११-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बाळासाहेब पोपटराव कोळपे, मु. पो. कोळपेवाडी, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, कोळपेवाडी, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (कृषि), पंचायत समिती, कोपरगांव, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३८३

निर्णय दिनांक ११-०१-२०१०

१ श्री. गोकुळ विलास सातपुते, : अपिलार्थी

मु. पो. मांडवगण, तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी,

पंचायत समिती, श्रीगोंदा, तालुका श्रीगोंदा,

जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी

पंचायत समिती, श्रीगोंदा, तालुका श्रीगोंदा,

जिल्हा अहमदनगर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : ग्रामसेवक, ग्रामपंचायत, मांडवगण, तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर

जन अपिलीय अधिकारी : विस्तार अधिकारी, पंचायत समिती, श्रीगोंदा, तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०९-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिली नसल्यामुळे आणि तसेच त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केल्यानंतर देखील त्यांना कोणतीही माहिती संबंधितांकडून उपलब्ध न

झाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जाव्दारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०७-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौजे मांडवगण, तालुका श्रीगोंदा येथील घरकुल योजनेच्या संदर्भात दिनांक ०१-०४-२००६ ते ३०-०६-२००९ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - मौजे मांडवगण येथील घरकुल लाभार्थ्यांची नांवे, लाभ झालेल्या योजनेचे नांव, मंजूर अनुदान, लाभार्थ्यास अदा केलेली रक्कम, घरकुल बांधून पूर्ण झाले का ?, संडास बांधले आहे का ? - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती. तसेच अपिलार्थीने हा माहितीसाठीचा अर्ज श्रीगोंदा पंचायत समितीकडे केला होता. तथापि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही ग्रामसेवक, ग्रामपंचायत, मांडवगण, तालुका श्रीगोंदा यांच्याशी संबंधित असल्यामुळे गट विकास अधिकारी, पंचायत समिती, श्रीगोंदा यांनी अपिलार्थीचा मूळ अर्ज ग्रामसेवक, ग्रामपंचायत, मांडवगण यांच्याकडे दिनांक १७-०७-२००९ रोजी पाठवून या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. या पत्रामध्ये गट विकास अधिकारी, पंचायत समिती, श्रीगोंदा यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती मुदतीत देण्याचे संबंधित ग्रामसेवकास सूचित केले होते. तथापि यानंतरही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार परत श्रीगोंदा पंचायत समितीकडे दिनांक २०-०८-२००९ रोजी प्रथम अपील केले. यानंतर अपिलार्थीच्या या अपील अर्जाची जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०७-०९-२००९ रोजी सुनावणी घेऊन या अपील अर्जासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणताही निर्णय न देता संबंधित ग्रामसेवकाने अपिलार्थीने मागणी केलेली माहिती दिली नाही असा त्यांचा निष्कर्ष काढला. अशा प्रकारे सर्व संबंधितांकडून आवश्यक ती

माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०१-२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हजर व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. संबंधित ग्रामसेवक हे ग्रामपंचायतीच्या कार्यालयात कधीही उपस्थित राहत नाहीत. त्यामुळे गावातील जनतेस ग्रामपंचायतीकडील कोणतीही माहिती कधीही उपलब्ध होऊ शकत नाही.

अपिलार्थी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी जन माहिती अधिकारी अथवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेल्या माहितीतील ' घरकुल बांधून पूर्ण झाले आहे का ? व संडास बांधले आहे का ?' या मुद्दयांवरील माहिती वगळता उर्वरित सर्व मुद्दयांवरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली आहे. या दोन मुद्दयावरील माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी विसंगत असल्यामुळे, अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांची मते अथवा अभिप्राय अपेक्षित करणारी प्रश्नार्थक स्वरुपात माहिती विचारणे त्यांना अनुज्ञेय नाही. त्यामुळे या दोन मुद्दयावरील अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी विसंगत असल्याचे स्पष्ट होत आहे. उर्वरित मुद्दयांवरील माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्यामुळे ती अधिनियमातील कलम ७ प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे भाग आहे. सशुल्क माहिती पुरविण्याचा

अधिनियमाव्दारे विहित केलेला कालावधी आता संपुष्टात आला असल्यामुळे अपिलार्थीस ही माहिती अधिनियमातील कलम ७ (६) च्या तरतुदीप्रमाणे विनामूल्य देय होत आहे. सबब संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीपैकी वर स्पष्ट केलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती अत्यंत मर्यादित व स्वरुप सोपे असतांनाही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात या संपूर्ण घटनाक्रमाच्या कोणत्याही टप्प्यावर सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे आयोगास आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी आपल्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, अशी आयोगाची खात्री झाली आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, मांडवगण, तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर (दिनांक १७-०७-२००९ व तदनंतर तीन महिन्यापर्यंत कार्यरत असलेले ग्रामसेवक) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

<u>आदेश</u>

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली व त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, मांडवगण, तालुका श्रीगोंदा, जिल्हा

अहमदनगर (दिनांक १७-०७-२००९ व तदनंतर तीन महिन्यापर्यंत कार्यरत असलेले ग्रामसेवक) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अहमदनगर **(वि. बा. बोरगे)**

दिनांक ११-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गोकुळ विलास सातपुते, मु. पो. मांडवगण, तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, मांडवगण, तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, श्रीगोंदा, तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३८४

निर्णय दिनांक ११-०१-२०१०

१ श्री. जालींदर रघुनाथ घोडके, : अपिलार्थी

मु. पो. मांडवगण, तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी,

पंचायत समिती कार्यालय, श्रीगोंदा, तालुका श्रीगोंदा,

जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी

पंचायत समिती कार्यालय, श्रीगोंदा, तालुका श्रीगोंदा,

जिल्हा अहमदनगर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : गट विकास अधिकारी, पंचायत समिती, श्रीगोंदा, तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर

जन अपिलीय अधिकारी : गट विकास अधिकारी, पंचायत समिती, श्रीगोंदा, तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०९-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन आयोगास असे अवगत केले आहे की, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही माहिती अद्याप-पावेतो दिली नसल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक २२-०६-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, मौजे मांडवगण तालुका श्रीगोंदा येथील विशेष घटक योजनेअंतर्गत दिनांक ०१-०४-२००४ ते ३१-०३-२००९ या कालावधीमधील जमा झालेल्या अर्जदारांची नांवे, निवड झालेल्या लाभार्थ्यांची नांवे, संबंधित लाभार्थ्यास मिळालेल्या वस्तु, त्याची तारीख आणि पात्रतेसंबंधी निकष, अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-०७-२००९ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावरही जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय न दिल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०१-२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती तथा अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना आता आवश्यक असलेली संपूर्ण माहिती प्राप्त झाली असून प्राप्त माहितीने ते समाधानी असून त्यांना आता विचाराधीन अपील पुढे चालवावयाचे नाही.

अपिलार्थीची ही विनंती लक्षात घेता तसेच अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील केल्यानंतर दिलेल्या माहितीचे अवलोकन करता असे आढळून आले

आहे की, संबंधित माहिती अधिका-याने दिलेली माहिती अपिलार्थीच्या मागणीशी सुसंगत आहे. याही उपर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील आता मागे घेतले असल्यामुळे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

<u>आदेश</u>

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

अहमदनगर **(वि. बा. बोरगे)**

दिनांक ११-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. जालींदर रघुनाथ घोडके, मु. पो. मांडवगण, तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, श्रीगोंदा, तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, श्रीगोंदा, तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३८५

निर्णय दिनांक ११-०१-२०१०

१ सौ. सुलोचना लक्ष्मण कोल्हे, : अपिलार्थी
मु. पो. इंदिरा पथ, कोपरगांव, तालुका कोपरगांव,
जिल्हा अहमदनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी
तथा रजिस्ट्रार, जिल्हा न्यायालय, कोपरगांव,
तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी
जिल्हा न्यायालय, कोपरगांव, तालुका कोपरगांव,
जिल्हा अहमदनगर

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-०७-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०१-२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीच्या आयोगास उद्देशून लिहिलेल्या दिनांक २९-१२-२००९ रोजीच्या पत्राची प्रत आयोगास

सादर केली असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दिनांक ०१-०४-२००९ व दिनांक ०६-०५-२००९ रोजी केलेल्या दोन अर्जासंदर्भातील माहितीची त्यांना आता आवश्यकता नसल्यामुळे त्यांचे माहिती अधिकार अधिनियमातील अर्ज निकाली काढण्यात यावेत. या पत्राची प्रत त्यांनी जिल्हा न्यायाधीश, कोपरगांव यांच्याकडे अग्रेषित केली आहे. अपिलार्थीच्या या पत्रावरुन तसेच आज रोजी सुनावणीसाठी असलेली त्यांची अनुपस्थिती पाहता, अपिलार्थीस या प्रकरणाशी संबंधित माहितीची आवश्यकता नसावी असा निष्कर्ष काढून त्यांचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१. अपील क्रमांक ३८५/२००९, दिनांक ०३-०७-२००९ खारीज करण्यात येत आहे.

अहमदनगर **(वि. बा. बोरगे)**

दिनांक ११-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ सौ. सुलोचना लक्ष्मण कोल्हे, मु. पो. इंदिरा पथ, कोपरगांव, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा रजिस्ट्रार, जिल्हा न्यायालय, कोपरगांव, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी, जिल्हा न्यायालय, कोपरगांव, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३८६

निर्णय दिनांक ११-०१-२०१०

१ श्रीमती शेख नाहिन परवीन शब्बीर अहमद, : अपिलार्थी
व्दारा- शब्बीर सर, वेस्टन कन्स्ट्रक्शन मागे, कादर पटेल
चाळ, वार्ड नं. २, श्रीरामपूर, तालुका श्रीरामपूर,
जिल्हा अहमदनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्य अधिकारी, वाल्मिकी आंबेडकर आवास
योजना, श्रीरामपूर नगरपरिषद, श्रीरामपूर, तालुका
श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्याधिकारी, श्रीरामपूर नगरपरिषद, श्रीरामपूर,
तालुका श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : मुख्य लिपीक, श्रीरामपूर नगरपरिषद, श्रीरामपूर,
तालुका श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०९-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती पुरविली नाही, पुरविलेली माहिती चुकीची व दिशाभूल करणारी आहे,

नगरपरिषद व म्हाडा ही दोनही प्राधिकरणे आपली जबाबदारी एकमेकांवर ढकलत आहेत, सदनिका वाटप यादी चुकीची असल्याचे निदर्शनास येत असून ती मंजूर यादीप्रमाणे नाही. त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ०४-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, मौजे श्रीरामपूर येथील वार्ड क्रमांक २, दांडेकर प्लॉट येथील वाल्मिकी आंबेडकर आवास योजनेअंतर्गत बांधण्यात आलेल्या घरकुलाच्या संदर्भात सन २००५ ते दिनांक ०४-०२-२००९ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण ९ मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - वार्ड क्रमांक २, दांडेकर प्लॉटमधील घरकुलासंबंधी विहित प्रपत्रात पुढील माहिती - घरकुल क्रमांक, घरकुल ताब्यात असलेले व्यक्तीचे नांव, दिनांक १७-०९-२००१ रोजी खरेदी रजिस्टर क्रमांक, दांडेकर प्लॉटमध्ये एकूण पाडण्यात आलेली घरे किती, एकूण बांधण्यात आलेल्या घरांची संख्या, वाटप व शिल्लक राहिलेल्या घरांची संख्या, - प्रांत अधिकारी, श्रीरामपूर यांनी दिनांक १०-०५-२००८ रोजी मुख्याधिकारी, नगर परिषद, श्रीरामपूर यांना दिलेल्या आदेशानुसार दिनांक १६-०५-२००८ रोजी झालेली कारवाई, बांधकामाचा कालावधी, त्या कालावधीतच बांधकाम पूर्ण झाले का, दांडेकर प्लॉटमध्ये बांधण्यात आलेल्या घरकुलाच्या अनुदानात प्रत्येकी घरकुलास शासनाच्या एकूण सुविधा किती, कोणत्या, शासनाकडून आजपर्यंत घरकुल दुरुस्तीसंबंधी कुठल्याही प्रकारे निधी उपलब्ध झाला आहे का, किती, प्रत्येक घरकुलासाठी किती, त्याप्रमाणे निधीचा उपयोग केला गेला का, अनेक व्यक्तीच्या ताब्यात मंजूर यादीप्रमाणे / पेक्षा जास्त घरकुल ताब्यात आहे का, शासनाने व केंद्र शासनाने दिलेल्या निधीचा उपयोग केला गेला काय व त्यांचे नियम, अटी, क्षेत्र व सुविधेप्रमाणे घरकुले बांधली गेली का, दांडेकर प्लॉटमध्ये झालेल्या शासन मंजूर घरकुलांचे काम स्वंयसेवी संस्थेमार्फत करता येते का, जर स्वंयसेवी संस्थेमार्फत काम करण्यासाठी परवानगी असेल तर त्याचे सदस्य होण्यासाठी अटी,

शर्ती, नियम आहेत काय, कोणते - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २७-०२-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध माहिती पुरविली व याच पत्राव्दारे उर्वरित माहितीबद्दल त्यांनी अपिलार्थीस असे कळविले की, ही योजना जिल्हा गृहनिर्माण समितीच्या अधिपत्याखाली जिल्हा गृहनिर्माण अधिकारी यांनी राबविलेली असल्यामुळे ही माहिती नगरपालिकेकडे उपलब्ध नाही. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झ ाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, श्रीरामपूर यांच्याकडे दिनांक २३-०३-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०८-०७-२००९ रोजी निर्णय दिला. या निर्णयाव्दारे जन अपिलीय अधिकारी यांनी असे म्हटले आहे की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती कार्यकारी अभियंता तथा माहिती अधिकारी, म्हाडा, अहमदनगर यांच्याकडे माहिती संकलनाचे काम चालू आहे व सात दिवसाच्या आत ते जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे माहिती उपलब्ध करुन देतील. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सात दिवसाच्या आत त्यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी. तथापि यानंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०१-२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांच्या-कडील उपलब्ध माहिती दिनांक २७-०२-२००९ रोजी टपालाव्दारे पाठविण्यात आली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही जिल्हा गृहनिर्माण समितीच्या अधिपत्याखालील आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, श्रीरामपूर व जिल्हा गृहनिर्माण अधिकारी, अहमदनगर यांच्याशी संबंधीत होती. तथापि या प्रकरणी मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, श्रीरामपूर यांनी अपिलार्थीच्या अर्जाची प्रत जिल्हा गृहनिर्माण अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, म्हाडा यांच्याकडे अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे पाठविली नसल्याचे आयोगास आढळून आले आहे व परिणामी अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहावे लागले आहे.

अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १, २, ३ व ५ शी संबंधीत या प्रकरणी संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. याबाबत मुद्दा क्रमांक १ शी संबधित माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केलेल्या प्रपत्रामध्ये त्यांना देणे अनिवार्य नाही. तथापि ही माहिती ज्या कागदपत्रामध्ये उपलब्ध आहे त्या कागदपत्राच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस द्याव्यात. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भात ‘ दांडेकर प्लॉट येथील वाल्मिकी आंबेडकर आवास योजने अंतर्गत बांधकाम करण्यात आलेल्या बांधकामाचा विहित कालावधी ’ एवढीच माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय आहे. या मुद्दयामधील ‘ त्या कालावधीतच बांधकाम पूर्ण झाले का ’, या मुद्दयावरील माहिती ही माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी विसंगत असल्याने ती अपिलार्थीस देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली आहे. त्यामुळे ती आता अपिलार्थीस देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. अपिलार्थीच्या अर्जातील उर्वरित मुद्दा क्रमांक ८ व ९ शी संबधित माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी विसंगत असल्यामुळे ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही.

वरील परिच्छेदामध्ये अपिलार्थीने मागणी केलेली माहिती व त्यांना देय असलेली माहिती यांचे केलेले पृथ:करण पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी आता अपिलार्थीस त्यांना देय असलेली मुद्दा क्रमांक १, २, ३ व ५ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसाच्या आत ती जिल्हा गृहनिर्माण अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १, २, ३ व ५ शी संबंधित मुद्दयावरील माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

अहमदनगर **(वि. बा. बोरगे)**

दिनांक ११-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्रीमती शेख नाहिन परवीन शब्बीर अहमद, व्दारा- शब्बीर सर, वेस्टन कन्स्ट्रक्शन मागे, कादर पटेल चाळ, वार्ड नं. २, श्रीरामपूर, तालुका श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्य लिपीक, श्रीरामपूर नगरपरिषद, श्रीरामपूर, तालुका श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, श्रीरामपूर नगरपरिषद, श्रीरामपूर, तालुका

श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले

क्रमांक ३८७/२००९ व ३८८/२००९

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३८७ व ३८८

निर्णय दिनांक ११-०१-२०१०

१ श्री. दिलीपराव नायकू थोरात, : अपिलार्थी

रा. कोळपेवाडी, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी

तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय,

कोळपेवाडी, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कोपरगांव,

तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : विस्तार अधिकारी (कृषि), पंचायत समिती, कोपरगांव, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर

निर्णय

अपील क्रमांक ३८७/२००९

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०९-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना चुकीची माहिती प्राप्त झाली असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक २५-०५-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौजे कोळपेवाडी येथील पाणीपुरवठा योजनेबाबत सन २००७ ते २००९ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण ९ मुद्दयाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत, कोळपेवाडी यांनी त्यांच्याकडील दिनांक २५-०६-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन काही माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कोपरगांव यांच्याकडे दिनांक २५-०६-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कोपरगांव यांनी दिनांक २६-०८-२००९ रोजी आपले आदेश पारीत केले. गट विकास अधिकारी यांनी पारीत केलेले कथित आदेश हे कोणत्याही प्रकारे आदेश नसून या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीस प्राप्त माहितीवर शंका असेल तर ग्रामविकास अधिकारी, कोळपेवाडी यांच्याशी संपर्क साधावा असे सूचित करुन अपिलार्थीचे अपील निकाली काढले आहे. गट विकास अधिकारी यांच्या या निर्णयानंतर संबंधित ग्रामविकास अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २५-१०-२००९ रोजी माहिती पुरविली. तथापि ही माहिती खोटी व दिशाभूल करणारी असल्याचे वाटल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०१-२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, ग्रामविकास व गट विकास अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मागणी केलेल्या माहितीमध्ये सरपंचाच्या पतीचा सहभाग असल्यामुळे ही माहिती त्यांना खोटी आहे असे वाटत आहे. अपिलार्थीस प्राप्त झालेल्या माहितीमध्ये या योजनेकरिता लागणा-या जागेसाठी दिलेल्या प्रमाणपत्रामध्ये विहिरीची मालकी बाबासाहेब चांगदेव कोळपे यांच्या नावाने दाखविली

आहे. तथापि सरपंचाने जागा विकली आहे व मोबदला देखील सरपंचाने घेतला त्यामुळे त्यांना प्राप्त झालेली ही प्रमाणपत्रे बनावट आहेत, असे त्यांना वाटते. त्यांच्या मते या योजनेत भ्रष्टाचार झाला असून ग्रामविकास अधिका-याने या योजनेमध्ये भ्रष्टाचार झाल्याचे त्यांच्याकडे अनौपचारिकरित्या कबूल केले आहे.

जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती विनामूल्य प्राप्त झाली असून प्राप्त माहितीमध्ये असलेल्या त्रुटीबाबत अपिलार्थीस असे स्पष्ट करण्यात येत आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या-कडून प्राप्त झालेल्या माहितीवर जर त्यांचे काही आक्षेप असतील तर या आक्षेपांचे निराकरण त्यांनी सक्षम प्राधिकरणाकडून करुन घ्यावे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे त्याच स्वरुपात ती अर्जदारास देणे त्यांना अभिप्रेत आहे. त्यामळे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे कर्तव्य पार पाडले आहे. जर प्राप्त माहितीच्या आधारे या योजनेत झालेला कथित भ्रष्टाचार अपिलार्थीस उघड करावयाचा असेल तर त्यासाठी त्यांना सक्षम प्राधिकरणाकडे वेगळ्याने अर्ज करावा लागेल, असे त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासाठी आता आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत. तसेच अपिलार्थीने दिनांक २५-०५-२००९ रोजी माहितीची मागणी केली असता अपिलार्थीस संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २५-१०-२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे आयोगास आढळून येत आहे. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिल्याने संबंधित ग्रामविकास अधिकारी हे अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार करावयाच्या कारवाईस पात्र होत आहेत. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,

अहमदनगर यांना संबंधीत ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, कोळपेवाडी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना, संबंधीत ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत, कोळपेवाडी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपील क्रमांक ३८८/२००९

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०९-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून चुकीची व दिशाभूल करणारी माहिती प्राप्त झाली असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ०९-०७-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित मे २००९ ते १० जून २००९ पर्यंतच्या कालावधीतील काही माहिती एकूण चार मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - ०१ मे २००९ ते १० जून २००९ पर्यंत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दाखल झालेल्या अर्जांची संख्या, त्यांचा माहितीचा विषय, मागणी करण्यात आलेली माहिती, माहिती कशी मागविण्यात आली याबाबतचे अभिप्राय, व्यक्तिश: माहिती मागणी केली असतांना पोस्टाने

माहिती पाठविणेबाबतचा अहवाल व अभिप्राय, ०१ मे २००९ ते १० जून २००९ या कालावधीशी संबंधित आवक जावक रजिस्टरची फोटो प्रत, सिध्देश्वर वाचनालय रजिस्टर नंबर ७०५३ स्थापना दिनांक १८-०३-१९७० या वाचनालयासाठी आर्थिक वर्ष २००८-०९ साठी शासनाकडून आलेला निधी, वाचनालयासाठी खरेदी केलेल्या पुस्तकाचा बिलासह तपशील, प्रवासभत्ता, प्रवासभाडे बिलाचा तपशील - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०४-०८-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २६ इतके अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०८-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०९-०९-२००९ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस सात दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १६-०९-२००९ रोजी माहिती दिली. तथापि ही माहिती दिशाभूल करणारी असल्याचे वाटल्यावरुन व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०१-२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या माहितीमध्ये त्यांना प्रवासभाडे रक्कम अदा केली नाही असे नमूद केले आहे. तथापि याच माहितीमध्ये त्यांनी नमुना नंबर १५ च्या प्रती प्रमाणे साहेबराव पाराजी कोळपे यांना ४२० रुपये इतके प्रवासभाडे अदा केल्याचे दिसून येत आहे. यावरुन जन

माहिती अधिकारी यांनी त्यांना दिशाभूल करणारी माहिती दिली आहे असे त्यांचे म्हणणे आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १६-०९-२००९ रोजी सशुल्क माहिती पुरविल्याचे आयोगासमोर कबूल केले आहे. अपिलार्थीने निर्देशित केलेल्या विसंगतीबाबत जन माहिती अधिकारी यांना विचारले असता, त्यांनी त्यांच्या हातून ही चूक झाली असल्याचे आयोगासमोर कबूल केले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडून २६ रुपये इतके शुल्क स्वीकारल्यानंतरही त्यांना चुकीची माहिती दिली आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांच्याकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रुपये २६ इतके त्यांना परत करावे लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत अपिलार्थीस परत करावे व अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ३ दिवसात प्रवासभत्त्यासंदर्भात विनामूल्य व सत्य माहिती पुरवावी. तसेच जन माहिती अधिकारी यांना इत:पर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास माहिती देतांना त्यांनी सतर्कतेने कार्यवाही करावी, अशी आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ३ दिवसाच्या आत प्रवासभत्त्यासंदर्भात संपूर्ण माहिती विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्याकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रुपये २६ इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे.

४. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

अहमदनगर **(वि. बा. बोरगे)**

दिनांक ११-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दिलीपराव नायकू थोरात, रा. कोळपेवाडी, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, कोळपेवाडी, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (कृषि), पंचायत समिती, कोपरगांव, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५७०
निर्णय दिनांक १२/०१/२०१०

१ श्री. अजित किसनलालजी कोठारी, रा. जालना	:	अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद कार्यालय, जालना २. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, जालना	:	प्रतिवादी

निर्णय

श्री. अजित किसनलालजी कोठारी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०५.०३.२००९ रोजी केलेले दि.०७.०३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि.१५.१०.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.१८.१०.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर सुनावणी घेऊन दि.०४.११.२००८ रोजी आपले आदेश पारित केले. तथापि यानंतर प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत अथवा प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि,

प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपील आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसापेक्षा ३१ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक : १२/०१/२०१० **राज्य माहिती आयुक्त,**
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अजित किसनलालजी कोठारी, घर नं. २.२०.१५, पारसी गल्ली, बेंझजी रोड, काद्राबाद, जालना.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५७१
निर्णय दिनांक १२/०१/२०१०

१ श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल, : अपिलार्थी
रा. जाफ्राबाद, जि. जालना

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तालुका कृषि अधिकारी,
तालुका कृषि कार्यालय, जाफ्राबाद, जि. जालना

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी,
जाफ्राबाद, जि. जालना

निर्णय

श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १५.०५.२००९ रोजी केलेले दि. १९.०५.२००९ राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि.१८.०८.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.०७.११.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ७१ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल

केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक : १२/०१/२०१० **राज्य माहिती आयुक्त,**
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल, बाजार गल्ली, मेन रोड, जाफ्राबाद, ता. जाफ्राबाद, जि. जालना.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१६२
निर्णय दिनांक १२/०१/२०१०

१ श्री. श्रीराम कन्हैयालाल भंडारी, रा. परळी वैजनाथ, जि. बीड	:	अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, वैद्यनाथ को. ऑ. इन्डस्ट्रीज लि., परळी वैजनाथ, जि. बीड	:	प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी तथा व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, बीड		

निर्णय

श्री. श्रीराम कन्हैयालाल भंडारी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०१.०९.२००८ रोजी केलेले दि. ०२.०९.२००८ राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि.०६.०८.२००७ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.१६.०१.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा १०५ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक : १२/०१/२०१० **राज्य माहिती आयुक्त,**
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. श्रीराम कन्हैयालाल भंडारी, जगमीत्रनागा को-ऑप.हौसिंग सोसायटी, परळी वैजनाथ, ता. परळी वै., जि.बीड.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३२५

निर्णय दिनांक १२-०१-२०१०

१ श्री. संदीप हरिभाऊ पडलवार, : अपिलार्थी

मु. अमीनगुडा, पो. तुळशी, ता. माहूर, जि. नांदेड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा

गटविकास अधिकारी तथा सह गट कार्यक्रम

अधिकारी, पंचायत समिती, माहूर, जि. नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),

जिल्हा परिषद, नांदेड

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६.०१.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मागविली असता, त्यांना जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माहूर यांनी कोणतीही माहिती दिली नाही, त्यामुळे त्यांनी उपमुख्य कार्यकारी अधिकारी, पंचायत विभाग, जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दिनांक १५.०९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय दिला नाही आणि केवळ तारीख पुढे पुढे ढकलली व अपिलार्थीस आर्थिक भुर्दंड

पाडला. त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०१.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित सन २००७ ते २००८ या कालावधीतील महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या संबंधित व्यापक व्याप्ती असलेली काही माहिती व्यक्तिशः मागितली होती. तदनंतर विहित मुदतीत अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिल्याचे, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत नाही.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०१.०९.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथम सुनावणी घेऊन आपला निर्णय देणे या टप्प्यावर आयोगास गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, नांदेड यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०१.०९.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या अपिलार्थीच्या दिनांक ०१.०९.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर पारित केलेल्या निर्णयाने जर अपिलार्थीचे समाधान झाले नाही तर ते, माहिती

अधिकार अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती अयोगाकडे द्वितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, नांदेड यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०१.०९.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

औरंगाबाद (वि. बा. बोरगे)

दिनांक १२.०१.२०१० राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. संदीप हरिभाऊ पडलवार, मु. अमीनगुडा, पो. तुळशी, ता. माहूर, जि. नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माहूर, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३२६

निर्णय दिनांक १२.०१.२०१०

१ श्री. नारायण ग्यानबा बापमारे, : अपिलार्थी
मु.पो. मंगरुळ नं.१, ता. माजलगांव, जि. बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी,
कार्यालय, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग,
माजलगांव, जि. बीड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम
विभाग क्र.-२, बीड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, माजलगांव, जि. बीड

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३.०२.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आयोगास अशी विनंती केली आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना, या प्रकरणी, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही कोणतीही माहिती दिली नसल्याने, त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कार्यवाही आणि अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे आयोगाने आदेशीत करावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, माजलगांव तालुक्यातील सर्वे नंबर २२२/१ शिवार सावरगांव, येथील रामपिंपळगांव जोड रस्त्याचे व नालीच्या अर्धवट ठेवलेल्या कामाबाबत काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीच्या केलेल्या या अर्जामध्ये अर्धवट राहिलेले काम पूर्ण करुन देण्याची जन माहिती अधिकारी यांना विनंती केली होती व त्याच बरोबर जन माहिती अधिकारी यांना तहसील कार्यालयाकडून या विषयावर प्राप्त दिनांक २६.०८.२००८ व ११.०९.२००८ रोजीच्या पत्रांवर त्यांनी काय कार्यवाही केली, अशी माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २४.१०. २००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीचे अर्धवट काम पूर्ण करुन देण्याच्या विनंती संदर्भातील कामाकरिता त्यांच्याकडे कोणतेही अंदाजपत्रक मंजूर नसल्याचे अपिलार्थीस कळविले व अर्धवट राहिलेले काम पूर्ण करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही, अशी माहिती अपिलार्थीस दिली. या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८.११.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १२.१२.२००८ रोजी आपला निर्णय पारित करुन जन माहिती अधिकारी यांना नाली बुजविण्याचे व निधी उपलब्ध झाल्यानंतर योग्य ती कार्यवाही करण्याचे आदेश दिले. यानंतरही अपेक्षित कार्यवाही न झाल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हजर आणि जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक २४.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे आवश्यक ती माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयामार्फत अद्यापपावेतो अपूर्ण करावयाचे राहिलेले काम पूर्ण करुन देण्याची विनंती केली होती व त्याचबरोबर या प्रकरणी तहसील कार्यालयाकडून जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या दिनांक २६.०८.२००८ व ११.०९.२००८ रोजीच्या पत्रांवर जन माहिती अधिकारी यांनी काय कार्यवाही केली, याची माहिती मागविली होती. या अर्जाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, अर्धवट काम पूर्ण करण्याकरिता त्यांच्या दिनांक २४.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे असमर्थता व्यक्त केली. परंतु या विषयी त्यांना तहसील कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या पत्रावर त्यांनी निश्चित कोणती कार्यवाही केली, हे अपिलार्थीस कळविले नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २४.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे पुरविलेली कथित माहिती ही अपूर्ण स्वरुपाची असल्याचे सिध्द होत आहे. तहसील कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या पत्रांवर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही म्हणजे, तहसील कार्यालयाकडून जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-०८-२००८ व ११-०९-२००८ रोजी प्राप्त झालेल्या पत्रांच्या संदर्भात त्यांनी वेगवेगळ्या प्राधिकरणाशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या आणि त्यांच्याकडील अभिलेख्यावर या प्रकरणाशी संबंधित असलेल्या टिपणीच्या प्रती, ही होय. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांना तहसील कार्यालयाकडून पत्रे प्राप्त झाल्यानंतर ते अपिलार्थीचा माहितीसाठीचा प्रथम अर्ज त्यांच्याकडे प्राप्त होईपर्यंतच्या कालावधीमध्ये त्यांनी या विषयावर सर्व संबंधित प्राधिकरणाशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या व त्यांच्याकडील अभिलेख्यावर या विषयासंदर्भात ठेवण्यात आलेल्या टिपणीच्या प्रती अपिलार्थीस देणे, त्यांना या प्रकरणी भाग होते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी येथे

अशाप्रकारची कोणतीही कृती केल्याचे आयोगास आढळून येत नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी या परिच्छेदामध्ये वर स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली व अपिलार्थीस देय असलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः अपूर्ण माहिती दिल्याचे सिध्द होत असल्याने ते अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरत आहेत. सबब संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांचेवर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे व अपिलार्थीस देय असलेली संपूर्ण माहिती , हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांचेवर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद (वि. बा. बोरगे)

दिनांक १२.०१.२०१० राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. नारायण ग्यानबा बापमारे, मु.पो. मंगरुळ नं.१, ता. माजलगांव, जि. बीड

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, माजलगांव, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग क्र.-२, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३२८

निर्णय दिनांक १२.०१.२०१०

१ श्री. बोरुळ सुधाकर नानासाहेब, : अपिलार्थी

रा.गवळी गल्ली, जिंतूर, ता. जिंतूर, जि. परभणी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत),

जिल्हा परिषद, परभणी

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, परभणी

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४.०१.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून, आयोगाच्या असे निदर्शनास आणले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासाठी टाळाटाळ केल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०३.१०.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्री. नानासाहेब नारायण बोरुळ यांच्या संदर्भात काही

माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - त्यांच्या मूळ सेवेपुस्तीकेची द्वितीय प्रमाणीत प्रत, भविष्य निर्वाह निधीचे अंतिम रक्कम मिळाल्याबाबत केलेल्या आदेशाची प्रत, त्यांच्या लिक्वीड इन्शुरंसच्या रकमेचा प्रस्ताव केव्हा मान्य होईल, पेंन्शन व ग्रॅज्युयूटी याबाबत ए.जी. कडे पाठविलेल्या प्रस्तावाची प्रमाणीत प्रत, आर. डी. च्या पासबूकची प्रत, मूळ सेवापुस्तीकेची दुसरी प्रत, पेंन्शन ग्रॅज्युटेडची रक्कम ६४४ रु. त्यांना अद्याप मिळाले नाही, त्यांच्या वडीलांची सेवा मान्य झाली नसल्यामुळे, त्यांचे दक्षता रोध मान्य करुन पुढील वेतनवाढीची थकबाकी केव्हा मान्य होईल - या मुद्यांचा समावेश होतो. अपिलार्थीने ही माहिती नोंदणीकृत टापालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. परंतु दिनांक ०९.०१.२००९ रोजी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जिंतूर यांनी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, परभणी यांनी उद्देशून लिहिलेल्या एका पत्राची प्रत गट विकास अधिकाऱ्यांनी अपिलार्थीस पाठविली. यापूर्वी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १२.११.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु असल्याचे अपिलार्थीस कळविले होते. तथापि अपेक्षित माहिती विहित मुदतीत प्राप्त न झाल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६.११.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकाऱ्यांनी दिनांक ०३.०३.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीने वीस वर्षापूर्वीची माहिती मागितली असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासाठी वेळ लागणार असल्याचे अपिलार्थीस कळवावे, अशा सूचना जन माहिती अधिकारी यांना दिल्या. परंतु प्रत्यक्षात माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती तथा अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जूनी असून या प्रकरणाशी संबंधित कागदपत्रे त्यांनी बराच शोध घेऊन त्यांना उपलब्ध होऊ शकली नाहीत व आता त्यांनी या प्रकरणाशी संबंधित नस्ती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध होऊ शकत नसल्याचे आढळून आले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ३, ७ व ९ वगळता उर्वरित संपूर्ण माहिती ती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. सबब जन माहिती अधिकीर यांना हे मुद्दे वगळता अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील माहिती त्यांना ३० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. या प्रकरणी अपिलार्थीस संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना उपलब्ध करुन देण्यात येईल, अशाप्रकारची आश्वासने मिळाली होती. परंतु अपिलार्थीस प्रत्यक्षात कोणतीही माहिती प्राप्त होऊ शकली नाही. आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर केलेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या संबंधित संपूर्ण नस्ती त्यांच्या कार्यालयातून गहाळ झाल्याचे उघड झाले आहे. अपिलार्थीस माहिती देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक यांना देखिल माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतूद माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५ (५) मध्ये आहे. हे पाहता, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस उपलब्ध न होण्यासाठी, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील संबंधित कर्मचारी, ज्यांच्यावर हे अभिलेखे जतन करुन ठेवण्याची जबाबदारी होती, हे जबाबदार असल्याचे सिध्द होत आहे. सबब

जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयातील ज्या कर्मचाऱ्यांनी गहाळ केली असेल त्या कर्मचाऱ्यांवर फौजदारी स्वरुपाची कारवाई करावी व याची प्रत अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. जन अपिलीय अधिकारी यांनी संबंधितांवर हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत आदेश केल्याप्रमाणे कारवाई करावयाची आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन

खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३, ७ व ९ वगळता उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. माहिती उपलब्ध न झाल्यास ही माहिती जतन करुन ठेवण्याची जबाबदारी ज्या कर्मचाऱ्यांची होती त्या कर्मचाऱ्यांवर वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे कारवाई करावी.

औरंगाबाद (वि. बा. बोरगे)

दिनांक १२.०१.२०१० राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बोरुळ सुधाकर नानासाहेब, रा.गवळी गल्ली, जिंतूर, ता. जिंतूर, जि. परभणी

२ जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१२२

निर्णय दिनांक १२-०१-२०१०

१ श्री. वाल्मिक विठ्ठलराव शिरसाठ, : अपिलार्थी

" गुरुप्रसाद, " लासूर रोड, गंगापूर, तालुका गंगापूर,

जिल्हा औरंगाबाद

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी,

तालुका कृषि अधिकारी कार्यालय, गंगापूर,

तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा तालुका कृषि अधिकारी, गंगापूर, तालुका गंगापूर,

जिल्हा औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगा-

कडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २३-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित दिनांक ०१-०४-२००६ ते ३१-०३-२००८ या कालावधीतील व्यापक व्याप्ती असलेली माहिती एकूण पाच मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने या अर्जामध्ये ही माहिती ते जन माहिती अधिकारी यांच्याकडून स्वतः घेऊन जाणार असे नमूद केले होते.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३०-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ३००० इतक्या पृष्ठांची असल्यामुळे आवश्यक ते शुल्क रुपये ६००० इतके त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५-०८-२००८ व दिनांक ०१-०९-२००८ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि या सुनावणीस अपिलार्थीस गैरहजर राहिल्यामुळे अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन घेण्यामध्ये स्वारस्य नसावे असा निष्कर्ष काढून त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढले. अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे अपील निकाली काढल्याचे दिनांक २४-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे कळविले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थी हे त्यांनी मागणी केलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी वारंवार येत असतात. तथापि या माहितीपोटीचे शुल्क ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कधीही भरत नाहीत. नंतर त्यांना धाक दाखवून त्यांच्याकडून रुपये २५००० इतक्या रकमेची मागणी करतात, अन्यथा ते आयोगाकडे अपील करतील अशी त्यांना धमकी देतात. अपिलार्थीने मागितलेली माहिती आजही त्यांच्या कार्यालयात तयार असून अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा भरणा केल्यानंतर ते ती माहिती अपिलार्थीस त्वरीत देतील.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दोन वेळा सुनावणी ठेवली होती. तथापि अपिलार्थी हे या दोनही वेळेस उपस्थित न राहिल्याने त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढले आहे. यानंतर अपिलार्थीने परत त्यांच्या दिनांक २२-०९-२००८ रोजीच्या पत्रान्वये जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय त्यांना कळविण्यात यावा असा आग्रह केला होता. शेवटच्या सुनावणीचे पत्र त्यांना पाठविण्यात आले होते. अपिलार्थीस त्यांनी व्यक्तिशः विनंती करुनही आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांनी कधीही भरले नाही असे त्यांना आढळून आले आहे. अपिलार्थीने ६००० रुपये इतक्या रकमेचा भरणा केल्यास ते अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना देऊ शकतील.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळात त्यांच्या दिनांक २३-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे व्यापक व्याप्ती असलेली माहिती मागितली आहे. तथापि ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी लागणा-या शुल्काचा जन माहिती अधिकारी यांच्याकडे भरणा करण्याची त्यांची तयारी नव्हती. ज्याप्रमाणे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास माहिती देणे हे जन माहिती अधिकारी यांचे कर्तव्य आहे त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक असलेल्या माहिती-पोटीचे शुल्क कळविल्यानंतर अधिनियमातील कलम ७ (५) च्या तरतुदीनुसार त्या शुल्काचा

भरणा करण्याची तितकीच महत्त्वाची जबाबदारी अर्जदाराची देखिल आहे. अपिलार्थीस याचा या प्रकरणी पूर्णपणे विसर पडल्याचे आयोगास आढळून येत आहे. ही वस्तुस्थिती पाहता, अपिलार्थीस अद्यापही ही माहिती आवश्यक असल्यास त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी कळविल्याप्रमाणे शुल्काचा भरणा करुन जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घेण्याचा पर्याय अपिलार्थीस उपलब्ध आहे. या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद (वि. बा. बोरगे)

दिनांक १२-०१-२०१० राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. वाल्मिक विठ्ठलराव शिरसाठ, " गुरुप्रसाद, " लासूर रोड, गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१२३

निर्णय दिनांक १२-०१-२०१०

१ श्री. कुम-या नरसया मुदीराज, : अपिलार्थी

हनुमान मंदिराजवळ, स्टेशन रोड, गोकुलनगर, नांदेड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी

तथा कार्यकारी अभियंता,

उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विभाग क्रमांक १, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर दिलेल्या निर्णयाने त्यांचे समाधान झाले नसल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १५-११-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील निरुपयोगी साहित्याच्या निर्लेखन अहवालासंदर्भात

एकूण तीन मुद्दयाव्दारे दिनांक ०१-०४-२००७ ते ३०-१०-२००७ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २५० इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे कळविले. या शुल्काचा तपशील म्हणून जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तयार करणे, टंकलेखन करणे व पोस्टाचा लागणारा खर्च अशा प्रकारचा तपशील दिला आहे. यानंतर अपिलार्थीने दिनांक २८-१२-२००७ रोजी या शुल्काचा भरणा त्यांच्या कार्यालयात केला व जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त करुन घेतली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपील अर्जावर कोणताही दिनांक लिहिलेला नाही. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २७-०२-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस तीन दिवसाच्या आत डाकपोच पावतीव्दारे माहिती पाठविण्याचे सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २७-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे परत माहिती पुरविली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस प्रथमतः दिनांक २८-१२-२००७ रोजी व तदनंतर दिनांक २७-०२-२००८ रोजी आवश्यक ती संपूर्ण माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जामधील मागणी केलेली संपूर्ण माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १५-११-२००७ रोजीच्या मूळ अर्जास अधिनियमातील कलम ७ (१) मध्ये नमूद केल्या-प्रमाणे दिनांक २९-११-२००७ च्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद दिला आहे. अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांना कळविताना माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ (३) (क) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास याबाबत शुल्काचा तपशील देणे त्यांना क्रमप्राप्त आहे. या शुल्काच्या तपशीलामध्ये अर्जदारास देण्यात येणा-या प्रस्तावित माहितीच्या पृष्ठांची अंदाजे संख्या, ही माहिती पुरविण्यासाठीचा प्रतिपृष्ठ दर हा तपशील कळविणे मूळात अधिनियमामध्ये अपेक्षित आहे. परंतु या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २९-११-२००७ रोजीच्या पत्रामध्ये अपिलार्थीस अशा प्रकारचा कोणताही तपशील न कळविता अपिलार्थीस आवश्यक माहिती तयार करणे, ती संकलीत करणे व पोस्ट इत्यादी खर्च म्हणून रुपये २५० इतके ठोक शुल्क अपिलार्थीस कळविले आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कजम ७ (३) (क) प्रमाणे अपेक्षित असलेला तपशील जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस पुरविलेला नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक २९-११-२००७ चे पत्र अवैध आणि चुकीचे असल्याचे सिध्द होत आहे. परिणामी या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रुपये २५० इतके त्यांना अपिलार्थीस परत करावे लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रुपये २५० इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे.

या प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करताना त्यांचे जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने समाधान न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगा-कडे केल्याचे नमूद केले आहे. अपिलार्थीचे समाधान झाले नाही म्हणजे नक्की काय झाले, अपिलार्थीस कोणत्या मुद्दयावर अद्यापपावेतो माहिती देणे बाकी आहे किंवा प्राप्त माहिती चुकीची आहे याबाबत कोणताही पुरावा न देता केवळ अपिलार्थीचे समाधान झाले नाही या कारणास्तव त्यांनी आयोगास मोघम कारण दर्शवून, व्दितीय अपील सादर केले आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी देखील अपिलार्थी आयोगासमोर जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीमधील निश्चितपणे कोणत्या माहितीने त्यांचे समाधान कसे झाले नाही हे स्पष्ट करण्यासाठी ते उपस्थित नाहीत. त्यामुळे अपिलार्थीचे प्राप्त माहितीवर त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अर्जामध्ये नमूद केलेले त्यांचे आक्षेप आयोग फेटाळून लावत आहे.

अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रुपये २५० इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे.

औरंगाबाद (वि. बा. बोरगे)

दिनांक १२-०१-२०१० राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. कुम-या नरसया मुदीराज, हनुमान मंदिराजवळ, स्टेशन रोड, गोकुलनगर, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विभाग क्रमांक १, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१२४

निर्णय दिनांक १२-०१-२०१०

१ श्री. साहेबराव देवराव पोटभरे, : अपिलार्थी

जंम्बोदिप निवास, नवीन भाटवडगांव, मांजरथ रोड,

माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी

तथा उप आयुक्त महसूल, आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा उप आयुक्त महसूल, विभागीय आयुक्त कार्यालय,

औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : तहसीलदार (महसूल), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : अपर विभागीय आयुक्त, औरंगाबाद

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-१०-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी खोटी माहिती दिली असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे आणि आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक १६-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा उपायुक्त (महसूल) यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित, त्यांच्या बि-हाड थाटो आंदोलनाच्या संदर्भात त्यांनी शासनाशी व महसूल विभागाशी संबंधित विविध प्रकरणात केलेल्या अर्जावर केलेल्या कारवाई संदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - त्यांनी दिनांक २५-०४-२००५ रोजी विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना चौकशी अधिकारी नेमावा असे निवेदन दिले होते त्या निवेदनावर केलेली कारवाई, चौकशी अधिकारी का नेमले नाही त्याची कारणे, अपिलार्थीचे आंदोलन बेकायदेशीर होते का, त्यांच्या आंदोलनासाठी शासनाचा ५० हजार रुपये खर्च झाला आणि त्याला जबाबदार कोण, अपिलार्थीचे आंदोलन अनधिकृत आहे की अधिकृत आहे, मंत्रालय महसूल विभागाने दिनांक २९-०३-२००६ रोजी विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना पाठविलेल्या पत्रावर विभागीय आयुक्तांनी केलली कारवाई - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-०५-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस शासनाच्या दिनांक २९-०३-२००६ रोजीच्या पत्रावर त्यांनी केलेल्या कार्यवाहीची प्रत अपिलार्थीस पाठविली व अपिलार्थीच्या दिनांक २५-०४-२००५ रोजीच्या निवेदनाच्या संदर्भात अपिलार्थीस असे कळविले की, या मुद्दयाबाबत उप आयुक्त सामान्य प्रशासन यांच्याशी संपर्क साधावा. प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-०६-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २३-०७-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील अंशत: मान्य केले आणि अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांना देण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २८ जुलै २००८ रोजी अपिलार्थीस दिनांक २५-०४-२००५ रोजीच्या अर्जासंदर्भात त्यांनी केलेल्या

कार्यवाहीबाबत काही माहिती पाठविली. तथापि प्राप्त माहिती ही खोटी असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस प्रथमतः त्यांच्या दिनांक २०-०५-२००८ रोजीच्या पत्राने पुरविली असून उर्वरित माहिती अपिलार्थीस त्या सात दिवसाच्या आत देऊ शकतील.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीपैकी विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक २५-०४-२००५ रोजीच्या निवेदनावर केलेली कार्यवाही आणि महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या दिनांक २९-०३-२००६ रोजीच्या पत्रावर विभागीय आयुक्त कार्यालयाने केलेली कार्यवाही या दोन मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये उर्वरित माहितीव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबद्दलची कारणे व स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती मागविली असल्यामुळे व ती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी विसंगत असल्यामुळे ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन जन माहिती अधिकारी यांनी मंत्रालय, मुंबई येथून दिनांक २९-०३-२००६ रोजी प्राप्त झालेल्या पत्रावर त्यांनी केलेल्या कार्यवाहीची माहिती अपिलार्थीस दिलेली आहे. तसेच अपिलार्थीच्या दिनांक २५-०४-२००५ रोजीच्या निवेदनावर देखील विभागीय आयुक्त कार्यालयाने दिनांक २८ जुलै २००८ च्या पत्राव्दारे केलेल्या कार्यवाहीची माहिती अपिलार्थीस दिली आहे. या

मुद्दयावरील माहिती देतांना जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विभागीय आयुक्तांच्या दिनांक २०-१०-२००५ च्या जिल्हाधिकारी बीड यांना उद्देशून लिहिलेल्या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली असल्याचे आढळून येत आहे. अशा प्रकारे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील दोन मुद्दयावरील देय माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिली असल्याचे आयोगास या प्रकरणी आढळून आले आहे, जी माहिती अपिलार्थीस खोटी असल्याचे वाटत आहे. ही माहिती खोटी कशी आहे हे अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये सबळ पुराव्यासह सिध्द केलेले नाही. तसेच या संदर्भातील तोंडी युक्तिवाद करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थितही नाहीत, हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

<u>आदेश</u>

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद (वि. बा. बोरगे)

दिनांक १२-०१-२०१० राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. साहेबराव देवराव पोटभरे, जंम्बोदिप निवास, नवीन भाटवडगांव, मांजरथ रोड, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार (महसूल), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१२५

निर्णय दिनांक १२-०१-२०१०

१ श्री. शाह शेख रहीम पिता शाह शेख इमाम कादरी, : अपिलार्थी
रा. गल्ली नंबर १, पिरबु-हाननगर,
नांदेड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी
तथा उपजिल्हाधिकारी (अतियात विभाग),
उपजिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप विभागीय अधिकारी (महसूल), नांदेड

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (अतियात विभाग), नांदेड यांच्याकडे दिनांक २३-०६-२००८ रोजी माहिती मागविली असता ती विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. परंतु त्यांनी या प्रकरणी सुनावणी न घेता प्रकरण प्रलंबीत ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक २३-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहितीची मागणी केली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही सन १९४२ या सालाशी संबंधित होती.

" लॅन्ड रेकॉर्ड ऊसुल बाकी सिटी सर्वे १९१५-१९१७ ची सत्यप्रती मिळणेबाबत. तसेच सर्वे नंबर रजिस्टर मस्जीदे वजिराबाद नांदेडची सत्यप्रती मिळणेबाबत. १४१५ व १३३३ फसली दरयाफ्त इनामची सत्यप्रती मिळणेबाबत. १२९९ हिजरी, १२८७ फसली ची सत्यप्रती तसेच ऊसुल बाकी रजिस्टर कार्बन रजिस्टर नक्कला, १३३२ फसली १४२८ हिजरी, १४१५ फसली, के-पत्रक १९४२ च्या सत्यप्रती मिळणेबाबत. "

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०७-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती खूप जुनी असल्याचे आणि त्यांच्या कार्यालयात उपलब्ध अभिलेखे हे जुने व उर्दू भाषेत असल्यामुळे अपिलार्थीस सदर अभिलेखे तपासणी करुन माहिती घेण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने या प्रमाणे कार्यवाही न करता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक ०५-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे परत त्यांनी मागितलेली माहिती ही उर्दू भाषेतील असल्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयात उपस्थित राहून ही माहिती तपासून व तपासणीअंती त्यांना आवश्यक असलेली माहिती घेण्याचे सूचित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न देऊन प्रकरण प्रलंबीत ठेवल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या-कडे मूळ अर्जाव्दारे १९४२ सालाशी संबंधित काही माहिती मागितली आहे. त्यावेळचे सर्व अभिलेखे हे उर्दू भाषेत आहेत. त्यांच्या कार्यालयात उर्दू भाषेतील जाणकार नसल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहून हे अभिलेखे तपासणीची विनंती केली व तपासणी-अंती अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांना पुरविण्याचे आश्वासीत केले. परंतु अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित राहिले नाहीत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी अथवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही उर्दू भाषेतील आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्प्यावर नाकारले नाही. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कोणीही उर्दू जाणकार नसल्यामुळे अपिलार्थीस माहिती देणे शक्य होत नाही. अशा परिस्थितीत अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात पूर्वनियोजित वेळी उपस्थित राहून जन माहिती अधिकारी यांच्याकडे या प्रकरणाशी संबंधित असलेल्या उपलब्ध कागदपत्रांची तपासणी करावी व त्यावर त्यांना आवश्यक असलेल्या कागदपत्राच्या छायांकीत प्रती काढून घ्याव्यात, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती न पुरविण्यासाठी दिलेले कारण आयोगास योग्य

वाटते. अपिलार्थीस या माहितीची आवश्यकता असेल तर त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे कार्यवाही करावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद (वि. बा. बोरगे)

दिनांक १२-०१-२०१० राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शाह शेख रहीम पिता शाह शेख इमाम कादरी, रा. गल्ली नंबर १, पिरबु-हाननगर, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१२६

निर्णय दिनांक १२-०१-२०१०

१ श्री. मिलिंद वसंतराव विटेकर, : अपिलार्थी

" दत्तकृपा, " ब्राम्हण गल्ली, सोनपेठ, तालुका सोनपेठ,

जिल्हा परभणी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी

तथा अधीक्षक,

सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालय, परभणी

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी

सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालय, परभणी

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, परभणी

जन अपिलीय अधिकारी : सहायक धर्मादाय आयुक्त, परभणी

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १, २, ३ व ६ शी संबंधित सर्व व मुद्दा क्रमांक ४, ५ व ७ ची उर्वरित माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेश द्यावेत, अशी विनंती केली आहे आणि विहित कालावधी संपल्यानंतरही

माहिती देण्यास टाळाटाळ करणारे जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक २१-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित व त्रयस्थ पक्षाशी संबंधित दिनांक ०१ जानेवारी १९८५ ते १५ मे २००८ या कालावधीतील काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १७-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती दिली व अपिलार्थीच्या मूळ अर्जातील काही मुद्दयावरील माहितीसंदर्भात आवश्यक त्या शुल्काचा भरणा करण्याचे अपिलार्थीस सूचित केले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा न करता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १८-०७-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सशुल्क माहिती पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर अपिलार्थीस दिनांक २८-०७-२००८ रोजी त्यांच्याकडील उपलब्ध माहिती दिली. परंतु प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक १७-०६-२००८ व दिनांक २८-०७-२००८ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे. तथापि दिनांक १७-०६-२००८ रोजीच्या पत्रामध्ये त्यांनी सूचित केल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांना आवश्यक

असलेल्या माहितीच्या प्रतीपोटीच्या शुल्काचा भरणा त्यांच्याकडे न केल्यामुळे ते अपिलार्थीस ही माहिती पुरवू शकले नाहीत.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी मुद्दा क्रमांक ४, ५ व ७ शी संबंधित माहिती दिनांक २८-०७-२००८ रोजी पुरविली आहे. आता अपिलार्थीने या मुद्दयावरील उर्वरित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपेक्षिली आहे. परंतु उर्वरित माहिती म्हणजे नेमकी कोणत्या मुद्दयावरील माहिती हे अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये स्पष्ट केलेले नाही. त्यामुळे अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालय, परभणी यांच्याकडील कोणत्या मुद्दयावरील नेमकी कोणती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अप्राप्त आहे ते जन माहिती अधिकारी यांच्या निदर्शनास आणावे व त्यांच्याकडून या मुद्दयासंदर्भात माहिती विनामूल्य प्राप्त करुन घ्यावी. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ व्दारे अपिलार्थीने " ..... वरिष्ठ कार्यालयामध्ये दावा करण्यात आला होता या दावाची सर्व माहिती आणि कागदपत्रे " अशा स्वरुपाची माहिती मागितली आहे. ' सर्व माहिती ' म्हणजे नेमकी कोणत्या मुद्दयावरील माहिती हे अपिलार्थीने त्यांच्या अर्जामध्ये स्पष्ट केले नसल्यामुळे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली मुद्दा क्रमांक ६ शी संबंधित माहिती ही मोघम स्वरुपाची आहे. अशा प्रकारची मोघम स्वरुपाची माहिती अपिलार्थीस, जी अधिनियमातील तरतुदीशी विसंगत असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही.

अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १, २, ३ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले आहे की, अपिलार्थीने या मुद्दयांसंदर्भातील माहितीची सीडी मागितली आहे तथापि ही सीडी त्यांच्याकडे उपलब्ध नाही. या संदर्भात अपिलार्थीस असे स्पष्ट करण्यात येत आहे की, जर अपिलार्थीने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी

यांच्याकडे सीडीच्या स्वरुपात उपलब्ध नसेल तर ती सीडीच्या स्वरुपात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या या मुद्दयांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात आहे त्या स्वरुपात ती प्राप्त होऊ शकते. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे सीडीच्या स्वरुपात उपलब्ध असल्याचे त्यांनी आयोगास सांगितले तेव्हा त्यांना असे सूचित करण्यात येत आहे की, याच स्वरुपात त्यांनी ही माहिती अपिलार्थीस आता विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामधील मुद्दा क्रमांक २ व्दारे, संस्था नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे व इतर संदर्भात माहिती मागितली आहे. या मुद्दयावर संस्था नोंदणी अधिनियम १८६० व संस्था नोंदणी अधिनियम १९५० मध्ये ज्या कलमाव्दारे आवश्यक कागदपत्रे सादर करण्याची तरतूद करण्यात आली आहे त्या कायद्यातील कलमांची प्रत अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी. मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भात देखील संस्था नोंदणी अधिनियमामध्ये ज्या कलमाव्दारे अशा प्रकारची कारवाई विहित केली असेल त्या कलमांच्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस द्याव्यात.

अशा प्रकारे अपिलार्थीने मागणी केलेल्या व त्यांना देय असलेल्या माहितीचे वरीलप्रमाणे केलेले पृथ:करण पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी वर स्पष्ट केल्याप्रमाणे, अपिलार्थीस मुद्दा क्रमांक १, २, ३ शी संबंधित संपूर्ण व मुद्दा क्रमांक ४, ५ व ७ शी संबंधित उर्वरित देय माहिती हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व रजिस्टर्ड पोस्टाव्दारे उपलब्ध करुन द्यावी.

आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये अपिलार्थीने संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची कारवाई आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे. यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी हेतुपुर:स्सर टाळाटाळ केली असल्याचे नि:संशयपणे सिध्द होत नसल्याने व जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १७-०६-२००८ च्या पत्राने सूचित करुनही

अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क न भरल्यामुळे, त्यांची आयोगाकडे केलेली ही विनंती आयोग अमान्य करत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १, २ व ३ शी संबंधित संपूर्ण व मुद्दा क्रमांक ४, ५ व ७ शी संबंधित उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व रजिस्टर्ड पोस्टाव्दारे उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद (वि. बा. बोरगे)

दिनांक १२-०१-२०१० राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मिलिंद वसंतराव विटेकर, " दत्तकृपा, " ब्राम्हण गल्ली, सोनपेठ, तालुका सोनपेठ, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८५२

निर्णय दिनांक १२-०१-२०१०

१ श्रीमती मंदा जयाजी खरात, : अपिलार्थी

रा. मानधना मेडिकलसमोर, कल्पना हेअर सलूनच्या मागे,

कचेरी रोड, जुना जालना, जालना

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी

तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, जालना,

तालुका जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा उप आयुक्त (सा.प्र.),

विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०९-२००८ रोजी फेरसादर केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अचूक आणि पूर्ण माहिती प्राप्त न झाल्यामुळे व प्राप्त माहितीने त्यांचे समाधान न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आयोगास अशी विनंती केली आहे की, त्यांचे अपील मान्य करण्यात यावे व जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्तीची करवाई करण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २२-१२-२००६ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्रीमती भिमाबाई जयाजी खरात यांच्या निवृत्ती वेतनासंदर्भात काही माहिती एकूण १५ मुद्दयाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५-०१-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती दिली व जी माहिती उपलब्ध नाही ती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे कळविले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ११-०६-२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील अमान्य केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक ०५-०१-२००७ रोजी त्यांच्याकडील उपलब्ध माहिती विनामूल्य व व्यक्तिशः हस्तांतरीत केलेली आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती त्यांच्या कार्यालयाकडून गहाळ झाली असल्याने त्यांना ही माहिती अपिलार्थीस देता आली नाही व तसेच अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ८ व ९ शी संबंधित माहिती सदर माहिती जतन करावयाचा कालावधी व्यपगत झाला असल्याने त्यांनी या मुद्दयाची माहिती नष्ट केली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व्दारे त्रयस्थ पक्षाच्या सेवापटाची माहिती मागितली आहे. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीस विचारलेल्या प्रश्नांवरुन आयोगास असे अवगत झाले आहे की, मूळात श्रीमती भिमाबाई जयायी खरात यांचा सेवापट जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयारच केला गेला नव्हता. त्यामुळे तो कधीही उपलब्ध असणे संभवत नाही. जन माहिती अधिका-याने अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ८ व ९ च्या संदर्भात असे कळविले आहे की, त्यांच्या कार्यालयातील सन १९८१ चे आवक जावक रजिस्टर नष्ट करण्यात आलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी यासंदर्भात योग्य तो पुरावा अपिलार्थीस द्यावा असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १० व्दारे, भिमाबाई जयायी खरात यांच्या अंतीम पगारपत्रकाची प्रमाणित प्रत मागितली होती, यासंदर्भात ही माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्याचे अपिलार्थीस कळविले आहे. जन माहिती अधिकारी यांची ही कृती चुकीची आहे. येथे या मुद्दयाशी संबंधित माहिती जतन करुन ठेवण्याची जबाबदारी ज्या कर्मचा-यावर होती त्या कर्मचा-यावर जालना नगरपरिषदेने प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मुद्दा क्रमांक १४ व्दारे, कुटूंब निवृत्तीवेतन देय होण्यास अथवा अदा करण्यास विलंब झाल्यास देय वित्तलब्धी सव्याज मिळण्याबाबत शासन आदेशाची प्रमाणित प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे. या मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात शासन निर्णय उपलब्ध नसल्याचे अपिलार्थीस कळविले आहे. जन माहिती अधिकारी यांची ही कृती अशाच प्रकारची चुकीची आहे. शासन निर्णयाच्या प्रती सर्व नगरपरिषदांना नियमितपणे पाठविण्यात येत असतात. त्यामुळे जर ही शासन निर्णयाची प्रत जालना नगरपरिषदे-कडे उपलब्ध नसेल तर त्यांनी इतर शासकीय कार्यालयाशी संपर्क साधून ही प्रत त्यांच्याकडून

उपलब्ध करुन घ्यावी व नंतर ती अपिलार्थीस विनामूल्य द्यावी, असे त्यांना या मुद्दयावर सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आणि अपिलार्थीस द्यावयाची यांचे वरील परिच्छेदा-मध्ये केलेले पृथ:करण पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी आता अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील त्यांना अद्याप द्यावयाची राहीलेली वर निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे उर्वरित माहिती हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये व्यक्तिश: माहितीची मागणी केली असल्यामुळे अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात वरील कालावधीमध्ये पूर्वनियोजित वेळी स्वत: उपस्थित राहून ती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून हस्तगत करावी. या कालावधीनंतर ती त्यांना विनामूल्य देय असणार नाही, याची त्यांनी नोंद घ्यावी.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची विनंती आयोगाकडे केली आहे. तथापि या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही असद्हेतूने टाळले असल्याचे आयोगाच्या निदर्शनास न आल्यामुळे अपिलार्थीची ही विनंती आयोग अमान्य करत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती वर निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद (वि. बा. बोरगे)

दिनांक १२-०१-२०१० राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्रीमती मंदा जयाजी खरात, रा. मानधना मेडिकलसमोर, कल्पना हेअर सलूनच्या मागे, कचेरी रोड, जुना जालना, जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, जालना, तालुका जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३२४

निर्णय दिनांक १२.०१.२०१०

१ श्री. आसाराम ग्यानबा कांदे, : अपिलार्थी

मु. चोपनवाडी, पो. दिंद्रुड, ता. माजलगांव, जि. बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा

उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,

वडवणी, जि. बीड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम

विभाग, बीड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, वडवणी, जि. बीड

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३.०२.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपुरी, दिशाभूल करणारी आणि खोटी माहिती पुरविण्यात आली असल्याने, संबंधित उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, वडवणी आणि कार्यकारी अभियंता, सार्वजनिक

बांधकाम, बीड यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कार्यवाही करावी. या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, मौजे चिंचाळा ते दुकडेगांव फाटा, तालुका वडवणी, जिल्हा बीड येथील रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामासंदर्भात सन २००६ ते २००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - मौजे चिंचाळा ते दुकडेगांव या रस्त्याच्या मंजूर अंदाजपत्रकाच्या सत्यप्रती, सर्वेमॅपच्या सत्यप्रती, मोजमाप पुस्तीकेच्या सत्यप्रती आणि क्वॉलिटी कंट्रोलच्या रिपोर्टच्या सत्यप्रती - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली असून, या अर्जामध्ये त्यांनी ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले होते.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ११.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन, हे काम सार्वजनिक बांधकाम उपविभाग, वडवणी मार्फत केले गेले नसल्याचे अपिलार्थीस कळविले. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड यांच्याकडे दिनांक २४.१०.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जाचा निर्णय जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १२.१२.२००८ रोजी देऊन, या निर्णयामध्ये जन माहिती अधिकारी यांच्या भूमिकेशी सहमती दर्शवून त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने ज्या कामाची त्यांच्याकडे माहिती मागितली आहे, ते काम मूळात त्यांच्या उपविभागातर्फे केले गेलेले नाही. त्यामुळे अपिलार्थीस त्यांना माहिती देण्याचा प्रश्नच उद्‌भवला नाही व तसे त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ११.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अवगत केले आहे. तसेच हे काम जिल्हा परिषदेने केले असण्याची शक्यता वाटल्यावरुन, त्यांनी अपिलार्थीचा अर्ज जिल्हा परिषद, बीड यांच्याकडे दिनांक ०२.१२.२००८ रोजी अपिलार्थीस माहिती देण्याकरिता पाठविला आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे, त्यामुळे अपिलार्थीस ती देय होत आहे. तथापि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्या प्रत्यक्ष ताब्यात नसल्यामुळे त्यांनी अपिलार्थीच्या अर्जाची प्रत, सदरचा अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून ५ दिवसाच्या आत, ही माहिती ज्या प्राधिकरणाकडे उपलब्ध होऊ शकते, त्या प्राधिकरणाकडे पाठवून या पत्राची प्रत अपिलार्थीस देणे त्यांना अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीप्रमाणे क्रमप्राप्त होते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अशाप्रकारची कोणतीही कृती न केल्यामुळे अपिलार्थी हे त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिले आहेत. त्यामुळे आता जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, वडवणी यांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जिल्हा परिषदेच्या संबंधित अधिकाऱ्यांकडून प्राप्त करुन घेऊन, ती अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की,

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करावी.

कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, बीड यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, वडवणी यांनी या प्रकरणाशी संबंधित मागणी केलेली सर्व कागदपत्रे त्यांनी उपविभागीय अभियंता यांना याच कालावधीमध्ये विनामूल्य हस्तांतरित होतील, असे पहावे व उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, वडवणी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात संपूर्ण सहकार्य करावे. याबाबत जर अपिलार्थीची काही तक्रार आयोगास प्राप्त झाली तर आयोगास कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, बीड व वरील संबंधित अधिकाऱ्यांवर अधिनियमातील तरतुदीनुसार कारवाई करणे भाग पडेल, याची त्यांनी नोंद घ्यावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्याचे संबंधित जन माहिती अधिकारी यांनी असद्हेतुने टाळल्याचे अथवा अपिलार्थीपासून अपेक्षित माहिती दुष्ट हेतुने दडविल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर कारवाई करण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करावी.

३.

औरंगाबाद (वि. बा. बोरगे)

दिनांक १२.०१.२०१० राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. आसाराम ग्यानबा कांदे, मु. चोपनवाडी, पो. दिंद्रुड, ता. माजलगांव, जि. बीड

२ जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, वडवणी, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/ ३२७
निर्णय दिनांक १२-०१-२०१०

१ श्री. गवळी गोरखनाथ विश्वनाथ, : अपिलार्थी
रा. योगेश्वरी नगरी, रिंगरोड, ब.न.४६, ज्ञानसिध्द,
अंबाजोगाई, जि. बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र,
बनसारोळा, ता. केज, जि. बीड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, बीड

त्रयस्थ पक्ष : श्रीमती हेमटे सी. व्ही

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०.०१.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी, त्यांनी मागणी केलेली माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आणि जन अपिलीय अधिकारी, अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष हे अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक १५.०२.२००९ रोजीचे एक पत्र सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक १५.०२.२००९ रोजी आवश्यक ती माहिती प्राप्त झाली असून, प्राप्त माहितीबद्दल त्यांची काहीही तक्रार नाही. जन माहिती अधिकारी यांनी सादर केलेल्या या पत्रातील मजकुराचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. हे पाहता, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाल्याचे अनुमान काढण्यात येऊन अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

<u>आदेश</u>

१. अपील क्रमांक ३२७/२००९, दिनांक ३०.०१.२००९ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद (वि. बा. बोरगे)

दिनांक १२.०१.२०१० राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गवळी गोरखनाथ विश्वनाथ, रा. योगेश्वरी नगरी, रिंगरोड, ब.न.४६, ज्ञानसिध्द, अंबाजोगाई, जि. बीड

२ जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, बनसारोळा, ता. केज, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३२९

निर्णय दिनांक १२.०१.२०१०

१ श्री. पांडुरंग मानाजी शिंदे, : अपिलार्थी
मु.पो. धसाडी, ता.जि. परभणी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी,
सज्जा, तलाठी कार्यालय, धसाडी,
ता. जि. परभणी

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय, परभणी

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : तलाठी, सज्जा धसाडी, ता. जि. परभणी

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९.०१.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी खोटी माहिती दिली व जन अपिलीय अधिकारी यांनी श्री. डी.आर. भोसले तलाठी यांची बाजू घेऊन निकाल दिला असल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे .

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १३.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, प्रयागबाई भ्र. पुंडलीकराव, राहणार निळा, तालुका पुर्णा यांच्या

नावावरची सर्वे नबंर २८८ ची जमीन जनार्धन मुंजाजी शिंदे, राहणार धसाडी यांच्या नावावर कशाच्या आधारे झाली त्या कागदपत्राच्या प्रती, अशी माहिती, रजिस्टर्ड पोस्टाने मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १८.१०. २००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहिती खोटी असल्याचे वाटल्यावरुन त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०३.११.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १०.१२.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळून लावले. त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत माहिती बनावट आहे की नंतर तयार करुन दिली, हा मुद्दा माहिती अधिकार अधिनियमाच्या कक्षाबाहेरचा असल्याने आणि या मुद्यांची तड लावण्याकरिता अपिलार्थीस सक्षम न्यायालय उपलब्ध असल्याच्या कारणावरुन त्यांनी, हा निर्णय दिल्याचे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी, तत्कालीन जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १८.०१.२००९ रोजी संपूर्ण माहिती पुरविल्याचे आयोगास अवगत केले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती ही खोटी असल्याचे वाटत आहे. तथापि प्राप्त माहिती ही खोटी कशी आहे, हे त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये सबळ पुराव्यासह सिध्द केलेले नाही, किंवा त्यांचे या संदर्भातील म्हणणे मांडण्यासाठी ते आयोगासमोर उपस्थित नाहीत.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीमध्ये - फेरफार घेण्याबाबतचा संबंधित अर्ज, सम्मती पत्र, नमुना नऊच्या नोटिसीची तामीली प्रत, ग्रामपंचायतीच्या नोटीस बोर्डावर डकविलेले जाहीर प्रगटन व त्याचा पंचनामा, गट क्रमांक २८८ मध्ये नमुना नऊची डकवलेली नोटिसीची प्रत व त्याचा पंचनामा व नमुना १२ ची तामीली प्रत - अशी संपूर्ण माहिती अपिलार्थीस पुरविल्याचे आढळून येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीस जर जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती बनावट किंवा खोटी आहे असे जर वाटत असेल तर, त्यांना या प्रकरणी न्याय प्राप्त करुन घेण्यासाठी महसूल अथवा तालुका, जिल्हा न्यायालय यांच्याकडे जाण्याचा पर्याय उपलब्ध आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्याच स्वरुपात त्यांनी ती अर्जदारास देणे अभिप्रेत आहे. त्याप्रमाणे या प्रकरणी जन माहिती अधिकाऱ्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध होती, त्याच स्वरुपात ती अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत व विनामूल्य पुरविली आहे. ही माहिती खोटी असल्याबाबत अपिलार्थीने आयोगाकडे कोणताही सबळ पुरावा सादर केलेला नाही, हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद (वि. बा. बोरगे)

दिनांक १२.०१.२०१० राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. पांडुरंग मानाजी शिंदे, मु.पो. धसाडी, ता.जि. परभणी

२ जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सज्जा धसाडी, ता. जि. परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३३४
निर्णय दिनांक: १३-०१-२०१०

१. श्री. राम केशवराव रामदासी, :अपिलार्थी
रा.गंगाखेड, जि.परभणी.

विरुध्द

१. जन माहिती अधिकारी तथा, :प्रतिवादी
जिल्हा शल्य चिकित्सक,
जिल्हा रुग्णालय,परभणी
२. जन अपिलीय अधिकारी तथा,
जिल्हा शल्य चिकित्सक,
जिल्हा रुग्णालय,परभणी

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : प्रशासकीय अधिकारी,
जिल्हा शल्य चिकित्सक,
जिल्हा रुग्णालय,परभणी.

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.०१.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नसल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत, जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांच्या दि. ३१.१२.२००९ रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या दि. १४.०१.२००९ रोजी आयोगाकडे पाठविलेल्यास अपील अर्जाच्यासंदर्भात संपूर्ण माहिती त्यांना जिल्हा शल्य चिकित्सक,परभणी यांच्याकडून प्राप्त झाली असल्याचे नमूद केले आहे व संपूर्ण माहिती प्राप्त झाली असल्यामुळे ते आयोगाकडे केलेले विचाराधीन अपील मागे घेत असल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले आहे.

खुद्द अपिलार्थीने त्यांच्या विचाराधीन अपील आता मागे घेतले असल्यामुळे सदर अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१. अपील क्र. ३३४/०९, दि. १६.०१.२००९ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद (वि. बा. बोरगे)
दिनांक : १३-०१-२०१० राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राम केशवराव रामदासी,रा.देवळे गल्ली,गंगाखेड, जि.परभणी-४३१ ५१४.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक,जिल्हा रुग्णालय,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक,जिल्हा रुग्णालय,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३३५
निर्णय दिनांक: १३-०१-२०१०

१. श्री. अशोक रा.दरेवार, :अपिलार्थी
रा.बरबडा, ता.नायगाव,जि.नांदेड

विरुध्द

१. जन माहिती अधिकारी तथा :प्रतिवादी
जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी,
जिल्हा परिषद, नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा पशुसंवधन अधिकारी,
जिल्हा परिषद, नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : पशुधन विकास अधिकारी (तां.स.),
जिल्हा परिषद, नांदेड.
त्रयस्थ पक्ष : श्री. जी.एस.कांबळे

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.०१.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्यास विलंब केल्याने व दिलेली माहिती चुकीची, अपूर्ण व दिशाभूल करणारी असल्यामुळे त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात यावी व अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती विनामूल्य देण्याचे आदेशित करावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की,या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दि. ०६.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. जी.एस.कांबळे यांच्यासंदर्भात एकूण ३ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये- त्रयस्थ पक्ष श्री. जी.एस.कांबळे यांना पशुसंवर्धन विभागात 'आस्थापना-१' हा कार्यभार ज्या परिपत्रकाआधारे देण्यात आला,त्या परिपत्रकाची प्रत, श्री. कांबळे यांच्या जॉब चार्टची साक्षांकित प्रत व जॉब चार्टप्रमाणे पशुधन पर्यवेक्षकास आस्थापना-१ या पदाचा कार्यभार देण्यात येतो काय - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ०१.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ४०/- इतके त्यांना भरण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने दि. २२.१०.२००८ रोजी चलनाद्वारे या शुल्काचा भरणा केल्यानंतर अपिलार्थीस दि. २४.१०.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांनी १६ पृष्ठांची माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०४.११.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न घेता यासंदर्भात एक बैठक घेतली व या बैठकीचे इतिवृत्त दि. २७.११.२००८ रोजी तयार करुन ते स्वत:कडे विनाकार्यवाही तसेच ठेवून घेतले. या इतिवृत्ताची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिली नाही. परिणामी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय पारित न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. सध्याचे व तत्कालीन जन माहिती अधिकारी, तत्कालीन अपिलीय अधिकारी त्रयस्थ पक्षासह उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांनी त्यांचा लेखी युक्तिवाद आयोगास फॅक्सद्वारे पाठविला असून या पत्रामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, त्यांनी दि. ०४.०९.२००८ रोजी माहिती मागितली असता त्यांना दि. १५.१०.२००८ रोजी माहिती प्राप्त झाली. माहिती अधिकारी हे अपिलार्थीवर दबाव आणत असून त्यामुळे त्यांच्या मूलभूत अधिकारास बाधा येत आहे व तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. २७.११.२००८ रोजीच्या सुनावणीचा कोणताही निर्णय न दिल्यामुळे त्यांनी हे निवेदन आयोगाकडे सादर केले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दि. २४.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे आवश्यक ती माहिती सशुल्क पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थी यांच्या दि. ०६.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील अखेरच्या मुद्याद्वारे, "जॉब चार्टप्रमाणे पशुधन पर्यवेक्षक यांना आस्थापना-१ या पदाचा कार्यभार देता येतो काय?" अशी जन माहिती अधिकारी यांचे स्पष्टीकरण अपेक्षित करणाऱ्या स्वरुपामध्ये माहिती मागविली आहे. अशाप्रकारची माहिती ही अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची असल्यामुळे ती अधिनियमातील तरतुदींशी विसंगत आहे. परिणामी ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीस देय असलेल्या दोन मुद्यांच्या माहितीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २४.१०.२००८ रोजी पुरविलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, त्यामध्ये त्यांनी अपिलार्थीस श्री.जी.एस.कांबळे यांच्या जॉब चार्टच्या साक्षांकित प्रती दिल्याचे आढळून येत आहे. तथापि त्यांना आस्थापना-१ हा कार्यभार ज्या आदेशान्वये देण्यात आला, त्या आदेशाची प्रत अथवा अशाप्रकारच्या शासकीय नियमांची अथवा शासकीय परिपत्रकाची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिली नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी श्री. जी.एस.कांबळे यांना आस्थापना-१ या पदाचा कार्यभार देण्याचे आदेशाची प्रत जन माहिती अधिकारी यांनी

आयोगास दाखविली. यावरुन असे आढळून येत आहे की, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी त्यांच्या कार्यालयाचा आदेश क्र. १५४१ दि. ३१.१०.२००३ अन्वये श्री. कांबळे यांना आस्थापना-१ चा कार्यभार दिला आहे. तथापि जिल्हा पशुसंवर्धन अधिकाऱ्याच्या दि. ३१.१०.२००३ च्या आदेशाची प्रत जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो अपिलार्थीस दिली नसल्याचे आयोगास आढळून आले आहे. ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. 'अ' शी संबंधित ही माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी असे आढळून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून संपूर्ण माहितीचे शुल्क स्वीकारुनही अपिलार्थीच्या मूळ अर्जातील दोन देय मुद्यांपैकी एकच मुद्यावर माहिती दिली असल्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती आता विनामूल्य देय होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु.४०/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करावे.

अशाप्रकारे या प्रकरणी अपिलार्थीकडून त्यांना आवश्यक असलेल्या माहितीचे शुल्क स्वीकारुनही संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील दोन मुद्यांपैकी एका मुद्यावर माहिती देऊन प्रथम अर्धवट माहिती दिल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीस अपूर्ण माहिती देण्याच्या जन माहिती अधिकारी यांच्या कृतीद्वारे त्यांनी स्वत:ला अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. ए.एन.दुबे,पशुधन विकास अधिकारी) यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा - 'अ'च्या संदर्भातील माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून स्वीकारलेले माहितीपोटीचे शुल्क रु.४०/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करावे.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. ए.एन.दुबे,पशुधन विकास अधिकारी) यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक : १३-०१-२०१०

(वि. बा. बोरगे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अशोक रा.दरेवार, पशुधन विकास अधिकारी, गट-अ, पशुवैद्यकिय दवाखाना, श्रेणी-१,बरबडा,ता.नायगाव,जि.नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा पशुधन विकास अधिकारी (तां.स.), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या

निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३३६
निर्णय दिनांक: १३-०१-२०१०

१. श्री. सय्यद नुर सय्यद गफुर, :अपिलार्थी
रा.सिरसाळा, ता.परळी वै.,जि.बीड

विरुध्द

१. जन माहिती अधिकारी तथा :प्रतिवादी
ग्राम विकास अधिकारी,
ग्रामपंचायत,सिरसाळा,
ता.परळी वै.,जि.बीड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, परळी वै.,
जि.बीड

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.०१.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अपिलार्थीने त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. २९.१२.२००८ रोजीच्या निर्णयाविरुध्द केले असल्याचे नमूद करुन या अर्जाद्वारे त्यांनी आपल्या अर्जातील मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. या अर्जामध्ये त्यांनी आयोगास असेही अवगत केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अद्यापही माहिती न पुरविल्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देईपर्यंत जन माहिती अधिकारी यांना प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे दंड करावयास हवा होता. परंतु त्यांना फक्त ताकीद देऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की,या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०६.११.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत,सिरसाळा यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयास प्राप्त वित्त आयोग योजना, यशवंत ग्राम समृध्दी योजना, संपूर्ण ग्रामीण समृध्दी योजना,जवाहर रोजगार योजना,दलीत वस्ती सुधार योजना या योजनांशी संबंधित नमुना नं. ७ व १० जमा खर्च व योजनांची अंदाजपत्रके व अंतिम मूल्यांकन, अशी दि. २१.०२.२००५ ते ३१.१०.२००८ या कालावधीशी संबंधित माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ११.१२.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २९.१२.२००८ रोजीच्या त्यांच्या निर्णयाद्वारे अपिलार्थीस आठ दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि या आदेशाद्वारे जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकाऱ्यास शास्ती न लावल्याबद्दल आणि जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन द्वितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणी अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीने त्यांच्या दि. ०६.११.२००८ रोजीच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेली संपूर्ण माहिती ही, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदींशी सुसंगत असल्याने अपिलार्थीस, जन माहिती

अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७(१) प्रमाणे विहित मुदतीत प्रतिसाद देणे त्यांना भाग होते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अर्जाची कोणतीही दखल घेतली नसल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येत आहे. एवढेच नव्हे तर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २९.१२.२००८ रोजी अपिलार्थीस आठ दिवसांच्या आत माहिती देण्याचे आदेशित करुनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज करेपर्यंत कोणतीही माहिती दिली नव्हती, असे आढळून आले आहे. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जाची, जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाची, या प्रकरणी अपिलार्थीस माहिती न देऊन जन माहिती अधिकारी यांनी उपेक्षा केली आहे. अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस माहिती न देण्याच्या त्यांच्या कृतीद्वारे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. अपिलार्थीस माहिती न देण्याच्या त्यांच्या या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना उपरोक्त प्रकरणी संबंधित ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत सिरसाळा तथा जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत,सिरसाळा, ता.परळी (वै.),जि.बीड(दि. ०६.११.२००८ रोजी आणि तदनंतर तीस दिवसांपर्यंत कार्यरत असलेले) यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक : १३-०१-२०१०

(वि. बा. बोरगे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद नुर सय्यद गफुर, मु.पो.सिरसाळा, जिल्हा परिषद शाळेशेजारी ता.परळी (वै.),जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत,सिरसाळा, ता.परळी (वै.),जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, परळी (वै.),जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर /३३७
निर्णय दिनांक: १३-०१-२०१०

१. श्री.अशोक भगवान शिंदे, : अपिलार्थी
रा.टाकळी (दे.) ता.परळी वै.,
जि.बीड.

विरुध्द

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तहसीलदार, परळी वैजनाथ,
जि.बीड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, परळी वैजनाथ,
जि.बीड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार, परळी (वै),
जि.बीड
त्रयस्थ पक्ष : श्री. श्रीराम रामकृष्ण शिंदे

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.०१.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो माहिती न मिळाल्यामुळे, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याच्यादृष्टीने कोणतीही कार्यवाही न केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १३.१०.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौजे देशमुख टाकळी येथील स्वस्त धान्य दुकानदार श्री. श्रीराम रामकृष्ण शिंदे यांच्याकडे जानेवारी २००१ ते जून २००६ या कालावधीतील दर महिन्याचे धान्य व रॉकेलच्या वाटप रजिस्टरच्या व स्टॉक रजिस्टरच्या झेरॉक्स प्रतींच्या संदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये- सदरील स्वस्त धान्य दुकानदाराने तहसील कार्यालयाकडून दरमहा धान्य व रॉकेलचा साठा किती उचलला व या दुकानदाराने जानेवारी, २००१ ते जून, २००६ या कालावधीमध्ये धान्य व रॉकेल साठा कशाप्रकारे वाटप केला, यासाठी दुकानदाराच्या दरमहा वाटप रजिस्टरच्या साक्षांकित प्रती आणि याच कालावधीमधील दुकानदारांच्या धान्य व रॉकेल साठयाच्या स्टॉक रजिस्टरच्या साक्षांकित प्रती - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती व तसेच अपिलार्थी हे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या अर्जासोबत जोडलेले होते.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. १४.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती देण्यासाठी त्यांचे सहायक श्रीमती परवीन पठाण व श्री. सावजी/ लाड यांच्याकडे अपिलार्थीच्या अर्जाची प्रत पाठविली व अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे दि. २४.१०.२००८ पर्यंत देण्याचे सूचित केले. यानंतर त्यांनी त्यांच्या या सहायकांना दि. ०३.११.२००८ रोजी स्मरणपत्र दिले व दि. १२.११.२००८ रोजी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधित सहायकांनी त्यांना उपलब्ध करुन न दिल्यामुळे संबंधित सहायकांना जबाबदार धरुन अपिलार्थीचा मूळ अर्ज निकाली काढला. या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २६.११.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३०.१२.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस एक महिन्याच्या आत माहिती उपलब्ध करण्याच्या सूचना जन माहिती

अधिकारी यांना दिल्या आणि प्रकरण निकाली काढले. तथापि यानंतरही अपिलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती व सहायक माहिती अधिकारी आणि अपिलीय अधिकारी त्रयस्थ पक्षासह आयोगासमोर उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी दुकानदाराकडील माहिती छतावरील पाण्याने भिजली असल्यामुळे ती माहिती अपिलार्थीस पुरविण्यासाठी संबंधित दुकानदाराने असमर्थता व्यक्त केली. तथापि त्यांच्याकडील उपलब्ध असलेली माहिती ते आता पंधरा दिवसांच्या आत अपिलार्थीस विनामूल्य उपलब्ध करुन देतील. जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे, ही माहिती अपिलार्थीस देणे जन माहिती अधिकारी यांना क्रमप्राप्त होते. तथापि उपलब्ध कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याकरिता त्यांच्या ज्या दोन सहायक कर्मचाऱ्यांना त्यांच्याकडे माहिती उपलब्ध करुन देण्याचे सूचित केले होते. त्या कर्मचाऱ्यांनी अपिलार्थीस द्यावयाची माहिती विहित मुदतीत तयार करुन ती जन माहिती अधिकारी यांना वेळेत सादर न केल्यामुळे अपिलार्थी हे त्यांना अपेक्षित माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होण्यापासून वंचित राहिलेले आहेत. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील एकूण ३ मुद्यांच्या पैकी मुद्दा क्र. १ च्या संदर्भात माहिती ही तहसीलदार, परळी (वै) यांच्या कार्यालयातच उपलब्ध असावयास हवी. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्या

सहायक श्रीमती परवीन पठाण यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांच्याकडे पुरेसे अनुदान नव्हते, त्यामुळे त्यांनी अपिलार्थीस माहिती दाखविली. तथापि सहायक जन माहिती अधिकारी यांचा अनुदानाची अनुपलब्धता हा मुद्दा आयोग फेटाळून लावत आहे.

अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ व ३ च्या संदर्भात त्रयस्थ पक्षाने आयोगास असे अवगत केले की, त्यांना सदरील अभिलेखे ग्रामपंचायतीच्या कार्यालयात ठेवले होते आणि या कार्यालयाच्या छतावर पत्रे नसल्यामुळे हे अभिलेखे पूर्णपणे भिजलेल्या अवस्थेत आहेत. भिजलेल्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती काढता येतील काय, असे विचारले असता, त्रयस्थ पक्षाने ही माहिती उघड करण्यासाठी असमर्थता व्यक्त केली, त्यामुळे आता अपिलार्थीस मुद्दा क्र. २ व ३ च्या संदर्भात माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून उपलब्ध होणार नाही, असे दिसून येत आहे.

या प्रकरणी त्रयस्थ पक्षाचे वर्तन निश्चितपणे आक्षेपार्ह असल्याचे आयोगास आढळून येत आहे. त्यामुळे तहसीलदार परळी (वै.) यांना संबंधित स्वस्त धान्य दुकानदार श्री.श्रीराम रामकृष्ण शिंदे यांचेवर जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५ च्या तरतुदीअंतर्गत कारवाई करावी, अशी शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. १ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांचे संबंधित सहायक अधिकारी/कर्मचारी, ज्यांना अधिनियमातील कलम ५(५) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी समजावे, अशी तरतुद आहे. त्यांनी अपिलार्थीस, त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने वारंवार सूचित करुनही कोणतीही माहिती उपलब्ध न करुन देण्याच्या त्यांच्या कृतीद्वारे स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे

यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची जिल्हाधिकारी, बीड यांना शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ च्या संदर्भातील संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

३. जिल्हाधिकारी, बीड यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांचे या प्रकरणाशी संबंधित सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांकः १३-०१-२०१०

(वि. बा. बोरगे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.अशोक भगवान शिंदे, मु.टाकळी (दे), पो.पांगरी, ता.परळी वैजनाथ, जि.बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय, परळी (वैजनाथ), जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, परळी (वैजनाथ), जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी,बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५८९
निर्णय दिनांक १३/०१/२०१०

१ श्री. बापुराव मारोतीराव रत्नपारखी, : अपिलार्थी
रा.नांदेड

विरुध्द

१ प्रशासक, : प्रतिवादी
जय शिवराय नागरी सहकारी बँक., नांदेड
२ जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, नांदेड

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३.०४.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दिनांक १७.११.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे प्रशासक, जयशिवराय नागरी सहकारी बँक नांदेड यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर अर्जास संबंधित बँकेच्या प्रशासकांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १२.०१.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांच्याकडे प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी या अपील अर्जावर दि. ०२.०२.२००९ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीचे अपील मान्य करुन, अपिलार्थीस सात दिवसाच्या आत विनामूल्य माहिती उपलब्ध करुन देण्याचे माहिती अधिकारी, जयशिवराय नागरी सहकारी बँक नांदेड यांना

आदेशित केले. पंरतु यानंतरही माहिती न मिळाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, संबंधित बँकेचे प्रशासक व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीअंतर्गत त्यांच्या मूळ अर्जाव्दारे प्रशासक, जयशिवराय नागरी सहकारी बँक यांच्याकडे माहिती मागितली असल्याचे दिसून येते. येथे मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी दिलेला निर्णय विचारात घेणे आवश्यक आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने "नियंत्रण" व "वित्तिय सहाय्य" या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे.

अशाप्रकारे मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित बँकेस लागू होत नसल्याने, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांचे दि०२.०२.२००९ रोजीचे आदेश अधिक्रमित करुन, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१) अपील क्र. ५८९ /०९ फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक : १३-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त,**
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बापुराव मारोतीराव रत्नपारखी, 'श्रीरामकृपा' ११७, हनुमान मंदिराजवळ, विवेकनगर, नांदेड ४३१६०२.

२. प्रशासक, जयशिवराय नागरी सहकारी बँक, विद्युतनगर, नांदेड, जि.नांदेड.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५९०
निर्णय दिनांक १३/०१/२०१०

१ श्री. सारंगधर भानुदासराव हारकल, रा. पिंप्रीराजा, ता.जि. औरंगाबाद	:	अपिलार्थी

विरुध्द

१ सचिव, श्री. सरस्वती भुवन प्रशाला सेवकांची सहकारी पतसंस्था मर्या., पिंप्रीराजा, ता.जि. औरंगाबाद	:	प्रतिवादी
१ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद	:	

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८.०७.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दिनांक १६.०३.२००९ रोजीच्या अर्जाद्वारे सचिव, श्री. स.भु.प्रशाला सेवकांची सहकारी पतसंस्था मर्या., पिंप्रीराजा यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर पतसंस्थेने अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दिनांक २४.०४.२००९ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि.१९.०५.२००९ रोजी पारित केले. याव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील मान्य केले व मुद्देनिहाय राहिलेली माहिती १० दिवसात उपलब्ध करुन देण्याचे सचिव, श्री. स.भु.प्रशाला सेवकांची सहकारी पतसंस्था मर्या., यांना आदेशित केले. यानंतरही

अपेक्षित माहिती उपलब्ध न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद हे उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच संबंधित उपस्थितांच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने "नियंत्रण" व "वित्तिय सहाय्य" या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. हेच विवेचन सहकारी पतसंस्थांना देखील लावल्यास असे दिसून येते की, सहकारी पतसंस्थांना देखील शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्राप्त होत नाही व या पतसंस्थेच्या दैनंदिन कारभारावर शासनाचे कोणतेही प्रत्यक्ष नियंत्रण नसल्याने माहिती अधिकार अधिनियम-२००५ आता मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर पतसंस्थेस लागू होणार नाही. तथापि अपिलार्थीस ते या पतसंस्थेचे सदस्य असल्यास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ३२ नुसार संबंधित पतसंस्थेकडे आवश्यक त्या दस्तऐवजाच्या प्रतींची मागणी करता येईल.

या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे

आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१) अपील क्र. ५९० /०९ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक : १३-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त,**
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सारंगधर भानुदासराव हारकल, श्री. सरस्वती भुवन प्रशाला, पिंप्रीराजा, ता.जि. औरंगाबाद.

२. सचिव, श्री. सरस्वती भुवन प्रशाला सेवकांची सहकारी पतसंस्था मर्या., पिंप्रीराजा, ता.जि. औरंगाबाद

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१६७

निर्णय दिनांक १३/०१/२०१०

१	श्री. चेतन रमण दाभाडे, रा.धुळे	:	अपिलार्थी

विरुध्द

१	गोविंदा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, धुळे	:	प्रतिवादी
२	जन अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे तालुका धुळे	:	

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक १२.११.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दिनांक २६.०७.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे गोविंदा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, धुळे या पतसंस्थेकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर पतसंस्थेने अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे तालुका धुळे यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०९.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे तालुका धुळे यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि.२७.०९.२००८ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी संबंधित संस्थेस अपिलार्थीस तात्काळ विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले. परंतु जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही माहिती न मिळाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे तालुका धुळे हे उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच संबंधित उपस्थितांच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने "नियंत्रण" व "वित्तिय सहाय्य" या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. हेच विवेचन सहकारी पतसंस्थांना देखील लावल्यास असे दिसून येते की, सहकारी पतसंस्थांना देखील शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्राप्त होत नाही व या पतसंस्थेच्या दैनंदिन कारभारावर शासनाचे कोणतेही प्रत्यक्ष नियंत्रण नसल्याने माहिती अधिकार अधिनियम-२००५ आता मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर पतसंस्थेस लागू होणार नाही. तथापि अपिलार्थीस ते या पतसंस्थेचे सदस्य असल्यास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ३२ नुसार संबंधित पतसंस्थेकडे आवश्यक त्या दस्तऐवजाच्या प्रतींची मागणी करता येईल.

या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे

आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१) अपील क्र. २१६७ /०८ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक : १३-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त,**
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. चेतन रमण दाभाडे, २८ , 'ऊँ निवास', सम्राट नगर, जमनागिरी रोड, धुळे, ता.जि.धुळे.

२. व्यवस्थापक / चेअरमन, गोविंदा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, जे.बी.रोड, दुल्हन शॉपिंग सेंटर तळ मजला, टॉवर बगीचा समोर, धुळे ४२४ ००१.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे तालुका धुळे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३३०

निर्णय दिनांक १३.०१.२०१०

१ श्री. साळवे विठ्ठल किशनराव, : अपिलार्थी

गौतमनगर, पाथरी, ता. पाथरी, जि. परभणी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम

विभाग, परभणी

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम

विभाग, परभणी

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१.०१.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या दिनांक १६.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जाप्रमाणे त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही व माहिती देण्यासाठी त्यांनी टाळाटाळ केली आणि त्यांच्या दिनांक १७.११.२००८ रोजीच्या प्रथम अपील

अर्जाची जन अपिलीय अधिकारी यांनी दखल न घेतल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील पाथरी, सेलू , जिंतूर, गंगाखेड व परभणी उपविभागाअंतर्गत सन २००७ - २००८मध्ये करण्यात आलेल्या / करण्यात येत असलेल्या कामाच्या संदर्भात व पाथरी येथील ग्रामीण रुग्णालय इमारत दुरुस्ती कामाच्या संदर्भात काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - कामाचे नाव, ठिकाण, योजनेचे (हेडचे) नाव, कामाची अंदाजपत्रकीय रक्कम, खर्च करणारी एजन्सी /गुत्तेदार /अभियंता यांची नावे इत्यादी - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज त्यांना प्राप्त झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या विभागाशी संबंधित आहे त्यांच्याकडे अपिलार्थीच्या अर्जाची प्रत दिनांक २१.०८.२००८ रोजी, अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीनुसार पाठविली व याची प्रत अपिलार्थीस दिली. यानंतर अपिलार्थीने त्यांना माहिती प्राप्त न झाल्याच्या कारणास्तव दिनांक १७.११.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील केले. अपिलार्थीने सदरचे अपील कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी यांना उद्देशून केले आहे. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणतीही सुनावणी झाली नाही अथवा या संदर्भात अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तयार करुन ठेवली होती. तथापि अपिलार्थी ही माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयात कधीही व्यक्तिशः उपस्थित न राहिल्यामुळे, ते अपिलार्थीस ही माहिती पुरवू शकले नाहीत. आजही त्यांच्याकडे ही माहिती तयार असून, अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहिल्यास अपिलार्थीस ते ही माहिती देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी कामासंबंधी नागरीक व कार्यकर्त्यांच्या तक्रारींच्या प्रती या मुद्याव्यतिरिक्त उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती ती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने अपिलार्थीस देय होत आहे. तक्रारीच्या माहितीच्या मुद्यासंदर्भात, अपिलार्थीने त्यांना सदर माहिती प्राप्त झाल्यास कोणते व्यापक जनहित ते साध्य करु शकतील याचे स्पष्टीकरण आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये केलेले नाही व तसेच हे स्पष्टीकरण मौखीक स्वरुपात आयोगासमोर करण्यासाठी ते आज रोजी सुनावणीच्या वेळी आयोगासमोर उपस्थित नाहीत. हे पाहता, अपिलार्थीच्या अर्जातील या मुद्यावरील माहिती उघड करणे योग्य राहणार नाही.

अपिलार्थीच्या प्रथम अर्जाचे अवलोकन करता, जन माहिती अधिकारी म्हणतात त्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्याकडे ही माहिती व्यक्तिशः मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली माहिती जर अर्जदारास व्यक्तिशः हवी असेल तर, माहितीसाठीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे केल्यानंतर या अर्जासंबंधित पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेण्याचे संपूर्ण उत्तरदायित्व हे अर्जदाराचे असते. या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता काय प्रयत्न केले, याचा कोणताही पुरावा आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेला

नाही व तसेच या संदर्भातील युक्तिवाद करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचा, त्यांनी अपिलार्थीस देण्याकरिता माहिती तयार करुन ठेवली होती परंतु ती व्यक्तिशः घेण्यासाठी अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात उपस्थित झाले नाही म्हणून त्यांना, अपिलार्थीस माहिती पुरविता आली नाही, हा त्यांचा युक्तिवाद मान्य करण्यात येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आजही जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात तयार आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील त्यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली व अपिलार्थीस देय असलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीने जन माहिती अधिकरी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे, अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त माहिती, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी पूर्वनियोजित वेळी उपस्थित राहून, ती विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. ही माहिती अपिलार्थी व्यतिरिक्त त्यांच्या कोणत्याही प्रतिनिधीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक १३.०१.२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. साळवे विठ्ठल किशनराव, गौतमनगर, पाथरी, ता. पाथरी, जि. परभणी

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३३१

निर्णय दिनांक १३.०१.२०१०

१ श्री. शिवदास दगडोबा शहाणे, : अपिलार्थी

रा. वडगल्ली, परभणी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा

सहायक निबंधक, सहकारी संस्था, परभणी

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, परभणी

त्रयस्थ पक्ष : अविष्कार सहकारी गृहनिर्माण संस्था, परभणी

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२.०१.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी या प्रकरणी प्रथमत: जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, परभणी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष अविष्कार सहकारी गृहनिर्माण संस्था, परभणी या संस्थेने त्यांना द्यावयाच्या हस्तांतर प्रमाणपत्राची प्रत व सभासदांना वाटून दिलेल्या प्लॉटची यादी अशी माहिती मागितली होती. तथापि संबंधित संस्थेने दिनांक ०६.१०.२००८ रोजी फक्त संस्थेच्या प्लॉट धारकांची यादी अपिलार्थीस उपलब्ध करुन दिली आणि त्यांना संस्थेने त्यांच्या भूखंडाची हस्तांतरण प्रत न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व त्यांच्या हस्तांतरण पत्राच्या प्रतीची मागणी कायम ठेवली आहे .

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे त्रयस्थ पक्षाशी संबंधित काही माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास सहायक निबंधक, सहकारी संस्था, तालुका परभणी यांनी त्यांच्याकडील दिनांक २०.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्याचे चेअरमन/सचिव, अविष्कार सहकार गृहनिर्माण संस्था, परभणी यांना सूचित केले व या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. तथापि यानंतरही आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २५.०९.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपिलावरील सुनावणीच्या वेळी संबंधित संस्थेने त्यांच्या प्लॉट धारकांची यादी अपिलार्थीस उपलब्ध करुन दिली. तथापि हस्तांतरण प्रमाणपत्र हे संस्थास्तरावरुन अपिलार्थीस दिले गेले नसल्याने त्याची प्रत ते अपिलार्थीस देऊ शकले नाहीत. या सर्व मुद्यांचा विचार करुन जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १६.१०.२००८ रोजी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत .

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने सहायक निबंधक, सहकारी संस्था यांच्याकडे त्रयस्थ पक्ष अविष्कार सहकारी गृह निर्माण संस्थेच्या मार्फत काही माहिती

मागविली होती. अपिलार्थीने एकूण २ मुद्यांवर माहिती मागविली होती. त्यापैकी पहिला मुद्दा म्हणजे अपिलार्थीस संबंधित गृहनिर्माण संस्थेने द्यावयाचे हस्तांतर प्रमाणपत्र व दुसरा मुद्दा म्हणजे या संस्थेच्या सभासदास प्लॉट वाटण्याची यादी. यापैकी दुसऱ्या मुद्यावर अपिलार्थीस माहिती मिळाली आहे. परंतु पहिल्या मुद्यावरील माहिती त्रयस्थ पक्षाकडे, मूळात ती तयार केली गेली नसल्यामुळे, अस्तित्वात नाही, त्यामुळे ती माहिती अमूर्त स्वरुपातील असल्याने अपिलार्थीस देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार सार्वजनिक प्राधिकरणातील जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या ताब्यात जी माहिती प्रत्यक्षात उपलब्ध आहे, तीच माहिती त्यांनी अर्जदारास देणे मूळात अभिप्रेत आहे. या प्रकरणी अपिलार्थीच्या अर्जातील या पहिल्या मुद्याची माहिती मूळात अस्तित्वात नसल्याने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होऊ शकणार नाही, हे उघड आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची सविस्तर छाननी केली असता, असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने संबंधित संस्थेकडे त्यांच्या प्लॉटसंदर्भात लागणारी रक्कम भरुनही संबंधित संस्थेने अद्यापपावेतो अपिलार्थीस त्यांना देय असलेले हस्तांतरण प्रमाणपत्र दिलेले नाही, असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील हा मुद्दा पूर्णतः प्रशासकीय स्वरुपाचा असल्यामुळे, या मुद्याची तड त्यांनी सहकार विभागातील सक्षम प्राधिकरणाकडून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतुदीप्रमाणे लावून घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अशाप्रकारच्या प्रशासकीय स्वरुपाचा निर्णय देण्याचा अधिकार आयोगास नसल्यामुळे या मुद्यावर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार आयोगातर्फे कोणतेही प्रशासकीय स्वरुपाचे आदेश नाहीत. अशा प्रकारे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींच्या मर्यादेपर्यंत या प्रकरणाकडे पाहावयाचे झाल्यास, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती प्राप्त झाली असल्यामुळे, त्यांचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक १३.०१.२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शिवदास दगडोबा शहाणे, रा. वड गल्ली, परभणी

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३३२

निर्णय दिनांक १३.०१.२०१०

१ श्री. कमलचंद माणिकचंद कुचेरिया, : अपिलार्थी
रा. परभणी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
सचिव, नेताजी सुभाष शिक्षण प्रसारक मंडळ,
भारतीय बाल विद्यामंदिर, परभणी

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी
कार्यालय, परभणी

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५.०१.२००९ रोजी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून सहायक धर्मादाय आयुक्त यांनी दिलेले आदेश फेटाळून लावण्याची आयोगास विनंती केली आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर आज रोजी उपस्थित नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: ज्या प्राधिकरणाकडे माहिती मागितली आहे ते प्राधिकरण म्हणजे नेताजी सुभाष शिक्षण प्रसारक मंडळ, भारतीय बाल विद्यामंदिर, परभणी हे होय. अपिलार्थीने त्यांच्या संस्थेच्या संदर्भात संस्थेच्या सचिवांच्याकडे दिनांक २२.०७.२००८ रोजी माहिती मागविल्याचे दिसून येत आहे. सार्वजनिक संस्थेच्या बाबतीत मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या नागपूर खंडपीठाने दिनांक २८.०४.२००९ रोजी, रिट पिटीशन क्रमांक ५२९४/२००८ श्री. गोविंद रामानंद समर्थ सद्गुरु प्रल्हाद महाराज रामदासी संस्थानाविरुध्द राज्य माहिती आयुक्त, नागपूर यांच्या प्रकरणात दिलेला निर्णय स्वयंस्पष्ट आहे. सदरच्या निर्णयाचा काही भाग खाली उद्धृत केला आहे.

"..... It is, therefore, clear from the provisions of this definition that the Act cannot apply to the Public Trust. Any public trust, therefore, is not at all covered by the definition of the public authority. .....If any person interested in the information of the trust, he can definitely apply to the Charity Commissioner under the provisions of the Public Trust Act to have such information, which the Charity Commissioner may deem fit to be provided. But as far as Right to Information Act is concerned, there is no need for any public trust to appoint any Information Officer and to entertain any such application under the Right to Information Act."

वरील आदेशाचे अवलोकन केले असता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी मूळात अपिलार्थीने ज्या संस्थेकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहितीची मागणी केली आहे, त्या संस्थेस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतूदी लागू होत नाहीत. तसेच या प्रकरणात अपिलार्थीने प्रथम अपील सहायक धर्मादाय आयुक्त, परभणी यांच्याकडे केले आहे.

माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती अधिकाऱ्यांनी माहिती न दिल्यास याच प्राधिकरणातील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे अधिनियमातील कलम १९ (१) प्रमाणे अर्जदाराने प्रथम अपील करणे अभिप्रेत आहे. सहायक धर्मादाय आयुक्त हे नेताजी सुभाष शिक्षण प्रसारक मंडळ, या प्राधिकरणाशी कोणत्याही प्रकारे संबंधित नाहीत. ही विसंगत वस्तुस्थिती पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक १३.०१.२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. कमलचंद माणिकचंद कुचेरिया, सरदार पटेल रोड, कच्छी बाजार, परभणी

२ जन माहिती अधिकारी तथा सचिव, नेताजी सुभाष शिक्षण प्रसारक मंडळ, भारतीय बाल विद्यामंदिर, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३३३

निर्णय दिनांक १३.०१.२०१०

१ श्री. धराजी आबाजी भुसारे, : अपिलार्थी
रा. परभणी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता (बांधकाम विभाग),
जिल्हा परिषद, परभणी

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी
जिल्हा परिषद, परभणी

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, परभणी

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, परभणी

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६.०१.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जाचा दिनांक १२.०१.२००९ असा दर्शविला आहे. या अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्यामुळे व जन अपिलीय अधिकारी यांनी

त्यांच्याकडे अपिलार्थीने केलेल्या प्रथम अपील अर्जावर निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३१.१०.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील कनिष्ठ अभियंता मंजूर व रिक्त पदाच्या संदर्भात काही माहिती टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५.१२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. १२/- इतके व पोस्ट खर्च रु. ५०/- असे एकूण रु. ६२/- इतक्या शुल्काचा भरणा त्यांच्या कार्यालयात करण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने दिनांक १२.१२.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात रु. १२/- इतक्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा केला. तथापि आवश्यक त्या शुल्काचा भरणा करुनही अपिलार्थीस माहिती न मिळाल्यामुळे अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०६.१२.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकाऱ्याने कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हजर आणि जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक १४.०१.२००९ रोजीच्या पत्राद्वारे, अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर व्यक्तिशः हस्तांतरित केली आहे. त्यांच्या या विधानापृष्ठर्थ त्यांनी अपिलार्थीची पोचसही असलेले कागदपत्र आयोगास दाखविले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी प्रथमतः जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ३१.१०.२००८ रोजीच्या अर्जास दिनांक ३०.११.२००८ रोजी अगर तत्पूर्वी प्रथम प्रतिसाद देणे, त्यांना अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीनुसार अनिवार्य होते. तथापि त्यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जास दिनांक ०५.१२.२००८ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपाटीचे शुल्क रु. ६२/- इतके त्यांना त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे केल्यानंतर अपिलार्थीस दिनांक १४.०१.२००९ रोजीच्या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक ती माहिती पुरविली. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) मध्ये विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने प्रतिसाद दिला असल्यामुळे, अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (६) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती देय होत आहे. परंतु असे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना देण्यात आलेल्या माहितीबद्दल एकूण रु. १२/- इतके शुल्क आकारले आहे. जन माहिती अधिकारी यांची अपिलार्थीस, सशुल्क माहिती देण्याची मुदत टळून गेल्यानंतरही विनामूल्य माहिती न देण्याची ही कृती सर्वथा गैर व चुकीची आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना आता असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. १२/- इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत परत करावे. तसेच या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत आवश्यक तो प्रतिसाद न दिल्याबद्दल संबंधित जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे. इतःपर त्यांनी अशाप्रकारची पुनरावृत्ती टाळावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीस आता आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून, अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर प्राप्त झाली असल्याने, अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून, माहितीपोटीचे स्विकारलेले शुल्क रु. १२/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत परत करावे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक १३.०१.२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. धराजी आबाजी भुसारे, जिल्हा उपाध्यक्ष, भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन (अण्णा हजारे प्रणित) मासिक मराठा प्रवाह, सा. जीवन स्फुर्ती कार्यालय, गाळा क्र.३३, स्टेडिअम कॉम्पलेक्स, स्टेशन रोड, परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३३८

निर्णय दिनांक १३-०१-२०१०

१ श्री. किशोर विठ्ठलराव बाब्रस, : अपिलार्थी

फ्लॅट क्रमांक ९, माणिक अपार्टमेंट, सराफा लेन, बीड,

जिल्हा बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी,

जिल्हा व सत्र न्यायालय, बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा प्रमुख जिल्हा न्यायाधीश, जिल्हा न्यायालय, बीड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : प्रबंधक, जिल्हा न्यायालय, बीड

जन अपिलीय अधिकारी : जिल्हा न्यायाधीश-१, जिल्हा न्यायालय, बीड

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आयोगास अशी विनंती केली आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी दिलेल्या त्यांच्या प्रथम अपील अर्जावरील निर्णय अधिक्रमित करुन जन माहिती अधिकारी यांना माहिती देण्याचे आदेशित करावे आणि त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाईचे आदेश पारीत करावेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ०५-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे, दिनांक ०१-०३-२००८ ते ०५-१२-२००८ या कालावधीत जिल्हा न्यायालय बीड यांच्या आस्थापनेवरील कर्मचा-यांनी मागितलेल्या स्वेच्छानिवृत्तीचे अर्जाची व त्यावरील आदेशाची प्रत, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०८-१२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या स्वतःशी संबंधित नसल्याने अपिलार्थीचा अर्ज नामंजूर केला. जन माहिती अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-१२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १५-१२-२००८ रोजी निर्णय देऊन त्रयस्थ पक्षाच्या सहमतीशिवाय अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले व अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज फेटाळून लावला. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर व जन माहिती अधिकारी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही त्यांच्या स्वतःशी संबंधित नसल्याने त्यांनी ती माहिती अपिलार्थीस देण्याचे नाकारले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. तथापि त्रयस्थ पक्षाशी संबंधित माहिती देतांना अधिनियमातील

कलम ११ प्रमाणे करावयाची कार्यवाही या प्रकरणी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी या दोघांच्यापैकी कोणीही या संपूर्ण घटनाक्रमामध्ये केलेली नाही. हे पाहता विशेषत: अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे सार्वजनिक स्वरुप पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस देण्यासंदर्भात त्रयस्थ पक्षाशी पत्रव्यवहार करावा व यासंदर्भात त्रयस्थ पक्षाकडून त्यांच्याकडे प्राप्त होणा-या उत्तरावर साकल्याने विचार करुन, त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात याबाबत निर्णय घ्यावा. हा पत्रव्यवहार करतांना त्यांनी त्रयस्थ पक्षाला अधिनियमातील कलम ११ (२) मधील कालमर्यादेची तरतूद स्पष्ट करावी व त्या कालमर्यादेमध्ये त्रयस्थ पक्षाकडून त्यांना कोणताही प्रतिसाद प्राप्त झाला नाही तर, ही माहिती त्यांनी अपिलार्थीस उघड करावी व जर या प्रकरणामध्ये प्रतिसाद प्राप्त झाला तर प्रतिसादाचे स्वरुप आणि अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप याचा सारासार विचार करुन अपिलार्थीस माहिती उघड करण्याचा निर्णय त्यांनी घ्यावा. जन माहिती अधिकारी यांनी ही संपूर्ण कार्यवाही हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

<u>आदेश</u>

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक १३-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. किशोर विठ्ठलराव बाब्रस, फ्लॅट क्रमांक ९, माणिक अपार्टमेंट, सराफा लेन, बीड,

जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, जिल्हा न्यायालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा न्यायाधीश-१, जिल्हा न्यायालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१२७

निर्णय दिनांक १३-०१-२०१०

१ श्री. बजरंग सटवाजी साखरे, : अपिलार्थी

मु. पो. धनगर टाकळी, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी

तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पूर्णा,

तालुका पूर्णा, जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, धनगर टाकळी, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी

जन अपिलीय अधिकारी : गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पूर्णा, जिल्हा परभणी

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांच्या दालनात दिनांक ०५-१२-२००८ रोजी सुनावणीसाठी उपस्थित राहूनही त्यांना माहिती न मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ०१-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पूर्णा यांच्याकडे, मौजे धनगर टाकळी येथील ग्रामपंचायतीमध्ये २६ जानेवारी २००८ पासून दिनांक ०१-०९-२००८ पर्यंत किती ग्रामसभा झाल्या, त्यामध्ये कोणते ठराव घेतले या ठरावाच्या सत्यप्रती ग्रामस्थांच्या सह्यासहीत मिळणेबाबत, अशी माहिती व्यक्तिश: मागितली होती.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, धनगर टाकळी, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी यांच्या अखत्यारितील असल्याने गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पूर्णा यांनी अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडील दिनांक ०१-०९-२००८ च्या पत्राव्दारे ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, धनगर टाकळी, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी यांच्याकडे हस्तांतरीत केला. अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर संबंधित ग्रामसेवकाने अपिलार्थीस दिनांक २३-०९-२००८ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध असल्याचे व ती घेऊन जाण्याचे अपिलार्थीस सूचित केले. तथापि अपिलार्थी ही माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी त्यांच्याकडे उपस्थित राहिले नाहीत आणि त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०३-०३-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना त्यांच्याकडील दिनांक ११-१२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे सूचित केले असल्याने अपिलार्थीचे अपील निकाली काढले. तथापि यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस वेळोवेळी देऊ केली असता अपिलार्थीने ती घेण्याचे नाकारले. त्यांनी दिनांक ३०-०९-२००८ रोजी अपिलार्थीस माहिती घेण्यासाठी स्मरणपत्र पाठविले. परंतु अपिलार्थीने हे पत्र स्वीकारण्यास नकार दिला त्यामुळे त्यांनी हे पत्र अपिलार्थीच्या घरावर डकविले. तसाच प्रकार दिनांक ०६-१०-२००८ रोजी घडला त्यावेळी त्यांनी अपिलार्थीस माहिती देऊ केली असता अपिलार्थीने ती घेण्याचे नाकारले असा पंचनामा पंचाच्या उपस्थितीत केला. सदर पंचनामा त्यांनी आयोगास दाखविला. अपिलार्थी व्यक्तिशः माहिती मागत असूनही जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती ते स्वीकारत नाहीत. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १३-०२-२००९ रोजी पोस्टाव्दारे माहिती पाठविली आहे. यासंदर्भातील पुरावा संबंधित ग्रामसेवक यांनी आयोगास सादर केला आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी अथवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार ' व्यक्तिशः ' माहितीची मागणी केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घेण्याचे पूर्ण उत्तरदायित्व अर्जदाराचे असते. परंतु या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या त्यांच्या वरील युक्तिवादावरुन अपिलार्थीने हे उत्तरदायित्व योग्य प्रकारे पार पाडले नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. तसेच अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १३-०२-२००९ रोजी पोस्टाव्दारे माहिती पाठविल्याचा पुरावा व पाठविलेली माहिती आयोगास सादर केली आहे. या माहितीचे अवलोकन करता, ही माहिती अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे आयोगास आढळून येत आहे. अशा प्रकारे अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून

त्यांच्याकडील उपलब्ध माहिती पोष्टाव्दारे व विनामूल्य पाठवली गेली असल्यामुळे अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर नव्याने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक १३-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बजरंग सटवाजी साखरे, मु. पो. धनगर टाकळी, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, धनगर टाकळी, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पूर्णा, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१२८

निर्णय दिनांक १३-०१-२०१०

१ श्री. संदीपान आप्पाराव थोरात, : अपिलार्थी
व्दारा- मेडीसीन वर्ल्ड, मेन रोड, किल्ले धारुर,
तालुका धारुर, जिल्हा बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, धारुर,
तालुका धारुर, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, धारुर,
तालुका धारुर, जिल्हा बीड

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी ४५ दिवसाच्या आत निर्णय देणे बंधनकारक असतांना जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०४-११-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व त्यांना आवश्यक असलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन देण्याचे व जन माहिती अधिकारी

यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याचे आयोगाने आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०१-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत वितरित करण्यात येणा-या जीवनावश्यक वस्तुंवर नियंत्रण ठेवण्यासाठी नियुक्त केलेल्या दक्षता समितीच्या संदर्भात दिनांक ०६-१२-२००७ ते ०१-०९-२००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण १३ मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाव्दारे अपेक्षिली होती. तथापि अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणत्याही प्रकारे प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळात माहितीसाठीचा प्रथम अर्ज केला किंवा कसे यासंदर्भातील कोणताही पुरावा त्यांनी आयोगाकडे त्यांच्या व्दितीय अपील अर्जासोबत सादर केलेला नाही. त्याचबरोबर त्यांनी या प्रकरणी मूळात जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-११-२००८ रोजी प्रथम अपील सादर केले होते किंवा कसे

यासंदर्भात देखील कोणताही पुरावा आयोगास सादर केलेला नाही अथवा या संदर्भात पुरेसे भाष्य करण्यासाठी ते आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता, आवश्यक त्या कागदपत्राच्या अनुपलब्धतेमुळे व संबंधितांच्या उपस्थितीअभावी अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्या-योग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक १३-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. संदीपान आप्पाराव थोरात, व्दारा- मेडीसीन वर्ल्ड, मेन रोड, किल्ले धारुर, तालुका धारुर, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, धारुर, तालुका धारुर, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, धारुर, तालुका धारुर, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१२९

निर्णय दिनांक १३-०१-२०१०

१ श्री. अंबादास दिगंबरराव देशपांडे, : अपिलार्थी

इ-६, तिरुपती पार्क, गुरुसहानीनगर, एन-४,

मधुमालती अपार्टमेंट, सिडको, औरंगाबाद

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी

तथा अध्यक्ष, ज्ञान प्रबोधिनी संस्था, पैठण, तालुका पैठण,

जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा धर्मादाय आयुक्त, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : सहायक धर्मादाय आयुक्त, औरंगाबाद

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आयोगास अशी विनंती केली आहे की, त्यांचे विचाराधीन अपील मंजूर करुन त्यांनी मागणी केलेली माहिती देण्याचे अध्यक्ष, ज्ञान प्रबोधिनी संस्था, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना आयोगाने आदेशित करावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये अध्यक्ष, ज्ञान प्रबोधिनी संस्था, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांच्याकडे एकूण नऊ मुद्दयाव्दारे

काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी संस्था स्थापन झाल्यापासून ते दिनांक १८-०७-२००८ असा होता.

अपिलार्थीच्या या अर्जास संबंधित संस्थेने अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार सहायक धर्मादाय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक २९-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि या प्रकरणाशी संबंधित ते जन अपिलीय अधिकारी नसल्याने त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०८-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी ते नसल्याचे कळविले. यानंतर व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने अध्यक्ष, ज्ञान प्रबोधिनी संस्था, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद या सहायक धर्मादाय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे नोंदणी झालेल्या सार्वजनिक संस्थेकडे काही माहिती मागितली आहे. यासंदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर यांच्याकडील रिट पिटीशन क्रमांक ५२९४/२००८, दिनांक २८-०४-२००९ रोजी मुख्य विश्वस्त गोविंद रामनंद सद्‌गुरु महाराज रामदासी संस्थान, साखरखेर्डा, जिल्हा बुलढाणा विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूर यांच्या संदर्भात दिलेला निर्णय या प्रकरणी विचारात घेणे योग्य राहील. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी खालीलप्रमाणे आदेश दिले आहेत. त्या अनुषंगाने काही भाग खालीलप्रमाणे उद्‌धृत केला आहे.

"..... It is , therefore, clear from the provisions of this definition that the Act cannot apply to the Public Trust. Any public trust, therefore, is not at

all covered by the definition of the public authority. ..... If any person interested in the information of the trust, he can definitely apply to the Charity Commissioner under the provisions of the Public Trust Act to have such information, which the Charity Commissioner may deem fit to be provided. But as far as Right to Information Act is concerned, there is no need for any public trust to appoint any Information Officer and to entertain any such application under the Right to Information Act."

मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांच्या वरील आदेशाचे अवलोकन करता, अपिलार्थीने ज्या संस्थेकडे माहिती मागितली आहे ती संस्था माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) मधील तरतुदीनुसार कोणत्याही प्रकारे ' सार्वजनिक प्राधिकरण ' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट होत नसल्यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी या संस्थेस लागू होत नाहीत. त्यामुळे अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांना या संस्थेस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागता येणार नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक १३-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अंबादास दिगंबरराव देशपांडे, इ-६, तिरुपती पार्क, गुरुसहानीनगर, एन-४,

मधुमालती अपार्टमेंट, सिडको, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, ज्ञान प्रबोधिनी संस्था, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५९२
निर्णय दिनांक: १४-०१-२०१०

१. श्री. शंकर भिकनराव शितोळे, : अपिलार्थी
रा. औरंगाबाद

विरुध्द

१. सचिव, : प्रतिवादी
भगीरथ सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित,
जाधववाडी, पिसादेवी रोड, औरंगाबाद
२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपनिबंधक,
सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद.

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०४.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि.२५.०८.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे चेअरमन / सचिव, भगीरथ सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., औरंगाबाद यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर गृहनिर्माण संस्थेने अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि.२३.१२.२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. १७.०१.२००९ रोजी पारीत केले. याव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील मान्य केले व त्यांना हवी असलेली माहिती ८ दिवसात विनामूल्य उपलब्ध करुन देण्याचे

अध्यक्ष, भगीरथ सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., जाधववाडी, औरंगाबाद यांना आदेशित केले. तथापि यानंतरही अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद हे उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित संस्थेस, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि यासंदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबईच्या नागपूर खंडपीठाने त्यांचे रिट पिटीशन क्र. ३६४८/२००७, श्री. बालाजी सहकारी स्पिनींग मिल्स मर्या., रिसोड, जि. वाशिम विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर या प्रकरणामध्ये दि. ०२.०३.२००९ रोजी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे.

"It is the contention of the petitioner that the petitioner Co-Operative Society is not a Public Authority and, therefore, Right to Information Act, 2005 is not applicable to the petitioner and, therefore, respondent no.6 could not pass any such order. When the matter is taken up for hearing, learned counsel for the parties concede that this point is squarely covered by judgment of this Court in Writ Petition No.5666/2007; Dr.Panjabrao Deshmukh Urban Co-Operative Bank Ltd., Amravati ..vs.. The State Information Commissioner, Vidarbha Region, Nagpur and Ors., dated 13.01.2009, <u>wherein this Court held that a Co-operative Society, registered under the Maharashtra Co-Operative Societies Act, is not a public authority within the meaning of Section 2(h) of Right to Information Act or a State within the meaning of Article 12 of the Constitution of India and,</u>

therefore, Right to Information Act is not applicable .”

वरील निर्णयाचे अवलोकन करता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीअंतर्गत नोंदणी झालेल्या सहकारी संस्थांना 'सार्वजनिक प्राधिकरण' म्हणून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मानता येणार नाही, असे दिसून येत आहे. यामुळे या प्रकरणी देखील असाच युक्तिवाद लागू होत असल्यामुळे अपिलार्थीने ज्या सहकारी संस्थेकडे माहिती मागितली आहे, त्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम लागू होणार नाही.

अशाप्रकारे मा. उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित गृहनिर्माण संस्थेस लागू होत नसल्याने, उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांचे दि. १७.०१.२००९ रोजीचे आदेश अधिक्रमित करुन, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१. अपील क्र.५९२/०९ फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांकः १४-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त,**
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शंकर भिकनराव शितोळे, व्दारा-संवाद कम्युनिकेशन ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस, साई विश्व अपार्टमेंट, शॉप नं.४, ज्योतीनगर, औरंगाबाद, ता.जि. औरंगाबाद.

२. सचिव, भगीरथ सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, जाधववाडी, पिसादेवी रोड, मार्केट कमिटी समोर, औरंगाबाद, ता.जि. औरंगाबाद.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५९३
निर्णय दिनांक: १४-०१-२०१०

१. सौ. वत्सला सोनाजी माने, : अपिलार्थी
रा. औरंगाबाद

विरुध्द

१. सचिव, : प्रतिवादी
जय शिवा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित,
मिटमिटा, ता.जि.औरंगाबाद
२. जन अपिलीय अधिकारी तथा
तालुका उपनिबंधक,
सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद.

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०६.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि.१९.०३.२००९ रोजीच्या अर्जाव्दारे सचिव, जय शिवा सहकारी गृहनिर्माण संस्था, मिटमिटा, औरंगाबाद यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर गृहनिर्माण संस्थेने अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि.०२.०५.२००९ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. १६.०५.२००९ रोजी पारीत केले. याव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील मान्य केले व त्यांना हवी असलेली माहिती १० दिवसात विनामूल्य उपलब्ध करुन देण्याचे सचिव, जय शिवा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. मिटमिटा, ता.औरंगाबाद यांना आदेशित केले.

तथापि यानंतरही अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद हे उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित संस्थेस, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि यासंदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबईच्या नागपूर खंडपीठाने त्यांचे रिट पिटीशन क्र. ३६४८/२००७, श्री बालाजी सहकारी स्पिनींग मिल्स मर्या., रिसोड, जि.वाशिम विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर या प्रकरणामध्ये दि. ०२.०३.२००९ रोजी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे.

"It is the contention of the petitioner that the petitioner Co-Operative Society is not a Public Authority and, therefore, Right to Information Act, 2005 is not applicable to the petitioner and, therefore, respondent no.6 could not pass any such order. When the matter is taken up for hearing, learned counsel for the parties concede that this point is squarely covered by judgment of this Court in Writ Petition No.5666/2007; Dr.Panjabrao Deshmukh Urban Co-Operative Bank Ltd., Amravati ..vs.. The State Information Commissioner, Vidarbha Region, Nagpur and Ors., dated 13.01.2009, <u>wherein this Court held that a Co-operative Society, registered under the Maharashtra Co-Operative Societies Act, is not a public authority within the meaning of Section 2(h) of Right to Information Act or a State within the meaning of Article 12 of the Constitution of India and, therefore, Right to Information Act is not applicable</u>."

वरील निर्णयाचे अवलोकन करता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीअंतर्गत नोंदणी झालेल्या सहकारी संस्थांना 'सार्वजनिक प्राधिकरण' म्हणून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मानता येणार नाही, असे दिसून येत आहे. त्यामुळे या प्रकरणी देखील असाच युक्तिवाद लागू होत असल्यामुळे अपिलार्थीने ज्या सहकारी संस्थेकडे माहिती मागितली आहे. त्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम लागू होणार नाही.

अशाप्रकारे मा. उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित गृहनिर्माण संस्थेस लागू होत नसल्याने उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांचे दि. १६.०५.२००९ रोजीचे आदेश अधिक्रमित करुन, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१. अपील क्र.५९३/०९ फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक: १४-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त,**
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. सौ. वत्सला सोनाजी माने, ४७, पर्वती सहकारी गृहनिर्माण संस्था, हर्सूल, औरंगाबाद.

२. सचिव, जय शिवा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., मिटमिटा, ता.जि.औरंगाबाद.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८५४
निर्णय दिनांक: १४-०१-२०१०

१. श्री. सुर्यकांत संतोषराव पाटील, : अपिलार्थी
रा. औरंगाबाद

विरुध्द

१. अध्यक्ष, : प्रतिवादी
मोरेश्वर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित,
गारखेडा, औरंगाबाद
२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपनिबंधक,
सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद.

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दि.२०.१०.२००६ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि.१५.०२.२००६ रोजीच्या अर्जाव्दारे अध्यक्ष, मोरेश्वर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., गारखेडा, औरंगाबाद यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर गृहनिर्माण संस्थेच्या अध्यक्षांनी त्यांच्या दि.१८.०३.२००६ रोजीच्या पत्रान्वये, हव्या असलेल्या माहितीपोटीचे शुल्क संस्थेच्या खात्यात जमा करुन माहिती घेऊन जाण्याचे अपिलार्थीस कळविले. यानंतर अपिलार्थीने उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि.२५.०८.२००६ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. १८.०९.२००६ रोजी पारीत केले. याव्दारे

त्यांनी अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य केले व त्यांना सशुल्क माहिती उपलब्ध करुन देण्याचे अध्यक्ष, श्री. मोरेश्वर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., गारखेडा, औरंगाबाद यांना आदेशित केले. तथापि यानंतर अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी संबंधित गृहनिर्माण संस्थेचे वकील श्री. विजय देशमुख व उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद हे उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित संस्थेस, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि यासंदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबईच्या नागपूर खंडपीठाने त्यांचे रिट पिटीशन क्र. ३६४८/२००७, श्री बालाजी सहकारी स्पिनींग मिल्स मर्या., रिसोड, जि.वाशिम विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर या प्रकरणामध्ये दि. ०२.०३.२००९ रोजी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे.

"It is the contention of the petitioner that the petitioner Co-Operative Society is not a Public Authority and, therefore, Right to Information Act, 2005 is not applicable to the petitioner and, therefore, respondent no.6 could not pass any such order. When the matter is taken up for hearing, learned counsel for the parties concede that this point is squarely covered by judgment of this Court in Writ Petition No.5666/2007; Dr.Panjabrao Deshmukh Urban Co-Operative Bank Ltd., Amravati ..vs.. The State Information Commissioner, Vidarbha Region, Nagpur and Ors., dated 13.01.2009, wherein this Court held that a Co-operative Society, registered under the Maharashtra Co-Operative Societies Act, is not a public authority within the meaning of Section 2(h) of Right to Information Act or a State within the meaning of

Article 12 of the Constitution of India and, therefore, Right to Information Act is not applicable ."

वरील निर्णयाचे अवलोकन करता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीअंतर्गत नोंदणी झालेल्या सहकारी संस्थांना 'सार्वजनिक प्राधिकरण' म्हणून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मानता येणार नाही, असे दिसून येत आहे. त्यामुळे या प्रकरणी देखील असाच युक्तिवाद लागू होत असल्यामुळे अपिलार्थीने ज्या सहकारी संस्थेकडे माहिती मागितली आहे. त्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम लागू होणार नाही.

अशाप्रकारे मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित गृहनिर्माण संस्थेस लागू होत नसल्याने, उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांचे दि. १८.०९.२००६ रोजीचे आदेश अधिक्रमित करुन, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१. अपील क्र.२८५४ /०७ फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांकः १४-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त,**
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सूर्यकांत संतोषराव पाटील, व्दारा-एस.एस.दंडे, कौस्तुभ हारमनी हेरीटेज, सेक्टर - जी, एन-५, टाऊन सेंटर, सिडको, औरंगाबाद.

२. अध्यक्ष, श्री. मोरेश्वर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, गारखेडा, औरंगाबाद

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३४८

निर्णय दिनांक १४.०१.२०१०

१ श्री. अशोक रा. दरेवार, : अपिलार्थी

रा. बरबडा, ता. नायगांव, जि. नांदेड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा

जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद,नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, पशुसंवर्धन

विभाग, जिल्हा परिषद, नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : पशुधन विकास अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५.०१.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या कार्यालयातील प्रतिनियुक्तीवर असलेले श्री. जी.एस. कांबळे (आस्थापना - १) पशुधन पर्यवेक्षक, यांना त्यांच्या जॉबच्यानुसार काम देण्याकरिता व सदरील पदावर संबंधित प्रशासकीय संवर्गातील कर्मचाऱ्यांची व्यवस्था करण्याच्या प्रयोजनार्थ त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असेही नमूद केले आहे की, त्यांची संबंधित विभागाने अडवणूक करुन त्यांना अर्धवट व दिशाभूल करणारी माहिती दिली असल्यामुळे संबंधितावर दंडात्मक कार्यवाही

व्हावी आणि संबंधितांना त्यांच्या जॉब चार्टनुसार काम द्यावे आणि आस्थापना - १ या पदावर संबंधित प्रशासकीय संवर्गातील कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्याबाबतची माहिती त्यांना प्राप्त व्हावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयातील कर्मचारी श्री. जी एस. कांबळे, पशुधन पर्यवेक्षक (आस्थापना - १) यांचेकडून अर्जदारास कामाबाबत अडवणूक, दिशाभूल व मानसिक त्रास होत असल्याबाबत - या विषयावर एकूण १४ मुद्यांद्वारे माहिती मागविली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून सर्वसाधारण टपालद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २२.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. २२०/- इतके अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात चलनाद्वारे भरण्याचे सूचित केले. यानंतर अपिलार्थीने दिनांक ०४.१०.२००८ रोजी चलनाद्वारे या शुल्काचा भरणा केल्यानंतर अपिलार्थीस दिनांक ०४.१०.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दिनांक ०४.११.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २७.११.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित एका मुद्यावरील माहिती दिनांक १५.१२.२०००८ पर्यंत देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस दिनांक १५.१२.२००८ रोजी उर्वरित माहिती पुरविली. तथापि याही माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी तत्कालीन व सध्याचे जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असून, त्यांनी आपला लेखी युक्तिवाद आयोगास दिनांक ११.०१.२०१० रोजी फॅक्सद्वारे पाठविला आहे. या लेखी युक्तिवादामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून ३० दिवसात माहिती मिळाली नाही. ही त्यांना दिनांक १२.११.२००८ रोजी माहिती मिळाली व त्यांना पाहीजे ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली नाही. तसेच दिनांक २७.११.२००९ रोजीच्या सुनावणीच्या संदर्भात निर्णय न देता त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी आस्थापना विभागातील ५४९ पृष्ठांच्या कागदपत्रांची माहिती पुरविली. एवढ्या मोठ्या माहितीच्या कागदपत्रांच्या आधारे अपिलार्थी अस्थापनाविषयाचा अभ्यास करु शकणार नाहीत व पुढे अपील करु शकणार नाहीत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या दिनांक ०४.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जास त्यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद देऊन अपिलार्थीस दिनांक २२.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविले. या शुल्काचा भरणा अपिलार्थीने चलनाद्वारे दिनांक ०४.१०.२००८ रोजी केल्यानंतर अपिलार्थीस त्याच दिवशी त्यांनी आवश्यक ती माहिती दिली होती. तथापि या माहितीमध्ये एका मुद्यावरील माहिती द्यावयाची राहून गेली होती, ती त्यांनी अपिलार्थीस दिनांक १५.१२.२००८ रोजी विनामूल्य पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविले आहे. अपिलार्थीस माहितीपोटीच्या शुल्काची कल्पना आल्यानंतर त्यांनी दिनांक ०४.१०.२००८ रोजी या

शुल्काचा जन माहिती अधिकारी यांच्याकडे चलनाद्वारे भरणा केला व त्याच दिवशी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून एक मुद्दा वगळता उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती प्राप्त झाली आहे. यावेळी द्यावयाची राहिलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १५.१२.२००८ रोजी विनामूल्य दिली आहे. अपिलार्थीच्या मते त्यांना ही माहिती ३० दिवसात मिळाली नाही. या मुद्यावर असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेले माहितीपोटीचे शुल्क ज्या दिवशी भरले त्याच दिवशी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाली आहे आणि अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २२.०९.२००८ रोजी म्हणजे दिनांक ०४.०९.२००८ रोजी अर्ज केल्यानंतर १८ दिवसात प्रथम प्रतिसाद दिला आहे, त्यामुळे अपिलार्थीस ३० दिवसात माहिती मिळाली नाही हा त्यांचा मुद्दा आयोग फेटाळून लावत आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या लेखी युक्तिवादामध्ये त्यांनी दिनांक १२.११.२००८ रोजी माहिती मिळाल्याचे नमूद केले आहे. तथापि दिनांक १२.११.२००८ रोजीच्या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीबरोबर या प्रकरणाशी संबंधित कोणताही पत्रव्यवहार केला नाही, असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले आहे. जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

अपिलार्थीने त्यांच्या लेखी युक्तिवादामध्ये त्यांना पाहिजे ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळाली नाही, असा त्यांनी अभिप्राय दिला आहे. तथापि त्यांना नेमकी कोणती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही, याचा कोणताही उल्लेख त्यांनी लेखी युक्तिवादामध्ये केलेला नाही अथवा हे आयोगास तोंडी स्पष्ट करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. हे पाहता, अपिलार्थीच्या लेखी युक्तिवादातील हा मुद्दा आयोग फेटाळून लावत आहे. या लेखी युक्तिवादामध्ये अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये अपिलार्थीने -"संबंधितांना त्यांच्या जॉबनुसार काम देणे आणि (आस्थापना - १) या पदावर संबंधित प्रशासकीय संवर्गातील कर्मचाऱ्यांची नेमणूक करणे"- अशी माहिती मागविली

आहे. या संदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अशाप्रकारच्या प्रशासनाच्या नियमीत कारभारात लक्ष घालून निर्णय देण्याचे प्रशासकीय स्वरुपाचे अधिकार आयोगास नाहीत. त्यामुळे श्री. जी. एस. कांबळे यांच्याकडून (अस्थापना - १) या पदाचा कार्यभार काढून या पदावर प्रशासकीय संवर्गातील अधिकाऱ्यांची नेमणूक करण्याचे आदेश आयोग देत नाही. या संदर्भात अपिलार्थीची काही तक्रार असेल तर त्यांनी त्यांच्या तक्रारीची तड जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी अथवा त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्याकडून लावून घ्यावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचा आता माहिती देण्यासाठी कोणताही मुद्दा राहिला नसल्याचे अनुमान काढण्यात येत आहे व अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश देण्यात येत नाहीत. तथापि या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उद्देशून लिहिलेल्या दिनांक २२.०९.२००८ रोजीच्या पत्राचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविताना या शुल्काचा तपशील, जो त्यांनी अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (३) (क) च्या तरतुदीप्रमाणे देणे अभिप्रेत होते, तो न दिल्यामुळे व परिणामी त्यांच्याकडून या कलमाचा भंग झाल्याने जन माहिती अधिकारी यांना आता अपिलार्थी यांच्याकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. २२०/- इतके त्यांना परत करावे लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. २२०/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत परत करावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. २२०/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत परत करावे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक १४.०१.२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अशोक रा. दरेवार, पशुधन विकास अधिकारी, गट - अ, पशुवैद्यकिय दवाखाना, श्रेणी - १, बरबडा, ता. नायगांव, जि. नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा पशुधन विकास अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३४९

निर्णय दिनांक १४.०१.२०१०

१ श्री. वसंत संपतराव मुंडे, : अपिलार्थी

रा. गौरीकुंज, मार्केट, परळी वैजनाथ,

ता. परळी वैजनाथ, जि. बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा

कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग,

परभणी

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१.०१.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून, या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून चुकीची माहिती दिली गेली व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊनही निकालपत्र न दिल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या विभागातील श्री. जी. एन. तापडीया, ठेकेदार, मे. पल्लवी कन्स्ट्रक्शन कंपनी, परभणी, मे. शक्ती कन्स्ट्रक्शन कंपनी व मे. विश्वशक्ती कन्स्ट्रक्शन कंपनी, या ठेकेदारांनी त्यांच्या प्रत्येक कामासाठी दिनांक ०१.०१.२००६ ते ३०.०८.२००८ या कालावधीतील वापरण्यात आलेल्या डांबराच्या गेटपासच्या प्रती व मोजमाप पुस्तकात नोंद केलेल्या मोजमापपुस्तीकेच्या प्रमाणीत सत्यप्रती, अशी माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०३.१०. २००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस "जिल्हा परिषद परभणी, बांधकाम विभागामार्फत कोणत्याही प्रकरणाची डांबराची खरेदी करीत नाही. ज्या रस्त्यावर डांबरी काम करावयाचे आहे त्या कामासाठी संबंधित ठेकेदार हा स्वखर्चाने डांबर खरेदी करतो, त्यामुळे मोजमाप पुस्तकांमध्ये नोंद घेण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही" असे कळविले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११.१०.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०३.०२.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस ४ दिवसाच्या आत माहिती पुरवावी, असे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. परंतु या कालावधीमध्ये देखिल माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हजर व जन अपिलीय अधिकारी आणि अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांचा लेखी युक्तिवाद आयोगास सादर केला असून, त्यामध्ये वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेली वस्तुस्थिती त्यांनी परत आयोगाच्या निदर्शनास आणली असून, या प्रकरणात त्यांना चुकीची माहिती प्राप्त झाली आहे, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कार्यवाही करावी, अशी आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील श्री. जी. एन. तापडीया, ठेकेदार, गंगाखेड यांनी त्यांच्या क्षेत्रात काम केले असून, उर्वरित ३ ठेकेदारांनी त्यांच्याकडे कोणतेही काम केलेले नाही. श्री. जी.एन. तापडीया, ठेकेदार, गंगाखेड यांच्याकडून अपिलार्थीने मागणी केलेल्या डांबराबाबतचे गेटपास ते अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य देण्यासाठी तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ३०.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जास अधिनियमातील कलम ७ (१) मधील विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. त्यास जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद हा विहित कालावधी व्यपगत झाल्यानंतर दिल्याचे आढळून येत आहे. या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी असे नमूद केले आहे की, ठेकेदार हा स्वखर्चाने डांबर खरेदी करतो आणि जिल्हा परिषद डांबराची खरेदी करीत नाही. यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की , सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे ज्या ठेकेदारामार्फत डांबर खरेदी केली त्यांना त्यांचे देयक अदा करण्यापूर्वी संबंधित ठेकेदारांनी डांबर खरेदी केल्याबाबतचा पुरावा, त्यांना बांधकाम विभागाकडून देण्यात येत असलेल्या प्रत्येक बिलासोबत जोडणे त्यांना अनिवार्य आहे. या प्रकरणी श्री. जी.एन. तापडीया या ठेकेदाराने अशाप्रकारचा गेटपास त्यांच्या बिलासोबत कार्यकारी अभियंता यांना सादर केला असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी श्री. जी. एन. तापडीया यांना

त्यांच्याकडे डांबर कामाच्या बिलासोबत जोडलेल्या गेटपासच्या प्रतीचा शोध त्यांनी परत एकदा त्यांच्या कार्यालयात घ्यावा व जर श्री. तापडीया यांना, त्यांनी डांबराचा गेटपास सादर न करता जिल्हा परिषद, परभणीकडून त्यांना देयके अदा केली गेली असती तर, ही वस्तुस्थिती अपिलार्थीच्या हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत निदर्शनास आणावी.

या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०३.०२.२००९ रोजी निर्णय देऊनही अपिलार्थीस या प्रकरणाची वस्तुस्थिती कळविली नाही. जन माहिती अधिकारी यांच्या अशाप्रकरच्या कृतीद्वारे त्यांनी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला असल्याचे दिसून येत आहे. सबब मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, परभणी यांचेवर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, परभणी यांचेवर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक १४.०१.२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. वसंत संपतराव मुंडे, रा. गौरीकुंज, मार्केट, परळी वैजनाथ, ता. परळी वैजनाथ, जि. बीड

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३५०

निर्णय दिनांक १४.०१.२०१०

१ श्री. भगवान फकिरचंद हिवाळे, : अपिलार्थी

रा. मांजरी, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा

गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, गंगापूर,

जि. औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा प्रतिवादी

शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद :

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३.०१.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून, या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित वेळेत न देता त्यांच्याकडून अव्वाच्या सव्वा शुल्क आकारण्यात आले, दिलेली माहिती अपूर्ण व विहित कालावधीत न मिळाल्यामुळे संबंधितांवर योग्य ती शास्ती लावण्यात यावी व त्यांनी भरलेले शुल्क परत देऊन त्यांना पूर्ण स्वरुपात माहिती विनामूल्य देण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयातर्फे दिनांक २६.०४.२००८ ते ०५.०५.२००८ व ०५.०६.२००८ ते १३.०६.२००८ या कालावधीमध्ये घेण्यात आलेल्या शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी

केलेली आर्थिक तरतूद व तिचा विनियोग या संदर्भात एकूण ४ मुद्यांद्वारे काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - उपरोक्त कालावधीमध्ये प्रशिक्षणासाठी करण्यात आलेली आर्थिक तरतुद आणि तिच्या वापरासंबंधी असलेले निकष याची सत्यप्रत, सदरील प्रशिक्षणातील प्रशिक्षणार्थींना प्रवासभत्ता वाटप केलेल्या रजिस्टरची सत्यप्रत, दोन्ही प्रशिक्षणासाठी चहा व नाष्टाची व्यवस्था करण्याकरिता निविदा स्थानिक वर्तमानपत्रातून जाहिरात देऊन मागविण्यात आल्या होत्या काय? असल्यास त्याची प्रत तसेच आलेल्या निविदाची पाकिटे कोणासमक्ष उघडली त्या पाकिटांची सत्यप्रत आणि सर्व शिक्षक संघटनांशी नाश्त्यासंदर्भात सहविचार बैठकीमध्ये चर्चा केली असल्यास अथवा शिक्षक सेनेच्या निवेदनाला उत्तर दिले असल्यास त्यांची सत्यप्रत - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. १९१२/- इतके चलनाद्वारे भरण्याचे सूचित केले व चलनाची प्रत त्यांच्या कार्यालयात जमा केल्यानंतर त्यांना रजिस्टर्ड पोस्टाने माहिती पाठविण्याचे आश्वासीत केले. याप्रमाणे अपिलार्थीने दिनांक २५.०७.२००८ रोजी या शुल्काचा भरणा औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत केला. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८.०८.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेला नाही. मात्र यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी तत्कालीन जन माहिती अधिकारी हजर आणि जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या प्रकरणाशी संबंधित माहिती त्यांना दिनांक २१.०८.२००८ रोजी दिल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीच्या दिनांक १२.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत दिनांक ०५.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद दिला. तथापि त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा तपशील, जो त्यांनी अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (३) (क) प्रमाणे देणे अनिवार्य आहे, तो या पत्रामध्ये दिलेला नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उद्देशून लिहिलेले दिनांक ०५.०७.२००८ रोजीचे पत्र अवैध होत आहे. परिणामी जन माहिती अधिकारी यांनी आता अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. १९१२/- इतके त्यांना अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत परत करावे लागेल. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २१-०८-२००८ रोजी माहिती दिल्याचे आयोगास अवगत केले आहे. ही माहिती अपूर्ण असल्याचे अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये नमूद केले आहे. तथापि नेमकी कोणती माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही, यासंदर्भात त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये कोणताही लेखी खुलासा केलेला नाही अथवा या संदर्भात तोंडी युक्तिवाद करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. हे पाहता, अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना आयोगास कोणतेही आदेश देता येत नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. १९१२/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत परत करावे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक १४.०१.२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. भगवान फकिरचंद हिवाळे, रा. मांजरी, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, गंगापूर, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६४४

निर्णय दिनांक १४-०१-२०१०

१ श्री. पांडुरंग निवृत्तीराव मोने, : अपिलार्थी

अंबाली निवास, समतानगर, औरंगाबाद

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी

तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा जिल्हाधिकारी, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : निवासी उपजिल्हाधिकारी, औरंगाबाद

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०३-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे, प्रतिनिधी हजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक १४-०१-२०१० रोजीचे पत्र सादर केले असून या पत्रामध्ये त्यांनी या प्रकरणाशी संबंधित मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त

झाल्याने विचाराधीन अपील ते मागे घेत असल्याचे नमूद केले आहे. या पत्रामध्ये अपिलार्थीने आयोगास विचाराधीन अपील रद्द करण्यात यावे अशी विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीने त्यांचे आयोगाकडे केलेले विचाराधीन अपील आता मागे घेतले असल्यामुळे व ते रद्द करण्याची विनंती आयोगास केली असल्यामुळे, अपिलार्थीने आयोगाकडे केलेले विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक १४-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. पांडुरंग निवृत्तीराव मोने, अंबाली निवास, समतानगर, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८६५

निर्णय दिनांक १४-०१-२०१०

१ श्री. उमाकांत गणपतराव रोट्टे, : अपिलार्थी

शिवगण निवास, सत्ताने निवासासमोर, बिदर रोड, उदगीर,

तालुका उदगीर, जिल्हा लातूर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी

तथा विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी, राज्य परिवहन

महामंडळ, लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, लातूर

त्रयस्थ पक्ष : १) श्री. एस. टी. मोतीबने २) श्री. बी. एन. कोळी

३) श्री. एस. एस. कज्जेवाड ४) एन. एल. तिकटे

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-१०-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ - त्रयस्थ पक्ष श्री. एन. एल. तिकटे यांनी ए. टी. आय. परीक्षेसाठी भरुन घेण्यात आलेल्या फार्मची सत्यप्रत, मुद्दा क्रमांक ७ - अहवाल क्रमांक ४८ दिनांक १९-०३-२००३ व अहवाल क्रमांक २१ दिनांक २८-०४-२००३ यांच्या सत्यप्रतीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ०३-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात एकूण ८ मुद्दयाव्दारे सन २००१, २००३ व २००८ शी संबंधित काही माहिती रजिस्टर्ड पोस्टाने मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २३-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ११-०८-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थी सुनावणीसाठी अनुपस्थित असल्याने अपिलार्थीचे अपील निकाली काढल्याचे अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ११-०८-२००८ रोजीच्या पत्राव्दारे कळविले. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व अपिलार्थी, त्रयस्थ पक्ष गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठी-च्या मूळ अर्जास प्रतिसाद म्हणून त्यांच्या दिनांक २३-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १२० इतके त्यांना त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. त्यानंतर अपिलार्थीने आवश्यक त्या रकमेचा भरणा केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०३-०७-२००८ रोजी त्यांना अपेक्षित माहिती पुरविली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी अथवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०३-०७-२००८ रोजी त्यांना आवश्यक असलेली पूर्ण माहिती पुरविली आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये ज्या माहितीची मागणी केली आहे त्या माहितीचा समावेश जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०३-०७-२००८ रोजी पुरविलेल्या माहितीमध्ये आहे. त्यामुळे आता अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

या प्रकरणी जरी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद देऊन या संदर्भात योग्य कार्यवाही केली असली तरीही अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविताना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २३-०६-२००८ रोजीच्या पत्रामध्ये, अपिलार्थीस देण्यात येणा-या माहितीच्या प्रतिपृष्ठाचा दर, पृष्ठांची संख्या व त्याकरिता लागणारा टपालखर्च हा तपशील जो त्यांनी अधिनियमातील कलम ७ (३) (क) प्रमाणे अपिलार्थीस देणे अनिवार्य होते, तो दिला नाही. त्यामुळे त्यांचे दिनांक २३-०६-२००८ रोजीचे पत्र अवैध होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीकडून माहितीपोटीचे त्यांनी स्वीकारलेले शुल्क रुपये १२० इतके अपिलार्थीस आता परत करावे लागेल. सबब हे शुल्क त्यांनी हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत अपिलार्थीस परत करावे, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रुपये १२० इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक १४-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. उमाकांत गणपतराव रोट्टे, शिवगण निवास, सत्ताने निवासासमोर, बिदर रोड, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी, राज्य परिवहन महामंडळ, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१३४

निर्णय दिनांक १४.०१.२०१०

१ श्री. गणेशसिंह प्रकाशसिंह रघुवंशी, : अपिलार्थी

रा. गणपती गल्ली, घडी टॉवरजवळ, सेलू, जि. परभणी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा

मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय,

सेलू, जि. परभणी

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

मुख्याधिकारी, नगर,परिषद, सेलू, जि. परभणी

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : प्रमुख लिपीक, नगर परिषद कार्यालय, सेलू, जि. परभणी

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून, या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २७.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, सेलू नगर परिषदेने सन २००१ ते २००८ या कालावधीमध्ये घेतलेल्या सर्व स्थायी समितीच्या सभा, सर्वसाधारण सभा, विशेष सभा ज्या सभेमध्ये घेतलेले ऐन

वेळेच्या सर्व ठरावांची सविस्तर माहिती (इतर विषय) व या कालावधीत किती सभा झाल्या याची सविस्तर माहिती, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २४.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जामध्ये मागणी केलेली माहिती पुरविली व अपिलार्थीस सन २००१ ते २००८ या कालावधीमध्ये घेतलेल्या सर्वसाधारण सभा, विशेष सभा, स्थायी समिती अशी आर्थिक सांखिकी स्वरुपाची माहिती अपिलार्थीस कळवली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४.११.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०३.१२.२००८ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले. यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ११.१२.२००८ रोजी परत तीच माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आणि जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली संपूर्ण माहिती त्यांना दिनांक २४.०९.२००८ व ११.१२.२००८ रोजी पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही बऱ्याच अंशी मोघम स्वरुपाची आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील सेलू नगर परिषदेत सन २००१ ते २००८ या कालावधीमध्ये किती सभा झाल्या या मुद्याव्यतिरिक्त

उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती ही मोघम स्वरुपाची असल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीने या अर्जाद्वारे 'ठरावाची सविस्तर माहिती' अशाप्रकारची माहिती मागितली आहे. 'सविस्तर माहिती' म्हणजे नेमकी कोणत्या मुद्यांवरची माहिती त्यांना हवी आहे, हे अपिलार्थीने या अर्जामध्ये स्पष्ट केलेले नाही. जर अपिलार्थीस या ठरावाच्या प्रती आवश्यक असतील तर त्यांनी या " ठरावाची झेरॉक्स प्रत " अशा स्वरुपाची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागावयास हवी होती. परंतु अपिलार्थीने तसे न करता केवळ सविस्तर माहिती या सर्वसाधारण शब्दांद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितलेली आहे. ही माहिती मोघम स्वरुपाची असल्यामुळे, ती अधिनियमातील तरतुदीशी विसंगत असल्याचे सिध्द होत आहे. त्यामुळे ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांना देय असलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविली असल्यामुळे, आता अपिलार्थीस माहिती देण्यासाठी आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीस देय असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून पुरविली गेली असल्यामुळे व अपिलार्थीस निश्चितपणे जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणती माहिती हवी आहे, याचा खुलासा त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये केला नसल्यामुळे किंवा, हा मुद्दा स्पष्ट करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नसल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक १४.०१.२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गणेशसिंह प्रकाशसिंह रघुवंशी, रा. गणपती गल्ली, घडी टॉवरजवळ, सेलू, जि. परभणी

२ जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपीक, नगर परिषद कार्यालय, सेलू, जि. परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर,परिषद, सेलू, जि. परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१३५

निर्णय दिनांक १४.०१.२०१०

१ श्रीमती आनंदीबाई शिवाजी गाडेकर, : अपिलार्थी

रा. काटी, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा

तलाठी, मौजे काटी, ता. तुळजापूर,

जि. उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

तहसीलदार, तुळजापूर, जि. उस्मानाबाद

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना या विषयाशी संबंधित माहिती मौजे काटी येथील जमीन गट नंबर ११२८ व ११३२ या गटावर नांवे दाखल करण्यासाठी हवी असून, नाव दाखल करण्यासंदर्भात अतिरिक्त जिल्हाधिकारी यांनी दिनांक २१.०२.२००४ रोजी व तहसीलदार, तुळजापूर यांनी दिनांक ०७.१०.२००७ रोजी दिलेल्या आदेशाप्रमाणे त्यांच्या जमिनीच्या ७/१२ वर नाव दाखल करुन घेण्यासाठी त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २६.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून खालीलप्रमाणे माहिती मागविली होती.

"मौजे काटी येथील जमीन गट नं. ११२८ व ११३२ मध्ये दिवाणी दावा क्र. ५९/९५ मध्ये सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ट उस्मानाबाद दिनांक ०२.०३.१९९५ रोजीचा , निकालाचा आधार घेऊन मा. अप्पर जिल्हाधिकारी, उस्मानाबाद क्र. ८७/आर टी एस/५९/२००१ दिनांक २१.०२.२००४ रोजी आदेश. आनंदीबाई व तिच्या दोन मुली अनुक्रमे ज्योती व स्वाती यांची मालकी हक्कात फेर क्रमांक ८०२ मंजूर झाला असून त्या आदेशाच्या नियमानुसार अमलबजावणीसाठी मा. तहसीलदार तुळजापूर यांनी दिनांक ०७.१०.२००७ रोजीच्या निर्णयाप्रमाणे अम्मल दाखल करुन ७/१२ वर मालकी हक्कात नोंदीचा ७/१२ मिळावा".

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २६.०५.२००८ रोजी तहसीलदार, तुळजापूर यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर उपविभागीय अधिकारी, उस्मानाबाद यांनी दिनांक ०८.०८.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील नामंजूर केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आणि अपिलार्थी या अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून निश्चितपणे कोणती माहिती हवी आहे, याचा त्यांना बोध होऊ शकत नाही. तसेच अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये केलेली विनंती मान्य झाली असून, अपिलार्थीच्या पतीच्या मालकीच्या जमिनीवर आता

अपिलार्थी यांच्या दोन मुली अनुक्रमे स्वाती व ज्योती यांच्या नावाच्या नोंदीवर दिनांक ०६.०६.२००९ रोजी निर्णय घेण्यात आला असून, त्याप्रमाणे त्यांच्या नावाची ७/१२ वर नोंद घेतली आहे व दुरुस्त ७ / १२ च्या उताऱ्याची प्रत अपिलार्थी या त्यांच्याकडून अंदाजे दोन महिन्यापूर्वी घेऊन गेल्या आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणत्याही स्वरुपाची माहिती मागितली नसून, श्री गाडेकर यांच्या मालकीच्या जमिनीवर त्यांच्या हक्काची नोंद करुन घेण्यासाठी केलेली ती एक विनंती आहे. अपिलार्थीची ही विनंती मान्य होऊन अपिलार्थीस ७ /१२ चा सुधारित उतारा संबंधित तलाठी, मौजे काटी, तालुका तुळजापूर यांनी व्यक्तिशः हस्तांतर केला आहे. या प्रकरणी मूळात अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्ती बाहेरची असल्यामुळे, अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. त्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक १४.०१.२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्रीमती आनंदीबाई शिवाजी गाडेकर, मु.पो. काटी, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा तलाठी, मौजे काटी, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तुळजापूर, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१३६

निर्णय दिनांक १४.०१.२०१०

१ श्री. बाबुराव ग्यानबा वावरे, : अपिलार्थी

मु.पो. हावरगांव, ता. कळंब, जि. उस्मानाबाद

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा

तहसीलदार, तहसील कार्यालय,

कळंब, जि. उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

उपविभागीय अधिकारी, भूम, जि. उस्मानाबाद

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१.०२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने आणि जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न पुरविल्याने व दिलेली माहिती चुकीची, खोटी व दिशाभूल करणारी असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ११.०६.२००७ रोजीचा मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांनी तहसील कार्यालयात सादर केलेल्या दिनांक १४.१२.२००६ , २६.०४.२००७ व २३.०५.२००७ रोजीच्या अर्जांवर कार्यवाही करण्यासाठी होणाऱ्या दिरंगाई

बाबतची कारणे आणि मौजे हावरगांव येथील अपील क्रमांक १० / ९५ बाबु भगवान वगैरे उस्मानाबाद न्यायालयातील निकालपत्र व डिक्री व संबंधित इतर कागदपत्रे आधारे अर्जदाराच्या नावे स्वतः फेरफार करण्याबाबत, अशी माहिती मागविली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीने सदरचा अर्ज तहसीलदार यांना उद्देशून केला होता. तथापि या प्रकरणी गाव कामगार तलाठी, हावरगांव हे माहिती अधिकारी असल्यामुळे, त्यांनी त्या अर्जाची प्रत अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीप्रमाणे तलाठी, हवरगांव यांच्याकडे दिनांक १३.०६.२००७ रोजीच्या पत्राद्वारे पाठविली. तथापि संबंधित तलाठ्याने या अर्जास कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक १३.०९.२००७ रोजी उपविभागीय अधिकारी, भूम यांच्याकडे प्रथम अपील केले. त्यांनी त्यांच्या दिनांक ०१.१०.२००७ रोजीच्या निर्णयाद्वारे अपिलार्थीस तहसीलदार, कळंब यांच्याकडे प्रथम अपील करण्याच्या सूचना केल्या. या अपील अर्जावर तहसीलदार, कळंब यांनी दिलेला निर्णय आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेला नाही. तथापि यानंतर अपिलार्थीने दिनांक २१.०२. २००८ रोजी वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण २ मुद्यांवर कथित माहिती मागितली आहे. त्यापैकी पहिल्या मुद्याद्वारे त्यांना, त्यांनी तहसील कार्यालयाकडे दिनांक १४.१२.२००६, २६.०४.२००७ व २३.०५.२००७ रोजी केलेल्या अर्जांवर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून केल्या गेलेल्या निर्णयाबाबतच्या अंमलबजावणीच्या दिरंगाईची कारणे अपेक्षित आहेत. या मुद्यावर असे स्पष्ट करण्यात येत आहे की, माहिती अधिकार अधिनियम

२००५ मधील तरतुदीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रत्यक्षात जी माहिती उपलब्ध आहे, तीच त्यांनी अर्जदारास देण्याकरिता अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे, अशाप्रकारची प्रक्रिया अभिप्रेत आहे. जन माहिती अधिकारी यांनी घेतलेला एखादा निर्णय अथवा त्यांच्या अर्जात संदर्भित केलेल्या विषयावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे कारण व स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील पहिल्या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ चे अवलोकन केले असता, त्यामध्ये अपिलार्थीने "न्यायालय निर्णयाप्रमाणे अर्जदाराच्या नावाने स्वतः फेरफार करण्याबाबत" अशी माहिती मागविली आहे. ही माहिती नसून, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना केलेली विनंती आहे. अशाप्रकारच्या विनंतीचा समावेश माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट होऊ शकत नाही. त्यामुळे या मुद्यावरील माहिती देखिल अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही.

अपिलार्थीच्या मूळ अर्जातील दोन्ही मुद्यांचे वरील परिच्छेदामध्ये केलेले विश्लेषण पाहता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती देय असल्याचे सिध्द होत नसल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक १४.०१.२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बाबुराव ग्यानबा वावरे, मु.पो. हावरगांव, ता. कळंब, जि. उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, कळंब, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, भूम, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१३७

निर्णय दिनांक १४-०१-२०१०

१ श्री. नारायण कुंडलिक घुगे, : अपिलार्थी

रा. टाकळी, तालुका केज, जिल्हा बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी

तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बीड,

तालुका जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कक्ष अधिकारी, पंचायत समिती, बीड, तालुका जिल्हा बीड

जन अपिलीय अधिकारी : गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बीड, तालुका जिल्हा बीड

त्रयस्थ पक्ष : श्री. बाबासाहेब मारुती गित्ते

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपुरी, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस सात

दिवसाच्या आत संपूर्ण माहिती देण्याचे आदेशित केले असता अद्यापपर्यंत जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांच्यावर शिस्तभंगविषयक अथवा अधिनियमातील कलम २० प्रमाणे शास्तीची कारवाई करावी, अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक १६-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. बाबासाहेब मारुती गित्ते यांच्यासंदर्भात एकूण १५ मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २५-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १६-०८-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस उर्वरित माहिती सात दिवसाच्या आत द्यावी असे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २५-०८-२००८ रोजी माहिती पुरविली. तथापि ही माहिती पूर्ण नसल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस प्रथमत: दिनांक २५-०६-२००८ रोजी व तदनंतर दिनांक २५-०८-२००८ त्यांच्याकडील उपलब्ध माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अपील अर्जामध्ये उपस्थित केलेल्या सर्व मुद्दयांचा ऊहापोह जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १६-०८-२००८ रोजीच्या निर्णयामध्ये केला असून या निर्णयाव्दारे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १० ते १४ च्या संदर्भात सात दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले आहे. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २५-०८-२००८ रोजी अपिलार्थीस ही माहिती पुरविली आहे. तथापि ही माहिती अपूर्ण असल्याचे अपिलार्थीचे म्हणणे आहे. परंतु ही प्राप्त माहिती अपूर्ण कशी आहे हे आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांनी स्पष्ट केलेले नाही अथवा यासंदर्भात त्याचा खुलासा करण्यासाठी ते आयोगासमोर उपस्थित नाहीत. त्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत. या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २५-०६-२००८ रोजी व तदनंतर दिनांक २५-०८-२००८ रोजी माहिती पुरविल्याचे आढळून येत आहे. अपिलार्थीचा माहितीसाठीचा जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेला अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक १६-०५-२००८ रोजी प्राप्त झाला आहे. त्यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १५-०६-२००८ रोजी अगर तत्पूर्वी त्यांना अधिनियमातील कलम ७ च्या तरतुदींचे अनुपालन करुन संपूर्ण माहिती देणे अभिप्रेत होते. परंतु जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः दहा दिवसाच्या विलंबाने आणि अपूर्ण माहिती पुरविली असून जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १६-०८-२००८ रोजीच्या निर्णयामध्ये निष्कर्ष काढलेली आणि उर्वरित माहिती दिनांक २५-०८-२००८ रोजी अपिलार्थीस दिल्याचे त्यांनी आयोगासमोर कबूल केले आहे, हे पाहता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः विलंबाने व अपूर्ण माहिती दिली असल्याचे निःसंशयपणे सिध्द होत असल्याने ते अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र होत आहेत. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना संबंधित जन माहिती

अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक १४-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. नारायण कुंडलिक घुगे, रा. टाकळी, तालुका केज, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, बीड, तालुका जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बीड, तालुका जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१३८

निर्णय दिनांक १४-०१-२०१०

१ श्री. चंगेडे शशिकांत पेमराज, : अपिलार्थी

३४६३, खिस्त गल्ली, अहमदनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी

तथा कार्यकारी अभियंता, जागतिक बँक प्रकल्प विभाग,

पुणे

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,

पुणे

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासाठी जाणुनबुजून टाळाटाळ केली आणि त्यांच्या सोईने त्यांना पुणे माहिती आयुक्तांकडे अपील करण्यास कळविले त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक १०-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे पुणे शिरुर रस्त्याबाबत सन २००५ ते २००७ या कालावधीशी संबंधित खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"१. आपल्या कार्यालयाकडे माझे मागणी पत्रानुसार मुदतीत माहिती अधिकारानुसार मागितलेली माहिती दिली नाही म्हणून प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या आदेशा-नुसार किती मुल्याची माहिती मला विनामूल्य देण्यात आली व सदर रक्कम कोणी कोणत्या सरकारी खात्यात कोणत्या चलनानुसार सरकार जमा केली त्या अधिका-याचे नांव व सदर चलनाच्या सत्यप्रती द्याव्यात.

२. पुणे शिरुर या रस्त्याच्या दोन्ही बाजुने साईन पट्टया या निविदेतील शर्तीनियमानुसार झाल्या आहेत त्या प्रमाणित केलेल्या कागदपत्राच्या सत्यप्रती दयाव्यात.

३. सदर रस्त्यावरील दैंनदिन कामाकरिता निवेदेतील शर्तीनुसार काम रोजच्या रोज होत आहे याबाबतच्या पहाणी अहवालाच्या व ठेकेदाराशी झालेल्या त्याबाबतच्या पत्रव्यवहाराच्या सत्यप्रती द्याव्यात.

४. सदर रस्त्याची पाहणी R.T.I. च्या कलमानुसार खात्याकडील संबंधीत अधिकारी तसेच ठेकेदाराच्या सह करण्याकरिता वेळ द्यावी."

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०६-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०४-२००८ रोजी प्रथम अपील

केले. सदर अपील करताना अपिलार्थीने ' खात्याचा कारभार पारदर्शी नाही ' या कारणास्तव जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २६-०५-२००८ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश पारीत केले. अपिलार्थीस हे आदेश दिनांक २३-०७-२००८ रोजी प्राप्त झाल्याचे अभिप्राय अपिलार्थीने आयोगाकडे दाखल केलेल्या अर्जामध्ये नोंदविले आहेत. या आदेशामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी रस्त्याची संयुक्त पाहणी करणे हे माहिती अधिकारात अपेक्षित नाही असे नमूद करुन अपिलार्थीचे अपील निकाली काढले आहे. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मुद्दा क्रमांक १ व २ व्दारे मोघम स्वरुपात माहिती मागितली आहे. यापैकी मुद्दा क्रमांक १ मध्ये त्यांनी आपल्या पत्राचा कोणताही संदर्भ जन माहिती अधिकारी यांना दिलेला नाही. त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या नेमक्या कोणत्या पत्राच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अपेक्षित आहे याचा बोध होत नाही. परिणामी अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक २ व्दारे अपिलार्थीने पुणे शिरुर रस्त्याच्या दोनही बाजूस साईन पट्ट्या निविदेतील शर्तीप्रमाणे झाल्या-बाबतची माहिती मागितली आहे. तथापि अशा प्रकारचा तपशील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संबंधित कार्यालयाकडे ठेवला जात नाहीत. मात्र उद्योजकासोबत करण्यात आलेल्या करारनाम्या-तील अट क्रमांक ४.२१ नुसार उद्योजकाने सादर केलेल्या प्रती अशा स्वरुपाची माहिती मागता येते.

तथापि अशा स्वरुपाच्या माहितीची मागणी केली नसल्याने अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे असणे संभवत नाही. त्यामुळे अपिलार्थीस मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व्दारे, ठेकेदाराबरोबर जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या पत्रव्यवहारा-च्या प्रती मागितल्या आहेत. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या मुद्दयावरील माहितीपोटीचे शुल्क म्हणून रुपये १६ इतके त्यांच्या कार्यालयात जमा करण्याचे सूचित केले आहे. तथापि अपिलार्थीने अशा प्रकारची कार्यवाही केली नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे या मुद्दयावरील माहिती त्यांना आवश्यक असेल तर त्यांनी या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे करुन आवश्यक ती कागदपत्रे जन माहिती अधिकारी यांच्याकडून हस्तगत करुन घ्यावीत, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ४ व्दारे पुणे शिरुर रस्त्याची अधिकारी आणि ठेकेदारासह पाहणी करण्यासाठी वेळ मागितली आहे. अपिलार्थीची ही विनंती माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या " माहिती " या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची आहे. त्यामुळे याही मुद्दयावर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती देय होत नाही. यासंदर्भात माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ञ) मध्ये "माहितीचा अधिकार" या संज्ञेची व्याख्या पुरेशा प्रमाणात स्पष्ट केली आहे. ज्यामध्ये कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली किंवा त्याच्या नियंत्रणात असलेली व या अधिनियमान्वये मिळवता येण्याजोगी माहिती मिळवण्याचा अधिकार, असे नमूद केले आहे व याच्या व्याप्तीमध्ये एखादे काम, दस्तऐवज, अभिलेख यांची पाहणी, दस्ताऐवजांच्या किंवा अभिलेखांच्या टिपण्या, उतारे किंवा प्रमाणित प्रती घेणे अशा प्रकारच्या प्रक्रियांचा समावेश आहे. त्यामुळे अपिलार्थीस पुणे शिरुर या रस्त्याची पाहणी करता येईल. याकरिता अपिलार्थीस या रस्त्याची पाहणी कोणत्या प्रकारे करावयाची हे प्रथमतः जन माहिती अधिकारी यांना स्पष्ट करणे भाग आहे व यानंतर या प्रकरणी संबंधितांनी आपापसात रस्त्याची

पाहणी करण्यासंभर्भात निर्णय घ्यावा, असे अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक १४-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. चंगेडे शशिकांत पेमराज, ३४६३, खिस्त गल्ली, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जागतिक बँक प्रकल्प विभाग, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१३९

निर्णय दिनांक १४-०१-२०१०

१ श्री. दुष्यंतकुमार कल्याणकर, : अपिलार्थी

व्दारा- मनोज वैद्य, प्लॉट नं. १, " योगीराज अपार्टमेंट "

लिमयेवाडी, मित्रनगर, सेवा हॉस्पिटलच्या बाजूला,

सिंधी कॉलनी, औरंगाबाद

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी

तथा संचालक, मिलेनियम इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट,

मौलाना आझाद एज्युकेशन ट्रस्ट, रोझाबाग, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी

मिलेनियम इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट,

मौलाना आझाद एज्युकेशन ट्रस्ट, रोझाबाग,

औरंगाबाद

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०७-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिली नाही तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ०२-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार श्री. शेख सलीम, संचालक, मिलेनियम इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, मौलाना आझाद एज्युकेशन ट्रस्ट, औरंगाबाद यांच्याकडे एकूण ११ मुद्दयासंदर्भात काही माहिती मागितली होती. तथापि संचालक, मिलेनियम इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, मौलाना आझाद एज्युकेशन ट्रस्ट, औरंगाबाद यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार परत त्याच संस्थेकडे दिनांक २५-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावरही निर्णय न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने मिलेनियम इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, मौलाना आझाद एज्युकेशन ट्रस्ट या सार्वजनिक संस्थेकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती मागितल्याचे आढळून येत आहे. या प्रकरणी मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांच्याकडील पिटीशन क्रमांक ५२९४/२००८, दिनांक २८-०४-२००९ रोजी मुख्य विश्वस्त गोविंद रामनंद सद्गुरु महाराज रामदासी संस्थान, साखरखेर्डा, जिल्हा बुलढाणा विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूर यांच्या संदर्भात दिलेला निर्णय या प्रकरणी विचारात घेणे आयोगास अगत्याचे वाटते. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालयाने धर्मादाय आयुक्तांकडे नोंद झालेल्या सार्वजनिक संस्थांच्याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले आहेत.

"..... It is , therefore, clear from the provisions of this definition that the Act cannot apply to the Public Trust. Any public trust, therefore, is not at all covered by the definition of the public authority. ..... If any person interested in the information of the trust, he can definitely apply to the Charity Commissioner under the provisions of the Public Trust Act to have such information, which the Charity Commissioner may deem fit to be provided. But as far as Right to Information Act is concerned, there is no need for any public trust to appoint any Information Officer and to entertain any such application under the Right to Information Act."

मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांच्या वरील अभिप्रायाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीने ज्या प्राधिकरणाकडे माहिती मागितली आहे ते प्राधिकरण माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) मधील " सार्वजनिक प्राधिकरण " या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरचे असल्यामुळे आणि माहिती अधिकार अधिनियम २००५ संबंधित संस्थेस लागू होत नसल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक १४-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दुष्यंतकुमार कल्याणकर, व्दारा- मनोज वैद्य, प्लॉट नं. १, " योगीराज अपार्टमेंट " लिमयेवाडी, मित्रनगर, सेवा हॉस्पिटलच्या बाजूला, सिंधी कॉलनी, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा संचालक, मिलेनियम इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, मौलाना आझाद एज्युकेशन ट्रस्ट, रोझाबाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी, मिलेनियम इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, मौलाना आझाद एज्युकेशन ट्रस्ट, रोझाबाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१४०

निर्णय दिनांक १४-०१-२०१०

१ श्री. मिलिंद वसंतराव वानखेडे, : अपिलार्थी

घर नं. ४-८-४८, सिध्देश्वर मंदिराजवळ, सिध्दनाथपुरी,

नांदेड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी

तथा उप अभियंता, पाणीपुरवठा, महानगरपालिका, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा अभियंता, पाणीपुरवठा, महानगरपालिका, नांदेड

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना अर्धवट, अपुरी व असमाधानकारक माहिती दिली असल्यामुळे आणि तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेताच निकाल दिला असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ०६-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे वॉर्ड क्रमांक ५४ मधील पाणीपुरवठ्यासंदर्भात एकूण तीन मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - वॉर्ड क्रमांक ५४ मध्ये सिध्देश्वर मंदिर या रस्त्यावर महानगरपालिकेच्या किती पाईपलाईन आहेत. त्यामध्ये खाजगी पाईपलाईन

दिली आहे काय, असल्यास पूर्ण तपशील, वार्ड क्रमांक ५४ मध्ये विंधन विहिरातून दिलेल्या जोडण्या किती जणांना दिल्या आहेत, ते त्यांच्या या जोडण्यासाठी वेगळा कर भरतात का, वार्ड क्रमांक ५४ मध्ये एका घरामध्ये २, ३ कनेक्शन दिले आहे का, असल्याचा तपशील किंवा बेकायदेशीर जोडण्या का काढल्या नाहीत - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून पोस्टाने मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न देता अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०३-१२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे काही माहिती दिली व अपिलार्थीस पाणीपुरवठ्यात सुधारणा होण्याचे आश्वासीत केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या एकूण तीन मुद्दयावरील माहितीपैकी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ मधील, वॉर्ड क्रमांक ५४ मध्ये सिध्देश्वर मंदिर मार्गावरील महानगरपालिकेच्या पाईपलाईनची संख्या व मुद्दा क्रमांक २, वार्ड क्रमांक ५४ मधील विंधन विहिरीची संख्या हा भाग वगळता उर्वरित कोणत्याही मुद्दयावर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती देय होत नाही. कारण माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे

अभिप्राय व मते अपेक्षित करणारी माहिती मागणे हे अधिनियमातील तरतुदीमध्ये अभिप्रेत नाही. अपिलार्थीने अशा प्रकारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ पूर्ण व मुद्दा क्रमांक १ व २ मधील उर्वरित भागाव्दारे त्यांची मते अपेक्षित करणारी माहिती मागितली आहे. अधिनियमातील तरतुदीशी अशा प्रकारची माहिती विसंगत असल्याने ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अशा प्रकारे अपिलार्थीस त्यांना देय असलेली माहिती जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०३-१२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे पुरविली आहे. तथापि ही माहिती अर्धवट, अपुरी व असाधानकारक आहे असा अपिलार्थीचा समज आहे. परंतु त्यांच्या विधानाच्यापृष्ठ्यर्थ कोणताही लेखी पुरावा त्यांनी त्यांच्या व्दितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही. तसेच त्यांना दिनांक ०३-१२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे दिलेली माहिती असमाधानकारक का वाटते याचे स्पष्टीकरण करण्यासाठी देखील ते आयोगासमोर आज रोजी उपस्थित नाहीत, हे पाहता, आवश्यक त्या कागदपत्राच्या अभावी अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक १४-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मिलिंद वसंतराव वानखेडे, घर नं. ४-८-४८, सिध्देश्वर मंदिराजवळ, सिध्दनाथपुरी, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, पाणीपुरवठा, नांदेड वाघाळा शहर

महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अभियंता, पाणीपुरवठा, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५९३
निर्णय दिनांक १५/०१/२०१०

१ श्री. अशोक चिंधु ढिवरे, : अपिलार्थी
चेअरमन,
नालंदा सहकारी पतपेढी मर्यादित, धुळे

विरुध्द

१ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
तालुका उपनिबंधक,
सहकारी संस्था, धुळे तालुका धुळे

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३.०१.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी श्री. संतोष महादु बागले यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार दिनांक १३.१०.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे चेअरमन, नालंदा सहकारी पतपेढी मर्या., धुळे यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर पतसंस्थेच्या चेअरमन यांनी त्यांच्या दि. १५.१०.२००८ रोजीच्या पत्रान्वये, अधिनियमातील काही तरतुदींचा आधार घेऊन अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले. या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे तालुका धुळे यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दिनांक २४.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे तालुका धुळे यांनी सुनावणी घेऊन दि. १२.१०.२००८ रोजी आपले आदेश पारित केले. याव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील मान्य केले व त्यांनी मागणी केलेली माहिती विनामूल्य उपलब्ध करुन देण्याचे चेअरमन / व्यवस्थापक, नालंदा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित यांना आदेशित केले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाविरुध्द चेअरमन, नालंदा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित यांनी वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे तालुका धुळे यांचे प्रतिनिधी हे उपस्थित आहेत.

या संदर्भात संबंधित उपस्थितांच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने "नियंत्रण" व "वित्तिय सहाय्य" या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. हेच विवेचन सहकारी पतसंस्थांना देखील लावल्यास असे दिसून येते की, सहकारी पतसंस्थांना देखील शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्राप्त होत नाही व या पतसंस्थेच्या दैनंदिन कारभारावर शासनाचे कोणतेही प्रत्यक्ष नियंत्रण नसल्याने माहिती अधिकार अधिनियम-२००५ आता, मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, पतसंस्थेस लागू होणार नाही.

या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर चेअरमन, नालंदा सहकारी पतपेढी मर्यादित, धुळे यांना मूळ अर्जदार श्री. संतोष महादु बागले यांना माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार माहिती देणे बंधनकारक असणार नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील क्र. ५९३/०९ मान्य करण्यात येत आहे.

२. उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे तालुका धुळे यांचे दि. १२.१०.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक : १५-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त,**
खंडपीठ औरंगाबाद
अपील क्र. ५९३/०९

प्रत,

१. श्री. संतोष महादु बागले, २१, उदयनगर, साक्री रोड, k.w.s. कॉलेजच्या जवळ, धुळे.

२. श्री. अशोक चिंधु ढवरे, चेअरमन, नालंदा सहकारी पतपेढी मर्यादित, १५, गोदाई कॉलनी, विद्यावर्धिनी कॉलेज मागे, साक्री रोड,धुळे.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे तालुका धुळे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५९४

निर्णय दिनांक १५/०१/२०१०

१ श्री. प्रकाश अमृतलाल चंगेडिया, रा. अहमदनगर	:	अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, श्री. महावीर ग्रामिण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या., सोनई, ता. नेवासा, जि. अहमदनगर	:	प्रतिवादी
१ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर	:	

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१.०३.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दिनांक १२.०९.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे व्यवस्थापक, श्री. महावीर ग्रामिण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या., सोनई, ता.नेवासा, जि. अहमदनगर यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर पतसंस्थेने अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम

१९(१) च्या तरतुदीनुसार दिनांक १२.११.२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि.१९.१२.२००८ रोजी पारित केले. याव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य केले व अधिनियमातील तरतुदीस अधिन राहून पुढील कार्यवाही करण्याचे व्यवस्थापक, श्री. महावीर ग्रामिण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या., सोनई, ता.नेवासा, जि. अहमदनगर यांना आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी संबंधित पतसंस्थेचे व्यवस्थापक व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच संबंधित उपस्थितांच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने "नियंत्रण" व "वित्तिय सहाय्य" या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. हेच विवेचन सहकारी पतसंस्थांना देखील लावल्यास असे दिसून येते की, सहकारी पतसंस्थांना देखील शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्राप्त होत नाही व या पतसंस्थेच्या दैनंदिन कारभारावर शासनाचे कोणतेही प्रत्यक्ष नियंत्रण नसल्याने माहिती अधिकार अधिनियम-२००५ आता मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर पतसंस्थेस लागू होणार नाही. तथापि अपिलार्थीस ते या पतसंस्थेचे सदस्य असल्यास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ३२ नुसार संबंधित पतसंस्थेकडे आवश्यक त्या दस्तऐवजाच्या प्रतींची मागणी करता येईल.

या पार्श्वभूमीवर माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे

आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१) अपील क्र. ५९४ /०९ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक : १५-०१-२०१०

(वि. बा. बोरगे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

अपील क्र. ५९४ /०९

प्रत,

१. श्री. प्रकाश अमृतलाल चंगेडिया, ३७७५, नवी पेठ, सरकारी दवाखान्याशेजारी, अहमदनगर, ता.जि. अहमदनगर.

२. व्यवस्थापक, श्री. महावीर ग्रामिण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या., सोनई, ता. नेवासा, जि. अहमदनगर.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५९५
निर्णय दिनांक १५/०१/२०१०

१ श्री. रामनाथ गणपतराव खोड : अपिलार्थी
रा. बीड

विरुध्द

१ अध्यक्ष, : प्रतिवादी
शनिमंदिर ट्रस्ट, बीड
२ जन अपिलीय अधिकारी तथा
सहायक धर्मादाय आयुक्त, बीड

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १६.०३.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. ३१.१२.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे अध्यक्ष, शनिमंदिर ट्रस्ट, बीड यांच्याकडे त्यांच्या संस्थेशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर संस्थेने अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती उपलब्ध करुन न दिल्याने अपिलार्थीने सहायक धर्मादाय आयुक्त, बीड यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि.०२.०२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर सहायक धर्मादाय आयुक्त, बीड यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. त्यांनी त्यांचा लेखी युक्तिवाद सादर केला असून त्यामध्ये असे नमूद केले आहे की, संबंधित देवस्थान ही कोणाची वैयक्तिक मालमत्ता नसून ती सार्वजनिक आहे आणि ती शासनाची मालमत्ता आहे. यासाठी लागणारा खर्च, पैसा व

देणग्या हे सार्वजनिक पध्दतीनेच जमा केले जाते. या त्यांच्या विशिष्ट अभिप्रायांबरोबर त्यांनी या देवस्थानाच्या विश्वस्तांवर कथित गैरव्यवहाराचे अनेक आरोप केले आहेत.

अपिलार्थीचा लेखी युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांना आवश्यक असलेली माहिती सहायक धर्मादाय आयुक्त, बीड यांच्याकडे नोंदणी झालेल्या एका खाजगी संस्थेकडे मागितली आहे. अशाप्रकारच्या खाजगी संस्थेच्या संदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांच्याकडील याचिका क्रमांक ५२९४/२००८ संदर्भात राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूर विरुध्द मुख्य विश्वस्त गोविंद रामनंद सद्‌गुरु महाराज रामदासी संस्थान, साखरखेर्डा यांच्या संदर्भात दि. २८.०४.२००९ रोजी निर्णय दिला आहे. तो या प्रकरणी विचारात घेणे आयोगास गरजेचे वाटते. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी दिलेल्या आदेशाचा काही भाग खालीलप्रमाणे उध्दृत केला आहे.

"..... It is, therefore, clear <u>from the provisions of this definition that the Act cannot apply to the public Trust</u>. Any public trust, therefore, is not at all covered by the definition of the public authority. ..... If any person interested in the information of the trust, he can definitely apply to the Charity Commissioner under the provisions of the public Trust Act to have such information, which the Charity commissioner may deem fit to be provided. But as far as Right to Information Act is concerned, there is no need for any public trust to appoint any Information Officer and to entertain any such application under the Right to Information Act."

मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर यांचे वरील आदेश पाहता या प्रकरणी अपिलार्थीने ज्या संस्थेकडे माहितीची मागणी केली आहे त्या संस्थेस ती सार्वजनिक प्राधिकरणाच्या

व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची असल्याने माहिती अधिकार अधिनियम मूळात लागू होत नसल्याचे दिसून येते. याचबरोबर अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या लेखी युक्तिवादावरुनही सदर संस्थान हे सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये असल्याचे सिध्द होत नाही. या प्रकरणी पुढे असेही स्पष्ट करण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त हे त्यांच्या कार्यालयाच्या संदर्भात मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भात प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार काम करु शकतात. या प्रकरणी अपिलार्थीने ज्या संस्थेकडे ही माहिती मागितली आहे ती संस्था व सहायक धर्मादाय आयुक्त हे एकाच प्राधिकरणाचे भाग नाहीत. त्यामुळे अपिलार्थीने जर ही माहिती सहायक धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली असती तर सहायक धर्मादाय आयुक्त यांनी या प्रकरणी आदेश देणे त्यांना अनुज्ञेय झाले असते. या सर्व बाबी एकत्रितपणे विचारात घेता खालीलप्रमाणे ओदश देण्यात येत आहे.

आदेश

१) अपील क्र. ५९५/०९ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक : १५/०१/२०१० **राज्य माहिती आयुक्त,**
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१) श्री. रामनाथ गणपतराव खोड, शनिमंदिर गल्ली, जुना मोंढा रोड, बीड, ता.जि. बीड.
२) अध्यक्ष, शनिमंदिर ट्रस्ट, शनिमंदिर गल्ली, पेठ, बीड, ता.जि. बीड.
३) जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बीड विभाग, बीड.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१३८
निर्णय दिनांक १५/०१/२०१०

१ श्री. नंदकुमार अनंतराव बनसोडे, : अपिलार्थी
रा.नांदेड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका
कार्यालय, नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शहर अभियंता,
सा.बा.वि. B.S.O.P., नांदेड वाघाळा शहर
महानगरपालिका, नांदेड

निर्णय

श्री. नंदकुमार अनंतराव बनसोडे यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १९.०५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १५.१०.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. ०५.१२.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ४४ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक : १५/०१/२०१० **राज्य माहिती आयुक्त,**
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नंदकुमार अनंतराव बनसोडे, एकता नगर, पावडेवाडी रोड, नांदेड ४३१६०५.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३४९

निर्णय दिनांक १५.०१.२०१०

१ श्री. प्रल्हाद कचरु मगरे, : अपिलार्थी

रा. न्यायनगर, घर नं. ४-३२-२१४, गारखेडा परिसर,

औरंगाबाद

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा

सहायक आयुक्त - २, महानगरपालिका, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

उप आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : उपायुक्त (महसूल), महानगरपालिका, औरंगाबाद

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७.०४.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून पूर्ण माहिती प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०७.११.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयाच्या आस्थापनेवरील वर्ग ४ च्या कर्मचाऱ्यांच्या सेवा ज्येष्ठता यादी संदर्भात, वर्ग ४ कर्मचाऱ्यांची जुनी ज्येष्ठता यादी पुर्वी अस्तित्वात होती, हे खरे

आहे काय, असल्यास त्याची प्रत पूर्ण द्यावी व वर्ग ४ कामगारांची नवीन ज्येष्ठता यादी तयार केल्याचे कळते त्या यादीची प्रत पूर्ण द्यावी, अशी माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १९.११.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. २४/- इतके त्यांना त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या या सूचनेप्रमाणे अपिलार्थीने दिनांक २५.११.२००८ रोजी या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात पावती क्रमांक ३११०३७ द्वारे केला. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने दिनांक ०५.०१.२००९ रोजी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २२.०१.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची ज्येष्ठता यादी विनामूल्य पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २२.०१.२००९ रोजी चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची प्रारुप ज्येष्ठता यादी विनामूल्य पुरवली. सदर यादी अपिलार्थीस प्राप्त झाल्याच्या-पृष्ठ्यर्थ जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीची पोचसही असलेला पुरावा आयोगास सादर केला आहे. यावरुन ही माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण आयोगासमोर हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून यांनी त्यांना वर्ग ४ च्या कर्मचाऱ्यांची जी ज्येष्ठतेची यादी दिली

आहे, त्यामध्ये त्यांचे नाव नाही. तसेच वर्ग ४ श्रेणीतील कर्मचाऱ्यांमध्ये पदोन्नती देताना त्यांना कनिष्ठ असलेल्या कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती दिनांक २२.०१.२००९ रोजी पुरविली आहे. त्यांनी आयोगास असा खुलासा केला आहे की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक २२.०१.२००९ रोजी प्रारुप ज्येष्ठता यादी पुरविली असून, या यादीवर त्यांनी कर्मचाऱ्यांचे आक्षेप मागविले आहेत आणि या संदर्भात प्रकरण निहाय सुनावणी घेऊन त्यांच्याकडून अंतीम निर्णय घेण्यात येणार आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक ०७.११.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहिती ही मोघम स्वरुपात व अधिनियमातील तरतुदींशी विसंगत अशी मागितली आहे. या मुद्याद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांचे मत अपेक्षित करणारी माहिती मागितली आहे. तसेच या अर्जामध्ये त्यांनी आवश्यक असलेल्या माहितीशी संबंधित कालावधीचा कोणताही उल्लेख केलेला नाही. शासनाच्या महानगरपालिकेसारख्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे वर्ग ४ च्या कर्मचाऱ्यांची ज्येष्ठतेची यादी ही दरवर्षी तयार केली जात असते आणि त्यामध्ये कालपरत्वे बदल होत असतात. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये त्यांना ज्या कालावधीशी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित आहे त्या कालावधीचा कोणताही उल्लेख केलेला नाही. त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ द्वारे, वर्ग ४ कामगारांची नवीन ज्येष्ठता यादी तयार केल्याचे त्यांना कळल्यावरुन त्या यादीची प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे. यासंदर्भात देखिल अपिलार्थीने कालावधीचा उल्लेख न केल्याने या मुद्यावरील माहिती देखिल अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. तथापि दिनांक ७.११.२००८ रोजी जन माहिती

अधिकारी यांच्याकडे प्राप्त असलेल्या वर्ग ४ कामगारांची प्रारुप ज्येष्ठता यादी त्यांनी अपिलार्थीस दिनांक २२.०१.२००९ रोजी विनामूल्य दिली आहे. त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील देय माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये त्यांना ज्या स्वरुपाचे निर्णय आयोगाकडून अपेक्षित असल्याचे स्पष्ट केले आहे त्या संदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या प्रशासकीय स्वरुपाचे निर्णय देण्याचे अधिकार आयोगास नसल्यामुळे आणि यासंदर्भात दुसरे स्वतंत्र प्राधिकरण अस्तित्वात असल्यामुळे अपिलार्थीचे नाव महानगरपालिकेच्या वर्ग ४ कामगारांच्या ज्येष्ठता यादीमध्ये घालण्यासंदर्भात अथवा त्यांना वर्ग ३ मध्ये पदोन्नती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत. यासाठी अपिलार्थीस न्याय मागण्याकरिता स्वतंत्र प्राधिकरण उपलब्ध आहे. त्या प्राधिकरणाचा वापर त्यांनी आपल्या गाऱ्हाण्याची तड लावण्याकरिता करावा, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

या प्रकरणी आयोगास असे आढळून आले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १९.११.२००८ रोजीच्या पत्रात सूचना केल्याप्रमाणे अपिलार्थीने दिनांक २५.११.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीपोटीचे शुल्क रु. २४/- इतक्या रकमेचा भरणा केला आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्यासाठी पाठविलेल्या पत्राचा दिनांक व अपिलार्थीने ही रक्कम जन माहिती अधिकारी यांच्याकडे भरल्याचा दिनांक व अधिनियमातील कलम ७ (३) (क) ची तरतूद पाहता, अपिलार्थीस दिनांक १२.१२.२००८ पर्यंत जन माहिती अधिकारी यांच्याकडून सशुल्क माहिती देय होत होती. तथापि या प्रकरणी प्रत्यक्षात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १२.१२.२००८ नंतर दिनांक २२.०१.२००९ रोजी माहिती पुरविली असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्याकडून माहितीपोटीचे घेतलेले शुल्क रु. २४ /- इतके आता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना परत करावे लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे

स्वीकारलेले शुल्क रु. २४/- इतके, त्यांना हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत परत करावे. अपिलार्थीस माहिती पाठविण्यासंदर्भात आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीस देय असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी पुरविली आहे. त्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. २४/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत परत करावे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक १५.०१.२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. प्रल्हाद कचरु मगरे, रा. न्यायनगर, घर नं. ४-३२-२१४, गारखेडा परिसर, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त - २, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (महसूल), महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३५० A

निर्णय दिनांक १५.०१.२०१०

१ श्री. गायकवाड सुभाष विठ्ठलराव, : अपिलार्थी

रा. गवळीपुरा, स्टेशन रोड, चाऊस किराणाजवळ,

घर नं. ३-२-३३६, नांदेड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा

आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

जन अपिलीय अधिकारी : शहर अभियंता, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३.०१.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून, या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर अद्यापही सुनावणी न झाल्याने आणि त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती न मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, नांदेड शहरातील चाऊस किराणा शॉप ते सुभाष गायकवाड यांच्या घरापर्यंत नालीची लांबी आणि सिमेंट कॉंक्रेटच्या रस्त्याची लांबी आणि रुंदी अशी माहिती मागविली होती. ही माहिती अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २१.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिसाद देऊन त्यांना दिनांक २९.०९.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली. तथापि प्राप्त माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६.१०.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीपैकी रस्त्याची लांबी व रुंदी कळविली नसल्याचे आयोगासमोर मान्य केले. तसेच अपिलार्थी हे व्यक्तिशः माहितीची मागणी करुन जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात किती वेळा उपस्थित झाले, अशी आयोगाने त्यांच्याकडे विचारणा केली असता, त्यांनी अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात माहिती घेऊन जाण्यासाठी स्वतः उपस्थित राहिले होते. परंतु त्यांना अंतिमतः दिनांक २९.०९.२००८ रोजी व्यक्तिशः माहिती पुरविण्यात आली, असे त्यांनी आयोगास सांगितले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचा दिनांक १६.१०.२००८ रोजीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे मूळात प्राप्त न झाल्याने ते अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणतीही सुनावणी घेऊ शकले नाहीत, असे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकरी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप इतके मर्यादीत होते की, ही माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस पूर्ण स्वरुपात एका दिवसाच्या आत पुरविण्यासाठी देखिल कोणतीही अडचण नव्हती. तथापि एवढे असूनही त्यांनी अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (१) मध्ये विहित केलेल्या कालावधीपेक्षा एक दिवस विलंबाने व अपूर्ण माहिती पुरविली आहे. अपिलार्थीने ज्या सिमेंट काँक्रीट रस्त्याची लांबी मागितली आहे तो रस्ता सिमेंट काँक्रीटचा आहे किंवा कसे, याची आयोगाने जन माहिती अधिकारी यांच्याकडे विचारणा केली असता, त्यांनी हा रस्ता अस्तित्वात असल्याचे आयोगास अवगत केले आहे. महानगरपालिकासारख्या सार्वजनिक प्राधिकरणामध्ये त्यांच्याकडे असलेल्या मालमत्तेचा तपशील जतन करुन ठेवण्याची विहित पध्दत आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी रोड रजिस्टरवर या रस्त्याची नोंद घेतली नाही काय, असे आयोगाने त्यांना विचारले असता, त्यांनी या संदर्भात रोड रजिस्टरची तपासणी केलेली नाही, असे आयोगास सांगितले. जर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील रस्त्याच्या संबंधित रजिस्टरची तपासणी केली असती तर, त्यामध्ये त्यांना या रस्त्याची लांबी व रुंदी मिळू शकली असती आणि अपिलार्थीस ते माहिती पुरवू शकले असते. अपिलार्थीस या मुद्यांवर माहिती देणे हे जन माहिती अधिकारी यांना अवघड वाटावे, असे कोणतेही कारण या प्रकरणी संभवत नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती हे आदेश निर्गमित होताच ३ दिवसाच्या आत त्यांना विनामूल्य पुरवावी.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २८.०९.२००८ रोजी त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती, त्यांना देय असताना, त्यांनी अपिलार्थीस दिनांक २९.०९.२००८ रोजी म्हणजेच अधिनियमातील तरतुदीनंतर एक दिवस विलंबाने आणि तीही अपूर्ण स्वरुपात माहिती दिली असल्याने ते अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र होत आहेत.

सबब या प्रकरणी अपिलार्थीस अपूर्ण व विलंबाने माहिती दिल्याबद्दल संबंधित जन माहिती अधिकारी यांना एक दिवसाच्या विलंबाबद्दल रु. २५० /- इतकी शास्ती लावण्यात येत आहे. या शास्तीचा भरणा त्यांनी शासकीय कोषागारामध्ये ३० एप्रिल, २०१० च्या आत खालील लेखाशिर्षामध्ये करावा.

लेखाशीर्ष - "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)"

शहर अभियंता यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी आयोगाच्या आदेशाप्रमाणे जन माहिती अधिकारी अपिलार्थीस उर्वरित माहिती देतील आणि या शास्तीचा भरणा ३० एप्रिल २०१० पर्यंत शासकीय कोषागारात करतील, असे पहावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी , अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांना या प्रकरणी एकूण रु. २५०/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक १५.०१.२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गायकवाड सुभाष विठ्ठलराव, रा. गवळीपुरा, स्टेशन रोड, चाऊस किराणाजवळ, घर नं. ३-२-३३६, नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३ जन अपिलीय अधिकारी तथा शहर अभियंता, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/ ३५१
निर्णय दिनांक १५-०१-२०१०

१ श्री. मुनव्वर अहेमद नईम अहेमद, : अपिलार्थी
द्वारा, अब्दुल माजीद, प्लॉट नं. ४०, न्यु एस.टी.
कॉलनी, कट कट गेट, औरंगाबाद

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी : शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३.०१.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून, संबंधितांवर माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० प्रमाणे कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आणि जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक १२.०१.२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर करण्यात आले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून या अपिलाशी संबंधित मूळ अर्जाद्वारे त्यांनी मागणी केलेली माहिती दिनांक १९.०३.२००९ रोजी प्राप्त झाली आहे, प्राप्त माहितीबद्दल त्यांची कोणतीही तक्रार नाही असे नमूद केले असून, या पत्राद्वारे त्यांनी आयोगास त्यांना माहिती प्राप्त झाली असल्यामुळे त्यांचे विचाराधीन अपील निकाली काढण्याची विनंती केली आहे.

अपिलार्थीच्या दिनांक १२.०१.२०१० रोजीच्या पत्राचे अवलोकन केले असता, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१. अपील क्रमांक ३५१/२००९, दिनांक ०३.०१.२००९ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक १५.०१.२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुनव्वर अहेमद नईम अहेमद, द्वारा, अब्दुल माजीद, प्लॉट नं. ४०, न्यु एस.टी. कॉलनी, कट कट गेट, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, औरंगाबाद

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३५२

निर्णय दिनांक १५.०१.२०१०

१ श्रीमती मुक्ताबाई सुंदरराव आर्डे, : अपिलार्थी
मु. मंगरुळ नं.२, पो. हारकी निमगांव, ता. माजलगांव,
जि. बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी,
कार्यालय, विशेष भू-संपादन अधिकारी, जा.प्र.क्र. ३,
अंबाजोगाई, जि. बीड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
अपर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई, जि. बीड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : विशेष भू-संपादन अधिकारी, जा.प्र.क्र. ३,
अंबाजोगाई, जि. बीड

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३.०२.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून, या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकाऱ्याने त्यांना मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अर्ज केला असता, दिनांक १६.१२.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील फेटाळले असल्यामुळे व अपेक्षित माहिती अद्यापपावेतो त्यांना प्राप्त झाली नसल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील

आयोगाकडे सादर केले आहे व तसेच या अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकाऱ्यांवर अधिनियमातील नियमाप्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाही करुन त्यांना विलंबासाठी दंडीत करण्यासाठी आदेश पारित करावे, अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे, जो जन माहिती अधिकारी यांना दिनांक २०.०९.२००८ रोजी प्राप्त झाला त्याद्वारे, जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या भू-संपादन प्रकरणी भू-संपादन कायद्यातील तरतुदीनुसार कलम १२ (२) ची नोटीस पाठविण्याचे आणि त्यांच्या संपादीत केलेल्या जमिनीचा मावेजा लवकरात लवकर द्यावा, अशी विनंती केली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १३.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन संपादन संस्थेकडून निधी प्राप्त होताच नियमाप्रमाणे मावेजा वितरणाची कार्यवाही करण्यात येईल, असे अपिलार्थीस कळवून त्यांचा प्रथम अर्ज निकाली काढला. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक १८.११.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १६.१२.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील नामंजूर केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीच्या, त्यांच्याकडे दिनांक २०.०९.२००८ रोजी प्राप्त झालेल्या अर्जास अधिनियमातील तरतुदीनुसार

दिनांक १३.१०.२००८ रोजी योग्य तो प्रतिसाद देऊन अपिलार्थीस वस्तुस्थितीची कल्पना दिली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणत्याही प्रकारची माहिती मागितली नव्हती. परंतु शासनाने त्यांच्या संपादीत केलेल्या जमिनीचा मावेजा त्यांना त्वरीत मंजूर करण्याची केलेली विनंती होती. अशाप्रकारची अपिलार्थीची विनंती, ही माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची असल्यामुळे, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा केलेला प्रथम अर्ज हा अवैध असल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीप्रमाणे विहित कालावधीत योग्य तो प्रतिसाद दिला आहे. या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक १५.०१.२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्रीमती मुक्ताबाई सुंदरराव आर्डे, मु. मंगरुळ नं.२, पो. हारकी निमगांव, ता. माजलगांव, जि. बीड

२ जन माहिती अधिकारी तथा विशेष भू-संपादन अधिकारी, जा.प्र.क्र. ३, अंबाजोगाई, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३५३

निर्णय दिनांक १५.०१.२०१०

१ सौ. कविता अ. गौर, : अपिलार्थी

रा.प्लॉट क्र. २, बिल्डींग सी-१, सारानगर, एन-१,

सिडको, औरंगाबाद

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा

सदस्य सचिव, विभागीय जात प्रमाणपत्र

पडताळणी समिती, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

विभागीय समाजकल्याण अधिकारी, विभागीय जात

प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र. १, औरंगाबाद विभाग,

औरंगाबाद

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२.०१.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर माहिती प्राप्त झाली आहे. सदर माहिती संबंधित जन माहिती अधिकारी श्री. आर. एन. वैद्य यांनी उशिरा दिल्याबद्दल आणि त्यांच्या प्रथम अपिलाची श्री. दत्तात्रय वाकोडे या अपिलीय अधिकाऱ्याने दखल न घेतल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०७.११.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे "राजपुत भामटा या जातीचे विद्यार्थी प्रकरण प्रलंबीत असल्याबाबत" या विषयावर एकूण ३ मुद्यावर माहिती विचारली होती. तथापि अधिनियमातील विहित तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक १८.१२.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत नाही. परंतु यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २३.१२.२००८ रोजी माहिती दिल्याचे आयोगास आढळून येत आहे. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०६.११.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे, जो जन माहिती अधिकारी यांना प्रत्यक्षात दिनांक ०७.११.२००८ रोजी प्राप्त झाला, त्याद्वारे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्या माध्यमाद्वारे व कोणती विशिष्ट माहिती हवी आहे, याचा उल्लेख केलेला नाही. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २७ च्या तरतुदीनुसार पारित केल्या गेलेल्या, सामान्य प्रशासन विभागाच्या अधिसूचना क्रमांक आर. टी. आय. २००५/ सी. आर. ३१५/०५/५ दिनांक ११.१०.२००५ मध्ये अर्जदाराने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागविण्यासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना दिला आहे. या नमुना प्रपत्रामधील मुद्दा क्रमांक ३ (IV) मध्ये अपिलार्थीस कोणत्या माध्यमाद्वारे

माहिती हवी आहे, याचा उल्लेख केला आहे. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना कोणत्या माध्यमाद्वारे माहिती आवश्यक आहे याचा उल्लेख करणे त्यांना अनिवार्य होते परंतु या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या अर्जात असा कोणताही उल्लेख केलेला नाही. त्यामुळे अशी शक्यता नाकारता येत नाही की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपाल खर्च टाळण्याच्या दृष्टीने व्यक्तिशः माहिती हवी असेल. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर या अर्जात मागणी केलली माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेण्याचे संपूर्ण उत्तरदायित्व अर्जदारावर येते. या प्रकरणी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता, ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कधी उपस्थित झाले, याचा तपशील आयोगास दिलेला नाही. तसेच या संदर्भात तोंडी युक्तिवाद करण्यासाठी देखिल अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. अशा परिस्थितीत योग्य त्या पुराव्याअभावी अपिलार्थीच्या विचाराधीन अपील अर्जावर नव्याने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक १५.०१.२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्रीमती कविता अ. गौर, रा.प्लॉट क्र. २, बिल्डींग सी-१, सारानगर, एन-१, सिडको,

औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र. १, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३५४

निर्णय दिनांक १५.०१.२०१०

१ श्री. राजेश सांडूजी हिवराळे, : अपिलार्थी

रा. औरंगाबाद

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी,

आदिवासी विकास आयुक्तालय,

महाराष्ट्र राज्य, नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी

आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक

जन अपिलीय अधिकारी : सहायक आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४.०१.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून, या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक यांच्या दिनांक २७ मे २००८ रोजीच्या पत्रान्वये अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांच्याकडून अपिलार्थीच्या दिनांक २६.०४.२००८ रोजीच्या अर्जासंदर्भात त्यांनी केलेला चौकशी अहवाल व नियमानुसार पुढील कार्यवाही अशी माहिती मागितली आहे व या अर्जामध्ये अपर आयुक्त, आदिवासी विकास यांनी

आयुक्तालयाच्या आदेशपत्रान्वये योग्य ती कार्यवाही न केल्याने त्यांच्यावर कोणत्या प्रकारची शिस्तभंगविषयक कारवाई केली अशी माहिती मागितली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २७.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, आयुक्त, आदिवासी विकास यांच्या दिनांक २७ मे २००८ रोजीच्या आदेशपत्रान्वये अपर आयुक्त, आदिवासी विकास यांनी अपिलार्थीच्या दिनांक २६.०४.२००८ रोजीच्या तक्रार अर्जावर केलेल्या चौकशीचा अहवाल आणि पुढील कार्यवाही व दुसऱ्या मुद्याद्वारे अपर आयुक्त, आदिवासी विकास यांनी आयुक्तांच्या दिनांक २७ मे २००८ रोजीच्या पत्रान्वये आदेशाचे पालन केले नसल्यास, काय कार्यवाही होणार अशी माहिती टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २३.१०.२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हजर व अपिलीय अधिकारी आणि अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांना आयोगाने विचारलेल्या कोणत्याही प्रश्नाचे उत्तर देता आले नाही.

अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ मध्ये अपिलार्थीने निर्देशीत केलेल्या त्यांच्या दिनांक २६.०४.२००८ रोजीच्या तक्रार अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आदिवासी आयुक्तांनी दिनांक २७ मे २००८ रोजी दिलेल्या आदेशाप्रमाणे चौकशी केली किंवा कसे यासंदर्भात

उपस्थित जन माहिती अधिकारी यांना आयोगास कोणतीही कागदपत्रे सादर करता आली नाहीत. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती न दिल्याचा निष्कर्ष आयोग काढीत आहे. फक्त अपिलार्थीस ही माहिती पुरविली आहे, एवढेच त्यांनी आयोगास अवगत केले. तथापि या संदर्भातला कोणताही पुरावा ते आयोगास सादर करु शकले नाहीत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २७.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण २ मुद्यांवर वरील परिच्छेदामध्ये स्पष्ट केलेली माहिती मागितली होती. यापैकी अपिलार्थीस मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणार नाही. कारण या मुद्याद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे भविष्यकाळातील व जन माहिती अधिकारी यांच्या प्रत्यक्षात ताब्यात नसलेली माहिती मागितली आहे. अशाप्रकारची माहिती ही माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्ती बाहेरची असल्याने, ती अधिनियमातील तरतुदींशी विसंगत असल्याचे सिध्द होत आहे. परिणामी ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ मध्ये अपिलार्थीने आदिवासी विकास आयुक्तांना दिनांक २६.०४.२००८ रोजी केलेल्या तक्रार अर्जाच्या संदर्भात आदिवासी विकास आयुक्तांनी अपर आयुक्तांना त्यांच्या दिनांक २७ मे २००८ रोजीच्या पत्राद्वारे या तक्रारीची चौकशी करण्यासाठी सूचित केले होते, ही चौकशी झाली किंवा कसे आणि या चौकशीचा अहवाल आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालयास प्राप्त झाला किंवा कसे, हे आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे आयोगास कळण्यास मार्ग नाही. तथापि ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, आयुक्त, आदिवासी विकास विभाग यांच्या सूचनेप्रमाणे जर अपर आयुक्त यांनी अपिलार्थीच्या दिनांक २६.०४.२००८ रोजीच्या तक्रार अर्जाच्या संदर्भात चौकशी करुन, आपला अहवाल आयुक्तालयास दिला असेल तर त्या अहवालाची प्रत, जर त्यांचा

हा अहवाल उघड केल्याने अधिनियमातील कलम ८ (१) व ९ च्या तरतुदींचा छेद होत नसेल तर, अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. जर त्यांनी आदिवासी विकास आयुक्तांनी दिनांक २७ मे २००८ रोजीच्या पत्राद्वारे कोणतीही कार्यवाही केली नसेल तर त्यांनी अपिलार्थीस त्याप्रमाणे याच कालावधीमध्ये कळवावे, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या दिनांक २७.०९.२००८ रोजीच्या अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, अशी आयोगाची खात्री झाली आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब आयुक्त, आदिवासी विकास विभाग यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांचेवर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे अपिलार्थीच्या दिनांक २३.१०.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही न करुन, स्पष्ट केलेल्या त्यांच्या अशाप्रकारच्या बेजबाबदार कार्यशैलीची आदिवासी विकास आयुक्त यांनी यथायोग्यरित्या नोंद घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ च्या संदर्भात वरील परिच्छेदात स्पष्ट केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. आदिवासी विकास आयुक्त, यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांचेवर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक १५.०१.२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. राजेश सांडूजी हिवराळे, द्वारा, सोनवणे भगवान सिष्णू (वनपाल), घर क्र. - २६१, मिलींदनगर, उस्मानपूरा, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आदिवासी विकास आयुक्त, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३५५

निर्णय दिनांक १५-०१-२०१०

१ श्री. चंगेडे शशिकांत पेमराज, : अपिलार्थी

३४६३, खिस्त गल्ली, अहमदनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी

तथा कार्यकारी अभियंता, जागतिक बँक प्रकल्प विभाग,

पुणे

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक

विभाग, पुणे

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,

पुणे

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-०९-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिली व काही माहिती देण्यास नकार दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे नमूद करुन खात्याच्या कामामध्ये पारदर्शकता आणण्यासाठी आयोगास विनंती केली आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ०४-०८-२००८ रोजीच्या मळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे पुणे-शिरुर रस्त्यासंदर्भात एकूण १७ मुद्दयांव्दारे काही माहिती व्यक्तिश: मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-८-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ४३८ इतके जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (३) (क) च्या तरतुदीप्रमाणे माहितीपोटीच्या शुल्काचा आवश्यक तो तपशील पुरविलेला आहे. अपिलार्थी यांनी दिनांक १०-०९-२००८ रोजी मनीऑर्डरव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे पैसे भरले व नंतर दिनांक २४-०९-२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती हस्तगत केली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७-१२-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली व अपिलार्थीस देय असलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक २४-०९-२००८ रोजी व्यक्तिश: पुरविली आहे. आता अपिलार्थीस माहिती देण्याचे बाकी नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ०३-०८-२००८ रोजीच्या अर्जाव्दारे, जो जन माहिती अधिकारी यांना दिनांक ०४-०८-२००८ रोजी प्राप्त झाला, त्याव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे पुणे शिरुर या रस्त्याच्या बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर केल्या गेलेल्या कामाच्या संदर्भात एकूण १७ मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली आहे. त्यापैकी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ८ व्दारे मागितलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती नसून ती एक विशिष्ट विनंती आहे. त्यामुळे अपिलार्थीस या मुद्दयावरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. अपिलार्थीच्या मुद्दा क्रमांक १० च्या संदर्भात अपिलार्थीने " सदर ठेकेदाराने आपल्याकडील R.T.I. च्या कलम ६. ३. २ नुसार मागितलेली माहिती दिली नाही याबाबत आपणाकडून कोणाकडे काय पत्रव्यवहार केला त्या कागदपत्राच्या सत्यप्रती " अशा प्रकारची माहिती मागितली आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही संदर्भहीन आहे व तसेच संबंधित ठेकेदार हे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार सार्वजनिक प्राधिकरण अथवा त्याचा भाग नसल्याने संबधित ठेकेदारांवर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे त्यांच्यावर बंधनकारक नाही. त्यामुळे या मुद्दयावर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती देय होत नाही. अपिलार्थीच्या मुद्दा क्रमांक १२ व्दारे अपिलार्थीने अशाच प्रकारची संदर्भहीन माहिती मागविली असल्याने या मुद्दयावर देखील जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना माहिती देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १३ व्दारे अपिलार्थीने सदर रस्त्यास आज दिनांकापर्यंत पूर्णत्वाचा दाखला न देण्याबाबत ठेकेदार व खात्यामध्ये झालेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती मागितल्या आहेत. तथापि ही माहिती मागताना त्यांनी त्यांना ही माहिती कोणत्या कालावधीशी संबंधित हवी आहे याचा उल्लेख केलेला नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये त्यांना आवश्यक असलेल्या माहितीशी संबंधित कालावधी सन २००८ असा दर्शविला आहे. २००८ साली खात्यात पूर्णत्वाचे

कोणतेही दाखले देण्यात आलेले नव्हते असे जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी आयोगास अवगत केले आहे. त्यामुळे याही मुद्दयावर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती देय होत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस " निरंक " अशी माहिती त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १६ व १७ च्या संदर्भात दिली आहे. या संदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, शासकीय प्राधिकरणामध्ये जर जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्जदाराने विचारणा केलेली माहिती उपलब्ध नसेल तर माहिती " निरंक " आहे असे कळविण्याचे संकेत प्रचलीत आहेत. यादृष्टीने त्यांनी अपिलार्थीस तसे कळविले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील १६ व १७ या मुद्दा क्रमांकाना तशी माहिती पुरविल्याचे आयोगास आढळून येत आहे.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती याचे वरीलप्रमाणे केलेले पृथक्करण पाहता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती सशुल्क पुरविली आहे. हे पाहता अपिलार्थीच्या विचाराधीन अपील अर्जावर वेगळ्याने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून ज्या मुद्दयांवर माहिती प्राप्त झाली नाही त्या मुद्दयांचे समर्थन निर्णयामध्ये वरील परिच्छेदामध्ये दिलेले आहे. त्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

<u>आदेश</u>

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक १५-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. चंगेडे शशिकांत पेमराज, ३४६३, खिस्त गल्ली, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जागतिक बँक प्रकल्प विभाग, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१३५

निर्णय दिनांक १५-०१-२०१०

१ श्री. नामदेव पुंडलिक कोल्हे, : अपिलार्थी
राजे संभाजी कॉलनी, प्लॉट नं. २५, २६, जळगांव रोड,
हर्सूल, औरंगाबाद

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, पैठण,
तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप आयुक्त (सा.प्र.),
विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : झेंडू बाबा ट्रस्ट, पैठण

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती पुरविली नाही, जन अपिलीय अधिकारी यांच्या समोर कोणताही खुलासा केला नाही, याव्दारे त्यांनी अपिलार्थीस माहिती नाकारली आहे आणि माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीचा पूर्णतः भंग केला असल्यामुळे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्यावर कारवाई करावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ०४-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, सन १९६८ ते ३० नोव्हेबर २००७ या कालावधीशी संबधित सर्वे नंबर २३१ झेंडू मठ, पैठण या ट्रस्टसंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - हस्तांतरण, नामांतरण ज्या कागदपत्राच्या आधारे झाले त्याच्या प्रती, नगरपरिषदेचा या संदर्भातील ठराव, सदरहू जागा पैठण परिषदेने भाड्याने, लीजने, कराराने अथवा विक्री खरेदी केली असल्यास त्यासंबंधी दस्तऐवजाच्या प्रती, इत्यादी माहिती - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला असल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत नाही. अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमा-तील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २१-०२-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मान्य केले व अपिलार्थीस सात दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधी हजर व अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष गैरहजर आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी दिनांक २१-०२-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सात दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले होते.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अद्यापपावेतो या प्रकरणाशी संबंधित मूळ अर्जाव्दारे त्यांनी मागणी केलेली कोणतीही माहिती दिली नसल्याचे अनुमान काढण्यात येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना अधिनियमातील तरतुदीप्रमाणे देय असल्याने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य द्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. आशुतोष चिंचाळकर, सध्या मुख्याधिकारी, नगरपरिषद भोकर या पदावर कार्यरत) यांनी या प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमा-व्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन व त्यांना अपेक्षित माहितीपासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केल्याचे दिसून येत आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे ते अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र होत आहेत. सबब संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी (श्री. आशुतोष चिंचाळकर सध्या मुख्याधिकारी, नगरपरिषद भोकर या पदावर कार्यरत) यांच्यावर प्रचलीत सेवानियमा-प्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी (श्री. आशुतोष चिंचाळकर, सध्या मुख्याधिकारी, नगरपरिषद भोकर या पदावर कार्यरत) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक १५-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. नामदेव पुंडलिक कोल्हे, राजे संभाजी कॉलनी, प्लॉट नं. २५, २६, जळगांव रोड, हर्सूल, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, शासकीय परिवहन सेवा इमारत, ३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, सी-फेस, वरळी, मुंबई - ३० यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१३६

निर्णय दिनांक १५-०१-२०१०

१ श्री. श्रीनिवास धोंडिराम मुंडे, : अपिलार्थी

मु. पो. पांगरी, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी,

तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, तालुका परळी

वैजनाथ, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ,

तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,

परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती पुरविली नसल्याने त्यांनी दिनांक ३१-०७-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले होते. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने आणि त्यांना माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील

आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने तहसील कार्यालयात वेळोवेळी केलेल्या तक्रार अर्जावर करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या संदर्भातील कार्यालयीन टिपणी, आदेश व विलंब याबाबतच्या माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ३१-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, मौजे पांगरी तालुका परळी येथील स्वस्त धान्य दुकानदार श्री. अरुण निवृत्ती गित्ते यांच्याविरुध्द दिनांक १३-०६-२००६ रोजी, श्री. मुकेश मुंजाजी पाचांगे, यशवंत नामदेव माने यांच्याविरुध्द दिनांक १७-०५-२००७ रोजी, सौ. मीरा भागवत पाचांगे व इतर आणि श्री. भाऊ पुरा चव्हाण यांच्याविरुध्द दिनांक ०९-०८-२००७ रोजी श्री. श्रीनिवास मुंडे यांनी केलेल्या तक्रार अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही या संदर्भातील कार्यालयीन टिपणी, आदेश, नोटीस, चौकशी अहवाल याच्या प्रती, प्रकरण निकाली काढण्यासाठी लागणारा विलंब व विलंबाची कारणे याची माहिती आणि दिनांक ०१ जानेवारी २००६ ते ३१ मे २००८ या कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कार्यरत असणा-या आणि सध्या ते ज्या ठिकाणी कार्यरत आहेत त्या अधिका-यांची संपूर्ण नावे, पत्ता, कार्यकाळ व हुद्दयासह माहिती, ही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून शीघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीने सदर अर्ज तहसील कार्यालय, परळी वैजनाथ यांना उद्देशून केला होता. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही तहसील कार्यालयातील पुरवठा व आस्थापना विभागाशी संबंधित असल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार यांनी दिनांक ३१-०५-२००८ रोजी पुरवठा व आस्थापना विभागातील कर्मचा-यांना अपिलार्थीच्या अर्जाची प्रत देऊन त्यांच्याकडून दिनांक १०-०६-२००८ पर्यंत अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांच्याकडे माहिती सादर करण्याचे कळविले. या संबंधात जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १०-०६-२००८ रोजी संबंधितांना स्मरणपत्र दिले. जन माहिती अधिकारी यांच्या पत्रास दिनांक १७-०६-२००८ रोजी प्रतिसाद देऊन आस्थापना विभागाने अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील त्यांच्या विभागाशी

संबंधित माहिती पुरविली. ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २५-०६-२००८ रोजी पुरविली व सदर माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याची त्यांची घेतलेली पोच प्रत आयोगास सादर केली आहे. तथापि पुरवठा विभागाकडून अद्यापपावेतो कोणतीही माहिती न मिळाल्याने ते अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील काही माहिती देऊ शकले नाहीत. यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २२-०८-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस तीस दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे पुरवठा विभागास सूचित केले. तथापि यानंतरही अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थी आणि इतर संबंधितांच्या तक्रारीवरुन संबंधित दुकानदारांचे परवाने निलंबीत करण्यात आले असल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस अद्यापपावेतो ही माहिती पुरविली नाही.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सेवानिवृत्त नायब तहसीलदार श्री. जी. के. सिरसाट यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्याच्या प्रत्यक्षात ताब्यात नव्हती. ती तहसील कार्यालयातील पुरवठा व आस्थापना शाखेशी संबंधित होती. त्याप्रमाणे अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी त्याच दिवशी अपिलार्थीच्या अर्जाची प्रत पुरवठा व आस्थापना शाखा यांच्याकडे हस्तांतरित करुन या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. या दोनही शाखापैकी आस्थापना शाखेने अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस २५-०६-२००८ रोजी म्हणजे

अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत पुरविली. तथापि पुरवठा शाखेने त्यांना ते या पदावर कार्यरत असेपर्यंत कोणतीही माहिती न दिल्याने अपिलार्थीस ते उर्वरित माहिती पुरवू शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, सध्या कार्यरत असलेले व तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार यांनी अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीप्रमाणे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना देण्यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही पूर्ण केली आहे. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने केलेल्या तक्रारीवरुन संबंधित दुकानादारांना शिक्षा झाली असल्यामुळे अपिलार्थीस त्यांनी कोणतीही माहिती पुरविली नाही. जन माहिती अधिकारी यांचा हा युक्तिवाद आयोग अमान्य करत असून अर्जदाराने केलेल्या तक्रारीवर कारवाई झाली म्हणून अपिलार्थीस त्यांनी कोणतीही माहिती देणे गरजेचे नाही हे त्यांचे गृहीतक, चुकीचे आहे असे त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेली माहिती त्यांना देणे आणि अर्जातील संदर्भीय प्रकरणावर कारवाई करणे या दोनही बाबी पूर्णतः भिन्न आहेत. त्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जात मागणी केलेली उर्वरित माहिती द्यावी लागेल. अर्जदाराच्या तक्रार अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही म्हणजे, अपिलार्थीचा तक्रार अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून जन माहिती अधिकारी यांनी या विषयावर वेगवेगळ्या प्राधिकरणाशी केलेला पत्रव्यवहार व या प्रकरणाशी संबंधित अभिलेख्यावरील टिपणीच्या प्रती, ही होय. या प्रती अपिलार्थीस त्यांच्या तक्रार अर्जावर केलेली कार्यवाही म्हणून जन माहिती अधिकारी यांनी पुरवाव्यात. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीमध्ये त्यांच्या तक्रार अर्जातील कार्यवाहीस झालेल्या विलंबाची कारणे मागितली आहेत. जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराने मागणी केलेली ही माहिती त्यांना देणे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मूळात अभिप्रेत नाही. अशा प्रकारची माहिती ही माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या " माहिती " या शब्दाच्या व्याख्येच्या

व्याप्तीबाहेरची आहे. त्यामुळे या मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस कोणतीही माहिती देय असणार नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली व वर स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्याने व अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून पूर्ण माहिती अद्यापपावेतो प्राप्त न होण्यासाठी तहसील कार्यालयातील पुरवठा विभागातील श्रीमती परवीन पठाण, श्री. लाड आणि श्री. सावजी हे कर्मचारी जबाबदार असल्याचे आयोगास आढळून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार अर्जदारास माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व संबंधित सहायक / कर्मचारी यांना देखील जन माहिती अधिकारी समजावे, अशी तरतूद आहे, हे पाहता या प्रकरणी श्रीमती परवीन पठाण, श्री. लाड आणि श्री. सावजी पुरवठा शाखा, तहसील कार्यालय परळी वैजनाथ हे अपिलार्थीस माहिती न पुरविण्यासाठी एकत्रितपणे जबाबदार असल्याचे आयोगास आढळून येत आहे. पुरवठा शाखेतील या अधिका-यांना माहिती अधिका-याने वेळोवेळी स्मरणपत्रे दिली, इतकेच नव्हे तर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील त्यांनी दिलेल्या निर्णयामध्ये देखील अपिलार्थीस केवळ पुरवठा शाखेतील कर्मचा-यांच्या असहकारामुळे माहिती प्राप्त झाली नाही असा निष्कर्ष त्यांनी काढला आहे. यावरुन या कर्मचा-यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्याचे हेतूतः नाकारल्याचे आयोगास आढळून येत आहे. अशा प्रकारे अपिलार्थीस अधिनियमातील विहित केलेल्या मुदतीत माहिती न देऊन त्यांनी अधिनियमातील कलम २० चा भंग केल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी हे कर्मचारी आयोगासमोर उपस्थित नाहीत. सबब श्रीमती परवीन पठाण, श्री. लाड आणि श्री. सावजी पुरवठा शाखा, तहसील कार्यालय परळी वैजनाथ यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना अधिनियमाव्दारे विहित केलेल्या

मुदतीत न पुरविल्याबद्दल त्यांना विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण २५,००० रुपये (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहिती न पुरविण्यासाठी ते जबाबदार असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन, हेच आदेश अंतिम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. श्रीमती परवीन पठाण, श्री. लाड आणि श्री. सावजी पुरवठा शाखा, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ यांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत न पुरविल्याबद्दल त्यांना एकूण २५,००० रुपये (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक १५-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. श्रीनिवास धोंडिराम मुंडे, मु. पो. पांगरी, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ श्रीमती परवीन पठाण, पुरवठा शाखा, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालाव्दारे)

४ श्री. लाड, पुरवठा शाखा, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालाव्दारे)

५ श्री. सावजी, पुरवठा शाखा, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालाव्दारे)

६ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१३७

निर्णय दिनांक १५-०१-२०१०

१ श्री. गुलाबसिंग चिंतामण वाघ, : अपिलार्थी

व्दारा- श्री मोहंमद खान ताजखान यांचे घर,

आराफात मस्जिसमोर, किराडपुरा, औरंगाबाद

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी

तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण

कंपनी मर्यादित, (शहर विभाग क्रमांक १), औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण

कंपनी मर्यादित, (शहर विभाग १), औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, (शहर विभाग क्रमांक १), औरंगाबाद

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, कार्यकारी अभियंता, शहर विभाग १ यांचे पत्र क्रमांक ५१३९, दिनांक २४-०९-२००८ या पत्राने, नमूद केलेल्या १ ते ११ या मुद्दयासंदर्भात माहिती पुरविण्यात आली. परंतु माहिती मला पुरविण्यात आली नाही. खोटी वाक्ये

वापरण्यात आलेली आहेत या कारणास्तव त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. आपल्या अपील अर्जासोबत त्यांनी दिनांक ०४-०८-२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची प्रत जोडली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता अपिलार्थीने आयोगाकडे ही कागदपत्रे का सादर केली आहेत याचे कारण आयोगास सादर केल्याचे आढळून येत समजत नाही. तसेच अपिलार्थीने अपिलाची कारणे या मुद्दयासमोर देखील कार्यकारी अभियंता यांच्या ज्या पत्राचा संदर्भ दिला आहे त्या पत्राचा आणि अपिलार्थीने या प्रकरणी व्दितीय अपील अर्जासोबत जोडलेल्या त्यांच्या दिनांक ०४-०८-२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जाचा अर्थाअर्थी कोणताही संबंध असल्याचे आयोगास आढळून येत नाही. यासंदर्भात स्पष्टीकरण करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नसल्यामुळे आणि अशा प्रकारे आयोगास चुकीची कागदपत्रे सादर केली असल्याने अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

<u>आदेश</u>

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक १५-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गुलाबसिंग चिंतामण वाघ, व्दारा- श्री मोहंमद खान ताजखान यांचे घर, आराफात

मस्जिदसमोर, किराडपुरा, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, (शहर विभाग क्रमांक १), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, (शहर विभाग १), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८५५

निर्णय दिनांक १५-०१-२०१०

१ श्री. हेमंत शिवाजीराव वडणे, : अपिलार्थी
व्दारा, गपाट निवास, सेवासुविधा, टेलीफोन भवनाजवळ,
तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी,
कार्यालय सह संचालक (उच्च शिक्षण), औरंगाबाद
विभाग, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सह संचालक (उच्च शिक्षण), औरंगाबाद विभाग,
औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : वरिष्ठ लिपीक, कार्यालय सह संचालक (उच्च शिक्षण), औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-०७-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

अपिलार्थीने आयोगाकडे या अपिलासंदर्भात दिलेल्या कागदपत्राची तपासणी करता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने एकाच माहितीकरिता मागितलेल्या माहितीसंदर्भात दिनांक १८-०७-२००७ रोजी दोन स्वतंत्र व्दितीय अपिले आयोगाकडे सादर केली होती. त्यापैकी अपिलार्थी-च्या आयोगाकडे दिनांक १८-०७-२००७ रोजी नोंदविलेल्या एका व्दितीय अपील अर्जावर दिनांक ०१-०४-२००९ रोजी सुनावणी होऊन आयोगाने या अपील अर्जावर आपले आदेश पारीत केले आहेत. अपिलार्थीचे विचाराधीन अपील आणि निर्णय दिलेले अपील हे तंतोतंत सारखेच आहे, हे पाहता, अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर वेगळ्याने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक १५-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. हेमंत शिवाजीराव वडणे, व्दारा, गपाट निवास, सेवासुविधा, टेलीफोन भवन जवळ, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपीक, कार्यालय सह संचालक (उच्च शिक्षण), औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक (उच्च शिक्षण), औरंगाबाद विभाग,

औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१७०
निर्णय दिनांक १६/०१/२०१०

१ श्री. पंढरीनाथ दगू पवार (पगार), : अपिलार्थी
रा.येवला, जि. नाशिक

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याधिकारी,
नगरपरिषद, येवला, जि.नाशिक

२. जन अपिलीय अधिकारी तथा
आयुक्त तथा संचालक,
नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई

निर्णय

श्री. पंढरीनाथ दगू पवार यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २१.०१.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २०.०५.२००५ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १४.०९.२००५ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर सुनावणी घेऊन दि.१४.०३.२००६ रोजी आपले आदेश पारित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

तथापि या अपिलाची प्राथमिक तपासणी केला असता असे आढळून येत आहे की, अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज व प्रथम अपील हे महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ खालील असून, तो कायदा आता निरसित झाला आहे. त्यामुळे प्रस्तुतच्या व्दितीय अपिलावर

निर्णय पारित करण्याची अधिकारिता आयोगास नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक : १६/०१/२०१० **राज्य माहिती आयुक्त,**
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पंढरीनाथ दगू पवार (पगार), रा. पहाड गल्ली, घ.नं. १८२७, येवला, ता.येवला, जि.नाशिक.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१७६
निर्णय दिनांक: १६-०१-२०१०

१. श्री. यादवराव मुकूंदराव नेम्मानिवार, : अपिलार्थी
रा.किनवट, जि. नांदेड

विरुध्द

१. अध्यक्ष, : प्रतिवादी
नगरपरिषद कर्मचारी गृहनिर्माण सहकारी संस्था
मर्या., किनवट, जि. नांदेड

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.०१.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि.०१.१०.२००७ रोजीच्या अर्जाव्दारे अध्यक्ष, नगरपरिषद कर्मचारी गृहनिर्माण संस्था मर्या., किनवट, जि.नांदेड यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर गृहनिर्माण संस्थेने अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने परत अध्यक्ष, नगरपरिषद कर्मचारी गृहनिर्माण संस्था मर्या., किनवट, जि. नांदेड यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि.२७.११.२००७ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलासंदर्भात कोणताही निर्णय प्राप्त न झाल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित व संबंधित गृहनिर्माण संस्थेचे अध्यक्ष हे अनुपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित संस्थेस, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि यासंदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबईच्या नागपूर खंडपीठाने त्यांचे रिट पिटीशन क्र. ३६४८/२००७, श्री बालाजी सहकारी स्पिनींग मिल्स मर्या.,रिसोड,जि.वाशिम विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर या प्रकरणामध्ये दि. ०२.०३.२००९ रोजी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे.

"It is the contention of the petitioner that the petitioner Co-Operative Society is not a Public Authority and, therefore, Right to Information Act, 2005 is not applicable to the petitioner and, therefore, respondent no.6 could not pass any such order. When the matter is taken up for hearing, learned counsel for the parties concede that this point is squarely covered by judgment of this Court in Writ Petition No.5666/2007; Dr.Panjabrao Deshmukh Urban Co-Operative Bank Ltd., Amravati ..vs.. The State Information Commissioner, Vidarbha Region, Nagpur and Ors., dated 13.01.2009, wherein this Court held that a Co-operative Society, registered under the Maharashtra Co-Operative Societies Act, is not a public authority within the meaning of Section 2(h) of Right to Information Act or a State within the meaning of Article 12 of the Constitution of India and, therefore, Right to Information Act is not applicable."

वरील निर्णयाचे अवलोकन करता महाराष्ट सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीअंतर्गत नोंदणी झालेल्या सहकारी संस्थांना 'सार्वजनिक प्राधिकरण' म्हणून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मानता येणार नाही, असे दिसून येत आहे. यामुळे या प्रकरणी देखील असाच युक्तिवाद लागू होत असल्यामुळे अपिलार्थीने ज्या सहकारी संस्थेकडे माहिती मागितली

आहे, त्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम लागू होणार नाही.

या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१. अपील क्र.२१७६/०८ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक: १६-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त,**
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. यादवराव मुकूंदराव नेम्मानिवार, मु.पो. वेलामपूरा, वार्ड क्र.३, किनवट, ता. किनवट, जि.नांदेड.

२. अध्यक्ष, नगरपरिषद कर्मचारी गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या., किनवट, ता. किनवट, जि. नांदेड.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८६२
निर्णय दिनांक १६/०१/२०१०

१ श्री. शेख मुस्तकीम शेख बाबु, रा. जळगांव	:	अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, जळगांव २. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी, धुळे	:	प्रतिवादी

निर्णय

श्री. शेख मुस्तकीम शेख बाबु यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १०.०८.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाच्या मुंबई कार्यालयाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि.३१.०८.२००५ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.२०.०५.२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणतीही सुनावणी न घेतल्यामुळे अपिलार्थीने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

या अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांचा माहितीचा मूळ अर्ज महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ खालील असून, तो कायदा आता निरसित झालेला आहे. त्यामुळे प्रस्तुतच्या व्दितीय अपिलावर निर्णय पारित

करण्याची अधिकारिता आयोगास नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक : १६/०१/२०१० **राज्य माहिती आयुक्त,**
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख मुस्तकीम शेख बाबु, ३५०, शनी पेठ, जळगांव, ता.जि. जळगांव.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८६३
निर्णय दिनांक १६/०१/२०१०

१ श्री. लक्ष्मण किटकूल बावस्कर, : अपिलार्थी
रा. रोझोदा, ता. रावेर, जि. जळगांव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, जळगांव
२. जन अपिलीय अधिकारी तथा
विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक

निर्णय

श्री. लक्ष्मण किटकूल बावस्कर यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ११.०४.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाच्या मुंबई कार्यालयाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०७.०९.२००५ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर सुनावणी घेऊन दि.०७.०२.२००६ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य केले. तथापि हवी असलेली माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

या अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता असे आढळून येत आहे की, अपिलार्थी यांचा माहितीचा मूळ अर्ज महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ खालील असून, तो कायदा आता निरसित झालेला आहे. त्यामुळे प्रस्तुतच्या व्दितीय अपिलावर निर्णय पारित करण्याची अधिकारिता आयोगास नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक : १६/०१/२०१० **राज्य माहिती आयुक्त,**
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. लक्ष्मण किटकूल बावस्कर, मु.पो. रोझोदा, ता. रावेर, जि. जळगांव ४२५५०४

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८६४
निर्णय दिनांक १६/०१/२०१०

१ श्री. शर्मा सूरज सुभाष, : अपिलार्थी
रा. वांबोरी, ता. राहुरी, जि. अहमदनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अधिकारी,
श्री. साई बाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी, जि.अहमदनगर
२. जन अपिलीय अधिकारी तथा
सहायक धर्मादाय आयुक्त,
अहमदनगर

निर्णय

श्री. शर्मा सूरज सुभाष यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २१.०९.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाच्या मुंबई कार्यालयाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने १८.०५.२००६ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.२०.०७.२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणतीही सुनावणी न घेतल्यामुळे अपिलार्थीने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

तथापि या अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता असे आढळून येत आहे की, प्रथम अपील योग्य त्या अपिलीय अधिकाऱ्याकडे केले नसल्याचे दिसून येते. सहायक धर्मादाय आयुक्त हे फक्त त्यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयासंदर्भात माहिती

अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी म्हणून काम करु शकतात. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज व प्रथम अपील अर्ज दोन वेगवेगळया प्राधिकरणाकडे केले आहेत. या प्रकरणातील ही त्रुटी लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक : १६/०१/२०१० **राज्य माहिती आयुक्त,**
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शर्मा सूरज सुभाष, मु.पो. वांबोरी, ता. राहुरी, जि.अहमदनगर

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८६५
निर्णय दिनांक १६/०१/२०१०

१ श्री. वासुदेव जगन्नाथ अग्रवाल, : अपिलार्थी
रा. जळगांव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
व्यवस्थापक,
श्री.सिध्दी व्यंकटेश अर्बन को-ऑप. क्रेडिट
सोसायटी मर्या., जळगांव

२. जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, जळगांव

निर्णय

श्री. वासुदेव जगन्नाथ अग्रवाल यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०२.०९.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने विनादिनांकाच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २५.०८.२००५ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर सुनावणी घेऊन दि.२२.११.२००५ रोजी आपले आदेश पारित केले. तथापि यानंतरही माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

तथापि या अपिलाची प्राथमिक तपासणी केला असता असे आढळून येत आहे की, अपिलार्थी यांचा प्रथम अपिलाचा अर्ज महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ खालील असून, तो कायदा आता निरसित झाला आहे. त्यामुळे प्रस्तुतच्या व्दितीय अपिलावर निर्णय पारित

करण्याची अधिकारिता आयोगास नाही. तसेच अपिलार्थीने ज्या प्राधिकरणाकडे माहिती मागविली आहे ते प्राधिकरण हे एक सहकारी पतसंस्था आहे. अशाप्रकारच्या सहकारी पतसंस्था माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याप्ती बाहेरच्या असल्यामुळे त्यांना माहिती अधिकार अधिनियम लागू होणार नाहीत, असा मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने त्यांच्याकडील रीट याचिका क्र. ५६६६/२००७, पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप. बँक लि., अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूरच्या संदर्भात दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या बाबी लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक : १६/०१/२०१० **राज्य माहिती आयुक्त,**
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. वासुदेव जगन्नाथ अग्रवाल, गणेश बिल्डींग, १२२, नवीपेठ, जळगांव.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८६६
निर्णय दिनांक १६/०१/२०१०

१ श्री. देवानंद धना जगताप, : अपिलार्थी
रा.धुळे

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, धुळे

२. जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, धुळे

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : अपर आयुक्त व विशेष निबंधक,
सहकारी संस्था, म.रा., पुणे.

निर्णय

श्री. देवानंद धना जगताप यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १०.०५.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ११.१०.२००५ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १६.११.२००५ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर सुनावणी घेऊन दि.२८.०२.२००६ रोजी आपले आदेश पारित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाविरुध्द अपिलार्थीने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

तथापि या अपिलाची प्राथमिक तपासणी केला असता असे आढळून येत आहे की, अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ खालील असून, तो कायदा आता निरसित झाला आहे. त्यामुळे प्रस्तुतच्या व्दितीय अपिलावर निर्णय पारित करण्याची अधिकारिता आयोगास नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक : १६/०१/२०१० **राज्य माहिती आयुक्त,**
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. देवानंद धना जगताप, साक्री रोड, भिमनगर, न्हानकु चौक, धुळे, ता.जि.धुळे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ३९१/२००९, ३९२/२००९, ३९३/२००९ व ३९४/२००९

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३९१, ३९२, ३९३ व ३९४

निर्णय दिनांक १६.०१.२०१०

१ श्री. सय्यद खाजा सय्यद मीरा, : अपिलार्थी
रा. रहेमान मंजील घर क्रं. ९-६-२२०, उमर कॉलनी
मस्जीदसमोर, देगलूर रोड, नांदेड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
रजा व प्रशिक्षण राखीव उपअभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, जि. नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम
विभाग, भोकर, जि. नांदेड

अपील क्र. ३९३/२००९ शी संबंधित त्रयस्थ पक्ष : १) श्री. एम.एन.डांगे २) श्री. ए.जी. करपे

अपील क्र. ३९४/२००९ शी संबंधित त्रयस्थ पक्ष : श्री. के.एम. दीक्षित

निर्णय

<u>अपील क्रमांक ३९१/२००९</u>

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७.०४.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून, या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९.१२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००७ - २००८ या कालावधीतील मोजमाप पुस्तकांच्या प्रमाणपत्रांच्या व पडताळणीच्या प्रमाणपत्रांच्या छायांकीत प्रती, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५.०३.२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०९.०४.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी आणि अपिलीय अधिकारी हे सर्वजण आज रोजी आयोगासमोर उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक ०४.०५.२००९ रोजी, त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज केल्यानंतर विनामूल्य माहिती प्राप्त झाली आहे. तथापि ही माहिती त्यांना माहिती अधिकार अधिनियमातील विहित केलेल्या कालावधीनंतर ४ महिने इतक्या विलंबाने प्राप्त झाली असल्याने संबंधितांवर योग्य ती कारवाई व्हावी. अपिलार्थीने या प्रकरणी व्यक्तिशः माहिती मागितली असल्यामुळे, माहिती प्राप्त होण्यासाठी अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कधी गेले, या संदर्भातील एखादा पुरावा त्यांच्याकडे उपलब्ध आहे काय, अशी आयोगाने विचारले असता, अपिलार्थीने ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात बऱ्याच वेळा गेले होते, परंतु या

माहितीची विचारणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे केल्यासंदर्भातील कोणताही पुरावा त्यांच्याकडे नसल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले. या युक्तिवादामध्ये अपिलार्थीने पुढे जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीतील कार्यालयीन त्रुटी आयोगास अवगत केल्या.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती दिनांक ०४.०५.२००९ रोजी दिली असून, ही माहिती त्यांच्या प्रत्यक्षात ताब्यात नव्हती, त्यांना ही माहिती सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर यांच्या भांडारपालाकडून घ्यावी लागणार होती. त्यांच्याकडून उशिरा माहिती प्राप्त झाल्याने त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विलंब लागला. भांडारपालाकडून जन माहिती अधिकारी यांना प्रत्यक्षात खोटी माहिती प्राप्त झाली किंवा कसे हे त्यांना आता सांगता येणार नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहिती मागितली होती. ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या प्रत्यक्षात ताब्यात नव्हती, ही माहिती त्यांना विभागाच्या भांडारपालाकडून प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस द्यावयाची होती. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचा माहितीसाठीचा प्रथम अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केल्यानंतर ३ महिन्याने जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलर्थीस माहिती देण्याचा निर्णय दिनांक ०९.०४.२००९ रोजी दिला. माहिती अधिकार अधिनियमातील विहित कालावधीचे महत्त्व लक्षात घेता, या ३ महिन्यामध्ये तरी जन माहिती अधिकारी यांनी भांडारपालाकडून माहिती घेऊन ती अपिलार्थीस तत्परतेने देण्यासाठी त्यांच्याकडे तयार करुन ठेवणे अभिप्रेत होते. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्यानंतर २५ दिवसानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिली आहे. यावरुन या प्रकरणी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीची निकोप अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीकोनातून ज्या प्रकारचे वर्तन जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित आहे, त्या प्रकारचे

वर्तन या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी आणि त्यांना माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे तत्कालीन भांडारपाल श्री. खडेकर (सध्या औरंगाबाद, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग येथे कार्यरत) यांनी दर्शविलेले नाही. अशाप्रकारच्या त्यांच्या बेजबाबदार वर्तनाबाबत त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून, इत:पर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीची अंमलबजावणी करताना अधिनियमातील तरतुदीप्रमाणे विहित कालावधीत कार्यवाही करण्याची त्यांनी दक्षता घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता माहिती प्राप्त झाली असल्यामुळे, अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीतील काही प्रशासकीय त्रुटी आयोगास अवगत केल्या. या संदर्भात अपिलार्थीस असे स्पष्ट करण्यात येत आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकाऱ्यांकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे त्याच स्वरुपात ती माहिती अर्जदारास जन माहिती अधिकारी यांनी देणे हे मूळात या अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे. या प्रकरणी देखिल, जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात अपिलार्थीने मागणी केलेली माहिती उपलब्ध झाली, त्याच स्वरुपात, जशीच्या तशी, ती त्यांनी अपिलार्थीस विनामूल्य दिलेली आहे. त्यामुळे या त्रुटीबद्दल जर अपिलार्थीची काही तक्रार असेल तर त्यांनी या तक्रारीचे निवारण सार्वजनिक बांधकाम विभागातील सक्षम प्राधिकरणाकडून करुन घ्यावे, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सहायक श्री. खडेकर भांडारपाल (सध्या सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद येथे कार्यरत) यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

निर्णय

अपील क्रमांक ३९२/२००९

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७.०४.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०५.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयाशी संबंधित आस्थापना विषयक काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - शासनाच्या आकृती बंधानुसार विभाग व उपविभागाच्या मंजूर पदांची माहिती आणि त्या पदांवर प्रत्यक्षात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची यादी, प्रतिनियुक्तीवर कार्यरत असलेले कर्मचारी प्रत्यक्षात कोणत्या कार्यालयाशी सलग्न आहेत व प्रतिनियुक्तीच्या आदेशांच्या / पत्राच्या सांक्षाकित व वाचनीय प्रती, मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशीक विभाग, औरंगाबाद यांच्या माहे २/२००८ च्या आदेशाप्रमाणे प्रतिनियुक्त्या का रद्द करण्यात आल्या नाहीत याची कारणे - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्रत्यक्षात उप कार्यकारी अभियंता जे या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी आहेत, त्यांच्या ताब्यात नव्हती. त्यामुळे अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या शाखेशी संबंधित आहे त्या

आस्थापना १ या शाखेकडे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी दिनांक १२.०१.२००९ रोजी मागितली आहे. या पत्राद्वारे त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाची झेरॉक्स प्रत संबंधित शाखेस दिल्याचे आढळून येत आहे.

तथापि आस्थापना १ शाखेकडून जन माहिती अधिकारी यांना माहिती प्राप्त न झाल्याने ते अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती पुरवू शकले नाहीत. यानंतर अपिलार्थीने दिनांक ०६.०२.२००९ रोजी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार कार्यकारी अभियंता, सर्वजनिक बांधकाम विभाग, भोकर यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०२.०४.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस ८ दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले व तदनंतर अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांना दिनांक १३.०४.२००९ रोजी याच माहितीकरिता स्मरणपत्र दिले. तथापि यानंतरही अपिलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी आणि अपिलीय अधिकारी हे सर्वजण आज रोजी आयोगासमोर उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती प्राप्त झालेली नाही, ती त्यांना त्वरित मिळणे अपेक्षित आहे. आपल्या युक्तिवादामध्ये त्यांनी पुढे अद्यापपावेतो त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई आदेशित करण्याची आयोगास विनंती केली.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांना मागणी केलेली माहिती ही त्यांच्या कार्यालयातील आस्थापना १ शाखेशी संबंधित होती . ही माहिती त्यांच्या कार्यालयातील वरिष्ठ लिपीक श्री. अब्दुल खालीद या लिपीकाच्या ताब्यात आहे. त्यांनी

अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे वेळेत सुपूर्द न केल्यामुळे ते अपिलार्थीस ही माहिती हस्तांतरित करु शकले नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आता त्यांच्याकडे तयार असून, ही माहिती ते अपिलार्थीस त्वरीत देण्यासाठी तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ३ मुद्यांद्वारे माहिती मागितली आहे. यातील मुद्दा क्रमांक ३ द्वारे त्यांनी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांच्या फेब्रुवारी २००८ च्या आदेशाप्रमाणे प्रतिनियुक्ती का रद्द करण्यात आली नाही, याचे कारण जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितले आहे. अपिलार्थीच्या अर्जातील या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस देय नाही. कारण अशाप्रकारची माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीत समाविष्ट होऊ शकत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्जदाराने मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्याच स्वरुपात ती अर्जदारास देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीप्रमाणे निर्णय घेणे इतपत सीमीत प्रक्रिया अभिप्रेत आहे. या अधिनियमामध्ये, अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्या कृतीबद्दल अथवा निर्णयाबद्दल त्यांच्याकडे कारणे व खुलासे अपेक्षित करणारी माहिती मागणे व जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास अशाप्रकारचे त्यांच्या कृतीबद्दलचे खुलासे व स्पष्टीकरणे अर्जदारास देणे, अशाप्रकारची प्रक्रिया अभिप्रेत नाही. त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व २ शी संबंधित माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे, ती अधिनियमातील कलम ७ (१) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उपलब्ध करुन देणे त्यांना क्रमप्राप्त होते. या प्रकरणी ही माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात प्रत्यक्षात केव्हा उपस्थित झाले, याचा कोणताही पुरावा त्यांनी

आयोगाकडे सादर केलेला नाही. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०२.०४.२००९ रोजी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आदेश पारित केल्यानंतर अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३.०४.२००९ रोजी याच माहितीकरिता स्मरणपत्र दिले होते. यावरुन असा निष्कर्ष काढण्यात येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न केले आहेत. तथापि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील ज्या आस्थापना शाखेशी संबंधित होती, त्या आस्थापना शाखेच्या श्री. अब्दुल खालीद या वरिष्ठ लिपीकाने जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक १२.०१.२००९ रोजी दिलेल्या पत्रातील व नंतर दिनांक १३.०२.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या पत्रातील सूचनांकडे पूर्णपणे दुर्लक्ष करुन अपिलार्थीस आवश्यक माहितीपासून वंचित ठेवल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना अर्जदारास माहिती देण्याकरिता त्या माहितीशी संबंधित कर्मचारी व जन माहिती अधिकारी यांचे सहायक या सर्वजणांना जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतूद आहे. ही तरतूद पाहता, या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आस्थापना शाखेतील ज्या लिपीकाकडे उपलब्ध आहे ते लिपीक जन माहिती अधिकारी असल्याचे आयोग मानत आहे. त्यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या माहितीपासून वंचित ठेवून स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे.

आज रोजी संबंधित वरिष्ठ लिपीक आयोगासमोर उपस्थित नाहीत. त्यांना त्यांच्या बचावाची संधी देण्याच्या दृष्टीने असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल विलंबाच्या प्रतिदिनी रु. २५०/- याप्रमाणे त्यांना एकूण रु. २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी आयोगास हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत सरळ सादर करावा. हा खुलासा या

कालावधीत प्राप्त न झाल्यास अपिलार्थीस कोणत्याही समर्थनिय कारणाशिवाय माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याचे श्री. अब्दुल खालीद यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली व वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली अपिलार्थीस देय असलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३ दिवसाच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीने या प्रकरणी व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे, अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित होताच ३ दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांच्याकडून पूर्वनियोजित वेळी हस्तगत करुन घ्यावी लागेल. ही माहिती अपिलार्थीच्या प्रतिनिधीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील देय माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. अब्दुल खालीद, वरिष्ठ लिपीक) यांनी अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन देण्यासाठी वंचित ठेवल्याबद्दल त्यांच्यावर एकूण रु. २५,०००/- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत आयोगास सरळ सादर करावा.

निर्णय

<u>अपील क्रमांक ३९३/२००९</u>

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७.०४.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९.१२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयातील श्री. एम. एन. डांगे, शाखा अभियंता, धर्माबाद व श्री. ए.जी. करपे, उपविभागीय अभियंता, धर्माबाद यांच्या अनुक्रमे दिनांक ११.०७.२००६ ते ३१.१२.२००७, ०१.०७.२००८ ते ३०.०९.२००८ व दिनांक २०.०९.२००७ ते ३१.०१.२००८ आणि ०१.०५.२००८ ते ३०.०९.२००८ या कालावधीच्या दैनंदिनीच्या प्रतीची मागणी केली होती. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०६.०२.२००९ रोजी प्रथम अपील केले असता, या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०२.०४.२००९ रोजीच्या निर्णयाद्वारे अपिलार्थीस ८ दिवसाच्या आत माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकरी यांना सूचित केले. यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, त्रयस्थ पक्ष श्री. ए. जी. करपे, तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी हे सर्वजण आज रोजी आयोगासमोर उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. डांगे, शाखा अभियंता व श्री. करपे, उपविभागीय अभियंता, धर्माबाद यांच्या काही कालावधीच्या दैनंदिनीच्या प्रतीची मागणी केली होती. तथापि त्यांना श्री. एम. एन. डांगे, शाखा अभियंता यांच्या दैनंदिनीची प्रत दिनांक ०७.०५.२००९ रोजी प्राप्त झाली. श्री. ए. जी. करपे, उप विभागीय अभियंता यांच्या दैनंदिनीची प्रत त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली नाही. त्यामुळे त्यांना मूळ अर्जातील उर्वरित माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्वरित उपलब्ध करुन द्यावी आणि विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिल्याबद्दल संबंधितांवर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई आदेशित व्हावी.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, धर्माबाद व त्यांच्या कार्यालयातील आस्थापना शाखेशी संबंधित असल्यामुळे, त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याकरिता उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, धर्माबाद व आस्थापना १ या शाखेकडे अपिलार्थीच्या अर्जाची प्रत दिनांक ३१.१२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे देऊन ही माहिती ८ दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर करण्याचे सूचित केले होते. तथापि संबंधितांच्याकडून त्यांना मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत. यानंतर आयोगाने जन माहिती अधिकारी यांना, श्री. करपे यांची त्यांच्या कार्यालयाकडे दिनांक २६.०३.२००८ व १६.१२.२००८ रोजी व श्री. डांगे यांच्या संदर्भातील माहिती त्यांच्याकडे दिनांक २५.०२.२००९ रोजी प्राप्त झाल्यानंतरही माहिती अपिलार्थीस न देण्याचे कारण विचारले असता, ते या मुद्यासंदर्भात आयोगास आयोगाने त्यांच्या बचावाची पुरेपुर संधी देऊनही, कोणताही खुलासा करु शकले नाहीत.

श्री. करपे यांच्या दैनंदिनी संदर्भात त्यांनी आयोगास असे अवगत केले आहे की, ते ही माहिती अपिलार्थीस ३ दिवसाच्या आत उपलब्ध करुन देतील.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २९.१२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली दोनही मुद्यांवरील माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत व सार्वजनिक स्वरुपाची आहे, त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः त्यांच्या दिनांक ३१.१२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या अधिकाऱ्यांच्या ताब्यात आहे, त्या अधिकाऱ्यांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे सादर करण्याचे सूचित केले होते. परंतु संबंधितांच्याकडून जन माहिती अधिकारी यांना माहिती प्राप्त न झाल्याने ते अपिलार्थीस मुदतीत माहिती पुरवू शकले नाहीत, असे त्यांचे म्हणणे आहे. तथापि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, श्री. करपे यांनी त्यांच्या दैनंदिनीची प्रत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास दिनांक २६.०३.२००८ व १६.१२.२००८ रोजी सादर केली आहे. तसेच आस्थापना १ शी संबंधितांनी श्री. डांगे यांच्या संदर्भातील माहिती दिनांक २५.०२.२००९ रोजी सादर केली होती, असे दिसून येत आहे. याचा अर्थ जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही दिनांक २५.०२.२००९ रोजी म्हणजे, अपिलार्थीचे प्रथम अपील प्राप्त झाल्यानंतर पूर्णपणे उपलब्ध होती. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०२.०४.२००९ रोजी निर्णय देऊनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ८ दिवसाच्या आत माहिती पुरविली नाही. त्यांनी अपिलार्थीस प्रथमतः दिनांक ०५.०५.२००९ रोजीच्या पत्राद्वारे माहिती पुरविली. तथापि या माहितीमध्ये अपिलार्थीच्या मूळ अर्जातील श्री. करपे यांच्या दैनंदिनीच्या प्रतीचा समावेश नाही. त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस विलंबाने व अपूर्ण स्वरुपात प्राप्त झाल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. तसेच अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक

२५.०२.२००९ रोजी उपलब्ध असून त्यांनी ही माहिती अपिलार्थीस लागलीच किंवा, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०२.०४.२००९ रोजीच्या निर्णयामध्ये विहित केलेल्या कालावधीमध्ये का पुरविली नाही, याचे कारण आज रोजी सुनावणीच्या वेळी तत्कालीन जन माहिती अधिकारी आयोगास स्पष्ट करु शकले नाहीत. त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध असताना देखिल अपिलार्थीस माहिती न देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव या प्रकरणी स्पष्ट केल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब सचिव, सार्वजनिक बांधकाम यांना संबंधित जन माहिती अधिकारी श्री. प्रमोद पंडितराव देशपांडे, उपविभागीय अभियंता यांचेवर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस उर्वरित माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीने या प्रकरणी व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे, ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात पूर्वनियोजित वेळी स्वतः उपस्थित राहून जन माहिती अधिकारी यांच्याकडून हस्तगत करुन घ्यावी लागेल, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

३. सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना श्री. प्रमोद पंडितराव देशपांडे, उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर यांचेवर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

निर्णय

अपील क्रमांक ३९४/२००९

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४.०२.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व ५ ची माहिती उशिरा दिल्यामुळे आणि मुद्दा क्रमांक ४ ची माहिती अद्यापपावेतो त्यांना जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १४.१०.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे त्रयस्थ पक्ष श्री. के. एम. दीक्षित यांच्या संदर्भात एकूण ५ मुद्यांद्वारे काही माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २०.११.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस मुद्दा क्रमांक १ व ३ शी संबंधित माहिती दिली. तथापि प्राप्त माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २७.११.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०३.०१.२००९ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व ५ शी संबंधित माहिती सुनावणीच्या दिवशी देण्याचे आदेशित केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व ५ शी संबंधित माहिती त्यांना दिनांक १६.१२.२००८ रोजी उपलब्ध करुन दिली. तथापि ही माहिती विलंबाने प्राप्त झाल्याच्या

कारणावरुन आणि त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ शी संबंधित माहिती त्यांना अद्यापपावेतो प्राप्त न झाल्याच्या कारणावरुन व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.०१.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, त्रयस्थ पक्ष, तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी आणि अपिलीय अधिकारी हे सर्वजण आज रोजी आयोगासमोर उपस्थित आहेत.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जातील निवेदनाशी सुसंगत युक्तिवाद आयोगासमोर केला व त्यांना आवश्यक असलेली माहिती संबधितांच्याकडून वेळेत प्राप्त न झाल्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची आणि ही माहिती, माहिती अधिकाऱ्यास त्यांना विनामूल्य देण्याचे आदेशित करण्याची आयोगास विनंती केली.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती उपअभियंता, धर्माबाद यांच्या प्रत्यक्षात ताब्यात असल्यामुळे, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे जसजशी माहिती उपलब्ध करुन दिली, तसतशी त्यांनी ती अपिलार्थीस हस्तांतरीत केलेली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी त्रयस्थ पक्ष, श्री. दीक्षित यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ द्वारे मागणी केलेली माहिती त्यांनी अभियंता श्री. मनुरकर, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, धर्माबाद यांच्याकडे वेळेत सादर केली आहे. तथापि श्री. मनुरकर यांनी या दैनंदिनीवर सह्या न केल्यामुळे ती अपिलार्थीस उपविभागाकडून दिली गेली नसावी. अपिलार्थीने मागणी केलेली त्यांच्या दैनंदिनीची प्रत अपिलार्थीस देण्यासाठी त्यांची कोणतीही हरकत नाही.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी, जन माहिती अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक

१ व ३ शी संबंधित माहिती दिनांक २०.११.२००८ रोजी व मुद्दा क्रमांक २ व ५ शी संबंधित माहिती दिनांक १६.१२.२००८ रोजी हस्तांतरीत केली गेली आहे. अपिलार्थीचे म्हणणे असे आहे की, ही माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विलंबाने प्राप्त झाली आहे. परंतु अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहिती मागितली आहे, हा मुद्दा येथे लक्षात घेणे आयोगास गरजेचे वाटते. या मुद्यासंदर्भात अपिलार्थीस त्यांना अपेक्षित असलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून स्वतः हस्तगत करुन घ्यावयाची होती. जन माहिती अधिकारी यांच्याकडे या कालावधीमध्ये कार्यालयात उपस्थित राहिल्याचा एखादा पुरावा त्यांच्याकडे उपलब्ध आहे काय, असे आयोगाने विचारले असता, अपिलार्थीने अशाप्रकारचा कोणताही पुरावा त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे आयोगास अवगत केले. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे 'व्यक्तिशः' माहितीची मागणी केल्यानंतर ही माहिती हस्तगत करण्याचे संपूर्ण उत्तरदायित्व हे अर्जदाराचे असते. अर्जदाराने त्यांचे हे उत्तरदायित्व विहित वेळेत पार पाडल्याचा कोणताही पुरावा आयोगासमोर सादर केला नसल्यामुळे, अशा प्रकारच्या पुराव्याअभावी अपिलार्थीच्या द्वितीय अपील अर्जातील त्यांचा, त्यांना मुद्दा क्रमांक २ व ५ शी संबंधित माहिती उशिरा मिळाली हा मुद्दा, आयोग फेटाळून लावत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ च्या संदर्भात त्रयस्थ पक्षाच्या युक्तिवादावरुन असे आढळून येत आहे की, ही माहिती उपविभागीय अभियंता, धर्माबाद यांच्या कार्यालयातील श्री. मनुरकर, अभियंता यांच्याकडे उपलब्ध आहे. तथापि श्री. दीक्षित यांनी सादर केलेल्या दैनंदिनीच्या प्रतीवर श्री. मनुरकर यांनी अद्यापपावेतो स्वाक्षरी न केल्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ शी संबंधित माहिती प्राप्त झाली नसावी, असे अनुमान त्रयस्थ पक्ष श्री. दीक्षित काढत आहेत. श्री. दीक्षित यांनी त्यांच्या दैनंदिनीची प्रत श्री. मनुरकर शाखा अभियंता धर्माबाद यांच्याकडे सादर केली असल्याने आणि श्री. मनुरकर हे सार्वजनिक प्राधिकरणाचे नियमीत आस्थापनेवरील कर्मचारी असल्याने व या माहितीमध्ये कोणतीही गोपनियता नसल्यामुळे, श्री. दीक्षित यांनी श्री. मनुरकर यांच्याकडे सादर केलेली दैनंदीनीची प्रत ही माहिती सार्वजनीक स्वरुपाची माहिती

असल्याचे सिध्द होत आहे. त्यामुळे श्री. मनुरकर यांनी श्री. दीक्षित यांच्या दिनांक ०१.०६.२००८ ते ३०.०९.२००८ या कालावधीत त्यांच्याकडे सादर करण्यात आलेल्या दैनंदिनीच्या प्रती जशाच्या तशा उपविभागीय अभियंता, धर्माबाद यांच्याकडे सादर करण्यास कोणतीही अडचण नव्हती. तथापि उपविभागीय अभियंता, धर्माबाद उपविभाग यांनी मूळात श्री. मनुरकर यांच्याकडे श्री. दीक्षित यांच्या दैनंदिनीच्या प्रतीची मागणी केली होती किंवा कसे हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्राच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही. परंतु या संपूर्ण घटनाक्रमाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ शी संबंधित माहिती प्राप्त न होण्यासाठी उपविभागीय अभियंता, धर्माबाद व श्री. मनुरकर, शाखा अभियंता हे एकत्रितपणे जबाबदार असल्याचे या प्रकरणी आढळून येत आहे. त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या अर्जावर विहित मुदतीत कार्यवाही न करता व अपिलार्थीस माहिती देण्याची कोणतीही व्यवस्था न करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीबद्दल ते अधिनियमातील कलम २० (२) च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र होत आहे. सबब सचिव, सार्वजनिक बांधकाम यांना संबंधित उपविभागीय अभियंता, श्री. करपे ए.जी. व श्री. मनुरकर शाखा अभियंता यांचेवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ च्या संदर्भातील माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ शी संबंधित माहिती धर्माबाद उपविभागाकडून असेल तशी प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली असल्याने त्यांना आता ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपरोक्त कालावधीमध्ये पूर्वनियोजित वेळी स्वतः उपस्थित राहून संबंधितांकडून हस्तगत करुन घ्यावी लागेल, असे अपिलार्थीस सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ शी संबंधित माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

३. सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना, या प्रकरणाशी संबंधित उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, धर्माबाद श्री. ए.जी. करपे व श्री पी. के. मनुरकर, शाखा अभियंता यांचेवर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक १६.०१.२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सय्यद खाजा सय्यद मीरा, रा. रहेमान मंजील घर क्रं. ९-६-२२०, उमर कॉलनी मस्जीदसमोर, देगलूर रोड, नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा रजा व प्रशिक्षण राखीव उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ श्री. अब्दुल खालीद, वरिष्ठ लिपिक, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, जि. नांदेड

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालाद्वारे)

५ श्री. ए. जी. करपे, उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, धर्माबाद, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ श्री. पी. के. मनुरकर, शाखा अभियंता धर्माबाद, जि. नांदेड, यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ श्री. पी. पी. देशपांडे, उपविभागीय अभियंता, उपविभाग भोकर, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८ सचिव (सार्वजनिक बांधकाम), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

९ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले

क्रमांक ३९५/२००९, ३९७/२००९ व ३९६/२००९

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३९५, ३९७ व ३९६

निर्णय दिनांक १६-०१-२०१०

१ श्री. सय्यद खाजा सय्यद मीरा, : अपिलार्थी

रहेमान मंजील, घर क्रमांक ९-६-२२०, उमर कॉलनी,

मस्जीदसमोर, देगलूर रोड, नांदेड

विरुध्द

अपील क्रमांक ३९५/२००९

१ जन माहिती अधिकारी

तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,

भोकर, तालुका भोकर, जिल्हा नांदेड

अपील क्रमांक ३९७/२००९ व ३९६/२००९

१ जन माहिती अधिकारी

तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,

धर्माबाद, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा कार्यकारी अभियंता,

सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, तालुका भोकर,

जिल्हा नांदेड

त्रयस्थ पक्ष : अपील क्रमांक ३९६/०९ : श्री. एम. एन. डांगे

निर्णय

अपील क्रमांक ३९५/२००९

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली कोणतीही माहिती त्यांना उपलब्ध करुन न दिली गेल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक २२-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, भोकर यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील मोजमाप पुस्तकाच्या संदर्भात एकूण तीन मुद्दयाव्दारे व्यक्तिश: माहिती मागितली होती. तथापि अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०३-०१-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि या कालावधीमध्ये माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना दिनांक २४-०२-२००९ रोजी प्राप्त झाली आहे. सदर

माहिती त्यांना विलंबाने प्राप्त झाली असल्याने संबंधितांवर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई व्हावी अशी अपेक्षा त्यांनी आयोगाकडे व्यक्त केली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती एका विशिष्ट प्रपत्रातील असल्याने व ही माहिती त्यांना कनिष्ठ अभियंता यांच्याकडून प्राप्त करुन घेणे गरजेचे असल्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे संकलन करण्यासाठी त्यांना वेळ लागला.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती ही विशिष्ट स्वरुपात नसल्यामुळे आणि अशा प्रकारची माहिती संकलीत करण्याची पध्दत सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये नसल्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती देय असणार नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व ३ शी संबंधित माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २४-०२-२००९ रोजी दिली आहे. त्यामुळे आता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती देय नाही. तथापि अपिलार्थीचे म्हणणे असे आहे की, त्यांना या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडून विलंबाने माहिती प्राप्त झाली असल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई होणे गरजेचे आहे. अपिलार्थीस उपलब्ध करुन दिलेली माहिती अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये विहित केलेल्या प्रपत्रामध्ये दिली आहे काय अशी विचारणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे केल्यानंतर त्यांनी, आयोगाच्या या प्रश्नास नकारार्थी उत्तर दिले आहे व अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना देण्यासाठी उशीर केल्याचे जे कारण जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या वरील युक्तिवादामध्ये स्पष्ट केले आहे त्या कारणाचे समर्थन होऊ शकत नाही. तसेच अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना दिनांक ०३-०१-२००९ रोजी ज्ञात असताना देखील अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानुसार आठ

दिवसाच्या आत माहिती देण्याऐवजी ती माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २४-०२-२००९ रोजी म्हणजे २६ दिवसाच्या विलंबाने दिली आहे. अपिलार्थीस विलंबाने माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांचे समर्थन आयोग अमान्य करत आहे व अपिलार्थीस विलंबाने माहिती देऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी (श्री. पी. पी. देशपांडे, उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, भोकर) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपील क्रमांक ३९७/२००९

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व २ ची अर्धवट व चुकीची माहिती दिली असल्याचे नमूद करुन उपविभागातील ११६ मोजमाप पुस्तिकांची माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिली नसल्याचे आयोगास अवगत केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक २०-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे अपील क्रमांक ३९५/२००९ च्या संदर्भात जी माहिती विचारली होती तीच माहिती उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, धर्माबाद यांच्याकडे मागितली आहे. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रथमत: त्यांच्याकडील दिनांक १५-११-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०३-०१-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत उर्वरित माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले.

मध्यंतरीच्या काळात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १९-१२-२००८ रोजी काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, धर्माबाद उपविभागामध्ये एकूण मोजमाप पुस्तिका किती व त्यांचे क्रमांक कोणते आहेत याची माहिती त्यांनी सार्वजनिक बांधकाम उपविभाग, धर्माबाद यांच्याकडे विचारली होती. तथापि ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीशी जुळत नसल्याने, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या प्रकरणाशी संबंधित दिलेल्या माहितीची प्रत, त्यांनी त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ आयोगास दाखविली. अपिलार्थीने आयोगास असे अवगत केले की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी १९६ मोजमाप पुस्तिकांची माहिती दिलेली नाही. अपिलार्थीने त्यांचे हे विधान पुराव्यासह आयोगास सिध्द करुन दिले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून एकूण ११६ मोजमाप पुस्तिकांच्या संदर्भात माहिती प्राप्त झालेली नाही. सार्वजनिक बांधकाम विभागामधील मोजमाप पुस्तिकांच्या मुद्याचे गांभीर्य लक्षात घेता अपिलार्थीने उपस्थित केलेल्या या मुद्दयाची दखल घेणे आयोगास आवश्यक वाटते. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या अपिलामध्ये जरी त्यांना ११६ मोजमाप पुस्तिकांची माहिती प्राप्त झाली नसल्याचे कबूल केले असले तरी प्राप्त न झालेल्या मोजमाप पुस्तिकेच्या संख्येची पाहणी केली असता अपिलार्थीस ११५ मोजमाप पुस्तिकांची माहिती देण्याचे बाकी राहिले असल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली ही माहिती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती आता द्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस न दिलेली आणि दिलेली माहिती या दोनही माहितींची तुलना करुन अपिलार्थीस आतापर्यंत ज्या ११५ मोजमाप पुस्तिकांच्या संदर्भातील माहिती देणे बाकी आहे ती माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. या कालावधीमध्ये जर अपिलार्थीस अद्याप द्यावयाच्या मोजमाप पुस्तिकांच्या प्रती त्यांना आढळून आल्या नाहीत तर त्यांनी या मोजमाप पुस्तिका ज्या अभियंत्याकडे दिल्या होत्या त्यांच्यावर फौजदारी स्वरुपाची कारवाई याच कालावधीमध्ये करावी आणि एफ. आय. आर. ची प्रत अपिलार्थीस याच कालावधीमध्ये विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणत्याही असद्हेतूने अर्धवट माहिती पुरविल्याचे नि:संशयपणे सिध्द होत नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची अपिलार्थीची विनंती आयोग अमान्य करत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपील क्रमांक ३९६/२००९

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना अर्धवट व दिशाभूल करणारी माहिती उशिरा दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ३१-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयातील श्री. एम. एन. डांगे, शाखा अभियंता यांना दिनांक ११-०७-२००६ ते ३०-०९-२००८ पर्यंत दिलेल्या कामांच्या संदर्भात माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या या माहितीमध्ये - कामांची यादी, निविदा क्रमांक, दिनांक, सदर निविदा वृत्तपत्रात जाहिरात देऊन बोलाविण्यात आल्या होत्या किंवा उपविभागीय स्तरावर निविदा तयार करण्यात आल्या होत्या याबाबतची तपशीलवार यादीसह माहिती, वृत्तपत्राव्दारे निविदा मागविण्यात आल्यास वृत्तपत्राची साक्षांकीत व वाचनीय प्रत, वृत्तपत्रात जाहिरात दिली नसल्यास याबाबतची कारणे व याची पुष्टी म्हणून शासनाच्या आदेशाच्या साक्षांकीत प्रती व कामाचे कार्यारंभ आदेश - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिश: मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः त्यांच्यकडील दिनांक २७-०१-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ३४ इतके व टपालखर्च रुपये १० इतक्या रकमेचा भरणा त्यांच्या कार्यालयात करण्याचे अपिलार्थीस सूचित केले. तथापि अशी कारवाई न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०२-०४-२००९ रोजी आपले आदेश पारीत करुन अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यापूर्वीच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २०-०३-२००९ रोजी ही माहिती व्यक्तिशः उपलब्ध करुन दिली होती. अपिलार्थीस प्राप्त झालेली माहिती अर्धवट व चुकीची असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना मुद्दा क्रमांक ४ शी संबंधित माहिती अद्यापपावेतो संपूर्णरित्या प्राप्त झालेली नाही. त्यांना प्राप्त झालेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ मधील निविदा क्रमांक व दिनांक ही माहिती अद्याप जन माहिती अधिकारी यांच्याकडून अप्राप्त आहे व तसेच मुद्दा क्रमांक ४ मधील शासनाच्या आदेशाच्या साक्षांकीत प्रती ही माहिती त्यांना अद्यापपावेतो मिळालेली नाही, असेही त्यांनी आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, ही माहिती कार्यकारी अभियंता यांच्या विभागाशी संबंधित असून आता ते अपिलार्थीने मागणी केलेली माहिती कार्यकारी अभियंता

सार्वजनिक बांधकाम विभाग, यांच्याशी संपर्क साधून अपिलार्थीस सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवतील.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अर्धवट व चुकीची माहिती दिली असल्याचे आयोगाकडील केलेल्या व्दितीय अपील अर्जातील नमूद केलेले म्हणणे ब-याच अंशी या प्रकरणी सिध्द होत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ मधील श्री. एम. एन. डांगे, शाखा अभियंता यांच्याकडील दिनांक ११-०७-२००६ ते ३०-०९-०८ या कालावधीतील या कामांचे निविदा क्रमांक व दिनांक जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाले नाहीत. तसेच अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ मधील अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे या कामाची जाहिरात वृत्तपत्रात दिली नसल्यास त्याची सविस्तर कारणे मागितली आहेत. ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून, ती अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत नसल्यामुळे, देय होत नाही. तथापि या मुद्दयातील शासनाच्या आदेशाची साक्षांकीत प्रत ही माहिती मात्र अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ मधील कामांचे निविदा क्रमांक व दिनांक व मुद्दा क्रमांक ४ मधील शासनाच्या आदेशाची साक्षांकीत प्रत ही माहिती अपिलार्थीस त्यांनी हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक १६-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सय्यद खाजा सय्यद मीरा, रहेमान मंजील, घर क्रमांक ९-६-२२०, उमर कॉलनी, मस्जीदसमोर, देगलूर रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, भोकर, तालुका भोकर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, धर्माबाद, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, तालुका भोकर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३९८

निर्णय दिनांक १६-०१-२०१०

१ श्री. सय्यद खाजा सय्यद मीरा, : अपिलार्थी
रहेमान मंजील, घर क्र. ९-६-२२०, उमर कॉलनी,
मस्जीदसमोर, देगलूर रोड, नांदेड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यालय अधीक्षक,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,
नांदेड

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांनी मागणी केलेली माहिती १९ दिवसाच्या विलंबाने व साक्षांकीत न करता विनामूल्य दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ०३-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०१-१९९५ ते ३१-१२-२००१ या कालावधीतील स्वातंत्र्य सैनिकांनी नामनिर्देशित केलेल्या कर्मचा-यांच्या नेमणुकासंदर्भात काही माहिती एकूण ४ मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलर्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे या माहितीपैकी मुद्दा क्रमांक ३ शी संबंधित माहिती साक्षांकीत स्वरुपात व संपूर्ण माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०१-०१-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ३५६ इतके त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या संपूर्ण शुल्काचा तपशील या पत्रामध्ये दिलेला आहे. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे न करता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०३-०३-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यापूर्वीच जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २०-०१-२००९ रोजी अपिलार्थीस संपूर्ण माहिती दिली होती. अपिलार्थीस या प्रकरणी आवश्यक ती माहिती प्राप्त झाली. परंतु ती उशीराने आणि विनामूल्य व साक्षांकीत केलेली नसल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना १९ दिवसाच्या विलंबाने माहिती प्राप्त झाली आहे. तसेच त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व्दारे त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य प्राप्त झाली आहे. त्यांना विनामूल्य माहिती प्राप्त झाली असल्यामुळे माहितीपोटीचे शुल्क जन माहिती

अधिकारी यांच्याकडून वसूल करावे, अशी त्यांनी आपल्या युक्तिवादाच्या अखेरीस आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस प्रथमतः दिनांक ०१-०१-२००९ रोजीच्या पत्राव्दारे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा करण्याचे सूचित केले होते. तथापि अशी कार्यवाही न करता तदनंतर अपिलार्थीने दिनांक १५-०१-२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. त्यानंतर दिनांक २०-०१-२००९ रोजी त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती विनामूल्य पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०३-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ' व्यक्तिशः ' माहितीची मागणी केल्यानंतर या अर्जासंबंधातील पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेणे हे अर्जदाराचे उत्तरदायित्व असते. या प्रकरणी अपिलार्थीस ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी स्वतः कधी उपस्थित झाले याचा पुरावा आयोगाकडे सादर करता आला नाही. परंतु एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०१-०१-२००९ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ३५६ इतके भरण्याचे सूचित केले. परंतु याप्रमाणे कार्यवाही न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. हे अपील केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २०-०१-२००९ रोजी संपूर्ण माहिती अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जामध्ये विनंती केल्याप्रमाणे साक्षांकीत करुन पुरविली आहे. अर्जदाराने व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी स्वतः होऊन अर्जदारास त्यांना आवश्यक असलेल्या

माहितीपोटीचे शुल्क कळविण्याची आवश्यकता नाही. एवढे असूनही या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क विहित मुदतीत कळविले आहे. केवळ अपिलार्थीने या पत्राचा स्वीकार न केल्यामुळे, अपिलार्थीस त्यांनी विनामूल्य माहिती पुरविली, ही जन माहिती अधिकारी यांच्याकडून झालेली चूक आहे. तथापि ही चूक जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या गैरसमजुतीमधून झाली असून या चुकीकरता, अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे, अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्यावर कारवाई आयोगास करता येणार नाही. जर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सशुल्क माहिती विनामूल्य देऊन त्यांच्या सेवाशर्तीचा भंग केला असल्याचे अधीक्षक अभियंता यांना वाटत असेल तर ते संबंधिताविरुध्द आवश्यकतेप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करु शकतात. अधिनियमातील कलम २० ची तरतुद ही जन माहिती अधिका-याने अर्जदारास माहिती न दिल्यास त्यांच्यावर शास्तीची कारवाई करण्यासंदर्भात आहे. या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिका-याने विनामूल्य माहिती दिली आहे, अशा वेळी आयोगाने जन माहिती अधिकारी यांच्यावर कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करण्याचे आदेश देणे अधिनियमामध्ये अभिप्रेत नाही. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे हेतूपुरस्सर टाळले असल्याचे या संपूर्ण घटनाक्रमाच्या कोणत्याही टप्प्यावर आयोगाच्या निदर्शनास न आल्यामुळे अपिलार्थीची, जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची विनंती, आयोगास मान्य करता येणार नाही. याउलट अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांना दिनांक ०२-०१-२००९ रोजी ज्ञात होऊनही त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती प्राप्त करुन घेतली असल्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीकरिता आवश्यक त्या शुल्काचा भरणा आता जन माहिती अधिकारी यांच्याकडे करणे गरजेचे आहे. त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांचे दिनांक ०३-०३-२००९ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त झाली असल्याने आणि ज्या कारणाकरिता जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्याची अपिलार्थीने आयोगाकडे विनंती केली आहे ते कारण माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीशी सुसंगत नसल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

<u>आदेश</u>

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक १६-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सय्यद खाजा सय्यद मीरा, रहेमान मंजील घर क्र. ९-६-२२०, उमर कॉलनी, मस्जीदसमोर, देगलूर रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले

क्रमांक ४२५/२००९ व ४२६/२००९

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४२५ व ४२६

निर्णय दिनांक १६-०१-२०१०

१ श्री. पटेल महंमद एकबाल महंमद कासीम, : अपिलार्थी

रा. घर नं. ९-४-१०६१, रामरहिमनगर, पोस्ट ईतवारा,

नांदेड

विरुध्द

१ अपील क्रमांक ४२५/२००९ व ४२६/२००९

जन माहिती अधिकारी

तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नांदेड

त्रयस्थ पक्ष : १. श्री. खांडवे व श्री. गोणारे

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-०६-२००९ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या दोनही अपील अर्जांशी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी हे एकच असल्यामुळे आणि अपिलार्थीने एकाच दिवशी दोन स्वतंत्र व्दितीय अपिले सादर केली असल्यामुळे या दोनही अपील अर्जांवर एकत्रितपणे सुनावणी घेण्यात येत आहे.

या अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, अपील क्रमांक ४२५/२००९ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-०३-२००९ रोजी व अपील क्रमांक

४२६/२००९ च्या संदर्भात दिनांक १२-०३-२००९ रोजी माहिती मागितली असता त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दिनांक २०-०४-२००९ रोजी दोन स्वतंत्र प्रथम अपिले दाखल केली. तथापि या दोनही प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी न घेता प्रकरण प्रलंबीत ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपिले आयोगाकडे सादर केली आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या व्दितीय अपील क्रमांक ४२५/२००९ च्या संदर्भात दिनांक १७-०३-२००९ रोजी व अपील क्रमांक ४२६/२००९ च्या संदर्भात दिनांक १२-०३-२००९ रोजी उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील काही माहिती मागविली असता या दोनही अर्जासंदर्भात त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०४-२००९ रोजी दोन स्वतंत्र प्रथम अपिले सादर केली. अपिलार्थीच्या या अपील अर्जांवर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिले सादर केली आहेत.

वरील प्रकरणांची सुनावणी आज दिनांक १६-०१-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपील क्रमांक ४२५/२००९ शी संबंधित अपिलार्थी हजर व जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष गैरहजर आहेत. अपील क्रमांक ४२६/२००९ शी संबंधित अपिलार्थी हजर व जन माहिती व अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता या प्रकरणी अपिलार्थींच्या दिनांक २०-०४-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जांवर जन अपिलीय अधिकारी

यांनी या टप्प्यावर सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नांदेड यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थींच्या दिनांक २०-०४-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जांवर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थींची राज्य माहिती आयोगाकडे केलेली दोनही व्दितीय अपिले निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील क्रमांक ४२५/२००९ व अपील क्रमांक ४२६/२००९ निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नांदेड यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थींच्या दिनांक २०-०४-२००९ रोजीच्या दोनही प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक १६-०१-२०१० **राज्य माहिती आयुक्त**

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. पटेल महंमद एकबाल महंमद कासीम, रा. घर नं. ९-४-१०६१, रामरहिमनगर,

पोस्ट ईतवारा, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.